
# धर्मभास्कर

पं. दत्तमहाराज कवीश्वर
विशेषांक. मे १९९९
मूल्य रु. २०/-



जन्म : २ मार्च १९१० ब्रह्मलीन ब्रह्मर्षि पं. श्रीदत्तमहाराज कवीश्वर निर्वाण : [illegible]१ मार्च १९९९




प. प. टेंबेस्वामी महाराज



प. प. श्रीदीक्षित महाराज



श्रीदत्त अमरेश्वर



सद्‌गुरू प. पू. श्रीगुळवणी महाराज



सद्‌गुरू प. प. श्रीदत्तमहाराज

# संपादकीय


धर्माचार्य ब्रह्मचारी विश्वनाथजींच्या प्रेरणेनुसार २८ वर्षांपूर्वी धर्मभास्कर हे मासिक आम्ही सुरू केले. मा. ब्रह्मचारी विश्वनाथजी वयाच्या दहाव्या वर्षी मसुराश्रमात आत्मप्रेरणेने भरती झाले आणि पुढची चोपन्न वर्षे एका विशिष्ट ध्येयाने भारित होऊन मसुराश्रमाचे कार्य अविरतपणे करीत राहिले. मसूराश्रमाचे संस्थापक प. पू. विनायक महाराज मसूरकर यांचे मार्गदर्शनात त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला. हिंदुत्वाच्या व शुद्धिआंदोलनाच्या प्रचाराकरिता-प्रसाराकरिता ते जिवाचे रान करीत. प. पू. मसूरकर महाराज १९५५ मध्ये समाधिस्थ झाल्यावर ज्येष्ठ गुरूबंधू मा. ब्रह्मचारी दत्तमूर्ती यांच्या सल्ल्यानुसार हिंदुत्वाच्या प्रभावी प्रचाराकरिता, शुद्धिकरणाच्या कार्याची माहिती सामान्य जनांना मिळावी या हेतून त्यांनी लहानसेच का होईना 'मसुराश्रमपत्रिका' नावाचे एक इंग्रजी मासिक सुरू केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. वर्गणीदारांची संख्या पद्धतशीर प्रयत्न केल्यामुळे चांगली वाढू लागली. हे सारे काही चांगले चालत असले तरी आपल्या कार्याचे क्षेत्र मुख्यत्वेकून महाराष्ट्र असल्याने एखादे मराठी नियतकालिक काढावे असे विचार बळावू लागला. पण मनुष्यबळ आणि अर्थबळाची वानवाच होती. बरीच चर्चा झाली. विचार विनिमय झाला व परिणामी आम्ही स्वतःच्या हिकमतीवर व जबाबदारींवर धर्मभास्कर नावाचे मासिक काढावे असे ठरले. तदनुसार मे १९७१ मध्ये धर्मभास्करचा पहिला अंक प्रकाशित झाला आणि त्या दिवसापासून ते आजपर्यंत धर्मभास्कर प्रतिमास नियमितपणे प्रकाशित होत आहे. मध्यंतरी काही अडचणी आल्या. मा. ब्रह्मचारी विश्वनाथजींचे निर्वाण होऊन दहा वर्षे होऊन गेली. पण मा. ब्र. विश्वनाथजींच्या आशीर्वादामुळे आणि आपणासारख्या अनेकांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे धर्मभास्करचे प्रकाशन सुरळितपणे चालू आहे. आजची मराठी (केवळ मराठीच नव्हे तर एखाद दुसरा अपवाद वगळता सरसकट भारतीय भाषांतील) मासिकांची स्थिती फारशी चांगली नाही. त्या परिप्रेक्षात धर्मभास्करच्या वर्गणीदारांची संख्या नक्कीच चांगली आहे. ही परमेश्वरी कृपा व आपणा सर्वांच्या सक्रिय सहयोगाचे सुफल होय. धर्मभास्करला अनेक हिंदूत्वप्रेमी सज्जनांनी उचलून धरले आहे, हे कृतज्ञतेने नमूद करायला हवे.

या वर्षीचा हा २९ वा वर्षारंभ विशेषांक पुण्यातील शैक्षणिक क्षेत्रातील व आध्यात्मिक क्षेत्रातील यथार्थपणे सज्जन असलेल्या व नुकतेच (१ मार्च ९९) निर्वाण झालेल्या ब्रह्मर्षि पं. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचेवर आहे. आमचे सहाध्यायी व समविचारी पं. श्री. धुं. कवीश्वर (महाराष्ट्र शासनाचे संस्कृतविषयक मानार्ह संघटक) हे पं. दत्तमहाराजांचे धाकटे बंधू. आम्ही प. पू. दत्तमहाराजांचे प्रत्यक्ष अंतेवासी नसलो तरी पं. श्री. धुं. कवीश्वरांच्या मुळे त्यांच्या दर्शनाचा योग मधूनमधून येत असे. त्यांच्या धीरगंभीर पण प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने, न्याय वेदान्तादिशास्त्रावरील त्यांच्या असामान्य अधिकाराने आणि मत्सररहित आचरणाने आम्ही खऱ्या अर्थाने प्रभावित होत असू. आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा अधिकार तर वादातीतच. पण असे साधुपुरुष, साक्षात्कारी पुरुष आपल्या सहज एकांतिक सहिष्णुतेमुळे समाजातील स्वार्थी तत्त्वाकडून नाडले जातात. त्यांचा छळ केला जातो आणि या साधुपुरुषांच्या अनुयायांना त्याची फारशी माहिती पण नसते. पं. दत्तमहाराजांवर पण असे प्रसंग आले. कधी स्वार्थांध व्यक्तींनी तर कधी मत्सरग्रस्त बोद्धारांनी आपापल्या परीने त्यांना शारीरिक, मानसिक क्लेश दिले. त्याचीही माहिती या अंकात देण्यात आली आहे. पं. दत्तमहाराजांच्या निर्वाणामुळे भारतीय समाज एका लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाला मुकला आहे. पण 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हे शाश्वत वास्तव आहे. आम्ही धर्मभास्कर परिवारातर्फे त्यांना विनम्र आदरांजली अर्पण करीत आहोत. त्यांच्यावरील आत्यंतिक श्रद्धेमुळेच अनेकांनी आपल्या आठवणी, लेख पाठविले. पण व्यावहारिक पातळीवर अंकाची पृष्ठसंख्या मर्यादित असल्याने आलेल्या सर्वच लेखांचा या अंकात समावेश करता न आल्याचे आम्हास दुःख आहे. अशा लेखकांनी आमच्या मर्यादेचा सहानुभूतीने विचार करावा अशी प्रार्थना आहे. हा अंक सिद्ध करण्यात श्री वासुदेवनिवासाचे प्रधान विश्वस्त श्री नारायणमहाराज ढेकणे व विश्वस्त श्री. लक्ष्मण व्यं. वाकडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे.

याच महिन्यात माननीय अटलबिहारी वाजपेयींच्या जनकल्याणकारी शासनाचा अवघ्या एका मताने पाडाव झाला. प्रारंभापासून 'कृण्वन्तो विश्वं आर्यम्' च्या उद्दिष्टासाठी झटणाऱ्या विश्वकल्याणकारी हिंदुत्वावर तो एक आघातच आहे. वैयक्तिक स्वार्थापायी हट्टास पेटलेली स्वदेशी अथवा परदेशी दुराग्रही स्त्री आणि त्यातून ती मायावती असेल तर ती कुठल्या थरावर जाऊ शकते व केवढा अनर्थ राष्ट्रावर ओढवू शकते याचा पुन्हा एकदा अनुभव साऱ्या राष्ट्राला आला. अजूनही दिवस हिंदुत्वाला प्रतिकूल आहेत याचा दाहक अनुभव आला. भाजप आणि त्याच्या मित्रपक्षाने थोडी अधिक सावधानता बाळगली असती तर आजचा हा राष्ट्रीन अनर्थ टाळता येऊ शकला असता. भाजप व त्यांच्या मित्रपक्षांनी यातून सम्यक धडा घेतल्यास येत्या निवडणुकांत पुरेसं मताधिक्य मिळवणे तसे कठीण नाही. हिंदुत्वप्रेमी प्रत्येक मतदात्याने थोडी जरी जागरूकता दाखवली 'मला काय त्याचे' ची वृत्ती सोडून प्रत्येकाने मतदानात भाग घेतला तर हे अशक्य नाही. पण त्यासाठी जनसामान्यांचे सम्यक प्रबोधन होणे आवश्यक आहे. ते करण्याची सुबुद्धि परमेश्वर भाजपवाल्यांना देवो. सर्वेत्र सुखिनः सन्तु चा संदेश देणाऱ्या हिंदुत्वाचा विजय होऊन समस्त भारतीयांचे खऱ्या अर्थाने कल्याण होवो ही प्रार्थना !

# पाचामुखी परमेश्वर

**ल. व्यं. वाकडे**




प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्म २ मार्च १९१० साली क्षेत्र श्री नरसोबाची वाडी येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण व वेदाध्ययनाचा प्राथमिक आरंभही वाडीला घरी सुरु झाला. त्यांचे वडील श्री धुंडीराज महाराज यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यांचे अध्ययन नरसोबाची वाडी, सांगली व धारवाड येथे झाले. व्याकरण शास्त्राचे अध्ययन पूर्ण झाल्यावर त्यांनी धारवाडचे विख्यात पंडित नागेशशास्त्री उफिन बेटिटगिरी यांचेकडे न्याय व वेदातशास्त्र यांचे अध्ययन केले. न्यायरत्न व न्यायचूडामणी या पदव्या संपादन करून धारवाड येथील पाठशाळेत अध्ययनही केले. काही काळ काशीमध्ये जाऊन महापंडित राजराजेश्वर शास्त्री द्रवीड यांचेही मार्गदर्शन लाभले.

त्यानंतर ते पुण्याला आले. शंकर विद्यापीठात न्याय व वेदान्त शास्त्राचे आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात वेदान्त शास्त्राचे अध्यापन कार्य सुरू केले. अध्यापनाबरोबर संशोधन कार्याचा आरंभ केला. कित्येक मौलिक ग्रंथांचे वाचन, मनन करून पुस्तकरूपाने नवीन विचारांची सांगड घातली. सतत कार्यमग्न. तरुण विद्यार्थी वर्ग आकर्षित होऊन अध्ययन करीत होता. अभ्यासाठी ठिकठिकाणचे बाहेर गावचे विद्यार्थीही येत व अध्ययन करून नावलौकिकही मिळवीत. त्यांचे शिष्यगण संस्कृतचे अभिमानीही आहेत.

प. पू. दत्त महाराजांची पारंगतता, अभिजात अध्ययन कौशल्य व मूलग्राही संशोधन इत्यादी गुणसंपदा कीर्तीरूपाने सर्वत्र पसरली. आचार्य पीठ, संस्कृत पीठ व केंद्र सरकार इत्यादी ठिकाणी त्यांना मान्यता, मानसन्मान मिळत गेले. तिरुपती विजयवाडा, बंगळूर येथील विद्वत परिषदांत दत्त महाराजांचा सन्मान झाला. भारताच्या तिन्ही राष्ट्रपतींनी सन्मान केले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 'विद्या वाचस्पती' तर व्ही. व्ही. गिरी यांनीं 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' ही पदवी बहाल केली. डॉ. शंकरदयाळ शर्मा यांनीही सत्कार केला. असा अपूर्व योगायोग लाभलेले दत्त महाराज. महान मोठेपण असूनही अगदी सामान्यपणे सर्वांशी आचरण करीत होते, इतके साधे होते.

प. पू. दत्त महाराजांचे घराणे वाडीला असल्याने श्री दत्त संप्रदायाची ओळख अगदी लहानपणापासून होती. माणगावचे प. पू. टेंबे स्वामी महाराज यांचाही त्यांचे कुटुंबात आदर होता. तसेच प. पू. गुळवणी महाराज यांच्या घराण्याचाही वाडीशी संबंध अगदी जवळचा होता. श्री दत्त प्रभूंचा निवास गुरुगृही असल्याने पूजनीय नरसिंह सरस्वती स्वामीशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध अबाधित होते. प. पू. दीक्षित स्वामी महाराज (संन्यासी) हे महाराजांचे गुरुपदी होते. आत्मकल्याण व विश्वकल्याण या दोन्हींचा समन्वय दत्त अवतारात असावा. श्री वासुदेवानंद सरस्वती व श्रीलोकनाथतीर्थ स्वामी हे दोघेही वेदोक्त आचारधर्म प्राणाप्रमाणे जपणार होते. आत्मशक्तीच्या शक्तीपात दीक्षेने कल्याणाला गती आली. शुद्ध शास्त्राधार आचारामुळे कार्याला स्थैर्य लाभले. शरीरात जीव असेपर्यंत वेदान्त, गुरु व ईश्वर यांची सेवा करावी हे सूत्र श्रीगुरुदेवांनी पक्केपणे सांभाळले होते. सध्याचे युगात स्नान, संध्या, तर्पण, अग्नी उपासना, स्पर्शास्पर्श इ. धार्मिक आचारांना प्रखर विरोध समाजातून होतो. गुरुचरित्रातील आचारधर्म पाळावा हीच उत्कट इच्छा त्यांची होती. यम नियमरूपी धर्म आचरण आवश्यक यावर निष्ठा होती. याची कटाक्षाने ते जपणूक करीत होते. गुरुंच्या आदेशाची परंपरा दत्तमहाराजांनी सांभाळली होती.

श्रीदत्तप्रभु, प. पू. श्रीगुळवणीमहाराज, प. पू. श्री. टेंबस्वामी महाराज, प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज आणि प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर असे 'पाचामुखी परमेश्वर'च, श्रीवासुदेव निवास या वास्तूत सतत मार्गदर्शन करीत आहेत असे दिसून येईल.

प. पू. दत्तमहाराजांनी धार्मिक अनुष्ठाने, भागवत सप्ताह व प्रवचन इ. कार्यक्रमासाठी वेळोवेळी बाहेर गावी दौरे केले. त्यावेळीही ते आचार धर्माची जपणूक व शुद्धता पाळत पण कोणालाही न दुखवता, त्रास न होईल या भूमिकेतून समजावून देत असत. ते चालता बोलता वेदान्त होते. स्वतःचे आचरणाने समाजाला यथायोग्य मार्गदर्शन करीत. कधीही शास्त्राचे बाहेर न जाता पुराणांचे आधारे कथा निरुपणाची कास धरून विस्ताराने समाजात धर्माची देखभाल कशी उत्तम प्रकारे चालविता येईल यावर भर देऊन सर्वांचे समाधान पाद. याकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे.

प. पू. दत्तमहाराजांची अगदी साधी रहाणी, नितांत शांत व निगर्वी स्वभाव, अत्यंत सोपे वक्तृत्व, अनेक विषयांचा व्यासंग व गाढेपांडित्य हेच त्यांचे जीवनातील वैशिष्ट्य म्हणावयास हवे. ते सतत कार्यमग्न असत. जानेवारी ७४ पासून त्यांनी श्री वासुदेव निवास आश्रमाशी प्रमुख विश्वस्त या रूपात कामाची पद्धत अत्यंत विनम्रपणे सांभाळली. कधीही येणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांना अचूक मार्गदर्शन केले. भक्तिमार्गाची उपासना, मंत्रांचे आधारे अचूक विधानाने समाधान पावून आनंदाने अनेक भक्तांनी कालक्रमणा उत्तम पकारे उपभोगिली. वार्षिक उत्सव, महोत्सव, धार्मिक अनुष्ठाने आश्रमात सर्वांचे कडून वेळेवर करून घेत असत. समाजाची अनेक मान्यवर विद्वानांचे मार्फत धर्माशी जवळीक कशी वाढेल व नैतिक वृत्तीला आधारभूत मार्गदर्शन करण्याकडे भर कसा राहील याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. आश्रमातील अन्नदानही यथायोग्य रीतीने सामाजिक बंधने पाळून करण्याकडे कटाक्ष असे. सर्वांनी समाधानाने राहावे यावर ते बारीक लक्ष ठेवीत. त्यांनी श्री वासुदेवनिवासातील सर्व धार्मिक अनुष्ठाने, रोजची देवपूजा, अर्चन पद्धती, वाडीतील आचारधर्माप्रमाणे करून सर्वांची ते समाधानपूर्वक जपणूक करवून घेत. त्याच पद्धतीने यापुढेही सर्व उत्सव, महोत्सव, धार्मिक अनुष्ठाने होत राहातील अशी काळजी घेतली जाऊन सर्व भक्त मंडळींनी सहकार्य द्यावे म्हणजे सर्व कार्यक्रम शांतपणे यशस्वी होण्यास मदत होईल.

श्रीवासुदेव निवास, ४२/१७, एरंडवणा, पुणे ४



# धर्मपुरूष

राम शेवाळकर

मानवजातीचा पहिला छंदोबद्ध उद्गार म्हणून वेदवाङ्मयाचा उल्लेख केला जातो. हजारो वर्षांपासून हे वेदवाङ्मय जसेच्या तसे टिकून आहे. पाठपरंपरेमुळे कुठलेलही पाठभेद न होता, एका कानामात्रेचाही फरक न होता अविकृत स्वरूपात ते आजपर्यंत टिकून राहिलेले आहे. ज्या वर्गाने आपल्या अचूक पाठपद्धतीच्या आधारे सर्वभक्षक काळाला पराजित करून ही मंत्राक्षरे त्यांच्या स्पंदन सामर्थ्यासहित टिकवून ठेवली, त्याचेही आपण कौतुक करतो. त्या ग्रंथातून प्रतिपादिलेला जो आचारधर्म आहे त्याचेही काटेकोर पालन बदललेल्या युगमानाचा परिणाम होऊ न देता ज्यांनी आजच्या काळातही अबाधित ठेवले आहे, त्यांचीही वस्तुत: अशीच दखल घेतली जायला हवी.

महानुभाव पंथाचे लोक अजूनही आपल्या सांप्रदायिक परिवेशामध्ये वावरतात. सूत्रपाठोक्त आचार निष्ठेने सांभाळतात. जैन साधु व साध्वी आपली धर्मशास्त्रोक्त व्रते व नित्य नैमित्तिक कर्मे श्रद्धेने पार पाडतात. या जेट युगात स्थळाचे व काळाचे अंतर कमी होऊन मानवी ऊर्जेची प्रचंड प्रमाणात बचत करण्याच्या सोयी उपलब्ध असूनही पायी परिभ्रमण करतात. शीख व लिंगायत संप्रदायाचे लोकही आपाआपले पारंपारिक आचारविचार जगात कुठेही व कोणत्याही परिस्थितीत सांभाळण्याचे सोडीत नाहीत. त्यांची कुचेष्टा करण्याचा विचारही आमच्या मनात येत नाही. उलट वर्षानुवर्षे टिकून राहिलेल्या त्यांच्या दृढमूल श्रद्धेचे आपण कौतुकच करतो.

मराठी समाज शिकलेला, सुधारलेला व आपल्या पुरोगामी आचारविचारांबाबत अहोरात्र दक्ष राहणारा समाज आहे. नव्या विद्येमुळे आधुनिक विचारांचा प्रभाव त्याच्यावर सर्वात अधिक व सर्वात आधीपासून पडलेला आहे. त्याचा आपल्याला अभिमानही आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य व मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन या तीन आधुनिक तत्त्वत्रयींची बीजे याच समाजाच्या मनात पहिल्यांदा रोवली गेली. त्यामुळे या तीन विषयांच्या बाबतीत तो अतिशय आवेशाने बोलतो. अशा बोलण्यातच सामाजिक विद्रोह साधण्याएवढा पराक्रम आहे, असेही प्रामाणिकपणे मानतो. त्यामुळे या ब्रीदाला उणेपणा येईल, असा कुठलाही विचार तो मनात येऊ देत नाही व आचार हातून घडू देत नाही. त्यामुळे कालबाह्य ठरविल्या गेलेल्या विचार व आचार सरणीपासून तो स्वत:ला कटाक्षाने अलिप्त ठेवतो व आपण असे राहू शकतो, यातच स्वत:चा गौरव मानतो. जे जे एतद्देशीय ते ते दोषपूर्ण म्हणून त्याज्य असा त्याचा बाणा असतो. अशा वातावरणात एखादे वेदाचार्य घैसास गुरूजी किंवा पं. दत्तमहाराज कवीश्वर, प्राचीन आरण्यक संस्कृतीतील आ[illegible] आचारधर्म पाळताना आढळले की त्याला बिचकल्यासारखे वाटते. वास्तविक उपरोल्लिखित विविध संप्रदाय हे बरेचसे उत्तरकालीन आहेत. त्यातील काही तर अर्वाचीनही ठरतील. त्यांच्या श्रद्धायुक्त आचाराचे आपल्याला सादर कौतुक वाटते. मग त्यापेक्षा कितीतरी प्राचीन धर्मोक्त आचार शैलीबद्दल कालबाह्य व बिचकल्यासारखे का वाटावे ?

वेद हजारो वर्षांपासून स्थल, काल, परिस्थितीपासून, अबाधित राहिले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तसे ते अविकृत ठेवणाऱ्या पद्धती-वैचित्र्याचे आपल्याला कौतुक वाटते. त्याप्रमाणे कितीही नवे वारे आलेत, तरी त्यापासून निर्लेप राहून आपला शास्त्रोक्त आचारधर्म यथावत् टिकवून ठेवणाऱ्यांबद्दल का वाटू नये ? वस्तुत: काळ झपाट्याने पुढे जात आहे. परिस्थितीही त्याच्या वेगाशी संगती राखून उत्तरोत्तर बदलत चालली आहे. नव्या नव्या सुधारणांचा परिणाम व लाभ वैपुल्याने होताना दिसत आहे. तरीसुद्धा आपल्या निष्ठेत व धर्माचरणात युगानुकूल बदल करावा, असे या जगावेगळ्या मोजक्यांना का वाटू नये ?

याचे उत्तर तुकारामाने देऊन ठेवले आहे :

*आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासि*
*बोलिले जे ऋषी साच भावे वर्तावया ।*

ऋषींनी जे धर्मग्रंथात बोलून ठेवले ते केवळ संग्रहासाठी, पारायणासाठी वा परोपदेशासाठी नसून प्रत्यक्ष आचरणासाठी आहे. ते केवळ पठणयोग्य नसून आचरणयोग्य आहे. हे समाजासमोर सिद्ध करण्यासाठी स्वत:च्या वर्तनाचा वस्तुपाठ मांडणे, हेच त्यांच्या जन्माचे प्रयोजन असते. धर्मग्रंथातील केवळ शब्द महत्त्वाचे नसतात, शब्द लक्षात ठेवता येतात, पाठ करता येतात. आपला प्रभाव पाडण्यासाठी दुसऱ्याच्या तोंडावर फेकताही येतात. त्या शब्दांचा अर्थ महत्त्वाचा असतो. कारण तो आचारलक्ष्यी असतो. विनोबा म्हणत, 'शब्द पुस्तकात असतात. त्यांचे अर्थ आयुष्यात असतात.' नुसती शब्दांची घोकंपट्टी करून चालत नाही. अर्थाचा अर्क आचरणात उतरला पाहिजे. एखाद्याचे नि:शब्द आचरणही फार बोलके व प्रभावी असते. याच अर्थाने तुकाराम म्हणाले होते :

*वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा येरांनी वहावा भार माथा ।*

धर्मशास्त्राचे शब्द पंडितांना पाठ असतात. त्याचा पुस्तकातील अर्थही विद्वान लोक सांगू शकतात. पण अर्थ पत्यक्षान्वित झालेला पाहाण्यात येत नाही.

परवा नागपूरला सोमयाग झाला. जुने यज्ञयाग आज क्वचित होताना दिसतात. त्याचे विधी व कर्मकांड जाणणारे शास्त्रवेत्तेही दुर्मिळ होत चाललेले आहेत. शास्त्रातील पारिभाषिक शब्द, त्यांचे आचार, विधी आधुनिकांना माहीत नसतात. ते काय आणि कसे असतात, हे नव्या पिढ्यांना कळण्यासाठी त्याचे समग्र छायाचित्रण करण्यात आले. हे शब्द वाचण्यात आले तरी त्यांचा वर्तमान संदर्भातील अर्थ तेवढा आपण लक्षात घेत असतो. पारिभाषिक शब्दाचा उत्तरोत्तर अर्थविकास होत जातो, हे आपण लक्षात घेत नाही. त्यामुळे तो विशिष्ट शब्द त्या विशिष्ट संदर्भात कोणत्या विशिष्ट अर्थाने वापरला जात असेल, त्याची आपल्याला कल्पना नसते. परिणामी आपल्या आधुनिक अन्वयार्थाच्या आरोपणामुळे त्या मूळ शब्दावर वा त्यामागील संकल्पनेवर अन्याय होत असतो. त्या संकल्पना स्पष्ट करू शकणारी फार थोडी निष्ठावंत माणसे आज उपलब्ध आहेत.

वाईला एकदा प्राज्ञ पाठशाळेचे काम पाहायला गेलो. धुवट धोतर, तसाच सदरा व डोक्यावर टोपी असलेली कितीतरी माणसे तिथे मीमांसा कोशाचे काम करण्यात गढली होती. त्या कामावरील त्यांची निष्ठा पाहून ते काम निर्दोष व्हावे, याबद्दलचा त्यांचा कटाक्ष पाहून माझे मन आदराने भरून आले. न्यायकोश, वेदान्तकोश, मीमांसा कोश यासारखे ग्रंथ यापुढे कोणी हाती घेण्याची तरी शक्यता आहे काय ? आणि कुणालाच त्याबद्दलची जिज्ञासा नसेल, तर असे ग्रंथ केवळ ग्रंथालयाचे भूषण म्हणून राहणार काय ? मग या बाबतचे तळमळीचे परिश्रम वाया जाणार काय ? असे प्रश्न माझ्या मनात आले. तर्कतीर्थांना मी विचारले की, 'सध्याची काम करणारी ही पिढी संपल्यानंतर पुढे काय होणार ?'

तर्कतीर्थ शांतपणे एका शब्दात उत्तरले, 'प्रलय !'

वाईला आजही वैदिकांचा ३५० उंबरठा आहे. स्वामी केवलानंदांनी घालून दिलेले काम प्राज्ञ पाठशालेच्या रूपाने आज चालू आहे. उद्या काय होईल, ते सांगवत नाही. कदाचित भारताच्या प्राचीन संचितांची व ज्ञानधनाची ही अनमोल संपत्ती दीर्घकाळ कपाटामध्येच हिरमुसली होऊन पडून राहील. ज्ञान रक्षणाचे आपले काम ही कपाटे प्रामाणिकपणे सांभाळून ठेवतील. पण नव्याने उगवणाऱ्या पिढ्यांशी त्यांचा अनुबंध राहणार नाही. आपलाच आपल्याला माहित नसण्याचा केवढा मोठा कालखंड मध्ये येऊन गेला ! आपलीच आपल्याशी या काळात साधी ओळख होऊ शकली नाही. करून घेण्याची उत्सुकताही आपल्याला कधी जाणवली नाही. आपणच स्वतःच्या अतीताबद्दल घोर अंधारात होतो. याचे वैषम्यही आपल्याला कधी वाटले नाही.


# संस्काररक्षम स्तोत्रांच्या ध्वनिफिती

**श्रीमद् भगवद्गीता**

॥ शुद्ध संस्कृत शब्दोच्चार व संधीविग्रह ॥
॥सर्वांनाच पाठांतरासाठक्ष सोपी घरगुती गेय चाल ॥
॥ संपूर्ण १८ अध्याय, गीताध्यान व फलश्रृती सहित ॥
**गीतापठण : सौ. सरिता देशमुख**

मूल्य : एकूण ३ ध्वनिफितींचा एक संच सवलतीने रु. १२०/- अधिक रु. २५/- ट.ख. (रजिस्टर्ड पोस्ट पार्सल)

**शिवस्तवन**

शिवमहिम्न स्तोत्र, तुलसीदासकृत रुद्राष्टक, रावणकृत शिवतांडव स्तोत्र, शिवपंचाक्षर, शिवषंडक्षर, वेदसारशिवस्तव, दारिद्र्यदहन स्तोत्र व शिवमानसपूजा
**स्तोत्र पठण : सौ. सरिता देशमुख व श्री. सुभाष पिंपळखरे**

रु. ३५/- + रु. १०/- ट.ख. (अनरजिस्टर्ड पोस्ट पार्सल)
सोबत वरील स्त्रोत्रांची पुस्तिका सप्रेम भेट

श्रीमंद् भगवद्गीता ३ ध्वनिफिती व शिवस्तवन १ ध्वनिफित अशा चारही ध्वनिफितींचे एकूण मूल्य रु. १५०/-+ २५/- ट.ख.

## पुण्ययोग प्रकाशन

४३२/ब, देशमुख बंगला, वकीलवाडी, नाशिक - ४२२००१
दूरध्वनी : (०२५३) ३११४२२ (कार्यालय), ५७४६१७ (निवास)

## सर्व शहरांमध्ये प्रसारासाठी संपर्क व्यक्ती हव्या आहेत.

संपर्क दूरध्वनी : औरंगाबाद : सौ. स्वाती खोत - ३५८२९३, बार्शी : श्री. घ. ना. जोशी - २३२५९, ठाणे : श्री. सुरेश देशमुख - ५४०५७८५, मुंबई (मुलुंड) : श्री. मनोज जोशी - ५६२०८१४, डोंबिवली : श्री. गो. का. केतकर - ४४९२०२
पुणे (औंध कॅम्प) : सौ. सुमती आपटे - ७२०३३२, (कर्वेनगर) : सौ. हेमांगी जोग - ३३४२८९ किंवा २६११००, (सिंहगड रोड) : श्री. महेश कुरवलकर ४३५२३४० किंवा २३५९७६

# परमपूज्य श्रीदत्तमहाराज कवीश्वर

## एक आठवण

### - ओमप्रकाश देवडा

**परमपूज्य श्री. दत्त महाराज कवीश्वर हे आमचे मोक्ष** गुरु. कोणत्याही अवघड प्रसंगी त्यांचे दर्शन घेतले की समस्येचा उलगडा निश्चित व्हायचा व तोही अगदी सहजतेने.

परभणी येथे परमपूज्य अखंडानंद स्वामी यांनी 'दत्तधाम'ची स्थापना करून त्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी विश्वस्त मंडळ नियुक्त करून त्यांचेवर टाकली. त्या न्यासाच्या घटनेनुसार प. पू. अखंडानंद स्वामींच्या पश्चात पीठाधिपती म्हणून कोणीतरी संन्याशी असावा अशी तरतूद आहे. अखंडानंद स्वामींच्या निधनानंतर स्वामी मकरंद महाराज हे मठाधिपती झाले. त्यावेळी ते अविवाहित असून ब्रह्मचारी होते. काही काळानंतर त्यांनी विवाह करण्याचे निश्चित केले. त्यावेळी विश्वस्त मंडळात मतभेद निर्माण झाले. सन्याशाच्या गादीवर संन्याशीच असावा. स्वामी मकरंद महाराज विवाह करतात हे बरोबर नाही, अशी चर्चा सुरू झाली. हा वाद विकोपाला जाण्याची चिन्हे दिसू लागली. ही गोष्ट आमच्या कानावर आली. तेव्हा एका सहकाऱ्याला बरोबर घेऊन आम्ही प. पू. श्री. कवीश्वर महाराजांकडे जाऊन ही गोष्ट त्यांना कळविली व या बाबतीत कोणते पाऊल उचलावे या संबंधी मार्गदर्शन मागितले.

'जी व्यक्ती मठाधिपती आहे त्यांनी या बाबतीत विचार करावा. कदाचित स्वामी अखंडानंदांच्या प्रेरणेनेच हे कृत्य झाले असेल व त्यांच्या इच्छेनुसारच ते टिकेल. इतरांनी त्या संबंधी चर्चा करण्याचे कारण नाही.'

ही गोष्ट 'दत्तधाम'च्या विश्वस्त मंडळा समोर विशद केली. सर्वांनी त्यास अनुमती देऊन वाद संपुष्टांत आला.

---

हा अंधार आपल्या परीने नाहीसा करण्याचे काम व्रतस्थपणे काही मंडळी अव्याहत करीत असतात. पू. दत्तमहाराज त्यांपैकी एक होते. गांधीजी नौखालीमध्ये संचार करीत असताना काही विद्यार्थी त्यांच्या स्वाक्षरीसाठी आले. स्वाक्षरी मिळाल्यावर त्यांनी संदेशही मागितला. त्यावेळी गांधीजी म्हणाले, 'आमार जीवन इ आमार बानी' आमचे जीवन हाच आमचा संदेश. आम्हाला द्यावयाच्या संदेशाचे प्रात्यक्षिक म्हणजे आमचे जीवन आणि ते खरेच होते. अशाच्या वाणीमधून जेवढे शिकता येत नाही त्यापेक्षा, अधिक त्यांच्या जीवनापासून शिकता येते. 'जयांच्या लीळेमाजी नीती । जियाली असे' असे ज्ञानेश्वर म्हणाले ते याच अर्थाने. त्यानुसार पू. दत्तमहाराजांचे जीवन हाच आमचा प्राचीन काळापासून चालत आलेला मूर्त आचारधर्म असतो. त्यांच्या आयु:क्रमाचे निरीक्षण केल्यास वेगळे धर्मनियम शोधण्याची गरज नसते. धर्माचरणच त्यांच्या रूपाने साकार झालेले असते. समाजामध्ये अशी माणसे अल्पसंख्यच असतात. आकाशामध्ये सूर्यनारायण एकटाच असतो. पण अवघे त्रैलोक्य त्याच्या प्रकाशाने उजळून निघते. त्याप्रमाणे पू. दत्तमहाराजांसारखे धर्मपुरुष संख्येने किती आहेत, हा प्रश्नच नसतो. किंबहुना त्यांच्यासारखे किती शास्त्रज्ञ असोत, ज्ञानाचा प्रकाश त्यांच्या माध्यमातून समाजाला उपलब्ध होत असतो. 'जे ज्ञान गंगे नाहले । पूर्णता जेवून धाले' अशा कोटीचे हे पुरूष असतात. प्राचीन ज्ञान-संचिताच्या रूपाने असणाऱ्या धर्माचे प्राणपणाने रक्षण, हेच त्यांचे जीवनव्रत असते.

इस्रायलला आपला केवढा मोठा इतिहास खोदून काढावा लागला आणि सामुदायिक इच्छा शक्तीच्या बळावर त्याचे पुनरूज्जीवन करावे लागले. सुदैवाने आपल्याला एवढे मोठे उत्खनन करण्याची गरज नाही. आजही काही जिवंत झरे ठिकठिकाणी जमिनीत झुळझुळत आहेत. त्यांच्या साहाय्याने आपल्या अतीताबद्दलच्या जिज्ञासेची तहान भागवता येईल. ती भागवताना या पुण्यपुरुषांनाही कृतकृत्यता वाटेल. त्यांची जगापासून कसलीही ऐहिक अपेक्षा नाही. आधिभौतिक लाभाची अभिलाषा त्यांनी कधी बाळगली नाही. आपल्या व समाजाच्या उन्नयनाची एकमेव आकांक्षा त्यांच्या अंतर्यामात अहर्निश निनादत असते. समाजाच्या इच्छेचा कल तिकडे वळू लागल्याचे आढळताच त्यांना अपार आनंद होईल. त्यातूनच भारताच्या भाग्योदयाची लक्षणे प्रगट होतील.

अशा पुण्यवंतांपैकी एक धर्मपुरूष पू. दत्तमहाराजांच्या रूपाने आम्हाला लाभले होते. त्यांनी किती शास्त्रांमध्ये प्रावीण्य संपादन केले, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये किती काळ अध्यापन केले वा त्यांना राष्ट्रीय पातळीवर किती सन्मान प्राप्त झाले, या सर्व बाबी तपशीलाच्या आहेत. मुख्य मुद्द्याची बाब ***त्यांच्या तप:पूत, तेजस्वी, धर्माचरणाची आहे. हेटाळणी करणाऱ्या समकालीन जगाची तमा न बाळगता श्रद्धेने त्यांनी जे जीवन व्यतीत केले आहे. त्या जीवनातील पुण्यांशाचा एखादाही शिंतोडा आमच्या अंगावर पडला तरी आम्ही धन्य होऊ.***

---

हॉटेल पर्णकुटीजवळ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर १०

# साधकाचे काही अतींद्रिय अनुभव

**डॉ. शरच्चंद्र कोपर्डेकर**



साधुसंतांजवळ काही अतींद्रिय शक्ती असतात आणि त्यांच्या कृपेने साधकांच्या अंत:करणाची शुद्धी होऊन त्यांना अनेक अतींद्रिय अनुभव येतात असे उल्लेख जगातील बहुतेक सर्व धर्मग्रंथात आढळतात. संतांच्या कृपेमुळे साधकांच्या मनातील अहंकार कमी कमी होत जातो आणि रागद्वेष वगैरे विकारही कमी कमी होत जातात. आध्यात्मिक वाटचालीत विशिष्ट टप्प्यापर्यंत आल्यावर साधकांना अतींद्रिय अनुभव प्राप्त होतात आणि त्यामुळे साधकांच्या आध्यात्मिक वाटचालीला गती मिळते असे दिसते.

भारतीय अध्यात्मशास्त्र असे सांगते की, ईश्वरकृपेनेच माणसाची आध्यात्मिक वाटचाल होत राहते आणि शेवटी तो साधक ईश्वररूपच होऊन जातो. अध्यात्मसाधना करावी असे खूप लोकांना वाटते. त्यातील बहुतेक लोकांना सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे थोडीफार आध्यात्मिक वाटचाल करणे शक्य होते. परंतु त्यापैकी फारच थोड्या साधकांना अंतिम अवस्था म्हणजे ईश्वराशी एकरूप होण्याची अवस्था प्राप्त होते. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे ईश्वरीशक्ती स्वत:च अवतीर्ण होऊन धर्मजागरणाचे काम करीत असते. असे महापुरुष अगदी बालवयापासून ईश्वरीशक्तीशी एकरूप असतात. फारशी साधना न करताही त्यांना अनेक अतींद्रिय शक्ती प्राप्त झालेल्या दिसून येतात. अशा अवतारी पुरुषांना युगपुरुष असे म्हटले जाते.

श्री दत्तमहाराज कवीश्वर हे अशा अवतारी पुरुषांपैकी एक आहेत. विसाव्या शतकातील थोर संत असे त्यांचे वर्णन केले जाते. त्यांचे ज्ञानप्रसाराचे कार्य श्रीमन् आद्य शंकराचार्य आणि श्रीज्ञानेश्वर महाराज यांची आठवण करून देणारे आहे.

दि. २ मार्च १९१० या दिवशी वाडी येथे श्री दत्तमहाराजांचा जन्म झाला. जवळजवळ ९० वर्षे वेदांताचा संदेश भारतभर पसरवणाऱ्या या धर्मपुरुषाने १ मार्च १९९९ रोजी पुणे येथे आपला स्थूल देह ठेवला. श्री दत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वाचे आणि त्यांच्या धर्मजागरणाच्या कार्याचे विविध पैलू दाखवणारे अनेक लेख 'धर्मभास्कर' या ख्यातनाम मासिकात प्रसिद्ध होत आहेत याचा सर्व अध्यात्मप्रेमींना मोठाच आनंद वाटेल. प्रस्तुत लेखात एका वेगळ्या पैलूचा म्हणजे श्री दत्तमहाराजांच्या कृपेने साधकांना आलेल्या काही निवडक अतींद्रिय अनुभवांचा समावेश केला आहे.

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहित असताना मला, अनेक भक्तांना आणि साधकांना भेटण्याची संधी मिळाली आणि त्यांचे अतींद्रिय अनुभवही ऐकायला मिळाले. त्यांपैकी काही निवडक अनुभव श्रीदत्तमहाराज चरित्र आणि विचारधन या चरित्र ग्रंथात समाविष्ट केले आहेतच. आणखी काही अनुभव या लेखात समाविष्ट करीत आहे. हे अनुभव सांगणाऱ्या बहुतेक सर्व व्यक्ती उच्च विद्याविभूषित आहेत. मोठ्या पदांवर काम करणाऱ्या आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाची खात्री पटली म्हणून ते अनुभव मी नोंदवून घेतले आणि जसे ऐकायला मिळाले तसे प्रामाणिकपणे येथे निवेदन केले आहेत. केवळ सद्गुरूंच्या कृपेमुळेच हे अनुभव आले अशी साधकांची पूर्ण श्रद्धा असल्यामुळे कोणत्याही साधकाचे नाव या लेखात लिहिलेले नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या सर्व शिष्यांना असा अनुभव आलेला दिसतो की दूर अंतरावरील गावातून जरी प्रार्थना केली तरीही ती दत्तमहाराजांना ते जेथे असतील तेथे पोहोचली आणि अनेक साधकांना आपले काम झाल्याचा अनुभवही आला. तसेच मनाला समाधान देणाऱ्या आणि सांसारिक अडचणीतून सुटका करणाऱ्या घटना तर बहुतेक साधकांच्या जीवनात घडलेल्या दिसून येतात.

हा अनुभव राष्ट्रीयकृत बँकेत काम करणाऱ्या एका व्यवस्थापकाचा आहे. त्यांनी सांगितले की, त्यांचे पोटावरची शस्त्रक्रिया करण्यासाठी जेव्हा भूल दिली तेव्हा त्यांचे शरीर बधीर झाले परंतु त्यांची जाणीव लोपली नाही. त्यांना सतत असे दिसत राहिले की ऑपरेशन थिएटरमध्ये कोपऱ्यात श्रीदत्तमहाराज आणि सौ. ताईमहाराज उपस्थित आहेत आणि त्यांच्या शस्त्रक्रियेवर देखरेख करीत आहेत. संपूर्ण शस्त्रक्रिया होईपर्यंत हे दोघेही तेथे उपस्थित होते. त्यामुळे त्या साधकाला मोठाच धीर वाटला आणि जणू काही दुसऱ्या एखाद्याची शस्त्रक्रिया दुरून बघावी तशा तटस्थ भावनेने तो त्याची स्वत:ची शस्त्रक्रिया बघत राहिला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली हे सांगायला नको. विशेष म्हणजे शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याने चौकशी केली तेव्हा इतर डॉक्टरांना आणि सेविकांना श्री दत्तमहाराज आणि ताईमहाराज यांचे अस्तित्व जाणवलेले नव्हते असे त्या भक्ताला आढळले....

एका भक्ताची अशीच मोठी शस्त्रक्रिया मद्रासला झाली. शस्त्रक्रियेच्या वेळी ऑपरेशन थिएटरमध्ये त्या भक्ताला असे जाणवत राहिले की, तो जालना येथे श्री दत्त आश्रमात नेहमीप्रमाणे वावरत आहे आणि श्रीदत्तमहाराज आणि ताईमहाराज यांच्या उपस्थितीत नित्याप्रमाणे आश्रमात कार्यक्रम चालू आहेत. दत्त आश्रमात उत्सव संपन्न होताना जसे पावित्र्याने भारलेले वातावरण असते तसेच या साधकाला सतत जाणवत राहिले. शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तो साधक जेव्हा त्याच्या रुग्णालयामधील खोलीत गेला तेव्हा त्याला असे जाणवत राहिले की, सौ. ताईमहाराज त्या खोलीत एका कोपऱ्यात ध्यानस्थ बसलेल्या आहेत. त्याने डोळे मिटले की सौ. ताईमहाराजांची ध्यानस्थ मूर्ती त्याला दिसत होती. डोळे उघडल्यावर ताईमहाराज दिसत नसत. परंतु त्या ध्यानस्थ

आधुनिक व अजोड परिपूर्ण निवासस्थान

**उद्यान कार्यालय**

१७२२-१ ब सदाशिव-पेठ,
स्काऊट ग्राऊंड समोर,
पुणे ४११ ०३०

बसल्या आहेत असे जाणवत राही.

एक भक्त महाविद्यालयीन जीवनात पदार्पण करताना श्रीदत्तमहाराजांच्या संपर्कात आला. वयाने तरुण, संपन्न कुटुंबात जन्म घेतलेला. सांपत्तिक स्थिती उत्तम. पण मनातून तो भक्त उदास होता. कारण त्याची आई काही कारणास्तव त्याच्या जन्मापासून वेडी झाली होती. वेडाचा झटका आला म्हणजे ती मुलाला मारीत सुटे आणि त्याचा प्रचंड रागराग करत राही. त्याच्यावर शिव्यांचा भडीमारही करीत असे. त्या भक्ताने आपली ही व्यथा श्रीदत्तमहाराजांना निवेदन केली. श्रीमहाराज म्हणाले, 'काही कर्मदोष असतात. साधना चालू ठेवावी.' त्या भक्ताने श्रद्धेने साधना चालू ठेवली. अशी तीन वर्षे गेली. परंतु त्या भक्ताच्या आईच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. उलट तिचा आजार वाढतच चालला होता. शेवटी शेवटी त्या भक्ताच्या आईचे वेड एवढे वाढले की, ती एकटी असली म्हणजे गळफास लावून घेण्याचा प्रयत्न करू लागली. असे तीनदा घडले. त्या भक्ताने ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांच्या कानावर घातली. श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'आपण आपल्या मातोश्रींना आमच्याकडे घेऊन या. आम्ही त्यांना सांगून बघतो.' तो भक्त आपल्या आईला घेऊन श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आला. श्रीदत्तमहाराजांनी सुमारे १ तास त्या भक्ताशी व त्याच्या आईशी सहज गप्पा मारल्या. नेहमीचे सामान्य माणसाच्या जीवनातील गप्पांचे विषयच होते. काही उपदेश नाही. काही धर्मचर्चा नाही. काही नाही. सांसारिक विषयांवरच संभाषण झाले. पण श्री दत्तमहाराजांच्या दर्शनानंतर बाहेर पडतानाच त्या भक्ताला आपल्या आईमध्ये सुधारणा होत आहे असे वाटले. खरोखरीच हळूहळू सुधारणा होत गेली आणि तीन वर्षांच्या कालावधीत त्या भक्ताची आई पूर्णपणे बरी झाली. भक्ताच्या कुटुंबीयांनी सुमारे सतरा वर्षे सर्व प्रकारचे आयुर्वेदिक व ॲलोपॅथीचे उपचार करूनही उपयोग झाला नव्हता. डॉक्टरांनी उपचार बंद करून वेड्याच्या इस्पितळात त्यांना ठेवून द्यावे असे सांगितले होते. परंतु श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाल्याच्या दिवसापासून कोणतेही औषध न देता भक्ताच्या आईची प्रकृती सुधारत गेली आणि ती स्त्री पूर्ण बरी झाली. हे का घडले याचे स्पष्टीकरणही डॉक्टरांना देता आलेले नाही.

मुंबईचे एक भक्त गुरुपौर्णिमेला पुण्याला श्री दत्तमहाराजांच्या दर्शनासाठी जात असत. एका वर्षी व्यावसायिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांना पुण्याला जाणे शक्य नव्हते. मुंबईत काही ठिकाणी श्री दत्तमहाराजांचे भक्त गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करतात. दैववशात त्या भक्ताला तेथेही जाणे शक्य झाले नाही. तो भक्त अतिशय उदास झाला. मनातल्या मनात श्रीदत्तमहाराजांचे स्मरण करीत राहिला. रात्री त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात असे दिसले की, तो भक्त गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी वासुदेव निवासमध्ये पुण्याला आलेला आहे. शेकडो भक्त उत्सवासाठी तेथे आलेले त्याला दिसले. कोणी आपापसात गप्पा मारीत होते, कोणी फराळ करीत होते, कोणी पोथी वाचत होते, कोणी झोपले होते, काही भक्त ध्यान करीत होते. त्या भक्ताने विचार केला की स्नान करावे आणि श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आतल्या खोलीत जावे. परंतु स्नानगृहासमोर भक्तांच्या मोठ्या रांगा होत्या. त्याला लवकर स्नान करायला संधी मिळेल असे दिसेना. त्या भक्ताचा गावात राहणारा भाऊ तेथे आला आणि म्हणाला की, 'तू आजारी आहेस. तुझी सोय इथे व्हायची नाही. माझ्याबरोबर चल. जवळच एका बंगल्यात गुरुपौर्णिमेचा मोठा उत्सव असतो. तेथे जाऊ या.'

त्या भक्ताने भावाला सांगितले, 'तू हो पुढे. जमलं तर येतो.' भाऊ निघून गेला. स्नानगृहात स्नान करायला गेलो तर बराच वेळ जाईल म्हणून तो भक्त नळावर गेला. त्याने बॅग व कपडे बाजूला ठेवले व तो गार पाण्यानेच नळाखाली आंघोळ करू लागला. स्नान होताच त्याला दिसले सामान, पैसे व कपडे सर्व चोरीस गेले आहेत. अंगावरील भिजलेल्या लंगोटीशिवाय काहीच जवळ नाही. टॉवेलही नाही. लोक काय म्हणतील याचा विचार न करता तो तसाच ओलेत्याने उघडाच श्रीदत्तमहाराजांच्या खोलीत गेला. तेथे काहीच गर्दी नव्हती. दोन-तीन साधक व दोन-तीन मुले एवढेच लोक तेथे होते. त्याने हात जोडले आणि तो श्रीदत्तमहाराजांची श्रीमूर्ती पाहू लागला. श्रीदत्तमहाराजांची कृपादृष्टी त्याच्यावर पडताच, त्याचे देहभान हरपले आणि दिशा, काळ, स्थळ यांच्या पलीकडे असलेली निर्विकल्प समाधीची अवस्था त्या भक्ताला प्राप्त झाली. अपार शांतीमध्ये तो बुडून गेला. 'मी'ची जाणीवही लोपून गेली. जागा झाल्यावर त्या भक्ताला जाणवले की, ती शांती तो तशीच अनुभवतो आहे. हा शांतीचा अनुभव अनेक महिने टिकून राहिला....

एक भक्त व्यावसायिक अडचणींमुळे खूप निराश झाला होता. त्याने आत्महत्या करण्याचा निश्चय केला. दिवसभर तो त्याच विचारात होता. पुन्हा पुन्हा विचार करूनसुद्धा आपला निर्णय बदलावा असे त्याला वाटेना. रात्री त्याने प्लास्टीकची दोरी छतावरील पंख्यात अडकवली आणि खुर्चीवर उभा राहून तो गळफास लावू लागला. एवढ्यात त्याला श्रीदत्तमहाराजांचे शब्द स्पष्टपणे ऐकू आले. 'एवढा मोठा निर्णय घेता आहात. आमच्याकडे आला असतात, आमच्याशी बोलला असतात तर बरं झालं असतं.' तो भक्त चमकला. खुर्चीवरून खाली उतरला. समोरच श्री दत्तमहाराजांच्या प्रवचनांचे पुस्तक पडले होते. त्याने ते पुस्तक हातात घेतले, उघडले. समोरच श्रीदत्तमहाराजांचे वाक्य त्याच्या

दृष्टीस पडले. जणू श्रीदत्तमहाराज त्या वाक्यातून त्याच्याशी बोलत होते. ते वाक्य असे होते, 'आमच्या मनात वासना आहेत. म्हणूनच आम्हाला हा संसार भासतो आहे. मनातल्या वासना निमाल्या, इच्छा नाहीश्या झाल्या की, सर्वत्र एक भगवंत आहे. ही दृष्टी येते. मग सर्व व्यवहार संपून जातो.' हे वाक्य श्रीदत्तमहाराज पुन्हा पुन्हा सांगताहेत असे त्या भक्ताला वाटले. त्याची निराशा हळूहळू नाहीशी होत गेली. मनात भक्तिभाव दाटून आला. एका वेगळ्याच शांतीने त्याचे अंतःकरण भरून गेले. शांतपणे तो झोपी गेला.

पुढच्याच आठवड्यात तो जेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला गेला तेव्हा त्याला असे जाणवले की, सर्वकाही श्रीदत्तमहाराजांना माहिती आहे. श्रीदत्तमहाराजांच्या डोळ्यात त्यादिवशी जे भाव होते ते काही वेगळेच होते. दया होती, करुणा होती, वात्सल्य होते, माया होती आणि अभय देणारी आश्वासक कृपाही श्रीदत्तमहाराजांच्या डोळ्यात त्या भक्ताला जाणवली. त्या दिवशी शब्दात काही संवादच घडला नाही. तो भक्तही काही बोलला नाही आणि श्री दत्तमहाराजही काही बोलले नाहीत. पण ज्ञानदेव सांगतात तसे, 'शब्देविण संवादिजे' असे खूप काही त्या दिवशी तेथे घडून गेले. हळूहळू त्या भक्ताच्या व्यावसायिक अडचणी दूर होत गेल्या आणि दोन-तीन वर्षांच्या कालावधीतच त्याचा व्यवसाय स्थिरावला. जणू काही त्या भक्ताला श्री दत्तमहाराजांनीच अडचणींतून बाहेर काढले होते....

अनेक साधक अनेक अनुभव सांगतात. जागेच्या मर्यादेमुळे एक शेवटचा अनुभव सांगून हा लेख संपवतो. श्री दत्तमहाराजांनी १ मार्च १९९९ रोजी सकाळी ८.३० वाजता देह ठेवला. परगावच्या एका भक्ताला दूरध्वनीवरून ही वार्ता समजली. अंत्ययात्रा दुसऱ्या दिवशी सकाळी होती. तशाच काही अडचणींमुळे तो भक्त पुण्याला जाऊ शकत नव्हता. त्या गोष्टीचा त्या भक्ताला एवढा ताण वाटला की तो भक्त आजारी पडला. आजार वाढत चालला. त्या भक्ताला वाटले आपलेही जीवन आता संपले. जगण्याचे काही कारणही आता उरले नाही. हाच विचार पुन्हा पुन्हा त्या भक्ताच्या मनात येत होता.

सातव्या दिवशी त्या भक्ताला स्वप्न पडले. समोर श्री दत्तमहाराज शांतपणे बसले होते. मोठ्या श्रद्धेने तो भक्त त्यांच्याजवळ गेला. श्री दत्तमहाराज काहीच बोलले नाहीत. न बोलताच त्यांनी त्या भक्ताच्या मस्तकावर हात ठेवला आणि त्या भक्ताचे देहभान नाहीसे झाले. स्थल, काल, दिशा यांच्यापलीकडे असलेली अनुभूती त्याला प्राप्त झाली. तो भक्त जेव्हा जागा झाला तेव्हाही श्री दत्तमहाराजांचा तो ईश्वरी स्पर्श त्या भक्ताला जाणवत होता आणि ती अनुभूती त्याच्या मनात रेंगाळत होती.

काही दिवसांनंतर तो पुण्याला सौ. ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला. त्याला पहाताच ताईमहाराज म्हणाल्या, 'श्री दत्तमहाराजांचे दर्शन झाले ना ? महाराज आहेतच.' त्या भक्ताला वाटले की ताईमहाराजांना सर्व काही माहिती आहे. मोठ्या भक्तीभावाने ताईमहाराजांचे दर्शन घेऊन तो भक्त रेणुकानिवासमधून बाहेर पडला. ते स्वप्न आणि तो ईश्वरीस्पर्श त्या भक्ताला पुन्हा पुन्हा जाणवत राहिला आणि त्या अनुभूतीचा प्रभावही तो भक्त त्यामुळे घेत राहू शकला.

श्री दत्तमहाराज हे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप आहेत, असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. त्यांनी स्थूल देहाचा त्याग केला हे खरे आहे. तथापि सूक्ष्म रूपात ते आहेतच. संतांनी स्थूल देह ठेवल्यावर सुद्धा श्रद्धावंतांना त्यांचे अस्तित्व जाणवत राहते. त्यांच्या कृपेचा अनुभव येत राहतोच. म्हणूनच श्रद्धावंत भक्त पुन्हा पुन्हा वाडीला, गाणगापूरला, कुरवपूरला आणि गरुडेश्वरला दर्शनासाठी जात राहतात. असे दर्शन घेतल्यामुळे आपल्या व्यावहारिक अडचणी सुटतात आणि परमार्थ मार्गावरील प्रतिबंधही दूर होतात असा अनुभव बहुतेक भक्तांना येतो. स्थूल देह ठेवल्यानंतर संतांचे कार्य अधिकच व्यापक होत जाते असे इतिहास सांगतो.

श्री दत्तमहाराजांचे कार्यही असेच व्यापक होत जाणार आहे. अनेक शतके ते आपल्या कृपेच्या वर्षावाने भक्तांचा प्रपंच आणि परमार्थ सांभाळत राहणार आहेत आणि तशी उत्कट इच्छा असलेल्या भक्तांना परमार्थ मार्गावर पुढे पुढे नेत अद्वैत अनुभूतीपर्यंत वाटचाल करायला साहाय्य करीत राहणार आहेत.

श्री दत्तमहाराजांच्या चरणी कोटीकोटी प्रणाम.

संचालक, वेलींगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, १९५, सायन (पूर्व), मुंबई

**ढवळे प्रकाशनाची धार्मिक पुस्तके**

| | |
|---|---|
| **सार्थ पंचरत्न हरिपाठ**, नाडकर्णी | २५ रु. |
| **भक्तिमार्गप्रदीप**, पांगारकर | ४० रु. |
| **श्रीशिवलीलामृत** (मोठा टाइप) | ७० रु. |
| **सटीप दासबोध**, शं. श्री. देव | ७५ रु. |
| **समर्थांची बोधसुधा**, दि. अ. घैसास | १०० रु. |
| **मंत्रशास्त्र**, गो. प्र. भावे | १२५ रु. |
| **आत्मविद्या**, हरि गणेश गोडबोले | १५० रु. |
| **बृहत्स्तोत्ररत्नाकर:** | १५० रु. |
| **देवाचिये द्वारी**, जयंत साळगांवकर | २०० रु. |
| **सुंदर ते ध्यान**, जयंत साळगांवकर | २०० रु. |

कमिशनची संपूर्ण यादी मागवा. विनामूल्य पाठवू.

**केशव भिकाजी ढवळे**
श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४

# आमच्या स्मरण संदूकीतले आमचे थोरले मामा

# श्री दत्तमहाराज कवीश्वर

प्रा. डॉ. पां. ह. कुळकर्णी



सोमवार दिनांक १ मार्च १९९९ रोजी सकाळी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या निधनाचे वृत्त फोनवरून समजलं. त्याच दिवशी त्यांच्या ८९ व्या वर्षाचा शेवटचा दिवस होता. एक असामान्य तेजस्वी आत्मा परमात्म्याच्या भेटीला निघून गेला.

जाणारा प्रत्येक जण आपल्या वंशाच्या रूपाने, नातेवाईकांच्या वा मित्रमंडळींच्या परिवाराच्या रूपानं, संस्था किंवा कार्य यामध्ये शिल्लक राहिलेला असतो. पण लोकोत्तर व्यक्ती या अनुयायांच्या शिष्यांच्या रूपानं अनंत काळ आपल्याला जाणवत राहतात.

आपल्यातून गेलेला माणूस आपल्या आठवणीत असतो. आठवणींची एक ज्योत उजळायला सुरुवात होते. एक सौम्य प्रकाशाची माळ दिसायला लागते.

मध्यम शारीरिक उंची, सोनेरी झाक असलेला गौरवर्ण, रेखीव चेहरेपट्टी, सरळ नाक, बुद्धीची प्रचंड उंची आणि सौम्यपणाचा अनोखा मिलाफ त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी दिसत असे. तरुण वयात दोन फूट लांबीची नितळ काळ्याभोर रंगाची शेंडी होती. पुण्याच्या रस्त्यावरून भर दुपारी डोक्यावर सूर्याचं दाहक ऊन अन् त्यापेक्षा तापलेली जमीन यावरून अनवाणी चालत जाणारे प्राध्यापक दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर उर्फ आमचे मोठे मामा आज मला पुन्हा आठवताहेत.

पुण्यातल्या राष्ट्रीय शिक्षण मंडळ या ७५ वर्षे जुन्या असलेल्या संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात श्रीदत्तमहाराज पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना तर्कसंग्रह, संस्कृत हे विषय शिकवत असत. रोगनिदान आणि चिकित्सेचा पाया म्हणून या विषयाला फार महत्त्व असे. त्यांचे अनेक शिष्य, प्राध्यापक, प्राचार्य, अधिष्ठाता आदि पदावर काम करत होते.

राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या वतीने पुण्यात टिळक आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेद रसशाळा इ. सहा संस्था चालविल्या जातात. या संस्थेचे ते आदरणीय सदस्य होते. अनेक अडचणींच्या काळी नेहमीप्रमाणे शांतपणानं विचार करून मार्ग कसा काढावा, कट्टर विरोधकांच्या बद्दलही कटू, द्वेषभावना मनात न आणता, न ठेवता काम कसे करावे याचं मार्गदर्शन अनेक वेळा सौम्य भाषेत त्यांनी केलं. त्यामुळे अति कठीण परिस्थितीतून संस्था बाहेर पडू शकली.

मी संस्कृत शिकावं अशी त्यांची इच्छा होती. म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची संस्कृतची एक परीक्षा दिली तर एक सायकल मी देईन असे पत्र त्यांनी मला लिहीले. आम्ही त्यावेळी सांगलीस राहात होतो. मी संस्कृतच्या दोन परीक्षा पास झाल्यावर त्यांनी मला एक सायकल पाठवून दिली. पुढं अनेक गोष्टी मी करत गेलो. काहींची पूर्ण फळं मिळाली, काहींची मिळाली नाहीत. ठरवून आपली कामं आपण करावी, मिळणारं फळ मिळतंच ही शिकवण फार लहान वयात त्यांनी मला नकळत, भाषण न करता दिली. ती शिकवण आजही पुरून उरली आहे. न संपण्यासाठी.

श्रीदत्तमहाराजांचा सर्वात धाकटा भाऊ केवळ अठराव्या वर्षी कॅन्सरने आजारी होता. सर्जरी, सर्व औषधे झाली होती. सर्व मानवी उपाय थकले. सांगलीस आमच्या घरी श्रीदत्तमहाराज अहोरात्र एक सप्ताह अखंड नामस्मरण व स्तोत्रपठण करीत होते. त्यांची एक मुलगी इन्फ्लुएंझाच्या साथीत दगावली, त्यांच्या आईवडिलांचे निधन झाले हे सगळे प्रसंग आठवतात. प्रत्येक वेळी ते अतिशय शांत होते. मनातल्या दु:खांचे कढ कधी वर आले नाहीत. त्यांच्या मातोश्री गेल्या तेव्हा गदगदलेल्या स्वरात ते एवढंच म्हणाले, 'आमच्या शिरावरचं छत्र गेलं !'

प्रवचने, लोकांना दिलासा देणं या कामासाठी त्यांचा सतत प्रवास चालू असे. किरकोळ त्रासावर ते छोटे उपाय स्वत:च करत असत. एका प्रवासानंतर त्यांना ताप व खूप पोटदुखी असा त्रास होत होता. मोठ्या मामींचा निरोप आल्यावर मी घरी जाऊन पाहिलं आणि इंजेक्शन शिवाय पर्याय नसल्यानं मी त्याचा वापर केला. त्यांना विश्रांती घ्या असं सांगितलं. संध्याकाळी पुन्हा इंजेक्शन देऊ असे सांगून मी परतलो. सायंकाळी त्यांची तब्येत पाहण्यासाठी मी गेलो, तर आंघोळ करून त्यांची देवपूजा प्रसन्न चेहऱ्यानं चालू होती. मला खूपच आश्चर्य वाटलं. देवपूजा झाल्यावर ते मला म्हणाले, 'तुमच्या औषधाचा चांगला गुण आला !' हे खरं नव्हतं, हे मला माहीत होतं. त्यांनी श्रेय मला दिलं तरी त्यांची नेहमीची देवपूजा, मंत्रपठण सकाळी पूर्ण होऊ शकली नव्हती ती त्यांनी ठरवून पूर्ण केली. आजाराला त्यांच्या शरीरात जागा राहिली नव्हती. कारण नेहमीची कामं करायचीच असं त्यांच्या प्रत्येक पेशीनं ठरवलं होतं. ते काम पूर्ण झालं होतं.

एक दिवस दत्तमहाराजांचा निरोप आल्यावरून मी त्यांच्या घरी गेलो. मला म्हणाले, 'चल, गुळवणीमहाराजांची प्रकृति बरी नाही. त्यांना पाहून औषध दे.' ते काहीवेळा एकेरी संबोधन करीत परंतु बहुतांश वेळा अहो-जाहो असं म्हणत असत. गुळवणीमहाराजांना औषधोपचार केले. त्यांना बरंही वाटलं. आशीर्वादाचा आणखी एक स्रोत आमच्यासाठी अवतरला.

एक दिवस डॉ. वि. म. बेंद्रे यांच्या दवाखान्यात श्री मिटकरमहाराजांचे ब्लडप्रेशर पहात होतो. त्यावेळी त्यांनी माझी चौकशी केली आणि मला म्हणाले, 'तू श्री गणपती अथर्वशीर्ष म्हणत जा. मी बाजारातून पुस्तक आणून रोज स्तोत्र म्हणायला

सुरुवात केली. एक दिवस आमचे धाकटे मामा श्रीपादशास्त्री कवीश्वर मला म्हणाले, 'अथर्वशीर्ष, गुरुमुखातून ऐकावं आणि मग म्हणावं, 'तू दत्तमहाराजांच्या कडून संथा घे.' त्याप्रमाणं मी दत्तमहाराजांना विचारलं. ते क्षणार्धात तयार झाले. आमचं लग्न नवीन झालेलं आणि बिऱ्हाड एका खोलीत थाटलेलं होतं. त्यांच्या सूचनेवरून श्री सत्यनारायणाची पूजा घातली. नंतर त्यांनी श्रीगणपती अथर्व शीर्षाची संथा मला दिली. त्यांच्या रूपानं श्रीगणेशाचा आशीर्वाद प्रवाह अखंड वाहात राहिला. अगदी मुलं, नातवंडं यांच्यापर्यंत.

श्रीदत्तमहाराजांचं सोवळं ओवळं फार कडक होते. पण त्याचा इतरांना त्रास होत नसे. एक दिवस आम्ही त्यांच्या घरी भेटण्यासाठी गेलो होतो. माझ्या मोठ्या मुलाच्या पायात सपाट तळपायाच्या उपचारासाठी कायम कातडी बूट घातलेले असत. तो तसाच देवघरात शिरला. आम्ही मुलाला ओरडलो व बाजूला हो असं सुचवलं. त्यावर दत्तमहाराज म्हणाले, 'असू दे. लहान मुलांचं सर्व चालतं.' हे अकल्पित होतं. कुणासाठी कडक नियम असावेत याचं आध्यात्मिक भान त्यांच्याजवळ होतं. त्यांच्या देवघरातल्या त्या सर्व देवांची मी लहान असताना अनेकवेळा पूजा केलेली होती त्याचं स्मरण मला त्यावेळी झालं.

आमच्या एका अभ्यासगटाने १९८३ मध्ये चरकसंहितेचे संपूर्ण मराठी भाषांतर प्रकाशित करण्याचे ठरविले. मी दत्तमहाराजांना आमंत्रण देण्यासाठी गेलो. ते म्हणाले, 'मी समोरच्या रांगेत बसून सर्व कार्यक्रमाला उपस्थित राहीन.' त्याप्रमाणे ते आले होते. मराठी चरक संहितेची दुसरी आवृत्ती पण नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. प्रत्येक कामात प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा सूचना करून प्रोत्साहनपर आशीर्वाद मिळत होता. त्याचा आयुर्वेदशास्त्राला शक्ती मिळण्यासाठी, लाभ होण्यासाठी उपयोग झाला.

काही वर्षांपूर्वी आमच्या एका जर्मन डॉक्टरने गुरुविषयी काही सांगा असं म्हटलं. माझी आई, माझे वडील आणि माझे गुरू श्रीदत्तमहाराज यांच्याबद्दल मी सविस्तर वर्णन करून सांगितले होते. ते ऐकून आनंदाश्रू अडथळा पार करून त्यांच्या डोळ्यांतून बाहेर आले. ते डॉक्टर शास्त्रज्ञ व लेखक आहेत.

ज्या काही संस्थेत ते काम करत होते त्या त्या ठिकाणी मतभेद झाले, होत असत. परंतु त्याबद्दल कुणाबद्दलही वाईट शब्द न बोलता शांतपणानं सोदाहरण पटवून देत असत. शेवटी सर्व काही मंगल होत असे.

मी व्यवसाय करीत असताना किंवा इतर संस्थात काम करत असताना आणखी जास्त लोकांना शिकवावं, सांगावं, बरोबर घ्यावं असं ते सांगत असत.

आयुर्वेदाबद्दल त्यांना प्रेम होतं. म्हणून मला या अभ्यासक्रमाकडे वळविण्यासाठी आणि त्यांच्या मोठ्या मुलाला आयुर्वेद अभ्यास पूर्ण करण्यासाठी उद्युक्त केलं. एवढंच नव्हे तर

## पूज्य बंधू दादांना

या दादा या पुनर्जन्म तुम्ही घेऊनि या ।
तुमच्या परिवारा किंवा बाळांना भेटाया ॥
गाऊनी प्रभुचे गीत भक्तीने जोडुनी हात
जाहलात विलीन विश्वात
सोडानी आम्हा सर्वांना दु:ख सागरात
निरुपयोगी जीर्ण वस्त्र हे सोडूनी गंगेत
आत्मरूपाने अमर राहिला आमुच्या समवेत ॥
आजपासुनी अंतरले मी थोर बंधु माऊलीला
दु:खाचीही जखम राहिली कायम हृदयाला
तव कीर्तिमंदिर थोर पवित्र स्मारक छान
राहिले अमर बहुमोल करिते प्रणाम तुजला ॥
व्रतवैकल्याचे करुनि सदा एकांतात
अखिल जीवन मुदे वेचले भागवत वाचण्यात
दिनांची तू गुरूमाऊली नाव असे सार्थ ॥
प्रशांत नंदादीप याक्षणी अकालीच विझला
अकस्मात् हा संतलोकीचा ढळला भूतारा ।
मायपाश हे तुटता सारे कळवळले प्राण
तुम्हावाचुनी वाटते घरमंदिर शून्य ॥
ऐका हो हाक, विनविते भगिनी तुम्हाला
द्या आर्शीवाद द्या आता मजला
अंतिम भेट न झाली म्हणुनी तळमळ वाटे मनाला
दर्शन द्या मज होऊ दे धन्य आजि मजला ॥
पूज्य मोठेमोठे लोक सगळे गेले मज सोडून
प्रेमळ बंधूही चौघे जण
आता एकच उरला दीर्घायुष्य लाभो त्याला
हीच प्रार्थना प्रभु चरणाला ॥
बोलावे किती, किती सांगावे किती
परि वेळ न आता उरला
मीच येईन आता पैल तीराला
भेटण्यास तुम्हाला
कवीश्वर घराण्यातील त्या दोघी जणी
आई आणि वहिनी भाग्याच्या म्हणुनी
त्या आधीच गेल्या जिंकले त्यांनी
भाळी कुंकवाचा टिळा लेऊनी सौभाग्याची लेणी
म्हणुनि वंदन त्या स्त्रीचरणी ।
ही श्रद्धांजली भक्तीने
तव पवित्र चरणी नमुनी ।
अर्पिते साश्रुनयनांनी
हे जगदीश शांति दे चिरकाल
दत्तकृष्णभक्ताला ॥

पद्मावती श्रीहरी कुलकर्णी (पं. दत्तमहाराजांची भगिनी)

ॐ
सर्वे सन्तु निरामया: ।
कृण्वन्तो विश्वमार्यम् ।
हिंदुराष्ट्रमिदं भारतम् ।
संस्कृतभाषा राष्ट्रभाषा ।
रामराज्यस्य आदर्शं मनसि
निधाय तन्निर्माणार्थं कटिबद्धा: वयम् ।
निरंकुशा राजनीति: ।
तत्र सुविचाराणां अंकुश: आवश्यक: ।
(राष्ट्रहितार्थं विज्ञापनम्)

आगम–पद्धति: तीर्थौषधि:
तीर्थस्य अर्थ, प्रदक्षिणाया: प्रभावं,
समिधानां संबन्धं दर्शयन्त्या:
आगम–पद्धत्या: ज्ञानार्थं 'घरचा वैद्य' एषा
पुस्तिका अवश्यं क्रेतव्या ।
यदि भवता: औषधापणे
न प्राप्यते चेत् षट्रुप्यकाणां पत्रचिटिका:
प्रेषणीया: । ज्ञानपत्रं विनामूल्यं प्रेषयाम: ।

गुटिका केश्शरंजनाया: वितरक:

आगोम, कोळथरे पिन – ४१५७१२
(महाराष्ट्र राज्यम्)
एस.टी.डी. ०२३५८ दूरभाष : ८५२२२
फॅक्स : ८५२२३

गृह–सौम्य–प्रथमोपचार: इत्येव
निरामय–जीवनस्य सोपान: ।

आयुर्वेद दवाखाना व त्याद्वारे सामान्यांची सेवा असा उपक्रम १५ वर्षांपूर्वी वामन निवासात त्यांनी सुरू केला.

आयुर्वेद महाविद्यालयात ५०-६० वर्षांपूर्वी अध्यापन करीत असताना त्यांच्या मनात, आयुर्वेदशास्त्र या देशातच नव्हे तर इतर देशांतही महत्त्वाचं मार्गदर्शक शास्त्र ठरावं आणि या महाविद्यालयातील संबंधित मंडळींनी हे काम उत्तम तऱ्हेनं पूर्णत्वाला न्यावं असं होतं. त्यासाठी त्यांनी विविध प्रसंगी, अनेकांना मार्गदर्शन केलेलं आहे.

संस्कृतचे प्रकांड पंडित असणारे पण लहानांशी, सामान्यांचे बरोबर सोप्या, सहज मृदू शैलीत बोलणारे, विविध देशी परदेशी जिज्ञासू, अभ्यासू मंडळींना अविरत मार्गदर्शन करणारे, पुण्यातील टिळक महाराष्ट्र विद्यापीठात तीन दशकांहून अधिक काळ संस्कृत, न्याय, तर्क आदि विविध व गहन दर्शन शास्त्रांचे अचूक अध्यापन करणारे, प्रवचनांचे वेळी साध्या शब्दात, सौम्यपणे योग्य शब्दात सामान्यातल्या सामान्य, अशिक्षित माणसांना कळेल अशी माहिती थोडक्या वेळात देणारे, नरसोबावाडी, बार्शी, जालना, देऊळगावराजा, मराठवाडा व विदर्भातील असंख्य ठिकाणी, आणि अख्ख्या महाराष्ट्रभर व इतर विविध प्रांतात असंख्य शिष्यसमुदाय असणारे श्रीदत्तमहाराज वारंवार आठवणींच्या पडद्यावर अखंडपणे दिसून राहिले आहेत.

विमानातून परदेश प्रवास करत असताना आपण जमिनीवर नसतो. फार उंचीवर असतो. मनात चांगले विचार येतात. सर्वजण चांगले आहेत असं जाणवतं. दत्तमहाराज हे जमिनीवर असूनही अतिशय उंच विचाराचे होते. त्यांच्याशी अनेक चर्चा होत असत. तीन वर्षांपूर्वी परदेशाहून आल्यानंतर त्यांना भेटून नेहमीप्रमाणे परदेशातील आयुर्वेद कामाची माहिती दिली. आणि माझ्या मनात निर्माण झालेला आणखी एक प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. 'प्रत्येक शरीरात एक आत्मा असतो. गेल्या शंभर वर्षात लोकसंख्या खूप वाढली आहे. हे जास्तीचे आत्मे कुठे होते ? आणि याचं स्पष्टीकरण काय असावं ? मला ते म्हणाले, 'यावर तुम्ही विचार करा. आपण बोलू या.' आजतागायत मला काही सुचलं नाही आणि श्रीदत्तमहाराज पण आज आपल्यामध्ये नाहीत.

पण अनेक बारीकसारीक गोष्टीत मोजक्या शब्दात, छोट्याशा कृतीने त्यांच्याकडून जी शिकवण मिळाली आहे त्यातूनच यासारख्या विविध गहन प्रश्नांची उकल होऊ शकेल.

कोल्हापूर जिल्ह्यातील नरसोबावाडी इथं उदित झालेलं हे मोठं व्यक्तिमत्त्व. त्यांच्या हयातीत अनेकांना मार्गदर्शक ठरलं ते दैवी व्यक्तिमत्त्व त्यांच्या निर्वाणानंतरही दीपस्तंभापेक्षाही अधिक चांगलं मार्गदर्शक ठरेल ही उघड गोष्ट आहे.

अध्यक्ष, राष्ट्रीय शिक्षण मंडळ, कर्वे पथ, पुणे ४

धर्मभास्करची सवय : चांगली सवय




# वीतराग सत्पुरुष – दत्तमहाराज

## डॉ. चिं. ग. काशीकर

**जगात रोज माणसे जन्माला येत असतात.** पण ज्यांच्यामुळे माणुसकी उंचावते अशा विभूती हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच असतात. दत्तमहाराज हे त्यांपैकी एक. त्यांचे नुकतेच निर्वाण झाले. परवा परवापर्यंत ते आपल्यात होते. आपल्यापैकी पुष्कळांचा त्यांच्याशी कमीजास्त प्रमाणात प्रत्यक्ष संबंध आला असेल आणि त्यांची थोरवी प्रत्यक्ष अनुभवाला आली असेल. आता ते आपल्यात नाहीत हे व्यावहारिक सत्य आहे. तथापि पारमार्थिक विचार केला तर ते आहेतच असे भान होणे उचित आहे.

महाराज अध्ययन संपवून पुण्यात आले आणि नारायण पेठेतील मुंजाबाच्या बोळात असलेल्या शांकर मठात अध्यापन करू लागले. तेव्हापासून ते माझ्या आणि इतरांच्या पाहाण्यात येऊ लागले. प्रत्यक्ष परिचयाचा अवसर नव्हता; तो लौकरच आला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना होऊन सन १९४६ मध्ये पंचवीस वर्षे झाली होती आणि हा प्रसंग साधून विद्यापीठाच्या प्रगतीसंबंधी पुढचे पाऊल टाकता आले तर पहावे असा विचार विद्यापीठाच्या चालकांच्या मनात आला. विद्यापीठाची काही स्थावर मालमत्ता होईल आणि त्याला आर्थिक बळ प्राप्त होईल असे काही उपक्रम करण्यात आले. प्रत्यक्ष विद्येच्या क्षेत्रात काहीतरी नवे करता आले तर पहावे असा विचार आला. इंग्रजी राज्य आल्यापासून संस्कृत विद्या मागे पडली होती. विशेषत: प्राचीन पद्धतीने अध्ययन केलेल्या पंडितांची परंपरा खंडित होण्याचे भय निर्माण झाले होते. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर हे विद्यापीठाचे कुलपती होते. प्राचीन परंपरेने संस्कृत विद्येचे अध्यापन विद्यापीठात सुरू करावे, त्यासाठी विद्वान अध्यापक मिळवावेत, विद्यार्थ्यांची निवास-भोजनाची व्यवस्था करावी, अशी योजना ठरली. टिळक विद्यापीठात महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकरांसारखे पंडित निर्माण व्हावेत अशी बाळासाहेब खेरांची आकांक्षा होती. या कामासाठी निधी उभारण्याची आवश्यकता होती. स्वत: बाळासाहेब खेर, दादासाहेब मावळंकर इत्यादींनी या कामी पुढाकार घेतला आणि महाविद्यालय सुरू करण्याचे ठरले. संस्कृत विद्येचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी विद्यापीठाने समिती नेमली. स्वामी केवलानंद हे समितीचे अध्यक्ष आणि प्रा. का. पां. अभ्यंकर हे सभासद होते. मी समितीचा कार्यवाह म्हणून काम पहात होतो. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर अध्यापक म्हणून सुयोग्य विद्वानांची योजना करणे आवश्यक होते. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे अध्यापक म्हणून लाभले तर चांगले होईल असे विद्यापीठाच्या मंडळींना वाटले. आणि त्यांनी पं. दत्तात्रेयशास्त्री यांना तशी विनंती केली. शास्त्रीबुवांनी ती मान्य केली. सन १९४८ मध्ये महाविद्यालयाची स्थापना झाल्यापासून न्याय आणि वेदान्त हे विषय ते शिकवू लागले. सन १९७० मध्ये वयाच्या साठाव्या वर्षी निवृत्त होईपर्यंत अखंडितपणे त्यांनी अध्यापन केले. अनेक विद्यार्थी त्यांच्या हाताखाली न्याय आणि वेदांत या विषयात निष्णात झाले. बादरायण सूत्रांवर निम्बार्काचार्यांचे 'वेदान्तपारिजातसौरभ' या नावाचे भाष्य आहे. त्याचा मराठी भाषेत अनुवाद पं. दत्तात्रेयशास्त्री यांनी केला. तो विद्यापीठाने ग्रंथरूपाने प्रकाशित केला आहे.

महाराज बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयात अध्यापन करू लागल्यापासून त्यांची माझी भेट मधूनमधून होत असे. काही निमित्ताने त्यांच्या निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी मी गेलो होतो. शनिवार पेठेत वर्तकांच्या वाड्यात मागील बाजूस तिसऱ्या मजल्यावर ते राहात असत. ते दत्तसंप्रदायाचे अनुयायी आहेत आणि वामनराव गुळवणी महाराजांशी त्यांचा विशिष्ट संबंध आहे हे हळूहळू लक्षात येऊ लागले हाते. वासुदेवाश्रमाची स्थापना झाल्यानंतर तेथे अनेक कार्यक्रम होत असत. काही समारंभांच्या निमित्ताने आश्रमाच्या मागील मोकळ्या जागेत मांडव घातला होता आणि काही धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम तेथे चालू होते. एकदा काही विषावर संस्कृत भाषेत चर्चा चालू होती. तीमध्ये सहभागी झाल्याचे मला स्मरते.

'विद्या विनयेत शोभते' हे तर सत्यच आहे. महाराजांच्या ठिकाणी पराकाष्ठेचा विनय आणि ऋजुता होती. त्यांचा विनय जन्मजात अंगभूतच होता. चालता बोलता विनयच. एकदा वासुदेवाश्रमात गुळवणीमहाराजांच्या प्रीत्यर्थ काही समारंभाचे आयोजन केलेले होते. त्याची मला काही कल्पना नव्हती. मी तेथे उपस्थितही नव्हतो. त्या समारंभाच्या एक भाग म्हणून काही व्यक्तींना वस्त्रे अर्पण करण्याचे ठरले होते. त्यांमध्ये माझ्या नावाचा समावेश होता. एक दिवस स्वत: महाराज विद्यापीठावाड्यातून माझ्या घरी चालत आले, बरोबर आणलेले वस्त्र त्यांनी माझ्या हातांवर ठेवले आणि वाकून मला नमस्कार केला. या अनपेक्षित घटनेने मी पराकाष्ठेचा लज्जित झालो. विद्यापीठवाड्यातून त्यांनी माझ्याकडे केवळ निरोप पाठविला असता तरी मी तत्काळ त्यांना भेटावयाला गेलो असतो. तसे करणे त्यांना

योग्य वाटले नाही. त्यांच्या अशा विनयबाहुल्याची कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

विद्वानाचा गौरव वाङ्मयस्वरूपात करावा अशीही एक प्रथा अलीकडे रूढ झाली आहे. या स्वरूपात महाराजांचा सन्मान करावा असे काही सज्जनांच्या मनात आले. महाराजांची सहस्त्रचन्द्रदर्शनशान्ति साजरी करावी असे त्यांच्या भक्तजनांनी ठरविले आणि त्यासाठी महोत्सव समिती स्थापन केली. महाराजांच्या गौरवाप्रीत्यर्थ एक अभिनंदन ग्रंथ निर्माण करून तो या महोत्सवात त्यांना अर्पण करावा असे महोत्सव समितीने ठरवले आणि ग्रंथसंपादनासाठी एक समिती नियुक्त केली. या समितीने केलेल्या विनंतीला अनुसरून अनेक विद्वानांनी भारतीय विद्येसंबंधीच्या विषयांवर निबंध लिहून पाठविले. 'अभिनन्दन' ग्रंथात त्यांचा समावेश करण्यात आला. या ग्रंथासाठी निबंध लिहिण्याची संधी मला मिळाली. ग्रंथाचे नाव 'प्रसन्नपारिजात' असे ठेवण्यात आले. हे नाव सर्वथा उचित होते. पारिजाताची प्रसन्नता, कल्पतरू या स्वरूपात त्याचे कर्तृत्व, त्याच्या फुलांची कोमलता शुभ्रवर्ण आणि सुगंध, पारिजात वृक्षाची शीतल छाया हे सर्व लक्षात घेतले म्हणजे उपमान आणि उपमेय यांचे सादृश्य किती परिपूर्ण आहे हे जाणवते. महोत्सवप्रसंगी हा ग्रंथ महाराजांना अर्पण करण्यात आला. समारंभ प्रसंगी भाषण करण्याचीही संधी मला लाभली होती. त्यानंतर वामननिवासात महाराजांच्या प्रीत्यर्थ आणखी एक समारंभ काही निमित्ताने झाला त्यातही दोन शब्द मी बोललो होतो.

माझ्या कुटुंबीयांनी एक धार्मिक कार्यक्रम योजला. त्याप्रसंगी महाराजांना निमंत्रित करून त्यांचे पूजन करावे असे माझ्या मनात आले. वासुदेवाश्रमात महाराजांना समक्ष भेटून मी त्यांना विनंती केली, ती त्यांनी स्वीकारली. ठरलेल्या वेळी ते आले. मी त्यांचा सन्मान करणार त्यापूर्वीच बरोबर आणलेली शाल त्यांनी माझ्या अंगावर घातली. महाराजांचा प्रसाद अनपेक्षितरीत्या मला मिळाला. नंतर मी आदरपूर्वक महाराजांचे पूजन केले.

महाराजांचे एक अनुग्रहित डॉ. गु. वा. पिंपळापुरे हे नागपूरचे. तेथील महाविद्यालयात ते संस्कृतचे प्राध्यापक होते. काही प्रसंगाने नागपूरला गेलो असता त्यांचा परिचय झाला होता. ते काण्व शुक्ल यजुर्वेदी. शुक्ल यजुर्वेदाच्या एकूण पंधरा शाखांपैकी दोन प्रमुख माध्यंदिन आणि काण्व. माध्यंदिन ही महाराजांची वेदशाखा. या शाखेचा शतपथ ब्राह्मण हा मोठा ग्रंथ छापला गेला आहे. काण्व शतपथ ब्राह्मणाची पहिली सात कांडे प्रकाशित झाली. पुढील आठ ते सोळा ही नऊ कांडे अप्रकाशित आहेत. डॉ. पिंपळापुरे यांनी काण्व शतपथ ब्राह्मणाचे हस्तलिखित ग्रंथ संपादित करून या समग्र विस्तृत ग्रंथाची चिकित्सापूर्ण प्रत सिद्ध केली आणि ती छापूनही घेतली. या ग्रंथाचे प्रकाशन पुणे येथे महाराजांच्या उपस्थितीत व्हावे असा त्यांचा संकल्प होता. या प्रकाशनसमारंभाचे अध्यक्षस्थान मी स्वीकारून ग्रंथ प्रकाशित करावा अशी डॉ. पिंपळपुरे यांची इच्छा होती. तिला अनुसरून वासुदेवाश्रमात प्रकाशनसमारंभ झाला.

महाराजांनी शेजारी खुर्चीवर बसावे अशी त्यांना विनंती केली. परंतु महाराजांनी ती मानली नाही. त्यांनी खाली बसणेच पसंत केले. विनय त्यांच्या रोमरोमी भिनला होता. त्यादिवशी महाराजांचे दर्शन झाले ते शेवटचे. त्यानंतर त्यांच्या भेटीचा योग आला नाही. शरीरस्वास्थ्याच्या अभावी वासुदेवाश्रमात त्यांचे आगमन क्रमशः कमी झाले.

प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ रोमाँ रोलाँ यांच्या मते महात्मा गांधी ही असामान्य व्यक्ति होऊन गेली. ते म्हणत, 'गांधींसारखी अलौकिक विभूति भूतलावर अवतीर्ण झाली होती असे भविष्यकालीन पिढ्यांना सांगितले तर त्यांना खरेसुद्धा वाटणार नाही.' कामक्रोधादि षड्रिपू ज्याने जिंकले आहेत अशी एखादी व्यक्ती तुमच्या पहाण्यात आली काय असे कुणी मला विचारले तर मी निःशंकपणे सांगेन, 'होय, अशी व्यक्ति मी प्रत्यक्ष पाहिली आहे दत्तमहाराज.'

१४८९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

पं. दत्तमहाराजांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन !

**अनेकात एक !**

**सांगली परिसरात कॅटरर्स अनेक आहेत, पण नाव घेण्यासारखे 'लागूंचे' अस्मिता व छाया कॅटरर्सच.**
**सर्व प्रकारच्या मंगल समारंभ प्रसंगीच्या कॅटरींग ऑर्डरस् स्विकारतो.**

**अस्मिता कॅटरर्स**
**आणि छाया कॅटरर्स**
**यशवंत कार्यालय**

**संपर्क : श्री. लागू**
**विनम्र आणि चोख समाधानकारक व्यवस्थेसाठी प्रसिद्ध.**
**३६३, गांवभाग, जैन बस्तीजवळ – सांगली**
**फोन – ३३२९२९ , ३४०९३९**

# साक्षात्कारी संत ब्रह्मीभूत पं. दत्तमहाराज कवीश्वर

पं. ल. पं. जांभोरकर



**परमपूजनीय ब्रह्मर्षि दत्तमहाराज कवीश्वर,** आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे पू. कवीश्वर गुरुजी. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात आम्हाला ते न्याय-वेदान्त शिकवीत होते. प्रत्यक्ष अभ्यासापेक्षा जीवनविषयक तत्त्वज्ञान ऐकण्यातच आम्ही स्वतःला कृतकृत्य समजत होतो. गोपिकांना रासक्रीडेच्या वेळी व इतरही वेळी जसे कृष्णाचे माझ्यावरच प्रेम आहे असे वाटत असे तसेच मीही असे म्हणतो, गुरुजींचे माझ्यावरच खूप प्रेम होते. शिकत असताना त्यांच्या मातामहींना (वय ८०) सांगलीवरून आणण्यासाठी गुरुजींनी मलाच पाठविले होते. तसेच सौ. सुमनताईंचे लग्नात मीच सर्वाधिकारी होतो.

तसेच आपल्यामुळे इतरांना यत्किंचितही त्रास होऊ नये म्हणून वेळप्रसंगी आपला कर्मठपणा ते बाजूला ठेवीत असत. कन्याशाळेच्या समोरच्या वर्तकांच्या वाड्यात गुरुजी प्रथम राहात असत. कोणत्यातरी निमित्ताने आईसाहेब व इतर सर्वजण बाहेरगावी गेले होते. ही कुणकुण माझ्या व माझा मित्र दिवाकरच्या कानी आली. आम्ही दोघे घरी गेलो. ते नको नको म्हणत असताना आम्ही स्वयंपाकाच्या तयारीला लागलो. तेव्हा गुरुजी म्हणाले की, सोवळे नेसण्याची आवश्यकता नाही. धूतवस्त्र असले तरी चालेल. बहिरंगापेक्षा अंतःकरणाची शुद्धता श्रेष्ठ असते. बहिरंग जाता जाता सहज बोलणे हाचि उपदेश हा संतांचा स्वभाव तेथे प्रकट झाला. अतिशय शांत स्वभाव, माऊलीची कनवाळू दृष्टी, राग कधी माहितच नाही, ते विद्यार्थ्यांना कधीही अरे-कारे म्हणत नसत. घरी मंडळींना देखील ते अहो-काहो असेच म्हणायचे. दत्तमहाराज प्रत्यक्ष दत्ताचेच अवतार होते याचा पदोपदी अनुभव आला.

एकदा विद्यापीठातील सर्वच जण गुपचुप गणपतीचे देवळात यज्ञासाठी गेले होते, मीच या ना त्या कारणाने विद्यापीठात एकटाच होतो. म्हणजे मलाही जाण्यास उशीर झाला होता. इतक्यात विद्यापीठात पोस्टमन आला नि त्याने तार आणली. ती कर्मधर्मसंयोगाने माझीच होती. माझी आई अत्यवस्थ होती व ताबडतोब निघून येणे असा तारेत मजकूर होता. जवळ तर एक पैसाही नव्हता, मी धावतच गुपचुप गणपतीचे देवळात गेलो. पाहतो तो काय तुडुंब गर्दी. देवळात शिरकाव होईना. काय करावे कसे करावे. डोळ्यांवाटे अश्रुपूर वाहत होता. मी थिजून जागचे जागी उभा राहिलो. पाहतो तो काय प्रत्यक्ष गुरुजी माझ्या समोर उभे. त्यांनी माझ्या हातात शंभर रूपयाची नोट ठेवली. एका विद्यार्थ्यास गाडीत बसवून देण्यास सांगितले व ताबडतोब निघ म्हणाले. 'वाटेल बरे आईला.' मी गुरुजींच्या चरणावर मस्तक ठेवले व निघालो. गावी गेलो. गुरुजींनी 'वाटेल बरे आईला' असे म्हटले होते. पुढे आईला खरोखरच बरे वाटले. वास्तविक ती अत्यवस्थ झाली होती पण गुरुजींनी आशीर्वाद दिला होताना. आई बरी झाली. मी विचार केला. तार आलेली कोणालाही माहीत नव्हती. फक्त मला व पोस्टमनला. मग गुरुजींना कळले कसे ? गुरुजी म्हणजे साक्षात दत्तावतार 'साक्षात्कारी संत'च होते.

**परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।'** अहं सामान्यः । मी अत्यंत सामान्य माणूस पण माझ्या ठिकाणी केवढा मोठेपणा त्यांनी निर्माण केला. माझ्या हातून संस्था स्थापण्याचे कार्य घडविले. ती संस्था त्यांच्या कृपेने वाढली, शिशुवर्गापासून ते दहावीपर्यंत सुमारे दोन हजार विद्यार्थी इतर विषयांबरोबर संस्कृतचाही अभ्यास करीत आहेत.

माझ्या गावाजवळील हिंगोली येथील धर्मालंकार ओमप्रकाश देवडाजींनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव पाठविला. संस्कृत पाठशाळेला 'ब्रह्मर्षि पं. दत्तमहाराज ढुंढिराजमहाराज कवीश्वर संस्कृत पाठशाळा' हे नाव पाठशाळेला देण्याचे त्यांचे प्रत्यक्ष भेटीत गुरुजींनी मान्यता दिली त्याकरिता श्री देवडाजी पाठशाळेच्या नावाने दोन लाख बँकेत ठेव ठेवणार आहेत व दरवर्षी पाठशाळेच्या खर्चासाठी तीस हजार रुपये शाळेच्या नावे व्याजाचे मिळणार आहेत. 'सज्जनानां जीवनं परोपकाराय एव । गंगा पापं शशी तापं । दैन्यं कल्पतरूस्तथा । सज्जनांना जीवनं परोप-कारार्थमेव ।' लोकांच्या उद्धाराकरिताच अशा सज्जनांचा जन्म होत असतो.

माझ्या जीवनाचे तर त्यांनी सोनेच केले. विद्यापीठात शिकत असताना धर्मवीर विश्वासराव डावरे सतत विद्यापीठात येऊन मला लग्नाची गळ घालू लागले. पण मी त्यांना दाद देईनासा झालो तेव्हा ते पू. कवीश्वर गुरुजींकडे गेले व माझी नात लक्ष्मीकांतला द्यायचा मी निश्चय केला आहे.. तेव्हा आपण हे घडवून आणावे. तेव्हा गुरुजींनी मला घरी बोलाविले व माझ्याकडून होकार वदवून घेतला. आईवडीलांना तार करून बोलाविले व माझे शुभमंगल घडवून आणले. असे एक ना अनेक प्रसंग सांगता येतील.

उपदेशाबद्दल मी अनेकवेळा त्यांना बोलून दाखविले पण त्यांनी प्रत्यक्ष गुरुमंत्र दिला नाही. 'सहज बोलणे हाचि उपदेश हेच ब्रीदवाक्य खरे ठरले. असे होते माझे व साऱ्या जगाचे गुरुजी. ते शरीराने जरी आमच्यातून निघून गेलेले असले तरी त्यांचा वरदहस्त साऱ्या जगावर राहाणारच आहे. माझ्यावरही त्यांची कृपा सतत राहावी हीच विनवणी.

२१९१, सहकारनगर क्र. १, पुणे ४११००९




# चालता बोलता वेदान्त

**डॉ. श्रीकांत बहुलकर**

**ब्रह्मश्री पंडित महाराज कवीश्वर हे नुकतेच** ब्रह्मतत्त्वात विलीन झाले. एक आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेलं आहे. असं असलं तरी अशा महात्म्यांचं कार्य चिरस्थायी असतं. पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारं असतं. भर्तृहरि या कवीनं 'नीतिशतक' या ग्रंथामध्ये रसाळ रचना करणाऱ्या श्रेष्ठ कवींचं - कवीश्वरांचं - जे वर्णन केलं आहे; ते पंडित कवीश्वर यांनाही लागू पडतं - जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः। नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम्॥ (नीतिशतक, श्लोक २३)

या श्लोकाचा वामन पंडितांनी केलेला अनुवाद असा -

जयांचे असे पुण्य की सावकाश विशेषें जनीं शोभती ते कवीश ॥
जयांचा यशोदेह आकल्प राहे जरामृत्युवार्ता जयाला न साहे ॥

पंडित कवीश्वर यांच्याशी माझा संबंध फारच थोडा आला. विद्यार्थिदशेमध्ये टिळक विद्यापीठात मी जात असे, तो काळ गुरुजींचा जवळजवळ निवृत्तीचा काळ होता. त्यावेळच्या विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयात तीन पूर्णवेळ अध्यापक होते. - पं. कवीश्वर, पं. शि. ह. धुपकर आणि पं. वा. बा. भागवत. पं. धुपकर हे विद्यापीठाचे सन्माननीय कार्यवाह म्हणूनही काम पाहत असत. पं. भागवत गुरुजी महाविद्यालयाचे अधिपति (प्राचार्य) होते. त्या काळात (१९६६-१९७०) संस्कृत भाषा परीक्षांचे वर्ग जोरात चालत. सकाळ-संध्याकाळ शालेय विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असे. शालान्त परीक्षेत संस्कृत विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति (एस.एस.सी. बोर्डाकडून) मिळत असे. त्यासाठी प्रयत्न करणारे बुद्धिमान विद्यार्थी विद्यापीठाची 'संस्कृतभाषाभिज्ञ' ही परीक्षा देत असत. त्या परीक्षेच्या तयारीसाठी अनेक विद्यार्थी येत. पं. भागवत गुरुजी सकाळी सहा वाजता तो वर्ग घेत असत. त्या मानाने संस्कृतच्या उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असे. विद्यापीठाचा तो अभ्यासक्रम म्हणजे प्राचीन शास्त्रांचा अभ्यास असे. न्याय, मीमांसा, व्याकरण, वेदान्त, साहित्यशास्त्र या विषयातला विशारद (बी.ए.) आणि पारंगत (एम.ए.) पदव्यांचे विद्यापीठाचे अभ्यासक्रम हे वैशिष्ट्यपूर्ण तसेच कठीणही होते.

संस्कृत विद्येला प्रतिकूल असलेल्या काळात विद्यापीठाने १९४८ मध्ये श्री बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली. त्या वेळेपासून १९७० पर्यंत पं. कवीश्वर गुरुजींनी महाविद्यालयात अध्यापन केले. प्राचीन पद्धतीचा आधुनिक, पाश्चात्य शिक्षणपद्धतीशी समन्वय साधून संस्कृतचे शिक्षण देण्याची ती अभिनव योजना होती.

पं. दत्तमहाराज कवीश्वर, पं. मार्तंडशास्त्री दीक्षित, पं. वा. बा. भागवत, पं. शि. ह. धुपकर असे अग्रगण्य विद्वान विद्यापीठाला लाभले. प्रारंभीच्या सुमारे बारा वर्षांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेतला. हे बरेचसे विद्यार्थी इतरत्र संस्कृत पाठशाळांमध्ये शिकत असत. विद्यापीठात अधिक चांगली सोय होती आणि पं. कवीश्वरांसारखे विद्वान तिथं होते. त्यामुळे महाराष्ट्र आणि गोव्याकडचे अनेक विद्यार्थी महाविद्यालयात दाखल झाले. न्याय आणि वेदान्त हे पं. कवीश्वरांचे मुख्य विषय. सांगली, धारवाड, पुणे या ठिकाणी त्यांनी प्रख्यात विद्वानांकडे व्याकरण, न्याय, मीमांसा अशा विषयांचा सखोल अभ्यास केलेला होता. त्यांचे अध्यापनकौशल्यही विद्यार्थ्यांना आकृष्ट करीत असे.

प्राचीन पद्धतीच्या संस्कृतच्या शिक्षणात ग्रंथातल्या प्रत्येक ओळीचा अचूक अर्थ समजावून घेऊन अभ्यास करण्याला महत्त्व असते. या पद्धतीला 'पांक्त अध्ययन' असे म्हणतात. पं. कवीश्वर गुरुजी अतिशय कठीण असे ग्रंथही या पद्धतीनं सोपे करून सांगत. त्या काळातले त्यांचे विद्यार्थी आज सत्तरीत आहेत. ते त्यांच्या अनेक आठवणी सांगतात. या विद्यार्थ्यांनी 'श्री बालमुकुंद महाविद्यालय आद्य सतीर्थ्य संघ' स्थापन केला आहे. प्रा. प्र. शं. जोशी, डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी, पं. वसंत गाडगीळ, पं. श्री. धुं. कवीश्वर, पं. लक्ष्मीकांत जांभोरकर असे अनेक विद्वान हे विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आणि गुरुजींचे शिष्य होत. दरवर्षी सहकुटुंब एकत्र जमून गुरुपूजन करायचं आणि त्यांच्यासमवेत काव्यशास्त्रविनोद करीत, जुन्या आठवणींना उजाळा देत, सुखदुःखाच्या गोष्टी करीत चार दिवस एकत्र घालवायचे हा परिपाठ गेली बाराहून अधिक वर्षे चालू आहे. या कार्यक्रमात पं. कवीश्वर प्रथमपासून सहभागी होत असत. भागवत सप्ताहाचं आयोजन केलं जाई. गुरुजींच्या प्रवचनांचा लाभ पुन्हा एकदा सगळ्यांना मिळत असे. मधली बारा वर्षं बाजूला होत. सगळ्यांना पुन्हा एकदा विद्यार्थिदशेत असल्यासारखं वाटे. मी त्या आद्य विद्यार्थ्यांपैकी नव्हे, तर अन्त्य विद्यार्थ्यांपैकी; पण मी शक्य तेव्हा या संमेलनात सहभागी होऊन या आनंदाचा लाभ घेतला आहे. ही संमेलनं पुढंही होत राहतील, पण गुरुजींची उणीव मात्र सर्वांनाच जाणवत

राहील. अध्यापनाबरोबरच ग्रंथसंशोधन आणि संपादन हेही महत्त्वपूर्ण कार्य गुरुजींनी केलं. ब्रह्मसूत्रावरचं शंकराचार्यांचं भाष्य प्रसिद्ध आहे. वेदान्त म्हणजे शांकरवेदान्त, असंच जणू समीकरण. महाराष्ट्रात या अद्वैत वेदान्ताची परंपरा मोठी आहे, पण वेदान्ताचे इतर संप्रदायही अभ्यासण्याजोगे आहेत. ब्रह्मसूत्रावरच्या आचार्य निम्बार्क यांच्या भाष्यग्रंथाचं संपादन आणि मराठी अनुवाद हे मौलिक कार्य गुरुजींनी केलं. 'वेदान्त परिजात सौरभ' या नावानं हा ग्रंथ टिळक महाराष्ट्र विद्यापीठानं प्रसिद्ध केला. सहस्रावधि पृष्ठांच्या या ग्रंथाला गुरुजींची एकशे अठरा पृष्ठांची प्रस्तावना आहे. त्यामध्ये चार्वाक, बौद्ध, जैन, वैशेषिक, न्याय, मीमांसा, सांख्य आणि योग या दर्शनाची मांडणी करून शेवटी वेदान्तदर्शनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. वैष्णव आणि खिस्तमताचीही चर्चा आहे. निम्बार्काचार्यांच्या परंपरेतल्या संतांविषयीची मौलिक माहितीही दिली आहे. आधुनिक विद्वानांच्या पद्धतीला अनुसरून प्राचीन परंपरेतल्या पंडिताने केलेली ही रचना म्हणजे अभ्यासाचं महत्त्वाचं साधन आहे.

विद्वत्तेबरोबरच आध्यात्मिक क्षेत्रातलं गुरुजींचं कार्य मोठं आहे. किंबहुना सहजयोगी सद्‌गुरू गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांची ख्याती मोठी आहे. या क्षेत्रातही साधनेबरोबरच ग्रंथसंपादन आणि प्रकाशनाचं मोठं कार्य त्यांनी केलं. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या संपूर्ण वाङ्मयाचं संपादन, मुद्रितशोधन आणि प्रकाशन हे कार्य गुरुजींनी ८-९ वर्ष गुरुसेवा म्हणून केलं. एकूण बारा खंडांमध्ये प्रसिद्ध झालेल्या या वाङ्मयाचा दत्त संप्रदायाच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी अतिशय उपयोग आहे.

गुरुजींचे अध्यापन आणि आध्यात्मिक कार्य यांची कीर्ती भारतात दूरवर पोहोचली. अनेक प्राचीन विद्यासंस्था, पीठे आणि भारत शासन यांच्याकडून गुरुजींना अनेक सन्मान प्राप्त झाले. 'अद्वैत वेदान्तशास्त्र विद्येच्या ज्ञात्यांच्या समूहामध्ये श्रेष्ठ, मोक्षविद्यारूपी अमृताचा रसानुभव घेणारे, असा गुरूजींचा गौरव कांचीपीठाने केला. डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. व्ही. व्ही. गिरी, डॉ. शंकरदयाळ शर्मा या तीन राष्ट्रपतींकडून सन्मानित झालेले गुरुजींसारखा पंडित विरळाच. अप्रतिम पांडित्य, उच्च आध्यात्मिक अधिकार आणि अपूर्व मानसन्मान प्राप्त होऊनही गुरुजींची वृत्ति विनम्र, सौजन्यशील अशीच होती. काम-क्रोधादि विकारांवर विजय मिळविणारी अशी व्यक्तित्वं फारच कमी पाहायला मिळतात. त्यांच्या रूपानं एक आदर्श शिक्षक आणि कर्मयोगी व्यक्तित्व विद्यार्थ्यांना लाभलं. अध्यापनाबरोबरच ते विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीही समजावून घेत. मार्गदर्शन करीत, साहाय्यही करीत. दूरवरून शिक्षणासाठी पुण्यात येऊन राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ते माता-पित्यांच्या ठिकाणी असत. त्यांच्याविषयी बोलताना अनेक विद्यार्थ्यांच्या मनातली ही भावना व्यक्त झालेली मी पाहिली आहे. त्यांच्या आदर्श आचरणाचा प्रभावही त्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर पडलेला आहे.

जीवनात सुख-दुःखाचे, मानापमानाचे अनेक प्रसंग सर्वांवरच येतात. अशा प्रसंगी गुरुजी खऱ्याखुऱ्या वेदान्त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ वृत्ति धारण करीत. टिळक विद्यापीठात अध्यापक म्हणून कार्य करीत असता काही प्रसंगी विद्यापीठाच्या प्रशासनाच्या कार्यपद्धतीमुळे गुरुजींना काही त्रासही सहन करावा लागला. प्रशासकीय दृष्टी आणि पद्धती ही काही वेगळी असू शकते. त्यातून घडते ते कित्येकदा उभयपक्षी त्रासदायक असते. तथापि, या प्रसंगीही गुरुजींची शांत वृत्ती बदलली नाही. विद्यापीठावर त्यांनी रागही धरला नाही, हे त्यांचं मोठेपण. तत्कालीन प्रशासकांच्या मनातही गुरुजींबद्दल विलक्षण आदर होता आणि तो वाढतच गेला. उभयतांचे वैयक्तिक संबंध नंतरही चांगलेच राहिले. या गोष्टींना आता बराच काळ लोटला आहे. गुरुजींचे तत्कालीन सहकारीही आता जीवनाच्या संध्याछायेत आहेत. तथापि गुरुजींचे काही शिष्य अद्यापही जुन्या गोष्टी उगाळताना दिसतात. गुरुजींच्या सान्निध्यात राहून, शुचितेच्या सागरात पोहूनही आपल्या मनावरची जळमटं जर जात नसतील, तर ते खऱ्या शिष्याचं लक्षण नव्हे. पूज्य गुरुजींच्या आदर्श जीवनातून काही बोध घेणं, आपल्या जीवनात तो आदर्श उतरवण्याचा प्रयत्न करणं हे शिष्यांचं कर्तव्य आहे. पंडित कवीश्वरांच्या आध्यात्मिक जीवनाची माहिती अनेकांना आहे. विद्वान अध्यापक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवावं, यासाठी हा लेखनप्रपंच केला आहे. पूज्य गुरुजींना ही शब्दरूपी श्रद्धांजलि आहे.

प. पू. पं. दत्तमहाराजांच्या
स्मृतीस अभिवादन

**मान्यताप्राप्त इलेक्ट्रीकल कॉंट्रॅक्टर्स आणि वीज सामानाचे व्यापारी**

**जे. के.**
**इलेक्ट्रीकल्स**

**सीताराम स्मृती,**
**वेस्ट हायकोर्ट रोड,**
**धरमपेठ - नागपूर ४४००१०**

**शैलेष जोगळेकर**
**फोन : (०७१२) ५२२६३३**




# सदा संतापाशी जावे

**श्रीवासुदेवनिवास आश्रमवासी**

प. पू. **श्रीमहाराजांचे महानिर्याण वयाच्या** ९० व्या वर्षी १ मार्च १९९९ या दिवशी झाले. आचारः प्रथमो धर्मः । या तत्त्वाला त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होते; मग ते नित्यकर्म असो अथवा नैमित्तिक असो ! श्री महाराजांच्या जीवनातील अनेक लहानमोठ्या प्रसंगांमध्ये आपल्याला आचारधर्माबरोबरच साधेपणा, अमानित्व, लीनता, स्थितप्रज्ञता, प्रसिद्धिपराङ्मुखता, वक्तृत्व हे सत्त्वगुण प्रकर्षाने अनुभवण्यास मिळतात.

**कमालीचा साधेपणा**

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या शरीराची वाजवीपेक्षा जास्त काळजी कधीही घेतली नाही. शनिवार पेठेतील वर्तक वाड्यातील आपल्या घरापासून श्रीवासुदेव निवासापर्यंत भर दुपारी ते अनवाणी येत असत; अंगावर देखील धोतर आणि उपरणे एवढीच वस्त्रे असत. आश्रमात दुपारी विश्रांती घेताना देखील नेहमीचेच उपरणे पांघरून आपल्या बैठकीच्या लहानशा गादीवर अंग दुमडून झोपत असत. पावसाळा असो, उन्हाळा असो अथवा हिवाळा असो, त्यांचा पोषाख ठरलेला - धोतर आणि उपरणे!

कुठेही परगावी जायचे असो, त्यांचे सामान अत्यंत आटोपशीर असे; हातात एक लहानशी पिशवी व बोचक्यासारखी लहानशी वळकटी ! त्यामध्ये एखाद दुसरी शाल, नित्य लागणारी वस्त्रे व उपकरणे एवढेच सामान असे. त्यांच्या या कमालीच्या साधेपणामुळे लोक त्यांना एक सामान्य याज्ञिकी करणारा ब्राह्मण असे समजत असत.

**अमानित्व**

अंदाजे १९७८ सालचा हा प्रसंग; आश्रमात शिकण्यासाठी दोन-तीनच विद्यार्थी होते. प. पू. श्रीदत्तमहाराज रोज भोजन आटोपून साधारण एकच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून आश्रमात विश्रांतीसाठी येत असत. श्रीमहाराज वरच्या खोलीत बसत. त्या दिवशी श्री महाराजांचा एक साधक दुपारी दोनच्या सुमारास आश्रमात आला. त्याला श्रीमहाराजांची पत्रदीक्षा झालेली होती. त्याने श्रीमहाराजांना कधीच पाहिलेले नव्हते. आश्रमात खाली कुणीही नसल्यामुळे तो सरळ जिना चढून वरती गेला. त्याने सरळ प. पू. श्रीदत्तमहाराजांनाच विचारले, 'दत्तमहाराज कुठे आहेत?' प. पू. श्रीमहाराजांनी त्या गृहस्थाचे नाव, गाव विचारले व भोजन झाले आहे का, नसल्यास खाली जाऊन भोजन करा असे सांगितले. ते गृहस्थ खाली आले, पण खाली कुणीच न दिसल्याने ते पुन्हा वरती आले व त्यांनी श्रीमहाराजांना सांगितले, 'खाली कुणी नाही.' श्रीमहाराज म्हणाले, 'चला, मी आलो.' असे म्हणून उपरणे सावरून श्रीमहाराज खाली आले. पाट मांडून तांब्या-भांडे ठेवले व शर्ट काढून, त्यांना पाटावर बसण्यास सांगितले. आपण स्वतःच त्यांना वाढण्यास सुरुवात केली. ओट्यावरील भांड्यांचा आवाज ऐकून, तळघरातून श्री. कृष्णा आर्वीकर बाहेर आले. त्याने पाहिले तर प्रत्यक्ष श्रीमहाराजच त्या गृहस्थांना वाढत आहेत. विद्यार्थी कृष्णा आर्वीकर पुढे आला व त्याने श्रीमहाराजांना सांगितले, 'मी वाढतो, आपण बसा.' हे सगळे भोजन करणाऱ्या त्या गृहस्थाने पाहिले. त्याने कृष्णा आर्वीकरला विचारले, 'हे कोण आहेत?' कृष्णाने 'हे श्रीदत्तमहाराज आहेत' असे सांगताच ते गृहस्थ अवाक् झाले. त्या गृहस्थांनी काही म्हणण्याआधीच श्रीमहाराज आपल्या खोलीत गेलेदेखील ! केवढे हे अमानित्व!

प. पू. श्रीदत्तमहाराज जेव्हा जेव्हा वाडीला जात, तेव्हा तेव्हा औरवाडला आवर्जून जात असत. त्या ठिकाणी प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या शिष्या गं. भा. यमुताई राहात असत. प. पू. श्रीमहाराज त्यांना भेटून त्यांची मोठ्या आस्थेने विचारपूस करीत, त्यांनी वाढलेल्या ज्वारीच्या कण्या मोठ्या प्रेमाने मनापासून खात असत.

१९८० साल, श्रीदत्तमहाराजांच्या अमृतमहोत्सवाचा दुसरा दिवस; महाप्रसादाकरिता श्री वासुदेव निवासात बरीच गर्दी झाली होती. लोक पाने धरण्यासाठी गडबड करीत होते. एका पंक्तीत दोन-चार पाने शिल्लक होती, त्यातील एका पानावर श्री दत्तमहाराज येऊन बसले देखील ! एका सामान्य भक्ताप्रमाणे सामान्यांच्या पंक्तीत बसलेले श्रीदत्तमहाराज, आपल्या कृतीने बरेच काही सांगून गेले. सांगता समारंभामध्ये मोठे हार घालून ज्यांचा सत्कार केला, ज्यांना लाखाचा निधी दिला, ज्यांचा गुणगौरव केला अशी महान व्यक्ति आपल्या पंक्तीत बसलेली आहे, हे कित्येकांना कळलेदेखील नाही; त्यामुळे प. पू. श्रीमहाराजांचे भोजन होण्याआधीच काही मंडळी हात धुण्यासाठी उठली देखील! स्वतःचे मोठेपण झाकून घेण्याची केवढी ही कुशलता, खबरदारी !

याच पद्धतीने दीक्षा देताना देखील श्रीदत्तमहाराज वागत असत. त्यांनी कुणालाही कधीही असे सांगितले नाही की, मी तुम्हाला दीक्षा देतो. दीक्षा पत्राद्वारे असो किंवा प्रत्यक्ष असो, ते सांगत, 'श्रीमहाराजांच्या (प.पू. गुळवणी

महाराज) फोटोला हार घाला. फोटोपुढे नारळ ठेवा, पेढे ठेवा आणि श्रीमहाराजांना प्रार्थना करा की माझ्यावर अनुग्रहाची कृपा करा. श्रीमहाराज तुमच्यावर कृपा करतील. नंतर तो नारळ फोडून घरच्या सर्वांनी खावा.' याप्रमाणे दीक्षा झाल्यानंतर साधक जेव्हा प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास जात आणि सांगत, 'महाराज, खाण्यापिण्याचे नियम (कांदा-लसूण) इतके काटेकोरपणे पाळणे, आम्हाला कठीण वाटते.' तेव्हा श्रीमहाराज म्हणत, 'ठीक आहे. काळजी करू नका. हळूहळू आपल्या सवयी कमी करत जा, पुढे या गोष्टी आपोआपच बंद होतील.' भक्ताची आर्तता पाहून त्यांचे अंत:करण विरघळून जायचे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची बसण्याची ढब वेगळीच असे. तसे ते मुद्दामच बसत असावेत. त्यांची पाऊले मांडीच्या इतक्या आत त्यांनी घेतलेली असत, की त्यांच्या पावलांच्या अंगठ्यांना सहसा कुणाला स्पर्श करता येत नसे. खुर्चीवर बसले असले तरी ते त्यांची पाऊले इतकी मागे घेत असत की, त्यांच्या पावलांना स्पर्श करणे अशक्य होत असे. 'अलौकिक नोहावें लोकांप्रती' अशी श्रीदत्तमहाराजांची कृती होती.

**परमेश्वर चरणी लीनता, नम्रता**

१९९० सालच्या आधी औरवाड येथे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ठरला. औरवाड येथे स्नानाची व अन्य विधींची सोय नव्हती. तेथील गैरसोयी श्रीमहाराजांना सांगताच श्रीमहाराज म्हणाले, 'देवांचे अन्य सेवेकरी जसे राहतात तसेच आम्ही राहू.' स्वत: इतके मोठे असूनदेखील सामान्य सेवेकऱ्यांच्या सारखेच स्वत:ला मानणे व वागणे हे किती कठीण आहे! ८० च्या घरात स्वत:चे वय असूनही श्रीमद् भागवत सेवेपुढे त्यांना स्वत:ला होणाऱ्या त्रासाची बिलकूल चिंता वाटली नाही.

श्रीदत्तमहाराजांचे श्रीमद् भागवतावर अलोट प्रेम होते. एका वर्षी श्रीवासुदेव निवासात श्रीमद् भागवतावर विवेचन करताना श्रीमहाराजांना ताप असूनही त्यांनी विवेचन चालूच ठेवले; शेवटी आरतीच्या वेळी श्रीमहाराजांना पुष्कळ थंडी भरून आली, त्यामुळे त्यांना उभे देखील राहता येईना. परंतु आरती होईपर्यंत श्रीमहाराज मोठ्या नेटाने तसेच उभे राहिले.

साधू, संत व संन्यासी यांच्याबद्दलचा श्रीमहाराजांचा आदरभाव वाखाणण्याजोगा होता. करवीर पीठाधिपती प. प.(परमहंस परिव्राजकाचार्य) विद्याशंकर भारती आश्रमात आले होते. त्यांचे व श्रीमहाराजांचे आसन शेजारी शेजारी मांडले होते. पीठाधिपती आसनस्थ होताच, श्रीमहाराज त्यांच्यासमोर खाली जमिनीवर बसले. नेमके असेच भोजनाच्या वेळी घडले. पीठाधिपतींच्या शेजारी श्रीमहाराजांचे पान मांडले होते. हे पाहताच श्रीमहाराजांनी एक शब्दही न बोलता आपले पान उचलले व विश्वस्तांच्या ओळीत जाऊन बसले. यावेळी यात कुणालाही दोषी न ठरविता संन्याश्याशी कसे वागावे हे आपल्या कृतीतून त्यांना दाखवून दिले.

**प्रसिद्धीपराङ्मुखता**

१९८० सालच्या अगोदर प. पू. श्रीदत्तमहाराजांचा आश्रमात कोठेच मोठा फोटो नव्हता. म्हणून विश्वस्तांनी मोठा फोटो तयार करून घेऊन तो वरील दिवाणाच्या खोलीत ठेवला. श्रीदत्तमहाराजांना ही गोष्ट आवडली नाही, श्रीमहाराजांनी तो फोटो श्री. कोंढरेंना तिसऱ्या मजल्यावरील आतील खोलीत ठेवण्यास बऱ्याचवेळा सांगितले. परंतु विश्वस्तांच्या सांगण्यावरून श्री. कोंढरेंनी त्याकडे दुर्लक्ष केले. श्रीदत्तमहाराज दौऱ्यावर गेले असताना, विश्वस्तांनी तो फोटो फ्रेम करून दिवाणावरील भिंतीवर बसवून टाकला. ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांना बिलकूल आवडली नाही; त्यादिवसापासून श्रीमहाराजांनी त्या खोलीत कामाशिवाय जाणेच बंद करून टाकले.

**व्यवहारदक्ष**

प. पू. श्रीदत्तमहाराज साक्षात्कारी असूनही अत्यंत व्यवहारदक्ष होते. पत्रव्यवहार करण्याकरिता श्रीमहाराजांना कार्डे, पाकिटे लागत असत. त्याकरिता व्यवस्थापकांच्या जवळ पन्नास शंभर रूपये देऊन, त्यांच्याकडून पाकिटे, कार्डे आणून घेत; पण आश्रमातील कार्डे, पाकिटे त्यांनी कधीही वापरली नाहीत. भक्त-मंडळींना लग्न-मुंजीकरिता अहेर पाठविताना देखील कमिशनसकट मनीऑर्डरचे पैसे व्यवस्थापकांच्या जवळ ते देत असत.

कांची कामकोटीचे प. प. श्रीशंकराचार्यांनी (जयेंद्र सरस्वती) काही कारणास्तव पीठाचा त्याग केला होता व तपश्चर्या करण्याकरिता ते निघून गेले होते. त्यांच्याबद्दल द्वारकापीठाधीश प. प. स्वरूपानंद सरस्वती यांनी वर्तमानपत्रात जाहीरपणे अनुदार उद्‌गार काढले होते. द्वारकापीठाधीशांच्या हस्ते प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्कार होणार होता. परंतु श्रीदत्तमहाराज त्या सत्काराला गेले नाहीत. कारण द्वारकापीठाधीशांचे हे बोलणे श्रीमहाराजांना आवडले नव्हते. त्यांनी आपली नाराजी तेथे न जाण्याने व्यक्त केली; फक्त श्रीदत्तमहाराज एवढेच म्हणाले की, थोरामोठ्यांनी सामान्यांचा असा बुद्धिभेद करू नये.

**महान त्याग**

कोठेही जाहिरात न केल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या असीम त्यागाची कल्पपा कोणालाही नाही. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील त्यांच्या वडिलोपार्जित घराची किंमत केल्यानंतर आपल्या सर्व बंधूंना

त्यांचा वाटा देऊन टाकला व नंतर सर्व घराचा ट्रस्ट केला, आणि ते घर देऊळगाव राजाच्या ट्रस्टला जोडून टाकले.

पुण्यातील श्रीवामननिवास ही वास्तू म्हणजे श्रीमहाराजांच्या अथक प्रयत्नांचे व असीम त्यागाचे चालते बोलते उदाहरण आहे. ही वास्तू उभारण्याकरिता गावोगावी श्रीमद्भागवत सप्ताह करून आलेले सर्व पैसे श्रीमहाराज विश्वस्तांच्या हवाली करीत. हे त्यांचे कार्य दोन-चार वर्षे चालले होते. पण श्रीमहाराजांनी या कार्याची लोकांना जरासुद्धा कल्पना येऊ दिली नाही. श्रीमहाराजांचे प्रत्येक कार्य इतके अबोलपणे व अलिप्तपणे चालायचे की, त्यांच्या महान कार्याची कोणालाही कल्पनाच येत नसे. श्रीदत्तअमरेश्वर जीर्णोद्धाराच्या वेळी श्रीमद्भागवत सप्ताह व श्रीगुरुपौर्णिमा यांतून मिळालेली सर्वच्या सर्व रक्कम न मोजता श्रीमहाराज जीर्णोद्धार मंडळाकडे देत असत. दोन तीन वर्षांमध्ये प. पू. श्री महाराजांनी जवळ जवळ तीन-चार लाख रूपये सहजरीत्या श्रीदत्तअमरेश्वरकरिता दिले. अशीच गोष्ट काशीयात्रेच्या वेळी घडली. तेथे दानधर्म करण्याकरिता त्यांनी शेकडोंनी वस्त्रे, उपवस्त्रे व अन्य गोष्टी घेतल्या होत्या. परंतु स्वत: मात्र आठवारी साधे धोतर व करवत काठी उपरणे याशिवाय काहीही परिधान केले नाही.

**दुसऱ्याला मोठेपणा देणे, स्वत:ची स्तुती स्वत:च्या कानाने न ऐकणे**

१९८० साल, प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अमृत-महोत्सवाचा सांगता समारंभ सुरू होता. प्रमुख व्यक्तींची भाषणे झाली. नंतर प. पू. वै. श्री धुंडामहाराज देगलूरकर यांचे अध्यक्षीय भाषण सुरू झाले. प्रास्ताविक संपताच श्री धुंडामहाराजांनी प. पू. श्रीमहाराजांची स्तुती करण्यास सुरूवात केली. ती स्तुती ऐकताच श्रीदत्तमहाराज पटकन् उठले आणि त्यांनी श्री धुंडामहाराजांच्या हातातील माईक आपल्या हातात घेतला व बोलण्यास सुरूवात केली. 'आपण सर्व भक्तमंडळी व साधक प. पू. योगीराजांच्या अतिशय प्रेमातील आहोत; याशिवाय येथे जमलेली विद्वान मंडळी, सत्पुरुष व श्री धुंडामहाराजांची आपल्या सर्वांवर असीम कृपा व प्रेम आहे. त्यांचे असेच प्रेम आपल्यावर राहावे अशी आपण त्यांना प्रार्थना करू या.' असे बोलून त्यांनी सभा संपवली. लोकांना वाटले, श्रीदत्तमहाराजांना कामाची घाई असावी म्हणून त्यांनी सभा संपवली असावी. परंतु प्रत्यक्षात मात्र श्री धुंडामहाराजांनी केलेली आपली स्तुती श्रीदत्तमहाराजांना स्वत:च्या कानाने ऐकायची नव्हती व दुसऱ्यांना ऐकवायची नव्हती.

प. पू. श्रीमहाराजांच्या स्वभावाचे एक खास वैशिष्ट्य होते. दुसऱ्याचा अगदी लहानसा गुणदेखील ते मोठा करून सांगत व त्याचे मनापासून कौतुक करीत. श्रीमहाराजांनी केलेले कौतुक तोंडदेखले कधीच नसायचे. एखाद्याने केलेली कविता, प्रसंग किंवा तक्रार ते नीट वाचून बघत असत व त्या व्यक्तीला समाधानकारक उत्तर देत असत.

साधारण दहा ते पंधरा वर्षांपूर्वीचा हा प्रसंग असेल. आश्रमात नित्य येणाऱ्या एका सद्भक्ताने प. पू. श्रीमहाराजांचा श्रीमद् भागवत सप्ताह आपल्या घरी ठरविला होता. त्या भक्ताला कुणीही नसल्यामुळे त्याने आपले स्वत:चे श्राद्ध गयेला जाऊन केले होते. परंतु या गोष्टीची पूर्वकल्पना त्या भक्ताने श्रीमहाराजांना दिली नव्हती. श्रीमहाराजांना जेव्हा निनावी पत्र आले, तेव्हा श्रीमहाराजांना ही गोष्ट समजली. वास्तविक पाहता श्रीमहाराजांना त्या भक्ताच्या घरी श्रीमद् भागवत सप्ताह करायचा की नाही हा निर्णय घेणे सहजशक्य होते. परंतु दुसऱ्याला मोठेपणा देणे व लोकापवाद टाळणे या दोन्ही गोष्टी साधायच्या असल्याने श्रीमहाराजांनी पंडित श्रीगणेशशास्त्री शेडें यांच्या कडे श्री रघुनाथराव कुळकर्णी, श्री. भाऊसाहेब वाकडे व श्री. दाते यांना पाठवले.

पं. गणेशशास्त्रींनी सर्व हकीगत ऐकून घेतली व सांगितले, स्वत:चे श्राद्ध केलेला माणूस प्रेतवत् होतो; त्याला कोणत्याच धार्मिक गोष्टी करण्याचा अधिकार राहात नाही. प. पू. श्रीमहाराजांना पं. गणेशशास्त्रींचे म्हणणे व निर्णय सांगितला गेला. तो निर्णय प्रमाण मानून श्रीमहाराजांनी त्या गृहस्थाच्या घरी श्रीमद् भागवत सप्ताह केला नाही.

आश्रमाचा एक माजी विद्यार्थी वे. मू. राजाराम कुळकर्णी याने पंधरा वर्षांपूर्वी प. पू. श्रीमहाराजांच्या प्रेरणेने अग्निहोत्र घेतले. आधानाच्या वेळेस श्रीमहाराजांचे प्रवचन झाले. ॥ य: क्रियावान् स पण्डित: ॥ या तत्त्वाचे विवेचन करताना ते म्हणाले, 'आम्ही नुसतेच शब्दपंडित आहोत. श्रौत कर्माचे फळ कसे महान आहे हे मीमांसा शास्त्राने नुसते सांगत बसतो, पण करत मात्र काही नाही. कारण श्रौत कर्म किती कठीण असते हे ते करणाराच जाणतो. येथे श्रीमहाराजांनी वे. मू. राजाराम कुळकर्णी याला मोठेपण दिले व स्वत:ला केवळ शब्दपंडित म्हटले, केवढे हे विशाल मन! दुसऱ्याला मोठेपण देण्याची श्रीमहाराजांची सहजवृत्ती होती.

**क्षमाशीलता**

१९९० साल. प. पू. श्रीमहाराजांचा सहस्र-चंद्रदर्शन शांती महोत्सव ठरला आणि श्रीमहाराजांची प्रकृती एकाएकी बिघडली. काय झाले आहे हे श्रीमहाराजांना कळले होते. पण कोणालाही न सांगता सर्व त्रास शांतपणे ते सहन करीत होते. डॉक्टरी उपचार चालू होते, पण थोडासुद्धा फरक पडत नव्हता. महोत्सवाच्या आधी पंधरा दिवस कुंडली पीठाचे शंकराचार्य श्रीवासुदेव निवासात आले होते. त्यांच्या कानावर महाराजांच्या प्रकृतीसंबंधी सर्व हकीगत घातली गेली. तेव्हा ते म्हणाले, 'काय आहे ते मी पाहतो.' असे म्हणून त्यांनी

आपल्या खोलीचे दार बंद करून घेतले. अर्ध्यापाऊण तासाने स्वामीमहाराजांनी दार उघडले. आपल्या पायांकडे स्वामींनी बोट करून दाखवले. तेव्हा दिसले की त्यांच्या पायाला सूज आली आहे. ते म्हणाले, 'श्रीमहाराजांवर प्रयोग झालेला आहे; हा प्रयोग उलटावावयाचा का? ते श्रीमहाराजांना विचारा.' प. पू. श्रीमहाराज म्हणाले, 'प्रतिकार करू नका, उलटवू नका. कारण प्रयोग करणाऱ्या व्यक्तिला त्रास होईल, फार फार तर प्रतिबंध करा.' केवढी ही दयाबुद्धी !

प. पू. श्रीमहाराजांच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन १९८० सालच्या आधी झाले. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आणि अतिकडक वागण्यामुळे ते ऑपरेशन बिघडले. श्रीमहाराजांना कमी दिसू लागले. तरीदेखील श्रीमहाराजांनी डॉक्टरांना दोष न देता, आपले प्रारब्ध म्हणून ते शांत बसले. केवढे हे उदार अंत:करण !

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी गोखले नगरचे आपले स्वत:चे घर एका अडलेल्या गरजू व्यक्तीला रहावयास दिले होते. पण पुढे त्या व्यक्तीने आपला शब्द फिरविला; जागा सोडली नाही, उलट श्रीमहाराजांना त्रास देण्यास सुरूवात केली. परंतु क्षमाशील श्रीमहाराज त्याच्यावर रागावले नाहीत. त्याला असे न वागण्याबद्दल उपदेशपर सुंदर पत्र लिहिले. त्या पत्राचा शेवट असा केला, 'परमेश्वराच्या दरबारी आपण एक गरीब ब्राह्मणाला निष्कारण का छळले. याचे उत्तर देण्याची वेळ आपणावर येऊ नये व आपणास परमेश्वराकडून शिक्षा होऊ नये, अशी श्रीपरमेश्वर चरणी आम्ही हात जोडून कळकळीची प्रार्थना करतो.' काय हा करूण भाव ! केवढी ही क्षमाशीलता !!

साधारण १५ वर्षांपूर्वीचा काळ असेल. प. पू. श्रीमहाराज आश्रमात उत्सव महोत्सवाच्या वेळी नित्य प्रसादास थांबत असत. त्यावेळी प. पू. (परमहंस परिव्राजकाचार्य) श्री टेंबेस्वामी महाराजांच्या फोटोखाली त्यांचे पान असे व त्यांच्या उजव्या हातास वयस्कर व परिचित व्यक्तींची पाने असत. त्यादिवशी सर्व मंडळी आपआपल्या पानावर बसली होती. प. पू. श्रीमहाराज आपल्या जागेवर बसले; पण त्यांच्या शेजारचे पान रिकामे होते. त्या पानावरील व्यक्ती आमंत्रण न गेल्यामुळे रागावून प्रसादास आली नव्हती. प. पू. श्रीमहाराजांना ते समजले; परंतु कोणतीही वाच्यता न करता ते शांतपणे पानावर बसले. संकल्प होताच पानाभोवती पाणी फिरविण्याचा, आहुत्या घालण्याचा इतका सुंदर अभिनय केला, की लोकांना वाटले श्रीमहाराज जेवायलाच बसले. सर्व मंडळींनी भोजनास सुरूवात करताच श्रीमहाराज एकदम उठले; तेव्हा लोकांना समजले की, श्रीमहाराजांनी जेवणाचा अभिनय केला होता. प. पू. श्रीमहाराज आपले ताट घेऊन स्वयंपाकघरात आले. तिथे आपले व त्या व्यक्तीचे पान मांडले व त्या व्यक्तीला बोलावणे पाठविले. ती व्यक्ती येईपर्यंत प. पू. श्रीमहाराज खिडकीजवळ उभे होते. ते दिसताच, 'या बसा.' असे म्हणून त्यांना पाट दाखविला. ती व्यक्ती बसताच त्यांच्याशेजारी श्रीमहाराज जेवायला बसले व सावकाश होऊ द्या, असे म्हणाले. याप्रमाणे अनेक भक्तमंडळींचे लहान-मोठे अपराध पोटात घालून त्यांना उदार अंत:करणाने श्रीमहाराजांनी क्षमा केली.

एकदा एक व्यक्ती तावातावाने वरच्या खोलीत गेली व प. पू. श्रीमहाराजांना ओरडून म्हणाली, 'तुम्हाला गादीवर कोणी बसवले आहे. उठा, तेथे मला बसायचे आहे.' प. पू. श्रीदत्तमहाराज शांतपणे त्यांना म्हणाले, 'तुम्ही बसा, आमची काहीही हरकत नाही; खाली देवापुढे चला, तिथे आपण प्रार्थना करू या.'

असेच एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज वरच्या खोलीत बसले होते. समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या घुश्श्यातच श्री महाराजांच्या समोर जाऊन, त्यांना रागाने बोलू लागली, 'तुम्हाला काय समजतंय का?' श्रीमहाराज शांतपणे म्हणाले, 'तुम्ही म्हणता आहात ते अगदी बरोबर आहे, आम्हाला खरंच काहीही कळत नाही, आम्ही अजाण आहोत.'

वरील दोन्ही प्रसंगातील उर्मट वक्तव्यावर जराही न रागावता, शांत व दयाळू अंत:करणाच्या श्रीमहाराजांनी त्या व्यक्तींनाच मोठेपण दिले. केवढे हे उदार, क्षमाशील अंत:करण !

**योग्य शब्दात समाधान करण्याची हातोटी**

दहा-बारा वर्षांपूर्वी, श्रीवामन-निवासमध्ये एक सद्गृहस्थ 'स्पिरीच्युअल हिलिंग' या शास्त्राने रोग्यांचे रोग बरे करीत असत. लोकांना बरे-वाईट अनुभव येत असत. ते गृहस्थ खाण्या-पिण्याबाबत काळवेळ (ग्रहण) इत्यादी बद्दल कोणताच विधिनिषेध पाळत नसत. त्यांच्याबद्दल प. पू. श्रीमहाराजांकडे तक्रारी गेल्या व त्यांचे हे उपचार बंद करण्याविषयी श्रीमहाराजांना लोकांनी विनंती केली. तेव्हा श्रीमहाराजांनी त्या गृहस्थांना असा निरोप पाठविला - 'आजपर्यंत तुम्ही पुष्कळ रोग्यांवर उपचार केले आहेत; त्यामुळे तुमच्या कार्याची माहिती बऱ्याच जणांना झाली आहे. त्या कार्याचा प्रचारही पुरेसा झालेला आहे. तेव्हा यापुढील कार्य तुम्हांस घरी करण्यास हरकत नाही.'

तसाच प्रसंग दोन तीन वर्षापूर्वी पुण्यात घडला. गणपती दूध पितो, अशी वार्ता सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. प. पू. श्रीमहाराज खाली हॉलमध्ये बसले होते; समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक महिला

श्रीमहाराजांना तावातावाने सांगू लागली - 'महाराज, गावातले सर्व गणपती दूध पीत आहेत, तर आपल्या देव्हाऱ्यातील गणपती दूध पितो का, हे पहा. कोणाला तरी सोवळे नेसून देवघरात जायला सांगा.' प. पू. श्रीमहाराजांनी त्या महिलेचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तिला म्हणाले - 'तुमच्या देव्हाऱ्यात गणपती आहे ना, त्याला प्रथम तुम्ही दूध पाजा. तुमचा गणपती दूध प्यायला की आम्ही आमच्या देव्हाऱ्यातील गणपतीला दूध पाजू.' प्रश्नकर्त्या माणसाला न दुखवता, त्याचे समाधान करून त्याला परत पाठविण्याची प. पू. श्रीमहाराजांची हातोटी काही वेगळीच होती.

प. पू. श्री दत्तमहाराज दौऱ्यावर गेले असतानाचा हा प्रसंग. एक मोठा श्रीमंत भक्त, प. पू. श्री महाराजांच्यावर अलोट प्रेम व भक्ती ! श्री महाराजांच्या पादुका नित्य पूजेत असाव्यात अशी त्याची तीव्र इच्छा; म्हणून त्याने आपल्या घरी प. पू. श्रीमहाराजांच्या पाद्यपूजेचा घाट घातला. त्याकरिता चांदीच्या मोठ्या पादूका करून घेतल्या. प. पू. श्रीमहाराज पाद्यपूजेला जाताना आपल्याबरोबर प. पू. योगीराज श्रीगुळवणी महाराजांच्या पादुका नेत असत; त्या पादुकांचीच पाद्य पूजा होत असे. त्या श्रीमंत भक्ताच्या घरी पाद्यपूजा सुरू झाली. प. पू. श्रीमहाराजांनी त्या भक्ताने तयार करून घेतलेल्या चांदीच्या पादुकांवर श्रीगुळवणी महाराजांच्या पादुका ठेवण्यास सांगितले. त्या पादुकांची पंचामृती पूजा होऊन अभिषेक, आरती इत्यादी उपचार झाल्यावर प. पू. श्रीयोगीराजांच्या पादुका पुसून बाजूला ठेवण्यात आल्या. ही पूजा झाल्यानंतर तो श्रीमंत भक्त श्रीमहाराजांना म्हणाला - 'महाराज, आता तुम्ही मी तयार करून घेतलेल्या पादुका पायात घाला म्हणजे मला त्या नित्य पूजेत ठेवता येतील.' श्रीदत्तमहाराजांनी त्याच्याकडे शांतपणे पाहिले व म्हणाले - 'अहो, तुम्ही आणलेल्या पादुका प्रत्यक्ष श्रीगुळवणी महाराजांनी घातल्या आहेत; त्यांनी घातलेल्या पादुका आम्ही पुन्हा कशा घालणार ?' त्यांचे हे बोलणे ऐकून पाद्यपूजेला जमलेली मंडळी स्तिमितच झाली. त्या भक्तालाही श्रीमहाराजांच्या या सांगण्यावर काही बोलताच येईना. त्याचा भाव ओळखून श्रीमहाराज म्हणाले - 'अहो आमचे काय घेऊन बसलात, आता तर तुमच्या घरी योगीराज श्री गुळवणी महाराज आले आहेत.'

**वक्तृत्व**


प. पू. श्री दत्तमहाराजांची विषयविवेचन करण्याची शैली समोरच्या श्रोतृवृंदावर अवलंबून असे; विषयांतर न करता प्रसंग वेळ ठिकाण बघून श्री महाराज बोलत असत. त्यामुळे समोरचे श्रोते विषयाशी पूर्णपणे एकरूप होऊन जात असत. सिंहगडच्या पायथ्याशी कोंढणपूर म्हणून एक गाव आहे; तेथील दत्तमंदिराचा कळस प. प. श्री गजानन स्वामी महाराज यांच्या हस्ते बसविण्यात आला. तेव्हा प. पू. श्री महाराजांचे समोरच्या लोकांना उद्देशून भाषण झाले. त्या भाषणात नरवीर तानाजी मालसुरे, शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज व रामदास स्वामी यांचे राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम कसे होते, हे निरनिराळ्या उदाहरणांद्वारे श्रीमहाराज लोकांना सांगत होतो; हे सांगताना तुकाराम महाराजांचे अभंग व रामदास स्वामींच्या दासबोधातील ओव्याच्या ओव्या श्रीमहाराज म्हणून दाखवीत होते. धर्मावर निष्ठा असली म्हणजे आपोआपच देशप्रेम निर्माण होते, हे विचार अतिशय साध्या व सोप्या भाषेत श्रीमहाराजांनी लोकांना पटवून दिले.

याउलट, श्रीगुरुदेव रानडे यांच्या पुण्यतिथी निमित्त, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन - या संस्थेच्या हॉलमध्ये श्रीमहाराजांचे व्याख्यान होते. व्याख्यानाला सर्व विद्वान मंडळी जमली होती. त्यावेळी न्याय, वेदांत व तत्त्वज्ञान यांचे दाखले देत देत, श्रोत्यांना 'श्री गुरुदेव रानडे यांचे तत्त्वज्ञान' हा विषय श्रीमहाराज समजावून देत होते. संपूर्ण भाषण म्हणजे विद्वत्तेचे व विषयाचे सखोल ज्ञान असल्याचे एक द्योतक होते.

महान पंडित असूनही कोंढणपूरच्या भाषणात श्रीमहाराजांनी आपल्या पांडित्याची जरासुद्धा लोकांना कल्पना येऊ दिली नाही; तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये मात्र पंडितांच्यासमोर पांडित्य पूर्ण भाषेत विषय विवेचन केले.

**आचारनिष्ठा**

प. पू. श्री दत्तमहाराजांनी आयुष्यभर कटाक्षाने पाळलेली आचारनिष्ठा शेवटच्या क्षणापर्यंत पाळली. अखेरच्या आजारात प्रकृती अस्वास्थ्यामुळे श्रीमहाराजांना संध्या करणे अशक्य झाले; आचमनाकरिता हातात घेतलेले पाणी तोंडापर्यंत पोहोचेचना; तेव्हा त्यांचे चिरंजीव श्रीअजितराव म्हणाले, 'दादा, आता संध्या करू नका.' 'बरं' असे श्रीमहाराज म्हणाले. पण संध्या नाही म्हणजे अन्न नाही, असे म्हणून श्रीमहाराज डोळे मिटून स्वस्थ पडून राहिले. त्या दिवसापासून शेवटच्या क्षणापर्यंत श्रीमहाराजांनी अन्न घेतले नाही व मौन धारण केले. केवढा हा आचारपालनाचा निश्चय ! प. पू. श्रीदत्तमहाराजांचे संपूर्ण जीवन आचारधर्माचा मूर्तीमंत आदर्श होता. प. पू. सद्‌गुरु श्री दत्तमहाराजांना कोटी कोटी प्रणाम !






# सरस्वती कण्ठाभरण ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

**डॉ. अशोक देव**

**भारतमातेला भूषण असलेले गीर्वाण भाषेतील** विद्वत्रत्न श्रीदत्तमहाराज कवीश्वर ह्यांनी वयाच्या १६व्या वर्षापासून आतापर्यंत ७० वर्षापेक्षा जास्त समाजप्रबोधनाचे कार्य केले. अध्यापनकार्य, श्रीमद्‌भागवत् सप्ताहातून जनजागरण; तर उपदेशातून मोक्ष साधनापंथ दर्शविला. ज्ञानोपासकाबरोबरच आत्मानुभूती प्राप्त करून केवळ 'लोकोपकारार्थ' महाराजांनी आपले तन-मन-धन वेचले आहे.

अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरुवे नमः॥

अज्ञानरूपी अंधःकार ज्ञानांजनाने ज्यांनी नष्ट केला असे सद्‌गुरु दत्तमहाराज ज्ञानरूपी चक्षु ज्यांनी उघडला अशा सद्‌गुरूंना वारंवार त्रिवार वन्दन.

दत्तमहाराज म्हणजे चालते बोलते ज्ञानपीठ. आम्ही शिष्यांनी विचारले, 'महाराज ईशदर्शन केव्हा होईल ?'

महाराज म्हणाले, 'रोज नित्यध्यान करीत जा. हळूहळू विचार नाहीसे होतील. मनाची एकाग्रता वाढेल. मग आपोआप ईशदर्शन होईल.' हे महाराजांचे स्वानुभूतीचे बोल.

आपल्या रसाळ आणि मधुर वाणीने दत्तमहाराज समोरच्याच्या मनामध्ये त्यांना अपेक्षित बीजाचे केव्हा आरोपण करीत असत लक्षातही येत नव्हते. कर्म करण्याच्या बाबतीत ते म्हणायचे 'कर्माप्रमाणे जग चालले आहे हा एक मोठा सिद्धान्त आहे. कोणाची कर्मे कशी असतील काय माहिती. जगात नियामक म्हणून कोणीतरी आहे असा विश्वास ठेवून शास्त्रांनी, संतांनी सांगितलेले कर्म आपण करीत राहायचे' महाराजांच्या मुखातून असे ज्ञानकणतुषार जेव्हा श्रोत्यांना प्राप्त होत तेव्हा जीवनाबद्दलची नैराश्यता पार पळून जात असे आणि पुनश्च नवोन्मेषाने साधक कर्मरत होऊन आपले दैनंदिन कार्य रस घेऊन करीत असत. महाराज जसे संस्कृतभूषण होते तसेच ते सन्तसाहित्याचे सखोल अभ्यासक होते. लागलीच कर्माबद्दल ते दाखला देत

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा
हरिकृपे त्याचा नाश आहे

कार्य करतांना जीवन जगतांना जर दुःख प्राप्त झाले तर प्रारब्धाप्रमाणे भोग आहे. मात्र ईश्वर कृपेने दुःखाचा नाश हा ठरलेला आहेच असे सांगून नकळत महाराज कर्मसाधना करीत असतांनाच 'ईशआराधना' करीत जावी हे सुचवित असत.

पूर्वसंस्काराप्रमाणे आपली मनोवृत्ती ज्याप्रमाणे तयार झालेली आहे त्याप्रमाणे वर्तन घडते. पण जे सद्‌गुरू जे असतील ते हिताचा उपदेश करतात. ते दयासम्पन्न असतात.

आणि दत्तमहाराज हे विश्वचि माझे घर
ऐसी मती जयाची स्थिर
किंबहुना चराचर
आपण जाहला

ही ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेली ओवी सहजतेने स्पष्ट करीत. म्हणजे महाराजांच्या कथनात प्रवचनात व वर्तनात 'सार्थता' होती.

'शाब्दे परे च निष्णातम्' शब्दामध्ये निष्णात आहेत आणि परमार्थात उच्चकोटीला स्थिरावलेले महर्षि आहे.

'अविद्यया मृत्युम् तीर्त्वा विद्यया अमृतम् अश्नुते'

सांसारिक ज्या विद्या आहेत, त्या द्वारे संसार सहज तरून जाता येतो. मोक्षविद्येने अमृतत्व प्राप्त करून घेता येते. ह्याचे मूर्तिमन्त उदाहरण म्हणजे दत्तमहाराज.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष चतुर्विध पुरुषार्थ महाराजांनी 'साधले' संत एकनाथाप्रमाणे 'शांतिब्रह्म' स्थितीत राहून संसार करून मोक्षसाधना यशस्वी रीत्या समाजाकडून करून घेतली.

'वयम् राष्ट्रस्य जाग्रयाधे पुरोहिताः। यजुर्वेद ९/२३

आम्ही राष्ट्राचे जागृत पुरोहित आहोत. राष्ट्राचे हित साधणे हे एकमेव ध्येय आमच्या पुढे आहे आणि हे ध्येय दत्त महाराजांनी सार्थतेने साध्य केलेले आहे. घरामध्ये पूर्वापार समाजप्रबोधनच्या कार्याचा वसा महाराजांना 'शुचीनाम् श्रीमतां गेहे' ह्या भगवद्‌गीतेच्या उक्तीप्रमाणे प्राप्त झालेला आहे. शुद्धसात्विक 'कवीश्वरांच्या' वंशात महाराजांना जन्म प्राप्त झाला. पण महाराजांनी प्राप्त जन्माचे 'सोने' केलेले आहे. घरातील भागवताचा वारसा जोपासतांनाच 'शक्तिपात' दीक्षेचा प्रसार गुळवणी महाराजांच्या नंतर पुण्यातील वासुदेव निवासातील शक्तीपीठावर गुळवणी महाराजांच्या इच्छेनुसार त्यांचे उत्तराधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारून अतिशय चांगल्या प्रकार भारतभर 'शक्तीसाधनेचा' प्रचार केलेला आहे.

विवेकसिन्धु ह्या शंकराचार्यांच्या ग्रंथाचे ज्ञानबिन्दुंनी विवेचन करतांना अतिशय सरलतेने आणि सहजतेने जणू काही शंकराचार्यच दत्तमहाराजांच्या वाणीने कथन करीत आहेत असे जाणवते दत्तमहाराज म्हणतात 'श्रेष्ठ ब्रह्मज्ञानी पुरुषाने ज्याला शाबासकी दिली ते शिष्य विचाराकडेच सर्वलक्ष केंद्रित करून परमात्म स्वरूपांचा विचार करून लवकरच कृतार्थ होण्यास लायक आहेत असा श्रीगुरुंचा

अभिप्राय आहे.' व्यावहारिक भाषेत उपमा द्यावयाची झालीच तर दत्तमहाराज 'ज्ञान वाणी' केंद्र होते. एकदा सुरु झाले की मूळग्रंथ दत्तमहाराजांच्या रूपाने आत्मप्रगटीकरण श्रोत्यांच्या वाचकांच्या स्तरावर जाऊन करीत असे असच 'सार्थ'तेने म्हणावे लागेल.

उपासनादि ज्ञानानां मार्गदर्शनतत्परः
मत्या कृत्या च धन्योऽसौ दत्तात्रेयः कवीश्वरः
पाण्डित्यं भूषणं यस्य विनयेन समन्वितम्
लोके दुर्लभमेतद्धि वर्तते तत् कवीश्वरे ॥
'दत्तमहाराजः केवलम् ज्ञानमूर्तीम्'

उपासनादि ज्ञानात तत्परतेने जे मार्गदर्शक बुद्धीने आणि कृतीने दत्तमहाराज कवीश्वर धन्य असे आहेत. विनययुक्त पाण्डित्य ज्यांचे भूषण आहे असे जगात दुर्लभ असते. मात्र दत्तात्रेय कवीश्वरामध्ये ते पूर्णत्वाने मूर्तिमन्त होते.

ब्रह्मश्रीदत्तमहाराज कवीश्वर केवळ 'ज्ञानमूर्ती' सद्गुरु होते. महर्षि वेदव्यासांचा 'ज्ञानदीप' तेवत ठेवण्यासाठीच ईश्वराने त्यांना अवनीतलावर देवदूत म्हणून पाठविले होते.

सद्गुरु ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरांच्या चरणी सादरं नमोनमः

ईशधाम, एफ ६२ एन १२, स्वामी विवेकानंद नगर, (औरंगाबाद) ४३१ ००३

ब्रह्मलीन पं. कवीश्वर महाराजांना आदरांजली
स्थापना - १९४२
दूरध्वनी : दुकान ४६५१०१८ निवास ४७५ ६७९३

**श्रीगजानन स्टोअर्स**

सुलतान बझार चौक,
हैदराबाद ५०००९५, (आंध्र)

सर्व प्रसिद्ध बाजारपेठेच्या, ६ व ९ वार साड्या, पंचे, धाबळी, ब्लाऊज पीस, चादरी, सतरंज्या व फॅन्सी कापडाचे विक्रेते

गिऱ्हाईकाचा संतोष
हीच आमच्या यशाची पावती

ग्राहकांच्या सदिच्छेने व श्रीगजाननाच्या कृपाप्रसादाने ५७ व्या वर्षात पदार्पण

श्री गजानन महाराज प्रसन्न
॥ श्री हरी ॥
प. ट्र. रजि. नं. ए. २५० (बुलढाणा)

**श्रीगजानन महाराज संस्थान, शेगाव**

ता. शेगाव जि. बुलढाणा (मध्य रेल्वे)
पिन ४४४२०३
दूरभाष क्र. : ५२०१८, ५२२५१
एस. टी. डी. कोड नं. ०७२६५ तार : योगी

**१) महाप्रसाद** : दररोज दुपारी ११.३० ते १ पर्यंत सरासरी ५००० भक्तांना गोडमिष्टान्नासह महाप्रसाद (विनामूल्य) वितरीत.

**२) भोजनकक्ष** : भक्त निवास क्र. १ व ३ मध्ये भक्तांकरता अल्प दरात भोजनप्रसादाची व्यवस्था २००० भक्तांकरता.

**३) वैद्यकीय कक्ष** : प्रतिदिवशी ॲलोपॅथी - ७००, होमियोपॅथी - ४५०, आयुर्वेदिक - २००, फिरते रुग्णालय - १५०, आदिवासींकरता फिरते रुग्णालय - १५०, रुग्णांची तपासणी व औषधोपचार केले जातात.

**४) अपंग पुनर्वसन केंद्र** : अपंगांची तपासणी व कृत्रिम अवयव वाटप.

**५) शैक्षणिक कार्य** : श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय व ज्ञानपीठ (इंग्रजी माध्यम) या दोन्ही उपक्रमांना योगदान. मतिमंद विद्यालय. विद्यार्थी - ९०, वारकरी शिक्षण संस्था विद्यार्थी - ९०, आदिवासी आश्रम शाळा, वर्ग १ ते ७ मुलामुलींची संख्या ५१५. ह्या सर्वांची निवास, भोजन, कपडे व पुस्तकांची पूर्ण व्यवस्था.

**६) सेवार्थ बससेवा** : संस्थानतर्फे ३ बसेस, २४ तास मंदिर मोटरस्टँड रेल्वेस्टेशन व गजानन वाटिका अशा क्रमाने भक्तांची विनामूल्य जाण्यायेण्याची व्यवस्था

**७) भजनी दिंड्यांना साहित्य वाटप** : संप्रदायाच्या व संस्थेच्या नियमाप्रमाणे प्रत्येक दिंडीस १० टाळजोड, १ मृदुंग व १ वीणा ह्या भजनी साहित्याचे धर्मप्रचारार्थ विनामूल्य वाटप. आता पावेतो एकूण ४११८ गावांच्या दिंड्यांना वाटप झाले आहे.

याव्यतिरिक्त नेत्रदानशिबीर, पॅथॉलॉजी व फिजीओथेरोपी विभाग, वाचनालय, रुग्णवाहिका, अग्निशामक दल, आदिवासींना कपडे वाटप अशा एकूण ४२ सेवा संस्थेकडून भक्तांच्या सहयोगाने होत आहेत.

संस्थेस व वरील सेवा योजनेस सर्वांचे सर्वतोपरी सहाय्य असावे ही विनंती.

व्यवस्थापक
श्रीगजानन महाराज संस्थान, शेगाव

# प. पू. दत्तमहाराज

**जयराम पु. जोशी**




**टेम्बे कुलसमुद्भुतं वासुदेवं यतीश्वरम् ॥**
**रमा-गणेशं तनयं सद्‌गुरुं प्रणमाम्यहम् ॥ १ ॥**

फाल्गुन शुक्ल एकादशी. शुक्रवार. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा आत्मार्पण-दिन (२६/२/९९) सकाळची वेळ. मी सावंतवाडीच्या बसस्टँडवर उभा होतो. माणगाव इथून जवळच आहे. सद्‌गुरूंचं जन्मगाव. कितीतरी दिवसांनी ते गाव पहाण्याची सुप्त इच्छा सद्‌गुरू आज पूर्ण करून घेत होते. रिक्षावाल्यानेही स्टँडवर (बाजारचौक) न सोडता मला अगदी आश्रमाच्या मोठ्या कमानीच्या प्रवेशद्वारापाशी पोचवले. मी न विचारताही एका गृहस्थानी मला म्हटले, 'देवाच्या दारी जाताना थोडंसं पायीच जायचं असतं.' मी सप्रणाम 'होकार' देऊन चालू लागलो. आश्रमात पोचलो. क्रमांक २च्या प्रशस्त खोलीत सामान ठेवलं. सश्रद्ध, आनंदी व पर्युत्सुक मनाने सर्व परिसर पाहिला. 'धन्योऽहं धन्योऽहं' ह्या विद्यारण्यस्वामींनी पंचदशीत वर्णन केलेल्या आनंदसागरात २ दिवस मी डुंबत होतो. आरती झाली. प्रसाद घेतला. खोलीवर परततानाच कार्यालयातून कागद व पेन मागून घेतलं होतं. येऊन बसलो. सद्‌गुरूंनी मनाची विमनस्कता दूर पळवून लावली होती. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे - 'शब्दांनो ! मागुते या' अशी अवस्था तयारही केली होती. तुकाराम महाराजांच्या अभंगात थोडा बदल करून म्हणता येईल की,

आपुलिया बळें, नाहीं लिहवत ॥
सखा कृपावंत, लेखन त्याचें ॥-॥

या अवस्थेत सद्‌गुरूंनी भराभर - 'मां निर्मितीकृत्य' माझ्या विचारांना गीर्वाणवाणीत, शब्दरूप - नव्हे श्लोकरूप देऊन १-२ नव्हे तर २१ श्लोक (अगदी संधीची खाडाखोड न करावी लागता) अर्ध्या तासात लिहवून घेतले. माझ्या अपेक्षेहूनही सुंदर. त्यातही पहिले ११ सद्‌गुरूंच्या नावाची (श्री वासुदेवानंदसरस्वती) ही आद्याक्षरे असलेले. मी मनात म्हटलं की, हे कसं झटकन् व अपेक्षेपेक्षाही कितीतरी पटीने सुंदर जमलं ? माझ्या अंतर्मनाने मला लगेच सुधारलं. ते म्हणालं, तुझ्या प्रश्नात एक अक्षर क्रियापदात घाल. म्हणजे उत्तरच तयार होईल. तात्पर्य काय? तर अहो जमलं नाही तर (गुरुदेवांनीच) जम(व)लं.' खूप लांबण लावली - 'नमनातच धडाभर तेल संपलं.' पण हे हेतुपूर्वकच 'त्यांनी - माझ्या गुरुत्रयीने - (प्राचार्य पं. गाडगीळशास्त्री, ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर व पू. नारायण विष्णु कुळकर्णी) घडवून आणलं आहे. मी हे खूपदा अनुभवलं आहे. अनुभवतही आहे व त्यांच्या कृपेने यापुढेही अनुभवीन. यानंतर मी २ दिवसांनी कुडाळजवळच्या वालावली या गावी गेलो. १ मार्च ९९ ला म्हणजे हुताशनी पौर्णिमेला गु. दत्तमहाराज हे 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति' या उक्तीप्रमाणे त्या नित्य शुद्ध बुद्ध अशा अनादि अनंत चैतन्याशी एकरूप झाले. मला ही वार्ता प्रवासात दैनिक सकाळमध्ये वाचावयास मिळाली. आतल्या एका पानावर त्यांच्या जीवनचरित्राचा एक छोटासा लेखही होता. त्यात पूजनीय सौ आईसाहेबांच्या (दि. १०/१/९९) निर्वाणाचाही उल्लेख होता. मी व्यक्तिश: गेले २ महिने एका अवर्णनीय अशा विमनस्क अवस्थेत होतो. दि. २७ मार्चला रात्री सांगलीस घरी आल्यावर मधल्या काळातील टपाल पाहिले. त्यात 'धर्मभास्कर'च्या संपादकांचे (मे महिन्याच्या धर्मभास्करचा अंक - पू. दत्तमहाराज कवीश्वर श्रद्धांजली विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्याबद्दलचे) पत्र वाचले. त्याला अनुसरून मी माझी ही 'भावसौरभपूरित शब्दसुमनांजली' आतापर्यंत ९० वर्षे पांचमहाभौतिक देवालयात देहात चैतन्यरूपाने 'दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर' या लौकिक नावाने वावरून आता परमात्मरूप अविच्छिन्न चैतन्याशी एकरूप झालेल्या तीर्थरूप (स्व.) कवीश्वर गुरुजींच्या चरणारविंदांवर वहात आहे -

गुरुत्रयं नमस्कृत्य तच्चरित्रं निरीक्ष्य च ॥
प्रीत्या तत्प्रेरितमति: इदं लिखितुमारभे ॥ १ ॥

मी टि. म. विद्यापीठात साहित्यविशारद परीक्षा देण्याच्या हेतूने ५५ सालच्या मे मध्ये आलो. नोव्हेंबरपर्यंत तेथे राहिलो. जे प्रश्नपत्रिकांच्या दृष्टीने वाचायचे होते. ते तेथील अध्यापकांकडून शिकलो. एका प्रश्नपत्रिकेत म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकरांनी विद्यारण्यलिखित सर्वदर्शनसंग्रहाला जी एक प्रदीर्घ (६० ते ६५ परिच्छेदांची) प्रस्तावना लिहिली आहे त्यावरचा ६० गुणांचा विषय होता.तो त्यांनी मला शिकवला. इतरही तदनुषंगिक विषय शिकवले. त्यांच्या व्यासंगाबद्दल, विद्वत्तेबद्दल खूप ऐकले होते व नंतरही गेल्या ४० वर्षांत ऐकायला मिळाले. त्यांची अध्यापनशैली अतिशय सोपी होती. विषय सोप्या भाषेत विद्यार्थ्याला पूर्ण समजावून देण्यात ते परमचतुर होते. कालिदासाच्या श्लोकांतील उक्तीप्रमाणे 'यत्रोभयं साधु स शिक्षकाणां धुरि प्रतिष्ठापयितव्य एव' ते खरोखर आदर्श गुरू होते. पण मला त्या वेळी एक मोठे आश्चर्यकारक कोडे पडले होते. ते म्हणजे पू. कवीश्वर गुरूजींची विद्वत्ता प्रकाण्ड पंडितांनीही हेवा करण्यासारखी असूनही, त्यांना 'अहंकाराचा वारा'मुळी

देखील लागला नव्हता. पंडितराज जगन्नाथाने रसगंगाधराच्या नमनानंतर 'मी कोणापासून काय काय शिकलो?' यासाठी एका श्लोकात भली मोठी यथार्थ यादी दिली आहे. गुरुजींना देखील वास्तवअर्थाने तसे सांगता आले असते आणि त्यात चूक काढण्याची कोणालाही हिंमत झाली नसती. पण गुरुजींनी जगन्नाथाच्या प्रसिद्ध अन्योक्तीमधील 'नखानां पाण्डित्यं प्रकटयतु कस्मिन् मृगपतिः ?' या चौथ्या चरणातील म्हणण्याप्रमाणे कधीही कोठेही प्रदर्शन केले नाही. 'संपूर्णकुम्भो न करोति शब्दम्' या उक्तीप्रमाणे ते आपल्या ज्ञानाबद्दल मूकच राहिले. 'यदि सन्ति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयम्' या तत्त्वावर त्यांची अविचल निष्ठा असली पाहिजे. म्हणूनच कालिदासाने कुमार संभवात म्हटल्याप्रमाणे 'न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत्' वेगवेगळे सन्मान, पदव्या, पुरस्कार त्यांना शोधीत आले आणि ते देणाऱ्या तीन राष्ट्रपतींना 'हे आम्हाला आमच्या थोर पुण्याईने मिळत आहे असे वाटून कृतार्थता मिळाली.

या सर्व गुणोच्चयांचे रहस्य त्यांच्या चरित्रामधील निष्ठा; आदर्श आदि जीवनमूल्यांचे मनापासून नम्रपणाने निरीक्षण करणाऱ्या उपासकांनाच कळेल. समीक्षक विद्वानांना नाही. हे सर्व कळण्यासाठी भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायामधील 'कार्पण्यदोषोपहतस्वभावः' या श्लोकातील चौथा चरणच सर्वांना उपयुक्त ठरेल. तो म्हणजे, 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्' हा उपदेश होय. हा गुरुजींनी दत्तोपासक गुरुपरंपरेतून अभ्यासला. हे समजवून देण्यासाठी शेकडो पाने देखील अपुरी पडतील. पण लेखमर्यादा लक्षात ठेवून सूत्ररूपानेच हे विशद करतो. प. प. वासुदेवानंदसरस्वतींनी (७०८ ओव्यांत) गीतेच्या १५ व्या अध्यायातील १-१ अक्षर प्रत्येक ओवीत तिसरे आणून ५१ व्या अध्यायाचे (मंत्रमय) श्रीगुरुचरित्र 'सप्तशती गुरुचरित्रसार' लिहिले. त्याच्या समारोपाच्या शेवटच्या ओवीतील २ चरण -

'ग्रंथत्रय रसभरित, वदवी दत्त वासुदेवमुखें ॥

असे आहेत. ज्यांना १०० टक्के, वास्तव अविनाशी शाश्वत सुख हवे असेल त्यांनी या अर्ध्या ओवीला गुरुमाऊली मानावे. ही माऊली तुमचे अनंत अपराध पोटी घालून तुम्हाला शाश्वत परमानंदाच्या डोहात सदैव अवगाहन करण्याचे नुसते भाग्य देईल एवढेच नव्हे तर 'स्वीयं साम्यं विधत्ते' (आपणांसारिखे करिती तत्काळ) या आद्य श्री शंकराचार्यांच्या उक्तीप्रमाणे तुम्ही देखील सद्गुरूंसारखे 'स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती व्हाल. पण याकरिता तीव्र निष्ठा, प्रखर वैराग्य हवे. मगच हे सारे घडेल. 'वाढता वाढता वाढे' याप्रमाणे हे फारच लांबले. समारोप करतो.

गुरुबंधूनो, भगिनींनो! ही श्रद्धांजलीची वेळ नव्हेच. तर आदरांजलीची ही मंगलप्रभात आहे. श्रीवासुदेव निवास, वामन निवास वा रेणुकानिवासात आता दत्तमहाराज नाहीत. पण आता या संकुचित निवासातून त्यांनी तुमच्या आमच्या सोयीसाठी एक वेगळाच निवास स्वीकारला आहे. त्याकरता कुठेही जायला नको. या दत्तमहाराजांच्या नव्या घराचे नाव आहे, भक्तजन-हृदय-निवास

'सरस्वती-धुंडिराज-पुत्रं राष्ट्रियपण्डितम् ॥  
वेदान्ताध्यापकं वन्दे 'लक्ष्मी' पनिमहं सदा ॥ १ ॥  
गुरुं षड्दर्शनाचार्यं दत्तात्रेयं कवीश्वरम् ॥  
विद्यावाचस्पतिं वन्दे वाञ्छन् गुरुकृपामहम् ॥ २ ॥

'शीलधी', गणेशनगर, डॉ. आंबेडकर मार्ग, सांगली.

श्रीगजानन वीव्हिंग मिल्सचे संस्थापक व पॉवरलूम कारखानदारीचे आद्य जनक उद्योगरत्न

**श्री. वि. रा. वेलणकर**

यांच्या ६ तपांच्या तपश्चर्येतून तयार झालेली छत्रपती उद्योगरत्न, विश्वेश, समर्थ, सम्राट, शेतकरी, सिल्व्हरग्रास, ग्रे व धुवट धोती आणि विविध पन्ह्यातील मुलायम लॉंग क्लॉथ व बेडशीटस् इ. सर्वगुणयुक्त

# श्री गजानन वीव्हिंग मिल्सची

उत्पादनेच ग्राहक पसंत करतात.

प्राप्तिस्थान :

**श्री गजानन फॅब्रिक्स डिस्ट्रिब्यूटर्स**

५६०, खणभाग, शिवाजी नगर, सांगली ४१६ ४१६

फोन नं. ३७३१५१, ३७२०६० तार GAJFABRICS

# त्यांच्याशिवाय प्रणाम तो कोणाला करायचा ?

अवधूत हर्डीकर




पुण्याच्या 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'त शिक्षणासाठी राहण्याचा योग आल्यामुळे, झळाळीचं पांडित्य असूनही, समुद्राची गंभीरता, हिमालयाची उंची आणि अवकाशीय शांतता या सर्वांचा मनोहारी संगम झालेल्या, जणू अनेक चांगल्या वस्तूंचे सार म्हणून वेचून आणलेल्या पंडितश्रेष्ठ व्यक्ती आम्हाला गुरुजी म्हणून लाभल्या. धारवाडचे पंडित मार्तण्डशास्त्री दीक्षितगुरुजी, प्राचार्य व्याकरणरत्न वामन बाळकृष्णशास्त्री भागवत गुरुजी यांच्याबरोबरच विद्यावाचस्पती पं. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या रूपातला धीरगंभीर प्रशांत महासागर; हे सर्व आम्हाला सुदैवानं गुरुजी म्हणून लाभले. या तिन्ही व्यक्तींबद्दलचा आदरभाव, कित्येक वर्ष लोटली तरी अंशांशानेही कमी होणार नाही, अशी ही प्रात:स्मरणीय व्यक्तिमत्वे. म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा (संस्कृत शिकलेल्या लोकांचा फटकून राहाणे, हा वर्धिष्णु स्वरूपात राहणारा गुण, सहज भावात असला तरी) एक संप्रदाय झाला.

संप्रदायाला आजच्या काळात जो गटबाजी हा अर्थ प्राप्त झालेला आहे, त्या अर्थी हा संप्रदाय नाही. आज कुपोषित आणि अव्यावहारिक अशा आपल्या अहंकारांना सदैव कुरवाळणारे, अध्यस्त मनांनी बरबटलेले, आपल्याहून अधिक गुणवान आणि म्हणूनच आपल्या व्यावहारिक प्रगतिमार्गामध्ये अडचण म्हणून होऊ शकणाऱ्या व्यक्तीला, वेळीच निंदानालस्ती, मत्सर, घृणा, द्वेष, असूयारूपी स्वत:जवळच्या गटारात बुडविण्याचा धंदा करणारे व त्याकरिताच स्वत:चा गट आणि उपगट करून तो भ्राजमातन अवस्थेत राखणारे, त्याकरिता धर्म-संस्कृती-परंपरा-पंथोपपंथांचाही बिनदिक्कतपणे वापर करणारे, समाजातले गणमान्य लोक आपण अनुभवत आहोत. या कशाचाही वासही जवळपास नसलेल्या अशा या गुरुमूर्ती. न्यायवार्तिकांत उद्योतकार म्हणतात, त्याप्रमाणे, 'शास्त्र काय आहे, मूळ तत्त्व कोणती, खरं काय हे जाणून घेण्यासाठी एक संतत - अविच्छिन्न अशा गुरु-शिष्य संबंधांची परंपरा म्हणजे संप्रदाय ! ही परंपरा, ज्यांचेमुळे जवळून समजली, त्यामध्ये गुरुवर्य पं. कवीश्वरांचं स्थान अढळ आहे.

त्यांचं बोलणं हे अनुभवांच्या कुपीतून आल्यासारखं होतं. त्यांना आम्ही कधीही रागावलेले पाहिलं नाही. एक अत्यंत सात्त्विक आणि सोज्वळ व्यक्तिमत्त्व. त्यामुळे त्यांचा व्यावहारिक अहम् आणि आध्यात्मिक अहम् हे कधी वेगळेपणानं भासत नसत. ते नेहमी आध्यात्मिक अहम् च्या स्वरूपातच असत. 'चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता', मन, वाणी आणि कृति ही पं. कवीश्वरांचे बाबतीत जणू एकरूप झालेली होती. तर्ककर्कश वेदान्ती आणि भक्तिपूत वेदान्ती असे जर वेदान्त्यांमध्ये दोन प्रकार कोणी केले तर ते भक्तिमान् वेदान्ती होते असं कोणीही त्यांना जाणणारा म्हणेल.

परंपरेनं आम्हाला गुरू या शब्दाचा जो अर्थ ज्ञात झाला होता; तो अर्थ अविकल्पानं त्यांचे बाबतीत प्रत्यक्ष पुढ्यात उभा राहात असे. एका विशुद्ध बोधाजवळ, आत्मविश्रान्त झालेल्या म्हणूनच सदैव संतृप्त असलेल्या, स्वप्रकाशी, मुक्तप्राय व्यक्तीजवळ बसून आपण वेदान्त हा त्यांचा आवडता विषय, शिकत आहोत; ही भावना त्यावेळीही आम्हाला भारावून सोडत असे. त्यांच्या शारीर वयाच्या बालपणीच, प्रौढ-वैराग्यानं त्यांचेजवळ येऊन कायमच्यासाठी वस्ती केलीय का; असं त्यांचेकडून पाहून वाटत असे. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी आम्हाला ते विद्यापीठ वाड्यात शिकवत असतानाच, त्यांचेजवळ, वासना नव्हत्या, तू-मी भान नव्हते, परनिन्दा कधीच नव्हती, त्यांचेकडून असूया व्यंग्यार्थानंही सूचित झाली नाही, त्यामुळे त्यांचं अंत:करण उद्विग्न नव्हतं, कलुषित नव्हतं. म्हणूनच व्यावहारिक जीवनातील तुष्टिमुद्रा किंवा दु:खी मुद्रा आम्हाला त्यांचेबाबतीत कधी जाणवली नाही.

व्यावहारिक जीवन जगण्यासाठीच केवळ ते विद्यापीठात शिकवीत असावेत. पण त्यांचेजवळचे ज्ञान व त्यांचं शिकवणं हे ज्ञानाचा बाजार मांडून बसलेल्या, माहितीचा पेटारा डोक्यावरून वहात राहाणाऱ्या व्यक्तीसारखे नव्हतं. त्यांचं ज्ञान, त्यांचा विषय व ते यात जणू एकरूपता होती. खरे मोठे लोक कसे असतात यासंबंधी एका सुभाषितकारानं सांगितल्याप्रमाणे, संपत्ती, कीर्ती, नसली तरी हरकत नाही. किंबहुना दारिद्र्य असलं तरी चालेल, असं असलं तरी स्वत:च्या ध्येयाकडे वाटचाल करणारे, धीरगंभीर प्रवृत्तीचे लोक आपले काम, त्याच तशाच वेगानं सुरू ठेवतात.' खरे मोठे लोक असे असतात.

'अर्थ: सुखं-कीर्तिरपीह मा भूत्,
अनर्थ एवास्तु तथापि धीरा: ।
निजप्रतिज्ञामनुरुध्यमाना:
महोद्यमा: कर्म समारभन्ते ॥

या श्लोकाचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आमचे कवीश्वर गुरुजी होते. याचं उदाहरण केवळ त्यांनी तयार केलेल्या

विद्यार्थ्यांकडे पाहूनच केवळ नव्हे तर जवळ जवळ विस्मृतीत गेलेल्या ब्रह्मीभूत वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामींचं सर्व लेखन महत्प्रयासानं जमवून, एकत्र करून, ते संपादित करून त्यांनी प्रसिद्ध केलं आणि ब्रह्मीभूत गुळवणी महाराजांच्या पश्चात पुण्याच्या वासुदेवाश्रमाची धुरा समर्थपणे सांभाळली हेच आहे.

या अशा व्यक्तींसंबंधी लिहिताना, एक विचार मला सदैव खिन्न करून सोडतो, तो हा की हे सर्व ज्यांचेसाठी म्हणून असते; त्या समाजाला त्यांची किती यथार्थपणे जाणीव असते ? खऱ्या बुद्धिमान् आणि त्यांचे त्यांचे विषयात अग्रणी असलेल्या लोकांना, बुद्धया दूर सारण्याचे अनन्त उद्योग; जे याच विषयातले तृतीय - चतुर्थ श्रेणीचे लोक करीत असतात; आणि अठ्ठ्याण्णव प्रतिशत अशाच व्यक्तींचा बोलबाला झालेला दिसतो, त्यांना पैसा व कीर्ती नको तेवढी मिळालेली दिसते; अशा लोकांना, वेळीच ओळखण्याची कुवत आमच्या समाजात कधी येणार? आणि त्याचबरोबर आमचे पं. कवीश्वर गुरूजी, पं. दीक्षित गुरूजी, पं. भागवत गुरूजी, व्याकरण रत्न बाळकृष्णशास्त्री हर्डीकर, आचार्य रघुनाथशास्त्री हर्डीकर, मीमांसागौरव दत्तात्रेयशास्त्री तांबे गुरुजी, व्याकरणाचार्य अच्युतशास्त्री पाध्ये अशासारख्या पंडितरत्नांची खरी ओळख समाजाला कधी होणार? अशा कित्येक खऱ्याखुऱ्या पंडितरत्नांना तो मान व ती कीर्ति मिळाली नाही. सर्वसामान्य समाजमनामध्ये अशा रत्नांना ओळखण्याची कुवत कशी वाढेल, हा खरा प्रश्न आहे. समाजाचे ते दायित्व आहे. ज्ञानच नसल्यामुळे पंडितराज जगन्नाथाला, जयपूरच्या राजांनी दिल्लीश्वरांकडे दिलं ही गोष्ट वेगळी. पण व्याकरणासारख्या प्रगत शास्त्राची आचार्य ही सर्वोच्च पदवी मिळवलेला रघुनाथशास्त्री हर्डीकर हा अध्यापक नको तर संस्कृतच्या प्राथमिक चार परीक्षा पास झालेला माझा मुलगा तिथं हवा, असं हट्टाग्रहानं सांगणारा संस्कृतपंडित संस्थाधिकारी कोणत्या प्रकारचं संस्थेचं किंवा संस्कृतचं हित साधणार? तिथं न्याय देणारे कै. भास्करराव जाधवांसारखे संस्कृत न शिकलेले, गृहस्थ भेटले. अनेकांना ते भेटतही नाहीत. त्याचे काय? म्हणूनच संस्कृतच्या अभिमान्यांनी पंडितश्रेष्ठ दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर गुरूजींजवळची त्यांनी विचारपूर्वक स्वत:मध्ये बाणवलेली वर दिलेली सर्व गुणसंपदा गिरवण्यासारखी आहे. म्हणजे संस्कृतची आजची स्थिती-संकृताभ्यासकांमुळेच आलीय हे म्हणण्याची कोणाची छाती होणार नाही.

आज एक प्रकारची रंगीत कागद चिकटवून येणाऱ्या झळाळीसारखी, विद्वत्तेला झळाळी आणण्याचे प्रयत्न अनेकांचे आहेत. संस्कृत न समजणाऱ्यांचं प्रमाण ९९९९९% असल्यामुळे, कोणालाही पंडित म्हणून मिरवणं शक्य आहे. तेवढी योग्य त्या ठिकाणी ओळख, नाटकीय गुणवत्ता व धाडस असल्यावर आजच्या परिस्थितीत तसा कोणीही नाव मिळवू शकतो. त्यामुळे एक प्रकारचं डेकोरेटिव्ह पांडित्य वाढलंय ते ओळखण्याची निखालस कुवत समाजामध्ये लवकरात लवकर वाढायला हवी आहे. त्याकरता मात्सर्याला कायमची तिलांजली दिलेले, स्वत:च्या अहंकाराला वेसण घालू शकणारे, स्वच्छ निखालस आणि केवळ समाजहिताचा विचार तत्त्वनिष्ठ भूमिकेतून करणारे आणि स्वत: जे शिकतो त्यातील ज्ञानावर शत-प्रतिशत विश्वास असणारे लोक हवे आहेत. म्हणजे सरावामुळे आलेले, भारवाहकतेमुळे पुष्ट झालेले, उसनवारीसारखे आलेले पांडित्य निखळून पडेल आणि खरी विद्वान माणसं जगापुढे येतील आणि कमअस्सल माणसांना विद्वानं समजल्यामुळे, ज्ञानवानांच्या जगात आपलं होणारं हसू आपण टाळू शकू.

गुरूवर्य कवीश्वरांना आदरांजली वाहताना, अशाच काही लोकांचं स्मरण झालं, आणि गुणगरिष्ठ लोकांकरिता ही भूमी शापित आहे का काय, अशा प्रकारच्या विचारांचं येणारं मळभ, थोडं दूर करण्याचा प्रयत्न केला. गुरुजींच्या गुणगणांना पुन्हा पुन्हा आठवताना शेवटी तेच प्रसिद्ध वाक्य आठवतं,

तान् अन्तरेण क्र नु मे निपतेत् प्रणाम : ॥

१६ ए, श्रीगणेशकृपा, पौड रस्ता, पुणे ३८

ब्रह्मर्षि पं. दत्तमहाराजांना विनम्र श्रद्धांजली

**धोपेश्वरकर अँड सन्स**

(धोपेश्वरकर उपक्रम)

**प्लॉंट आणि इक्विपमेंट कारखाना**

ए-१६, को. ऑप. इंडस्ट्रिअल इस्टेट,
बालानगर, हैदराबाद - ५०० ०३७
दूरध्वनी - २६० २६७




# निरंतर तेवणारी ज्ञानज्योत

## पू. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर

**प्रा. अजित कुळकर्णी**

**एतद्-देश प्रसूतस्य सकाशादग्रजन्मन:**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवा: ॥**

*(मनुस्मृती)*

मनुराजा असे म्हणतो, 'या देशात अशा श्रेष्ठ व्यक्ती आहेत की, त्यांच्या पायाशी बसून, पृथ्वीवरील सर्व मानवांनी जीवनाचे धडे गिरवावेत.' अशी पुत्ररत्ने या भारत देशात आहेत, असे मनुराजा अत्यंत अभिमानाने सांगतो. मनु राजाच्या या वचनाला भूषण आणणारे 'विद्यावाचस्पती दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर' हे एक होते.

**श्री गुरुचरित्र अखंड पारायणाचे मार्गदर्शक :**

पंडित दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर महाराज हे पुण्यात आल्यावर मुंजबाचे बोळातील शंकराचार्य मठात जात असत. तेथे श्री गुरुचरित्र अखंड पारायणाचे कल्पक वै. भालचंद्र खिस्ती (माझा मित्र गजानन खिस्तीचे वडील) हेही आचार्यांकडे जात असत. १९५५ साली ५५५ नारायण पेठ येथे श्री गुरुचरित्र अखंड पारायणाच्या उपक्रमास प्रारंभ झाला. त्यावेळी पुण्याच्या शंकराचार्य-मठाचे मठाधिपती, एरंडे स्वामी व पू. दत्तमहाराजांच्या उपस्थित याचा प्रारंभ झाला. वै. दादासाहेब तथा ग. या. नातू कुटुंबियांचा व पू. महाराजांचा विशेष लोभ होता. या सर्व थोरांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम अत्यंत भव्य स्वरूपात आनंदाश्रमात १९५६ साली सुरू झाला. वै. भालचंद्र खिस्ती यांना १९७४ साली देवाज्ञा झाल्यावर पू. महाराजांच्या मार्गदर्शनाने श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था, हा न्यास स्थापन झाला आणि प्रारंभापासून मार्गदर्शक महाराज असल्याने त्याच्या विद्वत्तेने व अत्यंत निरलस वागण्याने सर्वांच्या विनंतीला मान देऊन पू. महाराजांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले व मजकडे कार्यवाह पदाची धुरा देऊन पू. महाराजांनी मला सांभाळून घेतले. लहान वयात माझी योग्यता नसतानाही हे आमचेकडून पू. दत्तमहाराज, भगवान श्रीधरस्वामी व भगवान दत्तप्रभूने हे करवून घेतले असे वाटते.

दरवर्षी या उपक्रमाचा प्रारंभ श्री नृसिंहसरस्वती स्वामींच्या पादुका व फोटोच्या पालखी मिरवणुकीने होतो व त्यावेळी दरवर्षी आनंदाश्रमात पालखी आल्यावर पू. दत्तमहाराजांचे प्रवचन होत असे. हे प्रवचन मार्गदर्शनपर असे. त्यांच्या विचारधनाच्या या संकलनाचे काम सुरू आहे.

श्री गुरुचरित्र अखंड पारायण सप्ताहात येणाऱ्या गुरुवारी पू. दत्तमहाराज व पू. गुळवणी महाराज दर्शनाला आनंदाश्रमात येत असत. त्यामुळे सर्व सर्वांना खूप आनंद वाटत असे, तसेच उत्साहपण वाटत असे.

पू. दत्तमहाराजांनी केलेल्या मार्गदर्शनाने व संकल्प शक्तीने कोणाकडून काही मागावयाचे नाही. देवाची संकल्पशक्ती, आपल्यापेक्षा मोठी आहे. त्याला आवडेल असे काम, सेवा करीत राहायचे हे आपलं काम आहे...' याचा अनुभव आजही येत आहे. पू. दत्तमहाराजांमुळे या उपक्रमाचे उत्सवात अनेक संत महात्म्यांचे येणे झाले, यज्ञ-यागादि कार्ये पूर्ण झाली. याची पूर्ण जाणीव आम्हा सर्वांना आहे. भगवान दत्तात्रेयांनीच दत्तमहाराजांच्या रूपानेच ही कार्ये संपन्न केली आहेत अशी आमची धारणा आहे.

अलीकडे पू. दत्तमहाराज प्रकृती अस्वस्थतमुळे येऊ शकले नाहीत तरी, सप्ताहात किंवा दत्तजयंतीला स्वत: नुसते येऊन जात किंवा डॉ. अशोकराव कवीश्वर, श्री. अनिल कवीश्वर व सुनांना पाठवीत असत. त्यांच्या रूपाने हे कुटुंबिय येथे येतात असे वाटत होते व महाराजांचे कृपाशीर्वाद मिळत असत. प्रत्येक वर्षीच्या प्रवचनात व मार्गदर्शनात महाराजांच्या विचारधारेत एक संकल्पशक्ती होती. जीवनमूल्यांचे दर्शन होत असे, असा अनुभव आहे.

**मांडव्यऋषींच्या तपोभूमीतील बीज अंकुर :**

मूलत: कवीश्वर कुटुंब (घराणे) नगर जिल्ह्यातील मांडवगडचे. मांडवगड ही मांडव्य ऋषींची तपोभूमी. तेथील सप्तर्षि आडनावाचे हे कुटुंब. त्यापासून सातवा बीजांकूर ब्रह्मर्षि दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर म्हणजे ती. धुंडिराज महाराज व ती. सौ. सरस्वतीबाईंचे पुत्ररत्न ! आचार-विचार धर्माचरण संपन्न, शास्त्र-वेदनिष्ठा यांनी परिपोष झालेले, संपन्न असलेले, हे पू. महाराजांचे जीवन होते. म्हणून प्रारंभी मनुराजांनी व्यक्त केलेल्या विचाराप्रमाणे महाराजांचे सबंध विश्वाने वंदन करावे असे थोर व्यक्तिमत्व होते. त्यांच्या वासुदेव: जगत् सर्वम् या वृत्तीने भारतातील सर्व संप्रदायात अग्रपूजेचा मान महाराजांना प्राप्त झाला होता.

**पू. दत्तमहाराज एक मोक्षगुरू !**

शंकराचार्यांनी विवेकचूडामणि या ग्रंथात व्यक्त केल्याप्रमाणे 'वेदशास्त्रसंपन्न, सदाचारांनी स उत्तम ब्रह्मवेत्ते, निरिच्छ, आत्मस्वरूपात लीन असणार, सदैव शांत, तेजस्वी, निर्हेतुक कर्म करणारे, दयावान, सत्कर्मांचा पंथ दाखवणारे हे मोक्षगुरू !! या सर्व विशेष गुणांनी युक्त असे पू. महाराज होते. त्यामुळे साधक, भक्त या सर्वांचे महाराज मोक्षगुरू होते.

**आत्मज्ञान देणारा दत्तसंप्रदाय !**

दत्तसंप्रदायाचे वैशिष्ट्य असे की, हा संप्रदाय 'आत्मज्ञान देणारा' व 'भक्त वत्सलकल्पद्रुम' बिरूदावली सार्थ करणाऱ्या विचारांची थोर परंपरा आहे. या परंपरेत वाडीच्या वास्तवात करुणात्रिपदीत रमून गेलेल्या पू. महाराजांनी अत्यंत निर्हेतुकपणे कार्य करून सर्वांची जीवने उज्ज्वल केली आहेत. दत्तसंप्रदायाचे हे एक वैशिष्ट्य आहे की, भक्त सकाम जरी आला तरी तो शेवटी निष्काम होतो. पू. महाराज नेहमी सांगत 'सुदामजीसारखे मन निर्वासनामय झाले पाहिजे. भक्ती प्रल्हादजीसारखी झाली पाहिजे.' असा हा थोर संप्रदाय त्यातील महाराज म्हणजे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते.

वाडी व गाणगापूरप्रमाणे यतीची सोय आश्रमात व्हावी व सर्व लोकांना मानसिक विश्रामधाम निर्माण व्हावे या दृष्टीने वासुदेव निवास व वामन निवास यातील महाराजांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. दत्तसंप्रदायातील अमूल्य विचारधन, भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध या अनुषंगाने वेदप्रतिपाद्य विचारधारा त्यांनी जनमानसात रूजविली. त्यामुळे या धावत्या गतिमान काळात विचार संपदेने लोकांची तनुमने सुस्नात झाली आहेत.

श्रीमद् भागवतात सांगितल्याप्रमाणे -

मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव ग॒रीयसी ।

स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्याभिधीयते ॥

भक्ती व वैराग्य संपन्नतेतून आत्मस्वरूपात महाराज रममाण होते. हे एक साधकाच्या सहजावस्थेचे लक्षण भागवतात सांगितले ते महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात व्यक्त झाले होते. अशा थोर पू. महाराजांच्या जीवनात नित्य व्यवहारात तन्मयता व परिपूर्ण अलिप्तता याचा एक सुंदर सन्मवय होता, असे दिसून येत असे. त्यामुळे महाराजांचे सामाजिक जीवनातील, अध्यात्म्याच्या प्रांगणातील एकात्मतेचे कार्य, ज्ञानाचा कीर्तीचा सुगंध अखंड दरवळत होता. या दृष्टीने पू. दत्तमहाराजांचे कार्य व विचारधन, समयीच्या ज्योतीप्रमाणे निरंतर तेवणारा एक ज्ञानदीप आहे. यासाठी काय करावं -

आचार्यांच्या शब्दात म्हणू या, तमाराध्य गुरूं भक्त्या प्रह्प्रश्नसेवनैः । प्रसन्नं तमनुप्राप्य पृच्छेज्ज्ञातव्यमात्मनः॥

अशा मौक्षगुरू सद्गुरूला नम्रतापूर्वक नमस्कार करून अखंड लीन राहावे. महाराजांच्या तपोधनातील संपदेतून सर्वांनी जीवन व्यतीत करणे हीच एक श्रद्धांजली ठरो !

६९५, नारायण पेठ, फ्लॅट १३, संपदा अपार्टमेंट, पुणे ३०

धर्मभास्करच्या पं. दत्तमहाराज कवीश्वर विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा

# हैद्राबादेत महाराष्ट्रीयन वातावरणात महाराष्ट्र मंडळाच्या निवासात राहा.

डबल रुम (स्नानगृहासह), शाळा-कॉलेजच्या सहलीकरता मोठ्या खोल्या, लग्न-मुंजी आदि समारंभासाठी सभागृह उपलब्ध.

भेटा अगर लिहा -

महाराष्ट्र मंडळ ४-१-८,

रामकोट चौरस्ता,

रामकोट, हैदराबाद ५०० ००१

दूरध्वनी : ०४०-४७५ ४०२९, ४७५ ९०५३

# प. पू. श्रीदत्तमहाराजांचे महान कार्य

## श्री दत्त अमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार

सौ. मंगला ज्ञा. गायकवाड



साधारण पाच-सहाशे वर्षांपूर्वीची गोष्ट. प. प. (परमहंस परिव्राजकाचार्य) श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज पदभ्रमण करीत करीत कृष्णाकाठी भिलवडी या ग्रामी आले. तिथे काही काळ वास्तव्य करून त्यांनी एका ब्राह्मणाचा उद्धार केला आणि तेथून निघाले ते थेट स्थिरावले कृष्णा पंचगंगेच्या संगमावरच. तेथील शमीच्या दाट वृक्षराजींनी व चिंचेच्या बनांनी ते मोहित झाले. त्यांनी तेथेच तपश्चर्या करायचे ठरवले. याच काळात त्यांच्या आंतरदृष्टीला नदीच्या पैलतीरावरील अमरेश्वराचे प्राचीन जागृत देवस्थान दिसून आले. तेथे ते नित्य दर्शनास जाऊ लागले. त्यांचा हा नित्यक्रम जवळ जवळ बारा वर्षे चालला होता. तेथून निघण्यापूर्वी कृष्णापंचगंगा संगमावरील एका मोठ्या औदुंबर वृक्षाखाली आपल्या निर्गुण पादुकांची त्यांनी स्थापना केली; तेच हे पवित्र श्रीक्षेत्र नृसिंहवाडी होय.

त्यानंतर बऱ्याच काळाने म्हणजे एकोणिसाव्या शतकात श्रीदत्तावतारी प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज (टेंबेस्वामी) श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला आले. प. प. श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या प्रासादिक पादुकांच्याबरोबरच त्यांनी नदीच्या पैलतीरावरील श्रीअमरेश्वराचे पण दर्शन घेतले. पुढे आपल्या शिष्यमंडळींसह ते श्रीअमरेश्वराच्या दर्शनास वारंवार येऊ लागले. या शिष्य मंडळींमध्ये प.प. श्रीदीक्षित स्वामी महाराज (प.प. श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज) पण असत. या वास्तव्यात प. प. श्रीदीक्षित स्वामी महाराजांनी श्रीअमरेश्वराभोवती ७ x ८ चे एक सुरेख मंदिर बांधले. त्यात श्रीदत्तप्रभूंची व्याघ्रांबरधारी बैठी मूर्ती बसवली; शेजारीच दंडकमंडलूशंखचक्रगदापद्मंडित पादुकांची स्थापना करून मंदिराच्या मागील बाजूस योगिनींची प्रतिष्ठापना केली. आणि मंदिराच्या दर्शनद्वारांत विघ्नहर्त्या व सुखकर्त्या श्रीगणेशाची स्थापना केली.

या मंदिराच्या शेजारीच आणखी एक छोटीशी वास्तू बांधून, त्यातील गर्भागारात व्यासयंत्र (गुरूपीठ) स्थापन केले व जवळच आपल्या परम सद्‌गुरूंच्या प. प. टेंबेस्वामी महाराजांच्या खडावा व स्वतःच्या नित्यपूजेतील काही मूर्ती ठेवल्या. या गर्भागारात त्यांनी असा एक झरोका बांधून घेतला की त्यातून समोर पाहिले असता श्रीक्षेत्रनृसिंहवाडीच्या प्रासादिक पादुकांचे त्यांना केव्हाही दर्शन घेता येत असे. या वास्तूला 'श्रीवासुदेवपीठ' हे नाव देऊन त्यांनी आपल्या सद्‌गुरूंचे चिरंतन स्मारक करून ठेवले. याच ठिकाणी प. प. श्रीदीक्षित स्वामीमहाराजांच्या समोर वयाच्या फक्त सोळाव्या वर्षीच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पहिला भागवतसप्ताह केला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे किशोर वयातील ते अस्खलित संहितावाचन व संस्कृत भाषेवरील प्रभुत्व पाहून प. प. श्रीदीक्षित स्वामी महाराजांना अतीव आनंद झाला. त्यांचे अर्थकथन त्यांनी लक्षपूर्वक ऐकले आणि ते चकित झाले. श्रीमद् भागवतात षट्शास्त्रे, अठरा पुराणे, कर्ममार्ग, भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग इ. अनेक विषय आलेले आहेत. या सर्व विषयांचे विवेचन एवढ्या लहान वयात करण्याची त्यांची हातोटी पाहून ते भारावून गेले. त्यांची ही असामान्य बुद्धिमत्ता पाहून त्यांना परमानंद झाला आणि त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना जवळ घेऊन प्रेमभराने आशीर्वाद दिले.

आता प. पू. श्रीदत्तमहाराजांचे ठिकठिकाणी भागवत सप्ताह होऊ लागले; पाठीशी प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांचे आशीर्वाद होतेच, त्यामुळे त्यांची कीर्ती उत्तरोत्तर वाढतच गेली. पुढे त्यांना श्रीनृसिंहवाडी सोडावी लागली तरी सुद्धा जेव्हा जेव्हा ते वाडीस जात, तेव्हा तेव्हा न चुकता श्री दत्तअमरेश्वराचे दर्शन घेत असत.

'सहस्रचंद्रदर्शनशांति'च्या आधी त्यांनी श्रीदत्तअमरेश्वरापुढे एक भागवत सप्ताह करायचे ठरवले. त्यावेळी त्यांच्या वयाचा विचार करून काही भक्त मंडळींनी तेथील गैरसोयी त्यांना सांगितल्या. त्या ऐकताच प. पू. श्रीदत्तमहाराज पटकन् म्हणाले, 'तेथील सेवेकरी कसे राहतात? आम्हीही तसेच एक सेवेकरी म्हणून राहू.' त्यांचे हे उद्‌गार ऐकून भक्तमंडळींना ज्ञानेश्वरीतील पुढील ओवीची आठवण झाली. 'शास्त्राधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे । आलौकिक नोहावे लोकांप्रती ॥'


त्याचवेळी ती वास्तू जीर्ण झालेली आहे हे प. पू. श्री दत्तमहाराजांच्या लक्षात आले आणि तिचा जीर्णोद्धार करण्याचा त्यांनी मनोमन संकल्प केला. लोकांना समजण्यासाठी या जीर्णोद्धाराचा उल्लेख प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या 'सहस्रचंद्रदर्शनशांति' सोहळ्याच्या निवेदनात स्पष्टपणे केला आहे.

जीर्णोद्धार संदर्भात प. पू. श्रीमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे मूळ मंदिर कायम ठेवून भोवतालच्या परिसरात योग्य त्या सुधारणा करून मंदिराचा आराखडा सिद्ध करण्यात आला. या परस्पेक्टिव्ह प्लॅनप्रमाणे (कल्पनाचित्र) होणाऱ्या वास्तूला चाळीस लाख रूपयांपर्यंत खर्च येईल असा अंदाज केला गेला.

प.पू. श्री महाराजांचे निष्ठावान एक भक्त हा सर्व खर्च वैयक्तिकरीत्या करण्यास पुढे आले. त्यांनी आपला मनोदय जेव्हा श्री महाराजांपाशी प्रकट केला, तेव्हा श्रीमहाराज म्हणाले, 'घाई करू नका. यथावकाश ते पूर्ण होईलच.' मंदिराच्या निर्मितीत सामान्य जनांचा सहभाग असावा व प्रत्येकाला ते मंदिर आपले वाटावे यासाठी श्रीमहाराजांनी मंदिर लोकांच्या आर्थिक सेवेतूनच बांधण्याचे ठरविले. त्यांचे हे विचार पाहताच समर्थ रामदासांनी

शिवरायांना सांगितलेल्या चाफळच्या श्रीराम मंदिराच्या बांधकाम प्रसंगाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. श्री समर्थांचीच दूरदृष्टी प. पू. श्री महाराजांच्या रूपाने प्रकट झाली; कारण एकट्याने हे मंदिर उभारल्याने सात्विक अहंकार निर्माण होण्याची शक्यता असते, तसा तो होऊ नये म्हणून प. पू. श्रीमहाराजांनी घेतलेली काळजी बघून संत नामदेवांच्या पुढील अभंगाची आठवण होते. 'अहंकाराचा वारा न लागो माझिया विष्णुदासा ।' आपल्या या निष्ठावान भक्ताची सेवेची तळमळ जाणून, जीर्णोद्धाराच्या जबाबदारीसह अन्य सर्व जबाबदाऱ्या त्याच्यावर त्यांनी सोपवल्या.

या निस्सीम भक्ताने श्रीदत्तअमरेश्वर देवस्थान सेवा-निधी उभा करण्याकरिता सर्वतोपरीने प्रयत्न करण्यास सुरूवात केली. त्या संदर्भात त्यांच्या अमरापूर-औखाडला खेपा सुरू झाल्या. त्यांचे अथक परिश्रम म्हणजे इतरांना प्रयत्नवादाचा एक आदर्श पाठच होय. कोणत्याही प्रश्नाला त्यांचे उत्तर ठरलेले असायचे. 'आपले गुरुमहाराज सर्व काही करून घेतील. आपण निराश न होता प्रयत्न करीत राहावे.' साकार झालेल्या या भव्य वास्तूकडे पाहाताच, त्याच्या केलेल्या प्रयत्नांची व सद्गुरु चरणी असलेल्या अतूट निष्ठेची खात्री पटते.



जीर्णोद्धाराची सचित्र निवेदने छापली गेली आणि त्याद्वारे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्यसंकल्प लोकांपर्यंत पोहोचवला गेला. बांधकामाला लागणारा एवढा अमाप पैसा उभा राहणार कसा ? अशी शंका सामान्य जीवांच्या मनात साहजिक उभी राहिली, पण सत्यसंकल्पाचे दाते प्रत्यक्ष श्रीसद्गुरूच होते. त्यामुळे तन-मन-धनाने सेवा करण्यास भक्तमंडळी आपणहून पुढे येऊ लागली. कुणी पत्रलेखनाची जबाबदारी स्वीकारली, तर कुणी पावतीपुस्तकांद्वारे निधी गोळा करण्यास सुरूवात केली. त्याचवेळी ८० जी (करमाफी सवलत) सवलत मिळविल्यास पैसा लवकर उभा राहील असे काहींच्या मनात आले. परंतु त्याकरता देवस्थान मूळ रजिस्टर डीडमध्ये बदल करणे आवश्यक होते; कारण मूळ डीडचा हेतू धार्मिक असाच होता आणि धार्मिक संस्थांना करमाफी सवलत मिळत नाही. तेव्हा काहीतरी सामाजिक कार्याचे कलम त्या डीडमध्ये घालणे आवश्यक होते. पण प. पू. श्रीमहाराजांनी सांगितले की, जी गोष्ट आपणास कधीच करायची नाही तिचा खोटा निर्देश कशाला? ज्याला द्यायचे असेल तो देईल. श्रीदत्तअमरेश्वर आपल्या पाठीशी आहेच.

मुंबईतील प. पू. श्रीमहाराजांचे एक श्रद्धावान शिष्य श्रीदत्तअमरेश्वर देवस्थानच्या बांधकामावर जातीने लक्ष ठेवण्यास पुढे आले. त्याकरिता ऊन, थंडी, पाऊस, वारा या कशाचीही पर्वा न करता मुंबई औखाड असे त्यांच्या वारंवार जाणे-येणे सुरू झाले, तेही अबोलपणे. तसेच लोणावळ्याच्या एका सच्छील भक्ताने आपल्या घराकरिता घेतलेले सर्व घडीव चिरे देवस्थानाला देऊन टाकले. त्यामुळे सात-आठ हजार स्वेअर फुटांचे पायाभूत सुरेख बांधकाम सहजगत्या पूर्ण झाले. याप्रमाणे प. पू. श्रीमहाराजांनी नुसत्या नजीकच्या भक्तांना सेवेची प्रेरणा दिली असे नव्हे तर देश-विदेशातील भक्तांच्या हृदयात देखील सेवाभाव निर्माण केला. याची परिणती म्हणजे परदेशातील भक्तांनी पाठविलेला निधी! हे पाहिल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सूक्ष्म शक्तीचा किती दूरवर संचार होता याचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही.

प. पू. महाराजांनी नुसता दुसऱ्यांच्या मनातच सेवाभाव उत्पन्न केला असे नाही तर, स्वत: अगोदर तसे आचरण करण्यास सुरूवात केली; वय व प्रकृती दोन्हीही साथ देत नसताना त्यांनी ठिकठिकाणी दौरे काढले. या प्रवासाबद्दल भक्तमंडळींनी थोडीशी चिंता व्यक्त केली. तेव्हा प. पू. श्री महाराज हळू शब्दात म्हणाले, 'प्रकृति साथ देत नसताना देखील आम्ही बाहेरगावी कशाकरिता जातो? तर आमच्या जाण्याने श्रीदत्तअमरेश्वराच्या जीर्णोद्धारास आमचाही थोडाफार हातभार लागेल.' कुणालाही पत्ता लागू न देता वेळोवेळी जमलेले सर्व पैसे त्यांनी सेवासमितीच्या स्वाधीन केले. प. पू. श्री महाराजांच्या चरणी कुणी सेवा अर्पण केल्यास ते स्पष्ट म्हणत, 'यापेक्षा श्री दत्तअमरेश्वराची सेवा मोठी आहे; तिकडे अर्पण करा.' नाहीच ऐकले तर त्याच्या नावे स्वत: पावती फाडायला लावीत असत. केवढा हा निरिच्छ सेवाभाव !

या सर्व प्रयत्नांचा दृश्य परिणाम म्हणजे निवासस्थान, श्रीवासुदेव पीठ व मुख्य मंदिर यांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या सर्व बांधकामात लहान-मोठ्या देणगीदारांची नावे ठिकठिकाणी लिहिलेली दिसत नाहीत. हे असे का? या गोष्टीचा विचार करू जाता त्यामागे प. पू. श्री महाराजांची असलेली सौंदर्यदृष्टी ! तशी ती नावे लिहिली गेली असती तर एवढ्या मोठ्या वास्तूच्या सौंदर्याला बाधा आली असती, परंतु कुणालाही दुखवायचे नाही हे तर श्री महाराजांचे ब्रीदच! म्हणून दर्शनी भागात मोठ्या फलकावर देणगीदारांची नावे लिहिण्यात आली. त्यामुळे आसक्त व निरासक्त असे दोन्ही प्रकारचे भक्त समाधानी झाले.

श्रीदत्तअमरेश्वराच्या मागील भिंत पाडताना झाकणाने बंद असलेली, बरणीच्या आकाराची दोन मातीची भांडी सापडली. त्यामध्ये राणी छापाचे चांदीचे काही रूपये होते. कामावर देखरेख करणाऱ्यांनी ही गोष्ट प. पू. श्री महाराजांच्या कानी घातली; ही हकीगत ऐकताच प. पू. श्री महाराजांनी सर्वप्रथम ती नाणी

सरकारजमा करण्यास सांगितले. त्यांचे हे मत पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. पण यामागे प. पू. महाराजांचे दोन हेतू स्पष्ट दिसतात. पहिला म्हणजे सरकारने आपल्या हिताकरताच कायदे केले असल्यामुळे त्यांचा भंग होता कामा नये. जर थोरांकडून कायद्याचा अवमान झाला तर सामान्य जनतेचा बुद्धिभेद होण्यास वेळ लागणार नाही. दुसरी महत्त्वाची बाजू म्हणजे लोकापवाद टाळणे; कारण नाणी सापडली ही गोष्ट कर्णोपकर्णी होणारच आणि त्या बातमीत भर पडत शेवटी राईचा पर्वत होणार, नंतर लोकांना कितीही पटवून सांगितले तरी ते पटणारच नाही. तेव्हा कोणावरही कोणताही ठपका येऊ नये म्हणून ती नाणी त्यांनी सरकारजमा करण्यास सांगितली असावीत. नंतर अर्ज विनंत्या करून सरकारकडून नाण्यांच्या मोबदल्यात एक वेळेस पैसा मिळवता येईल परंतु लोकोपवाद टाळणे महा कर्मकठीण !

सर्व वास्तूच्या जीर्णोद्धाराबरोबरच प. प. दीक्षित स्वामी महाराजांनी बांधलेल्या मूळ छोट्या मंद्रिराचाही जीर्णोद्धार करावा अशी भक्तमंडळींची इच्छा होती. प. पू. श्रीमहाराजांनी मंदिराच्या बाह्यांगात फेरफार करण्यास अनुमती दिली, परंतु अंतरंगात बदल करण्यास ते तयार नव्हते. सर्वच बदलून टाकले तर मूळ मंदिराचे पुरातन वास्तुशिल्प कसे होते याचा पुढील लोकांना पत्ता लागणार नाही; शिवाय ते छोटेसे मंदिर प. प. दीक्षित स्वामी महाराजांनी बांधून घेतले होते, त्यामुळे तिला हात लावणे त्यांना पसंत नव्हते. अशा रीतीने प. पू. श्री महाराजांनी प्राचीनत्त्वाबरोबरच पावित्र्यही अबाधित ठेवले.

श्रीदत्तअमरेश्वर मंदिर जीर्णोद्धाराचा मुख्य भार प. पू. श्रीदत्तमहाराजांनी श्रीकृष्णासमान आपल्या करांगुलीवर सहजतेने उचलला व गोवर्धनाला काठ्यांनी आधार देणाऱ्या गोकुळवासियांप्रमाणे भक्तजन निमित्तमात्र असूनदेखील श्रीमहाराजांनी जीर्णोद्धाराचे सर्व श्रेय भक्तजनांनाच दिले.

श्रीदत्तअमरेश्वर मंदिर जीर्णोद्धाराचे काम तर पूर्ण झालेच आहे, परंतु प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या संकल्पातील काही भाग अद्यापि शिल्लक राहिला आहे. त्यातील एक भाग म्हणजे झालेल्या जीर्णोद्धाराचे व्यवस्थापन आणि नित्य व नैमित्तिक उत्सव महोत्सव याकरिता येणारा खर्च व त्याकरिता लागणारा पैसा उभा करणे, म्हणजे कायमनिधी उभा करणे. हे काम एकोणिसशे शहाण्णव सालापासून सुरू झाले आहे. दुसरा भाग म्हणजे स्नान-संध्या करण्याकरिता मंदिरासमोरील नदीच्या किनाऱ्यावर घाट बांधणे, घाट बांधण्याचे काम व त्याकरिता लागणारा निधी गोळा करण्याचे काम सुरु झाले आहे. एकूण प्रोजेक्ट वीस लाखाच्या आसपास आहे. वास्तविक पाहता हे सर्व काम सरकारने करावयाचे आहे, पण सरकार दरबारी फारसे यश आले नाही.

ही सर्व हकीगत श्रीमहाराजांच्या कानावर घातल्यावर श्रीमहाराज म्हणाले, 'मंदिराचा जीर्णोद्धार जसा भक्तांच्या सेवेतून झाला, त्याचप्रमाणे हा घाटही भक्तांच्या सेवेतूनच व्हावा अशी परमेश्वराची इच्छा दिसते आहे. त्यासाठी निवेदनाद्वारे घाट प्रकल्पाकरिता लोकांना तन-मन-धनाने सेवा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.'

सत्यसंकल्पाचा दाता श्रीमहाराज असल्यामुळे अपेक्षेपेक्षा फारच उत्तम प्रतिसाद या घाट प्रकल्पाला भक्त जनांकडून मिळत गेला. प. पू. श्रीमहाराज देखील आपल्याकडे येणारे पैसे घाट प्रकल्पाकरिता जमा करीत असत. या सर्वांचा परिणाम म्हणजे श्रीदत्तजयंतीच्या मुहूर्तावर घाटाचे भूमीपूजन होऊन प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली. श्री महाराजांच्या प्रभावी संकल्प शक्तीमुळे त्यांच्या महानिर्याणापर्यंत प्रोजेक्टला लागणाऱ्या एकूण रकमेपैकी तीन चतुर्थांश रक्कम उभी देखील राहिली. श्री महाराजांच्या संकल्पानुसार घाटाचे काम लवकरच पूर्ण होईल यात संशय नाही, पण एकाच गोष्टीची रूखरूख मात्र सारखी लागून राहणार आहे की झालेले काम पाहण्यास मात्र प. पू. श्री दत्तमहाराज आज आपल्यात नाही.

❦

१६/६, एरंडवणा, रघु-दुर्ग अपार्टमेंट, कर्वे रोड, पुणे ४११ ००४

## श्रीदत्तअमरेश्वर- कृष्णाघाट प्रकल्प

**कृष्णा नदीच्या एका काठावर श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी आहे तर समोरच्या तीरावर श्रीक्षेत्र अमरापूर (औरवाड) येथे श्रीदत्त अमरेश्वराचे मंदिर असून त्याच्या जीर्णोद्धाराचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे.**

**काशी क्षेत्राप्रमाणे या क्षेत्राचा व येथील स्नानाचा महिमा स्कंद पुराणाच्या 'कृष्णा माहात्म्य' या प्रकरणात आला असून कृष्णामाईच्या तटावरील श्रीक्षेत्र श्रीदत्तअमरेश्वर देवळाकडील काठावर सुंदर घाट बांधण्याचा संकल्प प. पू. सद्गुरू श्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी केला होता. श्रीदत्तजयंतीच्या शुभ मुहूर्तावर भूमिपूजन होऊन या कृष्णघाटाचे काम प्रत्यक्षात सुरू झाले आहे. घाटाच्या बांधकामाचा खर्च पंचवीस लाख आहे. समस्त दत्तभक्तांस व भाविकांस विनंती आहे की त्यांची आर्थिक सहाय्य करून या घाटाच्या प्रकल्पास आपला सक्रिय हातभार लावावा. चेक/डी.डी. 'श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ-घाट प्रकल्प' या नावाने काढून पुढील पत्त्यावर पाठवावा.**

*(१) श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ, मु. पो. औरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (२) श्री वासुदेव निवास, ४२/४१७ कर्वे रोड, पुणे ४११ ००४*

लाखो सुशिक्षित कुटुंबात विश्वासाने वापरतात
कुटुंबातील सर्वांच्याच सर्दी खोकल्यावर गुणकारी
आयुर्वेदिक काफी
– त्वरीत गुण
– गुंगी आणणारे घटक नाही
– चवीला उत्कृष्ट
– साईड इफेक्ट्स नाही
100 मि.ली. 200 मि.ली.
सिरप
निर्माते पार्ला फार्मा मुंबई ५७
TOSH/AD/K

# ॐ पूर्णमदः पूर्णमिदम्

**आशा किशोर धारप**



**भारतीय तत्त्वज्ञान व अध्यात्म, भारतीय** जीवन व धर्मविचार, विद्वत्त्व आणि संतत्त्व, ह्यांचा एकाच व्यक्तीच्या संदर्भात विचार करायचा असल्यास ज्या महापुरुषांची नावे डोळ्यांसमोर येतात (जगद्गुरु श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर माऊली) त्यात अलीकडच्या काळात जे नाव प्रामुख्याने लक्षात येते ते म्हणजे प.पू. श्रीदत्तमहाराज ढुंडीराजशास्त्री कवीश्वर होय.

श्रीदत्तमहाराजांचे जीवन व त्यांचे 'प्रयाग' हे चरित्र वाचकांना माहीत आहे. म्हणून लेखाची सुरुवात त्यांच्या 'महानिर्वाण'च्या प्रसंगानिमित्ताने आलेल्या विचारांनी होत आहे. श्रीदत्तमहाराजांचे महानिर्वाण झाले तेव्हा सूर्योदयाला चतुर्दशी व नंतर थोड्याच वेळात पौर्णिमा अशी त्या दिवसाच्या तिथींची स्थिती होती. महापुरुषांचे जन्म व त्यांचे निर्वाण ह्या गोष्टी सामान्य नसतात. त्या सूचक असतात. त्यांचा वैचारिक शोध घेणे महत्त्वाचे असते. श्रीदत्तमहाराजांचे चतुर्दशी व पौर्णिमेच्या उंबरठ्यावर निर्वाण होणे ह्यात त्यांच्या परिपूर्णत्वाचा निर्देश आहे. लौकिकात व अलौकिकात, प्रपंचात व परमार्थात, सगुणात व निर्गुणात, विद्वत्तेत व संतत्त्वात, वेदवाङ्मयात व संतसाहित्यात, ज्ञानी शिष्यात व सामान्य भक्तात, प. पू. श्रीगुळवणीमहाराज व प. पू. श्री दीक्षितस्वामीमहाराज ह्यांच्या शिष्यस्वरूपात आणि 'श्रीवासुदेवनिवास' पीठाच्या 'गुरुस्थान' स्वरूपात; समचित्तभावाने, सारख्याच वृत्तिविचारांनी व आत्यंतिक प्रेम व आदर भावनेने वागणारे श्रीदत्तमहाराज म्हणजे शब्दात न मावणाऱ्या व मनबुद्धीने न उलगडणाऱ्या अशा अनेक पूर्णत्वाच्या परी होत्या. त्यातल्या काहींची अल्पमतीप्रमाणे झालेली जाणीव हाच ह्या लेखाचा विषय आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना पाहून, त्यांची ओळख होऊन बरीच वर्षे झाली. पण ते थोडे बहुत दिसले व कळले, ते त्यांच्याच कृपेने अलीकडील काही वर्षांत. (अर्थात ते थोडे बहुत कळले हे म्हणणेही धाष्टर्याचेच आहे. कारण जे कळणे आहे ते वर दिसणाऱ्या १/१० हिमखंडाला स्वमर्यादापूर्ण दृष्टीने पाहून. ९/१० हिमखंडाचे दर्शन व्हायला श्रीतुकारामांची परिपूर्ण दृष्टी हवी. 'जेथे माझी दृष्टी राहिली बैसोन । तेथेंचि हें मन गुंडाळतें ।।)

श्रीदत्तमहाराजांच्या लौकिक जीवनाचा विचार करताना त्यांच्या रूपात संत एकनाथांच्या लौकिक जीवनाचे दर्शन होत असे. त्यांचा प्रपंच जणू एकनाथांचाच होता. त्यात इतके सादृश्य होते की, श्रीदत्तमहाराजांच्या पत्नी ती. सौ. लक्ष्मीआईसाहेब ह्या संत एकनाथांच्या पत्नी ती. सौ. गिरीजाबाईसारख्याच निष्ठावंत सहधर्मचारिणी होत्या. 'ह्यांच्या सहवासात असणे म्हणजेच परमार्थ कळणे, एवढे मला कळते.' ह्या ती. सौ. आईसाहेबांच्या वाक्यात त्यांना उलगडलेला प्रपंच परमार्थाचा अर्थ व त्यांचे 'सहधर्मचारिणीत्व' सिद्ध झालेले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या घरी येत राहाणारा भक्तांचा अखंड प्रवाह आणि त्या प्रवाहाचे दिवसा-रात्री केव्हाही आनंदाने स्वागत करणारे श्रीदत्तमहाराजांचे घर, हा एक विलक्षण अनुभव आहे; हेही इथे आदराने नोंदवणे अगत्याचे आहे.

अलौकिकातल्या ईश्वरी-शक्तीचे भान आपल्या ज्ञानपूर्ण शब्दांनी, आपल्या शास्त्रशुद्ध आचरणाने आणि सर्व प्राणीमात्रांबद्दलच्या असीम कारुण्यभावाने, सर्व जनांना सातत्याने करून देणे हा त्यांच्या लौकिक अलौकिकाच्या एकत्वाचा सुंदर अनुभव आहे. श्रीदत्तमहाराजांच्या घरून दूध, पोहे, भोजन असे वेळेनुसार काही घेतल्याशिवाय जसे कोणी रिक्तहस्ते परत गेले नाही त्याचप्रमाणे ईश्वरी अनुभवाचा कुवतीनुसार अल्पप्रसाद मिळाल्याशिवाय कोणी परतले नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या सगुणस्वरूपाचा विचार करताना त्यांच्यात मर्यादा - पुरुषोत्तम श्रीरामाच्या सगुणरूपाची कितीतरी शुभचिन्हे सापडतात. कुळाची मर्यादा त्यांनी आपल्या पिताश्री प. पू. श्री. ढुंडिराजशास्त्री कवीश्वरांकडून मिळालेल्या वारश्यातून उत्तम सांभाळली. गुरुमर्यादेची तर इतकी परिसीमा होती की प. पू. गुळवणीमहाराजांसमोर ते कधीही बसले तर नाहीतच, पण आपल्या गुरुदेवांच्या निर्वाणानंतर' उत्तराधिकारी झाल्यावरही त्यांच्या खोलीत त्यांच्या स्थानावर ते कधी बसले नाहीत. आपल्या गुरुदेवांच्या पवित्र स्मृतीप्रीत्यर्थ त्यांनी पुण्यात 'श्रीवामन निवास' बांधला तर औरवाडला सद्गुरु प. पू. श्री दीक्षितमहाराज ह्यांच्या 'श्रीदत्तअमरेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनी केला. कृष्णेला घाट बांधायचा श्रीदत्तमहाराजांनी केलेला संकल्प लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांच्या सर्व वाङ्मयाचे खूप कष्टाने, मेहनतीने एकत्रीकरण करून व ते सुसंस्कारित करून तसेच त्याचे बारा खंडात प्रकाशन करून, श्रीदत्तमहाराजांनी परात्परगुरूंचे ऋण तर फेडलेच आहे, पण अभ्यासकांना, उपासकांना व

दत्तसांप्रदायिकांना अनुभवाच्या व चिंतनाच्या महाद्वारापाशी नेऊन सोडले आहे.

'श्रीमद्भागवतावरील' श्रीदत्तमहाराजांचे एकनिष्ठ व आत्यंतिक प्रेम हे त्यांच्या श्रीकृष्णावरील भक्तिरूपाची साक्ष आहे. द्रौपदीची दोन प्रसंगातील वागणूक, हा श्रीदत्तमहाराजांच्या बोलण्यातला नित्य विषय असे. एक म्हणजे द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी 'मी हस्तिनापुरात व श्रीकृष्ण द्वारकेला ! मग त्याला कसे बोलावू ?' हा प्रश्न तिला पडला नाही. ईश्वर सर्वव्यापी असतो, अशी तिची डोळस ज्ञानभक्ती होती. दुसरे म्हणजे अश्वत्थाम्याला अर्जुनांने बांधून आणल्यावर द्रौपदी त्याला क्षमा करून, सोडून द्या म्हणून सांगते. 'एक तर तो गुरुपुत्र आहे, दुसरे म्हणजे त्याच्या मातेला होणाऱ्या शोकाची मला जाणीव आहे.' ह्या प्रसंगी द्रौपदीचा जागृत असलेला विवेक, तिची पराकाष्ठेची क्षमाशीलता व प्रचंड सहनशक्ती, ह्याचे श्रीदत्तमहाराजांना विशेष महत्त्व जाणवत असे. श्रीकृष्णावर गोकुळातील सर्व जनांचे असलेले, 'स्व'पण विसरलेले विशुद्ध प्रेमही श्रीदत्तमहाराजांना भारावून टाकत असे. 'श्रीवासुदेव निवासाचे' उत्तराधिकारी पद व प्रमुख विश्वस्तपद सांभाळताना व्यावहारिक पातळीवरचे अचूक निर्णय व व्यवहारकौशल्य हे सर्व श्रीकृष्णनीतीच्या दिशेने होत असे. श्रीराम व श्रीकृष्ण ह्या दोन सगुण व्यक्तिमत्त्वांचा भास श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तित्वात नेहमीच होत असे.

श्रीदत्तमहाराजांच्या 'निर्गुण निराकार' स्वरूपाचा विचार व उच्चार ही पेलण्यासारखी गोष्टच नाही. म्हणून इथे संत कबीरांच्या अनुभवाचा उल्लेख समर्पक ठरावा.

'पवन नही, पानी नही, धरती नही आकाश ।
कबीर कहे ता देसमें मेरो है प्रकाश ॥'

श्रीदत्तमहाराजांच्या विद्वत्तेचा तीन राष्ट्रपतींकडून तीनदा झालेला सत्कार, चारही पीठांच्या आचार्यांकडून झालेला सन्मान, अनेक विद्वत्सभांतून त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेचा आलेला अनुभव व त्यामुळे झालेला गौरव, हे सर्वजनांना विदित आहेच. ही खरी तर श्रीदत्तमहाराजांच्या अपरिमित ज्ञानाची परिसीमा आहे. पण एवढ्या तपश्चर्यापूर्वक मिळवलेल्या ज्ञानप्राप्तीनंतर संतत्वात विलीन होणे हा श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तित्वाचा अत्यंत दुर्मिळ असा विशेष आहे. (तुका म्हणे धन्य झालो संतसागरीं मिळालों ॥ हेच खरे.) ज्ञान परिपूर्ण असल्याचे किंवा ज्ञानमार्ग पूर्णत्वाला गेल्याचे हे निश्चित लक्षण आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तित्वात श्रीज्ञानेश्वर माऊलींसारखा दिसणारा आणखी एक विशेष म्हणजे ईश्वराप्रत जाणारे चारही मार्ग त्यांनी अनुभवले. ज्ञानमार्गी तर ते पूर्णपणे होतेच. पण ह्या लौकिक संसारात वावरताना त्यांनी कर्ममार्ग निष्ठापूर्वक असा उत्तम व आदर्शवत् अनुसरला. (कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥) आपले गुरुदेव प. पू. श्रीगुळवणीमहाराज ह्यांच्याकडून मिळालेला 'शक्तिपात महायोग' त्यांनी नुसताच अनुभवला नाही तर त्या योगपीठावर ते आरुढही झाले. 'भागवतामृताची' भक्ती तर त्यांच्या अस्तित्वाच्या कणाकणातून ओसंडत होती. अशा तऱ्हेचे परिपूर्ण दर्शन क्वचितच् घडत असते.

असे दर्शन ज्यांना झाले, श्रीदत्तमहाराजांची कृपा ज्यांच्यावर झाली, त्यांची स्नेहार्द्र संतदृष्टी ज्यांच्या ज्यांच्यावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पडली, त्यांचे जीवनच एक अनुभव होऊन गेलेले आहे. दिवसागणिक व भक्तागणिक असंख्य अनुभवांची मालिका मग तेथे सतत सिद्ध होत जाते. पूर्वसुकृत नि योग्यतेनुसार अनुभवांच्या पातळ्या बहुश: लौकिक व क्वचित अलौकिकाचा किनारा गाठतात. खरे तर संतांच्या जीवनात परमेश्वरी शक्तीचा मती गुंग करणारा खेळ पदोपदी दृष्टीस पडतो. पण तो पाहण्याची दृष्टी मात्र असावी लागते. हे होण्याकरिता श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने भक्तांचे सर्व विवेक जागे होऊ लागतात. साधनेतील सातत्य तसेच अखंड नामस्मरणाचा व अखंड अनुसंधानाचा अर्थ व मार्ग त्याला हळूहळू उलगडू लागतो आणि भक्तीच्या बळाची शिदोरी घेऊन तो 'सत्' मार्गाकडे थोडी बहुत पाऊले टाकू लागतो. पुढील कुठल्यातरी जन्मात होणाऱ्या ईश्वरप्राप्तीच्या शक्यतेची सुरुवात मात्र गुरुकृपेने इथेच होऊन जाते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे असे हे सहजसुंदर, सात्विक, परिपूर्ण, सत्य-संतदर्शन. प. पू. श्रीधुंडामहाराज देगलूरकरांनी म्हटलेल्या वाक्याची इथे नक्कीच आठवण होत आहे. 'श्रीदत्तमहाराजांचा अधिकार सहजासहजी कळणे कठीण आहे.' असे ते आवर्जून म्हणतात. असे असूनही अपुऱ्या, तोकड्या, क्वचित वेड्यावाकड्या, अल्पमतीवर आधारलेल्या ह्या मापाने घेतलेले हिमालयाएवढ्या संतसत्पुरुषाचे - श्रीदत्तमहाराजांचे हे दर्शन शुद्ध भक्तीने भरलेले आहे. (मन वाचातीत तुझे हे स्वरूप । म्हणोनिया माप भक्ती केले ॥) श्रीदत्तमहाराजांनी ही सेवा गोड मानून घ्यावी. शेवटी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी विश्वमांगल्याची प्रार्थना करताना त्यांना आवडणारा प. पू. श्रीतुकाराममहाराजांचा अभंग सादर आहे.

हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥
ठेविलें अनंतें तैसेचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥

सी ९, भाटिया बिल्डींग, दिलीप गुप्ते मार्ग, माहीम, मुंबई १६.
दूरध्वनी : ४४५ ४८४५

# ब्रह्मर्षि कवीश्वर गुरुजी : एक दर्शन

**प्रा. ज. दा. कुलकर्णी**



**इ. स. १९५२-५३ या वर्षातील कोणतीतरी** एक सुप्रभात. पुणे स्टेशनचा लांबच लांब क्र. १ चा प्लॅटफार्म. प्लॅटफार्मवर तसा शुकशुकाटच. पण विशीच्या वयाचा एक तरुण मात्र सचिंत नजरेनं त्या प्लॅटफार्मवर फेऱ्या मारतोय. कोणाची तरी वाट पाहतोय हे त्याच्या मुद्रेवरून कोणालाही सहज कळलं असतं. पण कोण त्याची विचारपूस करणार ? कसल्या तरी प्रचंड काळजीनं तो कावराबावरा झाला होता. असा कितीतरी वेळ - निदान तास-दीडतास - गेला.

हळूहळू प्लॅटफार्मला जाग आल्यासारखे वाटू लागले. प्रवाशांचा कलकलाट आणि गर्दी दोन्हीही वाढू लागली. त्याच्या नियोजित गाडीची (पुणे-भाग्यनगर (हैद्राबाद)) निघण्याची वेळ जवळ येऊ लागल्याचे घड्याळाचे काटे जाणवून देऊ लागले. त्या तरुणाची अस्वस्थता ही क्षणाक्षणाने वाढू लागली !

तोच त्याचे लक्ष दुरून येणाऱ्या एका व्यक्तीकडे गेले. धोतर-उपरण्याच्या साध्या पोशाखातील त्या व्यक्तीची त्याला क्षणात ओळख पटली; त्याचे डोळे अश्रूनी डबडबले; तो धावतच त्याच्या गुरुजींकडे (पू. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर) गेला; दररोजच्या सवयीने साष्टांग नमस्कारासाठी वाकला. नमस्कार झाला तरी तो उठेना की बोलेना ! गुरुजींसमवेत आलेल्या दुसऱ्या गृहस्थानीं - रघुनाथशास्त्री जोशी यांनी - म्हटले 'जनुभाऊ ! अहो उठा ना ! असे कावरेबावरे का दिसतां ? आमची वाट फार वेळ पहावी लागली का ? आम्ही तर वेळेवर आलो आहोत.' तो तरुण कसाबसा उठला आणि बोलू लागला - 'मी तुम्हां दोघांची वाट पहात नव्हतो; तुम्ही दोघेही वेळेवर येणारच अशी खात्री होती मला ! मी केव्हापासून वाट पाहतोय त्या सद्गृहस्थाची - आपल्या प्रवासात बरोबर न्यावयाच्या पुस्तकांचे गठ्ठे हातगाडीवरून घेऊन येणाऱ्या गाडीवाल्याची !' रघुनाथशास्त्री केवढ्यांदा ओरडले - 'म्हणजे ?' त्या आवाजाने तो तरुण खरोखरच भेदरला आणि आपली कर्मकहाणी सांगू लागला. तुटक तुटक शब्दांत...

'आधीपासून ठरल्याप्रमाणे गुरुजींच्या घरी गेलो; गुरुजींच्या घराजवळचा एक हातगाडीवाला - तो गुरुजींना ओळखत होता- त्याला बोलावून आणलं, पुस्तकांचे गठ्ठे त्याच्या गाडीवर नीट बांधले. त्याच्यासह स्टेशनला जायला निघालो - स्टेशनच्या जवळ आलो - हमालकट्टा दिसू लागला - तिथे तो गाडीवाला म्हणाला - 'मी त्या बाजूने गाडा घेऊन येतो; तुम्ही प्लॅटफॉर्मवर जाऊन थांबा; मी तिथे येतो ! त्याच्या शब्दांवर विसंबून मी इथे केव्हाचा येऊन थांबलो - त्याला शोधण्यासाठी खूप फेऱ्या मारल्या; त्याचा अजूनही पत्ता नाही !'

इतका वेळ शांतपणाने गुरुजी माझं गाऱ्हाणं ऐकत होते - अत्यंत सौम्य आवाजात ते म्हणाले - 'कुलकर्णी ! एवढंच ना ! तो गाडीवाला येईलच; न चुकता ! नेहमीचाच आहे तो - आमच्या परिचयातला !'

गुरुजीच्या तोंडचं वाक्य पूर्ण होतंय न होतंच तो भाग्यनगर गाडी सुटण्याची घंटा झाली - गाडीची शिटी झाली - आमच्यासमोरून गाडी हळूहळू जाऊ लागली ! आणि त्याचवेळी समोरून पुस्तकांच्या गठ्ठ्यांनी सजलेला हातगाडा खडखडत येत होता - गाडा आला - त्या हमालानं तो सोडला आणि गुरुजींच्या पायांवर मस्तक ठेवून बोलू लागला - 'महाराज ! मी चुकलो; तुमच्या या विद्यार्थ्याला पुढे जायला मी सांगितलं आणि नेहमीच्या हमाल-वाटेनं मी निघालो. अचानक गाड्याचं एक चाक मोडलं - गाडा कलंडला - चाक दुरुस्त करून - गाडा इथं आणीपर्यंत एवढा वेळ लागला - आणि तुमची गाडी चुकली ! मला माफ करा !'

हमालाच्या या सगळ्या खुलाशानंतर गुरुजी शांतपणे म्हणाले, 'असू द्या, असू द्या ! गाडी काय नंतरची मिळेल आम्हाला ! सर्व ग्रंथ तुम्ही सांभाळून आणलेत - त्यांची फार गरज होती. तुम्ही या आता.'

गुरुजींच्या या शांतस्वरूप-स्थितप्रज्ञ-दर्शनानं मी अवाक् झालो ! प्राप्त परिस्थितीत पुढे काय करायचे याची जाणीव झाली. लगेच फोन करून आम्ही नंतरच्या गाडीने निघत असल्याचे हैद्राबादच्या मंडळींना कळवले आणि नंतरच्या गाडीमध्ये पुस्तकांचे गठ्ठे ठेवण्याच्या कामाला लागलो.

नंतरची ती गाडी नियोजित वेळी सुटली. आणि आमचा तिघांचा प्रवास सुरू झाला. ती गाडी प्रत्येक स्टेशनवर थांबत थांबत आम्हाला भाग्यनगरला घेऊन जाणार होती ! आधीची एक्स्प्रेस गाडी गमावली, आता पॅसेंजर गाडी आमच्या वाट्याला आली होती.

गाडीत - डब्यामध्ये माझ्यासमोरच बसलेल्या गुरुजींच्याकडे आणि रघुनाथशास्त्री जोशींच्याकडे माझी नजर जात होती. इतके सगळे 'रामायण' घडूनसुद्धा गुरुजींच्या चेहऱ्यावर नित्याची शांति विलसत होती ! प्रवासात काहीही

न खाण्या-पिण्याचा गुरुजींचा नियम; तो ते सहजपणे सांभाळीत होते. माझा मात्र हा सर्वस्वी नवा अनुभव होता ! प्रवासाला निघताना, कळत नकळत का होईना माझ्याकडून प्रमाद घडला होता. त्यामुळे गुरुजींना पॅसेंजर गाडीच्या या दीर्घ कंटाळवाण्या प्रवासाचे कष्ट सोसावे लागत होते. माझी सगळी तहान-भूकच हरवून गेली ! मनाने एका वेगळ्याच विचारविश्वात प्रवेश केला.

'कालपर्यंत मी केवढ्या आनंदात होतो. दोन तीन दिवसांपूर्वी गुरुजींनी स्वत: आपणाबरोबर भाग्यनगरला येण्याचे आमंत्रण मला दिले होते. ते माझे भाग्य असे मी मानले होते. गुरुजींच्या भाग्यनगर-वास्तव्यात मा[illegible] काय उपयोग होईल याचा मी थोडा विचार केला. तडक दै. भारत कार्यालय गाठले. संपादकांना भेटलो. भाग्यनगर-कार्यक्रमाची निमंत्रण-पत्रिका त्यांना दाखवली आणि म्हणालो, 'भारतकरिता वार्तापत्र आणि छायाचित्रे मी पाठवू शकेन. आपली संमति असावी !' त्यांनी आनंदाने मान्यता दिली. मी मोठ्या खुषीने परत आलो. पण प्रवासाच्या प्रारंभीच घडलेल्या प्रसंगाने आनंद तर पुरता हरवला आणि खजील होण्याची पाळी आली !'

मुरुमे, रुक्ष दूषित त्वचेवर
तन्वी हर्बल मेडीसीन
रुपमाधुरी
८५/- + २०/-(पोस्टेज)
होमडिलिव्हरीसाठी मनिऑर्डर करा.
१ बाटली दीड महिना पुरते
केमिस्टकडे उपलब्ध.
तन्वी, घंटाळी ठाणे. ☎ ५३७५२१२

गुरुजींकडे मान वर करून पाहण्याचेही मला अवघड वाटत होते. टि. म. विद्यापीठातील माझे ज्येष्ठ सहाध्यायी रघुनाथशास्त्री जोशी ! आत्मीयतेमुळे, त्यांना माझी ही कुचंबणा जाणवली. दै. भारतच्या संपादकांसमवेत योजलेले माझे बेत त्यांना माहीत होते. प्रवासातला कंटाळवाणेपणा (की माझा कानकोंडेपणा) कमी करण्याच्या हेतून शास्त्रीबुवांनी दै. भारतच्या संपादकांसमवेत माझ्या झालेल्या छोट्या भेटीचे वर्णन अघळ-पघळपणे गुरुजींपुढे केले.

गुरुजींनी आश्चर्याने माझ्याकडे पाहिले आणि ते म्हणाले, 'अरे वा ! कुलकर्णी ! तुम्हाला छायाचित्रण आणि वृत्तलेखन दोन्हीही जमतात हे मला आताच कळले. छान ! आमच्या भाग्यनगरमधील समारंभाची यथोचित प्रसिद्धी करायला तुमची मदत तिथल्या लोकांना खचितच होईल !'

गुरुजींच्या त्या प्रोत्साहन शब्दांनी माझ्या अंगावर मूठभर मांस चढले; समाधानाने मन भारावून गेले आणि माझ्या डोळ्यातून ओघळणाऱ्या अश्रूंनी गुरुजींची पाऊले ओलीचिंब झाली.

गुरुजींचे हे अपूर्व दर्शन माझ्या मनात कायमचे कोरले गेले.

ऋतुपर्ण, अभिनव नगर, संगमनेर (जि. नगर)

*With Best Compliments From :—*

ALL INDIA REPORTER PVT. LTD.

(India's Premier Law Reporters and Publishers)

- STANDARD AND UP-TO-DATE LAW REPORTS COPIOUSLY CITED AND WIDELY CIRCULATED
- ANALYTICAL, CRITICAL & EXHAUSTIVE COMMENTARIES ON CENTRAL ENACTMENTS
- ENCYCLOPEDIC COMPILATIONS ON FEDERAL STATUTES OF CURRENT APPLICABILITY AND
- SYSTEMATICALLY COMPILED DIGESTS OF GREAT UTILITY

*Please Make It A Point To Always Check Up First With* **AIR**
*– A Popular Name With The Bench & The Bar*
*And Above All A Hallmark Of*
*Editorial Excellence In*
*Legal Publications*

*Head Office*
Post Box No. 209,
Congress Nagar,
Nagpur-440 012.
☎ 534321
Fax : (712) 526283
E-Mail : air al allindiareporter.com

*Regd. Office*
Medows House, 1st Floor,
Nagindas Master Road, Fort,
Mumbai-400 023.
☎ 2654204

ALSO NOW AVAILABLE –

**AIR Supreme Court (Full Text & Head Notes)**
**1991 to 1996 & 1986 to 1998 on CD-ROM**
**User Friendly Quick & Fast Searches**
**Easy to Operate**

*For further details please contact :*

AIR INFOTECH
Congress Nagar
NAGPUR - 440 012
☎ 534321 Fax : (712) 526283

We are also available on Website
Visit us at - www. allindiareporter.com

# तस्मै श्री गुरवे नमः ।

**व्यं. के. जोशी**




**मनुष्याच्या जीवनाला वळण लावणाऱ्या घटना** घडत असतात. त्यात परमेश्वरी इच्छेचा भाग महत्त्वाचा असतो. त्याला मी अपवाद नाही. १९५१ साली एस.एस.सी. परीक्षा पास झालो आणि नोकरी शोधण्यासाठी पुण्याला आलो. गुरुवर्य पं. वा. बा. भागवत यांना माझे बंधु कै. माधव गणेश जोशी यांनी पत्र दिले होते. ते त्यांना दिले आणि त्यांनी मला टि. म. विद्यापीठात शिकण्यासाठी ठेविले. त्यावेळी संस्कृतचा अभ्यास करायचा म्हणजे केवळ रूपावलीचे पाठान्तर आणि धड्यांचे भाषांतर इतकीच माहिती होती. इतर कसली माहिती नव्हती. याचवेळी (कै.) प. पू. महाराजांची व माझी पहिली भेट झाली. त्यांच्याकडे 'वेदान्तसारा'च्या पाठाला गेलो. खोलीत प्रवेश केला. महाराजांना साष्टांग नमस्कार केला आणि पहिला पाठ घेतला. महाराज माझ्याकडे वरचेवर पाहात होते. मीही त्यांना निरखीत होतो. शांत, गंभीर आवाज, धारदार नाक, गोरापान रंग, कपाळावर गंध, धोतर आणि अंगावर उपरणे असा त्यांचा पेहराव होता. माझे मन एकदम लीन झाले. त्यांच्याविषयी आदर निर्माण झाला. पण महाराज माझ्याकडे वरचेवर का पहात होते हे मला पुढे ४/६ दिवसांनी माझे मित्र डॉ. रा. ल. जोशी यांच्याकडून समजले. मी महाराजांना त्यांच्या भावासारखा दिसलो. (त्यांचे हे बंधू पुढे मिरजेत वारले.) माझ्यावरील महाराजांच्या लोभाला दुसरे कारण काय असणार ?

*'भावस्थिराणि जननान्तर सौहृदानि'* दुसरे काय ?

माझ्यासंबंधी विद्यापीठात असताना उल्लेखनीय असे काहीच घडले नाही. एका वर्षाने मला घरी राहावे लागले पण या एका वर्षात माझ्या मनात संस्कृत विषयी मोठा आदर निर्माण झाला. तो मला उपकारक ठरला.

बराच काळ लोटला. उदरभरणाच्या कार्यातच मग्न होतो. शिक्षकी पेशा पत्करून दिवस काटीत होतो. नरसोबा वाडीस राजाभाऊंच्या बरोबर जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळी प. पू. गुळवणीमहाराजांचे दर्शन झाले. विद्यार्थ्यांना पाठ देत होते. जाऊन साष्टांग नमस्कार केला. त्यांचे व राजाभाऊंचे काही संभाषण झाले पण माझे सारे चित्त ॐकाराच्या कंठातून होणाऱ्या गंभीर ध्वनीकडे होते. या ध्वनीच्या प्रकटीकरणाचे रहस्य अजूनही मला समजलेले नाही. दत्तमहाराजांचे वडीलही तेव्हा वाडीतच होते. त्यांचे दर्शन झाले. निरोप देताना त्यांनी आम्हाला सुपारी दिली. ती मी जवळजवळ वर्षभर जपून ठेवली होती.

मी अध्यात्माचा कधी विचार केलाच नव्हता. पण जीवनयात्रीची गाडी पुनः वळण घेणार होती. कारण घडले माझे मित्र पं. दुर्गाराम उपाध्ये यांच्या घरी होणाऱ्या भागवत सप्ताहाचे ! सर्व विद्यापीठीय निवासी विद्यार्थ्यांना निमंत्रित करून एक स्नेहसंमेलन घ्यायचे असा विचार ठरला. सर्व गुरुजनांना बोलावावे. त्यांचा सत्कार करावा असा विचार होता. सर्वांना निमंत्रणे प्रत्यक्ष जाऊन दिली पण कोणी येऊ शकले नाही. केवळ गुरुवर्य मा. चि. दीक्षित एक दिवस सहकुटुंब सहपरिवार आले होते. हे संमेलन गोव्यात पं. दुर्गाराम उपाध्ये यांचे केरी (बाग) गावातील घरी झाले आणि सतीर्थ्यांच्या संमेलनास सुरुवात झाली.

एक वर्ष मधे सोडून तिसरे संमेलन मी आमचे घरी घेण्याचे ठरवले. सर्व गुरुजनांनी आपल्या घरी पायधूळ टाकावी असे मनापासून वाटत होते. सर्वांकडे जाऊन प्रत्यक्ष आमंत्रणे द्यायची असे ठरवून पुण्यास आलो. सर्वांनी काही ना काही कारणे सांगितली. कोणीच येणार नव्हते. शेवटी कवीश्वर महाराजांना आमंत्रण देण्यास घरी गेलो. एकटे महाराज आले तरी मला समाधान होते. पण तेही नशिबी नव्हते. त्यांनीही नकार दिला. मी आग्रह करीत होतो. 'निदान एक दिवस तरी या' असे म्हणालो आणि मनात विचार केला महाराजांनी 'जा' म्हटल्याखेरीज आपण आग्रह चालू ठेवायचा, इथून हालायचे नाही.'

१-२ मिनिटे तशीच गेली. महाराजांनी घरात सांगितले यांना सरबत वगैरे काही द्या. थोडी आशा मनी जागली. सरबत आले. प्यालो आणि पेला बाजूला ठेवला. इतक्यात महाराज म्हणाले, 'निपाणीकर तुम्ही आता जा. आम्हाला येणे जमणार नाही.' मनात ज्या शब्दांची मी कल्पना केली होती तेच शब्द ऐकले. मनात असलेल्या विचारांचे वेध त्यांना कसे घेता येत होते कोणास ठाऊक ! असे माझे ३/४ तरी छोटेछोटे अनुभव आहेत.

एस.एस.सी.च्या मॉडरेटरच्या कामानिमित्त पुण्यास आलो होतो. रविवार होता. ऑफिस नव्हते. महाराजांचे दर्शन घेऊन येऊ असा विचार केला. वासुदेव-निवासात गेलो. महाराज काही लिहीत होते. जाऊन नमस्कार केला. उभा राहिलो. 'बसा.' मी बसलो. क्षेमकुशल, येण्याचे प्रयोजन, थोडे बोलणे झाले. बोलत असताना मनात आले. आज इथला प्रसाद आपल्याला मिळावा. बोलणे थांबवून मी उठू लागलो. तेवढ्यात महाराज म्हणाले, 'आज रविवार आहे.

घाई नाही ना ? प्रसाद घेऊनच जा.' मनात आलेला प्रसाद शब्दच त्यांच्या तोंडून बाहेर पडला. 'भोजन' नाही. मला आश्चर्य वाटले. प्रसाद घेतला. थोडी विश्रांती घेतली आणि बाहेर पडलो.

या वेळेपर्यंत मला पू. गुळवणीमहाराजांविषयी व शक्तिपात-दीक्षेविषयी अल्पशी माहिती झाली होती. मनात विचार आला आपणही महाराजांची दीक्षा घ्यावी. निदान गुरुपदेश घ्यावा. बरेच दिवस आम्हा पतिपत्नींच्या मनात हा विचार घोळत होता.

आम्ही प. पू. महाराजांसह नारेश्वरला गेलो होतो. सकाळी लवकर नर्मदास्नान करुन आह्निक आटपून स्नानाहून येण्याच्या रस्त्यावर थांबून प. पू. महाराज आले की नमस्कार करुन वाचनाचे ठिकाणी जाऊन बसत असू. हा माझा क्रम सप्ताह संपेपर्यंत चालला.

सौ.ला दुसरीच एक सेवा लाभली. पहिल्यापासूनच नऊवारी पातळ नेसण्याची आमच्या घरी पद्धत होती. तसे ती नऊवारी पातळ नेसते. प. पू. महाराजांना सोवळ्यात स्वयंपाक करून वाढण्याचे काम तिच्यावर सोपवण्यात आले. दाक्षिणात्य पद्धतीचा स्वयंपाक महाराजांना आवडे. तिने तो नऊ दिवस करून प. पू. महाराजांना वाढले. आजही ही आठवण झाली म्हणजे तिला कृतकृत्य वाटते.

नारेश्वराहून येताना खूप उन्हाळा होता. पुणे जवळ आले. पुण्यातील मंडळी आपापल्या घरी गेली आम्ही ठरविले आपण वासुदेव निवासात जायचे. सहज मनात विचार आला आपण संपन्न असतो तर एखादी आंब्याची पेटी बरोबर घेतली असती... निवासात गेलो. स्नानादि आह्निक उरकले. जेवायला बसलो आणि आश्चर्याचा धक्का बसला.आमच्या पानात आमरस घातला. मनाच्या आंदोलनांना इतक्या अचूकपणे हेरणे हे काय सामान्य माणसाचे काम आहे? आमरस हवा ना? घ्या. अनेक भक्त ऐश्वर्यसंपन्न आहेतच. परमेश्वरी इच्छेप्रमाणे सर्व घडेल. पुन: विचार आला प. पू. महाराजांकडून उपदेश घ्यावा.

घरी आलो. काही महिने गेले. एक दिवस पूजा करीत असताना आरती सुरू केली. वेंकटेशाची आणि देवीची आरती म्हणून झाली. केदाराची आरती म्हणत असतानाच आमच्या देव्हाऱ्यात असलेल्या पितळेच्या शाळुंकेवर पू. महाराज दिसत हाते. निळा मुकटा कपाळावर नेहमीप्रमाणे गंध आणि आशीर्वादाचा हात ! आजही मला ती मूर्ति तशीच दिसते.

सौ. म्हणाली, 'अहो, केदाराची आरती अर्धीच झाली आणि दत्ताची आरती दोन/दोनदा कशाला म्हणताय.' मी सावध झालो. आरती पूर्ण केली. पूजा संपवली. पुढे मी ही हकीकत माझे परममित्र डॉ. रा. ल. जोशी यांना सांगितली. ते म्हणाले, 'ही गोष्ट विशेष आहे. तू प. पू. महाराजांनाच पत्र पाठव. ते तुला निश्चित मन्त्रोपदेश करतील. हा दृष्टान्त आहे.'

प. पू. महाराजांना पत्र पाठविल्यानंतर आठवड्यात प. पू. महाराजांचे उत्तर आले. पहाटेच्या वेळी १ तासभर परमेश्वर चिंतन करून २ माळा जप करण्यास त्यांनी पत्रात लिहिले होते. त्याप्रमाणे आम्ही दररोज जप करीत आहोत. जन्माच्या सार्थकासाठी हा उपदेश घेतला आहे. त्या जगन्नियंत्यालाच ठाऊक मी कोठे आहे.

मागच्या वर्षीची गोष्ट. प. पू. महाराजांनी राजाभाऊंचेवर एक जबाबदारी टाकली. श्रीक्षेत्र अमरेश्वरात दरवर्षी नारायणस्वामींच्या उत्सवास लागून एक भागवत सप्ताह करावा. ब्र. भू. प.प. नारायणस्वामींविषयी एखादे व्याख्यान असावे. राजाभाऊंनी सप्ताहाची जबाबदारी स्वीकारली आणि म्हणाले, 'यावर्षी निपाणीकरला प. प. नारायणस्वामींचे चरित्र सांगण्यास सांगेन.' महाराज म्हणाले, 'छान ! बोलू देत.' आणि मी सप्ताहामध्ये दररोज १५ मिनिटे स्वामींविषयी बोललो. केवळ महाराजांच्या आशीर्वादानेच हे शक्य झाले. 'मूकं करोति वाचालं, पङ्गुंलङ्घयते गिरीम् ।' हे सामर्थ्य प. पू. कै. श्रीदत्तमहाराजांच्यात नक्कीच होते. त्यांना माझे लक्ष लक्ष प्रणाम.

१८६४, जोशी गल्ली, निपाणी (कर्नाटक) ५९१२३७

साक्षात्कारी साधुपुरुष पं. दत्तमहाराजांना विनम्र अभिवादन

**श्री. सुभाष गंगाधर बापट**
**आणि**
**बापट परिवारातर्फे**
**हार्दिक शुभेच्छा**

धर्मभास्कर मासिकाला नवे नवे वर्गणीदार मिळोत ही सदिच्छा

**बापट स्वागत-सभागृह**

धंतोली पार्क, अभ्यंकर रोड, नागपूर १२.

# त्या मूळ पुरुषाची वोळखण

सौ. वसुधा जोगळेकर



ते कुणाचे आजोबा होते, कुणाचे दादा होते, कुणाचे गुरुजी तर कुणाचे शास्त्रीजी ! पण भावभक्तीच्या गंगेतील लहरीलहरींवर उमटणारे, विश्वाच्या अणुरेणुत वसणारे आणि भक्तांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ते सर्वांचे 'श्रीदत्तमहाराज' होते. लेकरू आईचा पदर धरून जसे सारखे तिच्या मागे असते तसेच आम्ही सगळेजण श्रीमहाराजांच्या पाठीमागे होतो. त्या पदराला माऊलीच्या वात्सल्याचा प्रेमाचा मऊ स्पर्श होता. त्यांच्या दृष्टीतून झरणारा मायेचा झरा... कितीतरी वेळा आम्ही त्याच्यात चिंब भिजलो होतो. आशीर्वादाचे शब्द अगदी स्पष्टपणे कानावर पडायचे तेव्हा तर सरस्वतीच्या अशरीरी वाणीचे दर्शन व्हायचे. दिलेल्या सुंठवड्याचा बारीकसा तुकडा त्यांनी मुखात टाकला की मला संत नामदेवांचा आनंद कळायचा. दिलेल्या कुठल्याही भेटवस्तूचा स्वीकार अत्यंत निर्लेप तरी प्रेमभरल्या मनाने ते करायचे तेव्हा तर मला आकाश ठेंगणं वाटायला लागायचं !

शब्दात सांगणं कठीण अशा त्या प्रेमस्वरूपाने आमच्यासारख्यांना जवळ करावं, उपासनेला लावावं, सख्यभक्तीच्या जवळ आणावं... ही सगळी त्यांचीच प्रेरणा... कधी आम्ही आपला छोटा लेख त्यांना दाखववावा. ते आवर्जून वाचत आणि म्हणत, 'तुमचाही दासबोधाचा अभ्यास आहे.' आम्ही फुशारून जात असू. पण श्रीमहाराजांची आपला मोठेपणा झाकण्याची प्रवृत्ती पाहिली की आमच्या वृत्तीचा उथळपणा लक्षात यायचा. तनमनाची शुद्धी नसतानाही आम्ही केलेली जवळीक त्यांनी सहन करावी... प्रत्यक्ष परमेश्वरच ते ! रामानं नाही का शबरीची बोरं चाखली... कृष्णानं किती घरचं दहीदूध खावं... अंत:करणात विश्वकरूणेचा उदय झाला असल्याने त्यांच्याजवळ कुठे आप-पर भाव होता ? ओंजळीत घेतलेली सुवासिक फुलं का कधी डावा-उजवा भेद करतात ? वाहतं पाणी क्षुधार्ताची तहान शमविताना का चांगला-वाईट विचार करतं ? तसेच तर महाराज होते. प्रत्येकालाच त्यांनी पूर्ण समाधान दिले.

मला आठवतं वाडीला श्रीमहाराजांच्या बरोबर प्रवास घडला. एकाच रेल्वेगाडीतून एकाच डब्यातून ! त्यादिवशी वाडीचा सूर्य उगवला तोच मुळी महाराजांच्या आनंदात. माध्यान्हीच्या सूर्याची प्रखरता श्रीमहाराजांच्या सहवासाने जाणवतच नव्हती आणि संध्याकाळच्या उत्सवाने तर आनंदाच्या सीमा भेदून टाकल्या होत्या. एकीकडे दत्तप्रभूंची स्वारी सजत होती तर दुसरीकडे स्वत: दत्तप्रभू पुराण सांगत होते. (वाडीला दत्तप्रभूंना पुराण सांगण्याची प्रथा आहे. ही परंपरा कवीश्वर घराण्याकडे आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराज तिथे असले की स्वारींची स्वत: पुराणसेवा करीत.) सगळीकडे अखंड तेज प्रकाशिलं होतं. त्याच दिवशी संध्याकाळी आम्ही पुण्यास परतणार होतो. पण वाडीतून पाय निघत नव्हता. तसे श्रीमहाराजांना सांगितलं तर म्हणाले, 'समर्थांनीही कल्याणस्वामींना लांब ठेवले होते !' अजूनही ते ओट्यावर बसलेले महाराज आठवतात.

श्रीमहाराजांकडील नवरात्रीच्या उत्सवाला तर आणखीनच तेज चढलेले असायचे. सौ. आईसाहेब तर दक्षतेने नऊ दिवस हा कुलपरंपरेचा उत्सव पार पाडीत असत. पायावर डोकं ठेवलं की अगदी प्रेमाने मस्तकावर हात ठेवायच्या. त्या हातातून, त्यांच्या नजरेतून, खूप बोलायच्या. कधी अचानक 'जेऊन जा' म्हणून सांगायच्या. एखादे पद म्हणून दाखवले की हाताने 'सुंदर' अशी मुद्रा करीत दाद द्यायच्या. (पू. सौ. आईसाहेबांच्या निर्वाणाआधी अलीकडील दोन वर्षे त्या बऱ्याच आजारी होत्या.) 'लो लो लागला अंबेचा. भेदाभेद कैचा, आला कंटाळा विषयाचा - धंदा मूळ मायेचा.' हे भजन स्वत: महाराज अतिशय तन्मयतेनं म्हणत असत. जणू परमात्मा आपल्याच शक्तीचा गौरव करायचा. घरातील वातावरण अगत्यानं, सौजन्यानं झळाळलेलं असायचे. त्या नऊ दिवसांत आदिशक्ती रेणुका जणु माहेरपणाला आलेली असायची. नवरात्रीची ही सेवा पू. सौ. आईसाहेबांकडून, देवी रेणुकेने अहेवपणी जाण्याचे भाग्य प्राप्त करून देऊन, पूर्ण करवून घेतली. यानंतर श्रीमहाराजांनीही महिन्या दीड महिन्यात देह ठेवला. गृहस्थाश्रमाची पूर्णता झाली.

**'संसारत्याग न करिता । प्रपंचउपाधी न सांडिता ।।'**

संत एकनाथांसारखाच प्रपंच-परमार्थ, विवेक-वैराग्याने परिपूर्ण संसार श्रीदत्तमहाराजांचाही होता. 'संसारत्याग न करिता । प्रपंचउपाधी न सांडिता । जनामध्ये सार्थकता । विचारेचि शेये ।।' हे प्रापंचिकांना त्यांचे सांगणे असे. अभ्यासाने अलिप्त राहूनही प्रपंच करता येतो, त्यासाठी 'अतिथीवृत्तीने' राहावे, हे वारंवार सांगत. कुठल्याही गोष्टीचा जास्त आग्रह धरू नये. वृत्ती अनाग्रही असावी. नामस्मरण आणि ईश्वराची शरणपूर्वक प्रार्थना करावी, यासारख्या संवादातून ते आमच्यापर्यंत सहजपणे पोहोचत !

वास्तविक पाहता त्यांनी विवेक वैराग्याच्या बळावर नित्य-अनित्याचा विचार करून या सगुणापलीकडील चिन्मात्रस्वरूप त्यांनी केव्हाच जाणून घेतले होते. तेच स्वरूप

श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आमच्यासाठी साकार झाले होते. आत्मारामाचा त्यांचा संग नित्य जागता असला तरी ते आमच्यापर्यंत पोहचत होते. आम्हाला समाधान मिळेल असा संवाद करीत होते. मोठ्यांच्या मनाला न दुखविता आपला परमार्थ आणि प्रपंच करावा हे त्यांचे अगत्याचे सांगणे होते. मोठ्यांच्या मनाला न दुखविता आपला परमार्थ आणि प्रपंच करावा हे त्यांचे अगत्याचे सांगणे होते. स्वत: श्रीमहाराज आपली ब्रह्मीभूत अवस्था सांभाळत प्रपंच करीत होते. अत्यंत निर्लेपपणे पूर्ण प्रेमाने प्रत्येक साधकाला मार्गदर्शन करीत असत. 'जपाची माळ गाठवून घ्या' हे सांगण्यापासून ते 'मला आता ज्ञान नको. भक्ति हवी आहे. मौनाने सर्व काही प्राप्त होते.' हे सांगण्यापर्यंतचे श्रीदत्तमहाराज म्हणजे 'विश्वाधार' होते.

**'॥ दिसतो तरी देहधारी । परी काहीच नाही अंतरी ॥'**

मला आठवतो तो त्यांच्या नातीच्या (सौ. रेणुका) लग्नाचा प्रसंग ! लग्नाला आशीर्वाद देऊन श्रीमहाराज घरी आले. पाठोपाठ आम्हीही दर्शनासाठी घरी गेलो तेव्हा अत्यंत अलिप्ततेने ते पुस्तक वाचत शांतपणे बसले होते. कुठल्याही प्रसंगाला त्या वेळेपुरते अत्यंत वत्सलतेने सामोरे जाऊन नंतरच्या क्षणी पूर्णपणे अलिप्त होणे ही किमया नव्हती. तर तो ईशशक्तीचा अविष्कार होता.

समत्व हे तर त्यांच्या हृदयातच वसती करून होतं. सज्जन-दुर्जन, चांगले-वाईट, हा भेद त्यांच्याजवळ नव्हताच. त्यामुळे आमच्या दोषांना ते गुणस्वरूप करून टाकत, म्हणजे चुकलो तरी प्रेमाने सांभाळून घेत असत आणि गुणांचे कौतुक करीत. कर्तृत्वभाव ते स्वत:कडे कधीही घेत नसत. त्यांना एखादे पद म्हणून दाखवावे किंवा काही लिहिलेले वाचून दाखवावे की लगेच सांगत, 'बुद्धीला प्रेरणा देणारा ईश्वर असतो. त्याच्या कृपेने सर्व काही घडते.' त्यामुळे श्रीदत्त महाराजांच्याकडे गेलो की, 'सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधिल आपणासी' या समर्थोक्तीची आठवण व्हायची.

वृत्तीने अतिशय प्रेमळ, आपल्या गुरुत्वाचे कोणावरही दडपण न आणणारे, त्यांच्या घरात गेल्यावर आपल्याच कुटुंबातील एक व्यक्ती या नात्याने जवळ करणारे श्रीदत्तमहाराज 'त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधु च सखा त्वमेव ।' याचा अनुभव आणून देत असत (व अजुनही हा अनुभव त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकाकडून येतो !) तरीही स्वत:चा अलिप्तपणा शेवटपर्यंत होता. श्रीसमर्थ म्हणतात, 'कळाया शोधावे अंतर । तव तो नित्य निरंतर । जयास धुंडिता विकार । निर्विकार होती ' ही सद्गुरुंची अवस्था श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात आम्ही अनुभवली आहे.

**'तो ब्रह्मबोधे ब्रह्मचि झाला'**

'सदा स्वरूपानुसंधान' हे श्रीदत्तमहाराजांचे वैशिष्ट्य होते. खऱ्या साधूचे लक्षण होते. 'अंतरास्थितीची अचलता' म्हणजे त्यांचे संपर्ण जीवनच होते. त्यांच्यावरही दु:खद, कठीण प्रसंग परिस्थितीनुसार आले पण 'दृश्य सांडून नाशिवंत । स्वरूप सेविले शाश्वत' अशी अवस्था असल्याने प्रत्येक प्रसंगातून वृत्तीच्या अलौकिकत्वाने त्यातून बाहेर पडले.

देहाची चिंता तर त्यांनी केव्हाच सोडली होती. भावार्थ रामायणात असे म्हटले आहे की, परमेश्वराशी भेटी झाली की देहाचे प्रारब्ध गळून पडते. देहसंग त्याला बाधत नही श्रीमहाराजांची ही अवस्था उभ्या आयुष्यभर होती. कडकडीत उन्हातही कायम अनवाणी पावलाने चालायचे, धोतर आणि उपरणे याखेरीज अन्य पोषाख त्यांनी कधी स्वीकारलाच नाही. एका शालीखेरीज अन्य शाल त्यांनी कधीच पांघरली नाही हे शारिरीक अमानित्व तर त्याचे ठिकाणी होतेच. पण शेवटी तर 'नारायणाच्या' नामाने त्यांचा देह नाममय झाला होता. कासवाने आपली सर्व इंद्रिये आवरून घ्यावीत त्याप्रमाणे श्रीदत्तमहाराजांची अवस्था अखंड ब्रह्मायमान झालेली होती. समर्थांनी वर्णन केल्याप्रमाणे प्रत्येक संताची अवस्था अशीच असते...

'तो ब्रह्मबोधे ब्रह्मचि झाला । संसारखेद तो उडाला ।
देह प्रारब्धी टाकीला । सावकाश ॥
आता होणार ते होयेनाका । जाणार ते जायेना का ।
तुटली मनातील आशंका । जन्ममृत्याची ॥

वास्तविक पाहता सद्गुरु हे तत्त्व आहे. त्या तत्त्वाला क्षमता, गुणधर्म असले तरी शरीर नाही. ते स्वयंभू आहे. आता मात्र हे नक्कीच की डोळे, नाक, कान हे शारीर अवयव नसतानाही तो पाहणारा, ऐकणारा आहे. हेच त्याचे देखणेपण आहे. ते सबाह्य कोंदलेले आहे. हे ईश्वरत्व जाणवण्यासाठी आम्हाला पारमार्थिक बळ प्रदान करो हीच श्रीदत्तमहाराजांचे चरणी प्रार्थना आणि अनन्यभावे सादर प्रणिपात !

सी-२७, लोकमान्यनगर, माहीम, मुंबई १६

*With Best Compliments*

**Mangal & Co.**

*Dealers in :*
Prestige, Butterfly,
MajesticCookers & Mixies,
Stainless Steel Utensils and
Presentation Articles

*Authorised Service Centre For :*
PRESTIGE
PRESSURE
COOKERS

4-2-204, Sultan Bazar,
Hyderabad - 500 095.
Telephone 475 2596
Resi : 756 4950

# गुरु परमात्मा परेशु...

डॉ. सौ. माधुरी पणशीकर



ज्ञानेश्वरीच्या १६ व्या अध्यायात 'शुचित्व' ह्या गुणाचे वर्णन करताना ज्ञानदेव लिहितात,

का फेडित पापताप । पोखीत तीरींचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ॥ १९९ ॥
का जगाचे आंध्य फेडितु । श्रियेंची राऊळे उघडितु ।
निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ॥ २१० ॥
तैसी बांधिली सोडित । बुडाली काढीत ।
साकडी फेडित । आर्तांचिया ॥ २०१ ॥
किंबहुना दिवसराती । पुढिलांचे सुख उन्नती ।
आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥ २०२ ॥
वाचूनि आपुलिया काजालागी । प्राणीजातांचा अहितभागी ।
संकल्पाचीही आडवंगी । न करणें जे ॥ २०३ ॥

गंगानदी वहाता वहाता सहजपणे तीरावरच्या झाडांचे पोषण करते सूर्य पूर्वेकडून पश्चिमेला जाता जाता जगाच्या अंधाराचा नाश करतो, त्याप्रमाणे श्रेष्ठ पुरुष आपल्या करुणामय दृष्टीने जगाची दु:खं सहजपणे नाहीशी करतात. ज्ञानेश्वरीत ठायीठायी नैतिकतेच्या भक्कम पायावर उभ्या असलेल्या आदर्श पुरुषांची चित्रणे ज्ञानदेवांनी रेखाटली आहेत. ती वाचत असताना माझ्या नजरेसमोर नेहमी माझे श्रीगुरु प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांची मूर्ति उभी राहाते. असीम शांतता आणि समाधान त्यांच्या डोळ्यांतून सदैव पाझरत असे. त्यांचे प्रभावलय इतके शक्तिमान होते की, त्यांच्या सहवासात क्षुद्र मनोविकारांचा मागमूसही राहात नसे. केवळ शुभंकर, कल्याणकारी स्पंदनांचा अनुभव येत असे व त्याच स्थितीत राहाण्याची उत्कट ओढही जीवाला वेढत असे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा षड्दर्शनांचा अभ्यास होता. वेदान्तावर त्यांची नितांत श्रद्धा होती. डोळस शास्त्राभ्यासामुळे शास्त्राज्ञेचे उल्लंघन त्यांनी कधी केले नाही. 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं' शास्त्रवचनानुसार वर्तणूक असण्यावर त्यांचा सदैव भर असे. शास्त्रसंमत पद्धतीने एखादी गोष्ट केल्यास त्याचे योग्य ते फळ मिळते पण अशास्त्रीय वागल्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात, म्हणून शास्त्रप्रामाण्यावर आधारित अशीच त्यांची जीवनशैली होती.

प. पू. महाराज कधीही कोणालाही दुखवत नसत. त्यांची वाणी अत्यंत मधुर आणि संयमित होती. तरीही अभ्यासविषय ते फार स्पष्टपणे मांडत असत. एकदा पुण्याच्या 'वासुदेव निवास' आश्रमात 'विवेकचूडामणी'चे वाचन चाललेले असताना 'श्रवणभक्ती' असा विषय निघाला. कोणीतरी प्रश्न केला की आम्ही आपले हे सर्व निरुपण ऐकतो, ही 'श्रवणभक्ती नाही का ?' यावर त्यांनी स्वच्छपणे सांगितले की, 'रोजच्या व्यवहारात आपण कंटाळलेले असतो. संध्याकाळी तास दोन तास विरंगुळा म्हणून हे जे ऐकतो, त्याला श्रवणभक्ती म्हणत नाहीत.' प. पू. महाराजांसारख्या संतांना ह्या असीम विश्वात कोंदाटून राहिलेल्या चैतन्याची अनुभूती सतत येत असते. त्यामुळेच किडामुंगीलाही ते दुखवत नसतात. 'दीपांचिया कोडी जैसे । एकचि तेज सरिसे । तैसा जो असतचि असे । सर्वत्र ईश ॥' असा त्यांच्या बुद्धीचा निश्चय असतो आणि त्या निश्चयाचा आविष्कार त्यांच्या कृतीत सहजपणे घडतो. ह्या संदर्भात एक छोटीशी पण महत्त्वाची घटना प. पू. महाराजाचा नातू, चि. आमोद ह्याने सांगितली, ती अशी की, एकदा महाराज आश्रमात जायला निघाले. झपाझप अंगणातून बाहेरच्या द्वारापाशी आले आणि एकदम शांतपणे उभे राहिले. दोन-पाच क्षण स्तब्धतेत गेले. आजोबा असे का उभे राहिले ते आमोदला कळेना पण सहजच त्याचे लक्ष त्यांच्या पावलांकडे गेले. त्याने बघितले एक छोटीशी मुंगी महाराजांच्या पावलावरून चालत होती. ती पूर्ण पाऊल उल्लंघून पलीकडे जाईपर्यंत महाराजांनी पाऊल हलवले नाही.

अध्यात्ममार्गाची वाटचाल सोपी नाही. कारण ह्या मार्गात मन स्थिर होण्यावर फार भर असतो. अर्जुनानेही श्रीकृष्णापुढे 'चंचलं हि मन: कृष्ण' म्हणून आपली अगतिकता प्रगट केली. मनात अनेक विचार-विकार सतत उसळतात, त्याला शांत करण्यासाठी काय करावे असे मी परत परत महाराजांना विचारत असे. 'नामाने मन शांत व एकाग्र होतं. सतत अनुसंधान ठेवावं' असे ते म्हणत. एकदा त्यांनी सांगितले की, 'तांब्याचा तांब्या आपण घासून स्वच्छ केला तरी दुसऱ्या दिवशी परत त्याच्यावर डाग पडतात मग तो परत घासावा लागतो. तसंच मनाचं आहे. त्याला परत परत चांगल्या विचारांकडे वळवावं लागतं.' त्यासाठी सद्ग्रंथांचं वाचन करावं. श्रेष्ठ पुरुषांची चरित्रं वाचावी. नाम घ्यावं. नाम नुसतं घ्यायचं नाही, प्रत्येक नामाबरोबर त्यांच्या चरित्रातली कथा असते ती आठवावी. म्हणजे अहंकार वगैरे नाहीसा व्हायला मदत होते. पण इतके करूनही मन अनावर होतेच. सतत धावणे हा मुळी त्याचा स्वभावच आहे. क्षणभराची स्थिरता, विसावा त्याला नसतो. तेव्हा अशा मनाला कोण लगाम लावू शकेल ? ह्या संदर्भात बोलताना त्यांनी नाथमहाराजांच्या भागवतातील ओवी सांगितली, 'जेवी हिरेनी हिरा ;चिरीजे । तेवी मनेंची मन धरिजे । हे ही तेची गे लाहिजे । जे सानुकूल सर्वथा सद्गुरु होये ॥' हिरा कापायला फार कठीण असतो म्हणून हिऱ्यानेच हिरा कापावा लागतो. त्याप्रमाणेच मनानेच मन धरावे लागते आणि ते

धरलेही जाते. पण केव्हा ? तर सद्गुरुकृपा असेल तेव्हा. गुरुकृपा, गुरुसेवा, गुरुंच्या संदर्भात नम्र भाव ह्याविषयी बोलताना महाराजांचा स्वर खूप ओला होत असे. दीक्षितस्वामीमहाराज, योगिराज गुळवणीमहाराज ह्यांसारख्या ज्ञानी सद्गुरुंचा सहवास त्यांना घडला. दीक्षितस्वामी महाराज तर वाडीलाच दत्तमहाराजांच्या कोवळ्या मनावर संस्कार करून गेले. असे म्हणतात की, झाड खूप छोटे असताना त्याच्यावर काही लिहिले तर ती अक्षरे आपला चिरंतन ठसा उमटवतात. प. पू. दत्तमहाराजांना बालवयातच दीक्षितस्वामी महाराजांसारख्या तेजस्वी पुरुषाने मार्गस्थ केले. वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी दत्तमहाराजांनी आपल्या गुरुंच्या आज्ञेने भागवत सांगितले आणि त्या भागवतपुराणाने महाराजांच्या आयुष्याची भक्कम पायाभरणी केली. त्यांनी अनेक भागवत सप्ताह केले. महाराजांनी भागवत नुसते सांगितले नाही तर महाराज भागवत जगले. भागवतातला भक्तिविचार त्यांच्या रक्ताच्या कणाकणातून वाहात होता. त्यातल्या कृष्णप्रेमाने त्यांच्या श्वासोच्छ्वासाची लय धरली होती. भगवंतावर निरतिशय प्रेम करणाऱ्या भगवत् भक्तांची मूर्ति त्यांच्या डोळ्यात साठवली होती. भागवत हा त्यांच्या अत्यंत आवडीचा, प्रेमाचा विषय होताच, त्यातही 'गोपीगीत' ज्यात गोपींनी स्वत:च्या अस्तित्वाचा लय कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वात केलेला दिसतो, त्यांच्या विशेष प्रीतीचे होते. भक्तांमध्ये सर्वश्रेष्ठ भक्त प्रल्हादजी होते असे ते नेहमी म्हणत, कारण प्रल्हादजी अकामभक्त होते. कोणतीच कामना, इच्छा त्यांच्या मनात नव्हती. ते केवळ ईश्वरभक्तीत रंगून गेले होते आणि 'अशा सर्वस्वी शरण आलेल्या भक्ताच्या हाकेला भगवंत धावून जातो' असे ते नेहमी सांगत. इथेच द्रौपदीवस्त्रहरण प्रसंगातल्या भक्तिभावाविषयीही त्यांचे प्रतिपादन आठवते. ते म्हणत की, द्रौपदीने कृष्णाचा धावा केला. दु:शासनाने तिच्या वस्त्राला हात लावला तेव्हा आपल्या हाताने आपली वस्त्रे सावरीत ती कृष्णाला विनवीत होती. आपल्या मदतीला यावे म्हणून प्रार्थना करत होती. शेवटी आपल्या दातात धरलेला पदरही जेव्हा तिने सोडून दिला आणि आता तुझ्याशिवाय मला कोणी नाही म्हणून टाहो फोडला तेव्हा कृष्ण तिच्या मदतीला धावला. म्हणजे 'अनन्यशरणता' ईश्वराच्या संदर्भात महत्त्वाची असते. एकदा गीतेतला 'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज' ह्या श्लोकाविषयी बोलताना, 'धर्म' हा शब्द कोणत्या अर्थाने खेळवला आहे' असे विचारले. तेव्हा त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण करून त्यांनी 'मामेकं शरणं व्रज' ह्या शब्दांकडे लक्ष वळवले. 'सर्वार्थाने शरण गेल्याशिवाय काही ईश्वरप्राप्त होणार नाही' ह्या विषयाकडे विवेचनाचा ओघ नेऊन, ते 'शरण' ह्या शब्दाचा अर्थ खुलवत राहिले.




गीतेमध्ये दैवीसंपत्तीचे वर्णन करताना 'अमानित्व' हा मोठाच गुण सांगितला आहे. प. पू. महाराजांचे ठायी पराकोटीचे 'अमानित्व' होते. शक्तिपात विद्येतले अधिकारी पुरुष असूनही स्वत:विषयी ते कधीच आणि काहीच बोलत नसत. उलट दुसऱ्याच्या गुणांचे कौतुक करण्यात ते नेहमी रमून जात. वेदान्त विद्या उत्तम जाणलेली असताना, कोणी एखाद्या सद्ग्रंथाचे वाचन करतोय असे ध्यानात आले की, 'चांगलंय, तुमचं वाचन चालू आहे. ईश्वराची कृपा आहे तुमच्यावर.' असे म्हणून त्या व्यक्तीला प्रोत्साहन देत असत. आश्रमात आलेल्या विद्वानांचा आदरसत्कार फार मन:पूर्वकतेने ते करत. घरी आलेल्या विद्वज्जनांना पोहोचवयाला बाहेरच्या दारापर्यंत जात असत. विशेषत: आजच्या काळात पुष्कळवेळा इतरांविषयी तुच्छताभाव दाखवला जातो पण प. पू. महाराज कोणाच्याच विषयी अनादर दर्शवत नसत. किंबहुना समोरच्या माणसाचे दोष ते गुणस्वरूप करून बघत असत. ज्ञानदेवांनी हे 'अपैशुन्या'चे लक्षण सांगितले आहे. ते म्हणतात, 'अज्ञानप्रमादादिकी । कां प्राक्तनींही सदोषी । निंद्यत्वाच्या सर्वविषीं । खिळिले जे ॥ १४५:१६ तया आंगीक आपुले । देऊनिया भले । विसरविजती सले । सलती तिये ॥ १४६:१६ ॥'

म्हणजे अज्ञान प्रमादादि किंवा प्रारब्धजन्य निंद्य अशा दोषांनी जे पछाडलेले असतात, त्यांना आपल्या अंगाचे उत्तम गुण देऊन, त्यांच्या दोषांचा जे विसर पाडतात, त्यांच्या अंगी अपैशून्य हा गुण आहे. पुढे ज्ञानदेव ह्या गुणाचा विलक्षण गौरव करताना म्हणतात,

'अगा अपैशून्याचे लक्षण । अर्जुना हे फुडे-जाण ।
मोक्षमार्गीचे सुखासन । मुख्य हे गा ॥ १५३:१६

म्हणजे अपैशून्य हा गुण म्हणजे मोक्षमार्गाची पालखीच आहे. हे सर्व इतके दीर्घ लिहिण्याचा उद्देश असा की,

अध्यात्मिक क्षेत्रात श्रेष्ठ गुण जे सांगितलेले आहेत ते खरोखरीच आचरणात आणणे कोणाला शक्य आहे का असा प्रश्न आज अनेकजण विचारतात. कारण हे गुण आत्मसात केलेल्या व्यक्ती दुर्मिळ झाल्या आहेत. प. पू. दत्तमहाराजांच्या ठायी ह्या सर्व गुणांचा उत्कर्ष झालेला होता.

सर्व विश्वाविषयी करुणा बाळगणारे महाराज भौतिकाच्या संदर्भात अनासक्त होते. आपल्या घरादाराविषयी 'अतिथी'प्रमाणे भाव असावेत, असे ते नेहमी म्हणत, 'पांथस्थ घरासी आला । सकाळी निघोनी गेला' ह्या उक्तीप्रमाणे, ह्या देहाच्या घरात काही काळ राहाणाऱ्या 'मी'ने एकूण जीवनव्यापाराविषयी तटस्थ असणेच योग्य ठरेल. हा तटस्थपणा त्यांच्या कृती-उक्तीतून आविष्कृत होत असे. एकदा ते म्हणाले की, आपण म्हणतो 'माझा मुलगा, माझी मुलगी' पण तसं काही नसतं. प्रत्येकजण आपापल्या कर्मांनी इथे आलेला असतो. पण अशा प्रकारची तटस्थता म्हणजे कोरडेपणा नाही. एकीकडे जीवनव्यवहाराविषयी अलिप्तता आणि दुसरीकडे सर्व प्राणीजातांविषयी आत्मीयता, आस्था मनात असण्याची अवघड किमया त्यांना साधलेली होती. त्यामुळेच दुःखार्त जीवाला ते मार्गदर्शन करीत. विविध प्रकारच्या समस्या त्यांच्याकडे घेऊन माणसे प्रत्यही येत असत. त्यात प्रॉपर्टीच्या भांडणाचा विषय असे, मूल होत नाही, नोकरी मिळत नाही, लग्न ठरत नाही असे व्यावहारिक विषय असत. पण प. पू. महाराजांविषयी सर्वांच्या मनात विलक्षण विश्वास असे 'इथे आपल्या दुःखाची दखल घेतली जाईल' असे प्रत्येक व्यक्तीला वाटे आणि महाराजांच्या चरणावर दुःख ओतून माणसे शांत होत असत. त्या सर्वांना मार्गस्थ करून महाराज अलिप्त राहात असत. हे सर्व ह्यांना कसे साधते असा प्रश्न माझ्या मनाला पडत असे. अनेकवेळा असे जाणवे की, त्यांच्यासमोर येणाऱ्या व्यक्तीचे सर्व भूत, वर्तमान, भविष्य एका क्षणात त्यांनी न्याहाळले आहे. समोरच्या व्यक्तीकडे ते बघत तेव्हा जणू त्यांच्या डोळ्यांना क्ष-किरणांचे बळ प्राप्त होई आणि म्हणून अंतर्बाह्य त्या जीवाचे स्वरूप त्यांना उलगडले आहे असे वाटे. ज्ञात ज्ञानाच्या मर्यादेत ह्याचा थोडासा खुलासा असा करता येईल की आपण सामान्य माणसे जगतो तेव्हा लांबी-रुंदी आणि खोली ह्या तीन परिमाणांचे भान आपल्याला असते. पण महाराजांसारख्या योगीपुरुषाला दिशा आणि काळ ह्याही परिमाणांचे भान असते. किंबहुना ते शुद्ध चैतन्यस्वरूप असल्याने सर्व परिमाणांच्या अतीत होते. ते शरीरात सगुणरूपात दिसत असले तरी सर्व बंधनांचे, स्थळ-काळाचे पिंजरे सोडून त्यांच्यातला 'मी' विश्वात्मक झाला होता, मुक्त झाला होता ते खऱ्या अर्थाने 'अनंत' झाले होते. आणि म्हणूनच समोर येणाऱ्या सर्वांनाच संकुचित स्वार्थ सोडून, पलीकडे जाऊन विचार करायला ते शिकवत होते.

आधुनिक मानसशास्त्र सांगते की, आपल्या मनाच्या शक्ती फार असतात पण आपल्या त्या ध्यानात येत नाहीत किंवा त्यांचा विकास आपण करत नाही. प. पू. महाराजांच्याठायी ह्या शक्तींचा विकास परिपूर्ण झालेला होता पण त्या परिपूर्णतेचा विचार तरी आपण कसा करणार ? आपल्या चिमणीच्या डोळ्यांना आकाशाची व्याप्ती कशी कळणार ? अत्यंत सूक्ष्म आणि व्यापक अशा त्यांच्या रूपाचा अंदाज, स्थूल मतीला कसा समजणार ? तेव्हा त्यांच्याविषयी कितीही लिहिले, सांगितले तरी अपूर्णता राहणारच ! ज्ञानदेवही आपल्या श्रीगुरुंचे वाणीने वर्णन करता करता मौनाचा आश्रय घेतात. कारण सद्गुरुस्वरूप 'परे'च्याही पलीकडचे असते. म्हणून त्या रूपाचा नुसता अनुभवच घ्यायचा असतो.

११, गुडविल बिल्डींग, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई १६

गुढीपाडवा.... परंपरेनुसार गुढी उभारून
नवीन वर्षाचं स्वागत करायचं...
आणि आंबट-गोडीची लज्जत कळण्यासाठीही केळकर
उत्पादनांसह एक नवी सुरुवात करायची...



# धुरि प्रतिष्ठापयितव्य एव

## श्रीदत्तमहाराज कवीश्वर



**डॉ. श्री. शं. फडके**

**१ मार्च रोजी पूजनीय गुरुजींचे ब्रह्मनिर्वाण** झाल्याची वार्ता मुंबईच्या वर्तमानपत्रातून माझ्यापर्यंत पोचली व मन चाळीस वर्षांपूर्वीच्या भूतकाळातील आठवणी जागवू लागले. गोव्यात त्या काळी पोर्तुगीज राजवट होती व इतर अनेक जुलुमाच्या बरोबरीने शैक्षणिक जुलूमही सुरू होता. साधारणत: गरीब विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणानंतर शिक्षणाची द्वारे बंद व्हायची व चांगले बुद्धिमान विद्यार्थी शिक्षणाअभावी पारंपारिक व्यवसायात कुढत बसायचे. माझीही अशीच परिस्थिती झाली व शिक्षणाअभावी काय करावे अशा विवंचनेत असतानाच पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याविषयीची जाहिरात वाचनात आली व माझ्या शैक्षणिक इच्छाशक्तीला पंख फुटले.

टि. म. वि. च्या बालमुकुन्द संस्कृत महाविद्यालयात त्यावेळी नामवंत संस्कृत पंडित अध्यापनाचे कार्य करीत असत. पं. कवीश्वर, पं. भागवत, पं. दीक्षित, पं. धुपकर असे असे त्या त्या विषयातील दिग्गज शास्त्री शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना लाभले होते. मी वेदान्त विषय घेतल्याने सुरवातीपासूनच गुरुजींच्या मार्गदर्शनाचा लाभ मला झाला. मी सुरवातीपासून ऐच्छिक वेदान्त घेतला होता, परंतु आवश्यक विषयांमध्ये व्याकरण, साहित्य, मीमांसा या शास्त्रांचादेखील समावेश होता.

कवीश्वर गुरुजी सकाळ,संध्याकाळ दोन्ही वेळा यायचे. गुरुजी शनिवारातील कन्याशाळेसमोरील वाड्यात राहायचे. जागा चांगली वरच्या मजल्यावरच होती. मुलंबाळं होती. संसार होता. पण गुरुजी कोणत्याही गोष्टीने विचलित होत नसत. एकदा मी गुरुजींकडे गेलो असता त्यांचा पत्रव्यवहार चालू होता. समोर एक डेस्क ठेवून त्यावर एका टोकाला दौत ठेवून लेखणीने लेखन चालू होते. अगदी एकाग्रतेने लिखाण चालू होते. इतक्यात त्यांचा मुलगा आला व जोराने दौत घेऊन दुसरीकडे जाऊन लिहायला बसला. दौत एक लिहिणारे अनेक अशी परिस्थिती होती. मला वाटले आता पितापुत्रांचा समरप्रसंग पहावयास मिळणार. पण गुरुजींची शांती तिळमात्र ढळली नाही. ते लिखाणाचं साहित्य घेऊन सरळ मुलाच्या जवळ जाऊन बसले व सदर प्रसंगाऐवजी पितापुत्रांचे एकत्र लिखाण पहावयास मिळाले.

मकर संक्रांतीला तिळगूळ घेण्यासाठी आम्ही विद्यार्थी गुरुजींकडे जात असू. गुरुजी एका मोठ्या भांड्यात तिळगूळ घेऊन बसत व प्रत्येकाला मूठ भरून तिळगूळ देत. मग सर्वांची विचारपूस व्हायची. मातोश्री कशा आहेत? घरी आणखी कोणकोण मंडळी आहेत? अशा खुशालीच्या गोष्टी व्हायच्या. एक प्रकारचे घरगुती वातावरण तयार व्हायचे. दसऱ्याला सोने देण्यासाठी सुद्धा आम्ही गुरुजींच्या घरी जात असू. गुरुजी मला सणासुदीच्या दिवशी विशेषत: नवरात्रात 'ब्राह्मण' म्हणून जेवायला बोलवायचे. त्यांच्या घरी सणासुदीला हुग्गी नावाची खीर असायची. बहुधा ते कर्नाटकी पक्वान्न होते. गुरुजी स्वत: आग्रह करून ते पक्वान्न सर्वांना वाढायला लावीत. गव्हाचा एवढा सुंदर पदार्थ माझ्या पाहण्यात कधी आला नाही. त्या काळात गोमंतकातील दहा-पंधरा विद्यार्थी विद्यापीठात राहून संस्कृतचा अभ्यास करत असत. त्यामध्ये प्रामुख्याने स्व. अनंतराव उपाध्ये (वेदान्त पारंगत), पं. दुर्गाराम उपाध्ये, आनंदराव भावे, श्रीकंठ उपाध्ये (गोवा विधानसभेचे मार्शल), दामोदर उपाध्ये (बँक ऑफ इंडियाचे वरिष्ट अधिकारी) असे काही विद्यार्थी प्रकाशात आले.

गुरुजींच्या हाताखाली मी १२ वर्षे वेदान्ताचे अध्ययन केले व वेदांत पारंगत ही पदवी मिळवली. त्यांच्या आशीर्वादाचे पाठबळ मला नेहमीच लाभले. 'आर्यसंस्कृती' नावाचे पुस्तक पू. श्रीधर स्वामींनी लिहिले आहे. गुरुजींनी ते पुस्तक मला वाचावयास सांगितले. अजूनही ते पुस्तक माझ्या संग्रही आहे. विद्यापीठात असेपर्यंत गुरुजींची नेहमीच भेट व्हायची. ते निवृत्त झाल्यावर मी त्यांना भेटण्यासाठी वासुदेवाश्रमात जात असे. गेल्या वर्षी प्रा. वा. ना. अभ्यंकरांकडे सतीर्थ्यसंघाचे संमेलन झाले त्यावेळी त्यांची भेट घेण्याचा योग होता. पण ते आजारी असल्याने संमेलनाला येऊ शकले नाहीत. वेदांत शास्त्राचे ग्रंथ कोणीही पंडित शिकवू शकेल. पण प्रत्यक्ष वेदांत जगणाऱ्या पंडिताकडून ते ग्रंथ शिकण्याचा योग आला हे मी माझे भाग्य समजतो. कवीश्वर गुरुजींना माझी विनम्र श्रद्धांजली.

किनारा बोर्डा, पो. फातोर्डा, मडगाव - गोवा ४०३६०२



## श्रद्धांजली - (प. पू. श्रीदत्तमहाराजांस)

काय ऐकिले कानीं, गेले निजधामी गेले।
जे व्हायाचे ते झाले, सद्गुरु 'दत्तराज' गेले ॥ धृ. ॥
नव्वद वरुषें झाली, काया जीर्ण, जीव थकला।
धर्मपत्नीला जाऊनि केवळ, अल्पकाल लोटला।
शिव-शक्ती वा पुरुष-प्रकृति, सहप्रवासी झाले ॥ १ ॥
ध्यानमग्न अन् अंतर्लक्ष्यी, ऋषीतुल्य मुद्रा।
शांतस्वभावी मितभाषी अन् प्रसन्न मौनमुद्रा।
नवत्वाने जणू वाकले, अनंतासि कोंदिले ॥ २ ॥
धोतर खाली वरी उपरणे, गौरपूर्ण कांति।
काखोटीला ऐकचि पिशवी, अनवाणी जाती।
जणा धाकुटे होण्यामागे, मोठेपण लपले ॥ ३ ॥
मुकलो आतां त्या रूपाला, प्रासादिक वाणी।
भक्तिरसाने ओथंबियली, मृदु, मधुर वाणी।
जन्मभरी तर 'श्रीमद्भागवत' ओठावरी रुळले ॥ ४ ॥
नाही परिसणे वाणी, झालो श्रवणांसी पारखे।
कोण आम्हांला सांगे महिमा, भक्तीचा कवतुके।
स्वाध्यायाला, व्यासंगाला, ऐकनिष्ठ राहिले ॥ ५ ॥
नैय्यायिक अन् वेदान्ती ते, धर्मशास्त्रवेत्ते।
योगपीठावरी आरूढ झाले, पावशतक होते।
सत्कर्मांचा, सद्धर्मांचा, धडा घालुनी गेले ॥ ६ ॥
जरी जाणते झाला कोणी, फुगु नका ज्ञाने।
सिद्ध जाहला कोणी योगे, भ्रष्ट नको होणे।
सदाचार अन् भक्ति-ज्ञाने, खूप सांगुनी गेले ॥ ७ ॥

मधुसूदन रा. खानवेलकर, कोथरूड, पुणे २९

**वाई अर्बन बँक**

जिथे जिव्हाळा जोपासला जातो...

अकरा शाखांसह जनसामान्यांच्या सेवेत

ठेवी : रु. ७१ कोटी कर्जे : रु. ४३ कोटी

खेळते मांडवल : ७३ कोटी

**रा. ना. कानडे** (व्यवस्थापक)

**शि. द्वा. जोशी** (उपाध्यक्ष)

**कांतीलाल प्रतापचंद जैन** (अध्यक्ष)

**दि वाई अर्बन को. ऑप. बँक लि. वाई**

प्रधान कार्यालय :

५९१, गणपती आळी, वाई (सातारा) ४१२ ८०३.
फोन नं. : (०२१६७) २०७७७, फॅक्स : (०२१६७) २०५७७, चेअरमन निवास : २०० ७५



## कै. पू. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर

### एक स्मरण

गुरुवर्य पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे संस्कृत भाषेतील न्याय, वेदान्त, मीमांसा व्याकरण इ. शास्त्रांचे गाढे विद्वान होते. ज्ञानी भक्त असलेल्या त्यांचा धर्मशास्त्राचा व्यासंगही सखोल होता. त्यांनी टिळक विद्यापीठात, आम्हास इ.स. १९४९ ते १९५५ च्या दरम्यान वेदान्त आणि धर्मशास्त्राचे अध्यापन केले.

**त्रि. ना. धर्माधिकारी**

त्यांची उपासना आणि अनुष्ठानाची बैठक दृढ होती. परंपरागत पाङ्क्त अध्ययन-अध्यापन पद्धतीस साजेसा धोतर आणि उपरणे - असा पोशाख आणि भाली गन्ध लावलेले, त्यामुळे ते अत्यंत सनातनी प्रवृत्तीचे असावेत असा समज होई.

सुमारे तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. माझ्या परिचयाचे एक परदेशीय गौरकाय तरुण मला भेटले. ते सिद्धयोग मार्गातील संन्यासी होते. काषाय वस्त्रांचे परिधान त्यांनी स्वीकारले होते. त्यांनी पूज्य गुळवणीमहाराज यांचे आश्रमात पं. कवीश्वर गुरुजींची भेट घेण्याची इच्छा माझेजवळ व्यक्त केली आणि गुरुजी भेट देतील की नाही याबद्दलची आशंकाही माझेजवळ बोलून दाखवली.

मी त्या संन्याशाला आश्रमात घेऊन गेलो. गुरुजी तेथे होतेच. त्यांची भेट झाली. हे संन्यासी मराठी, संस्कृत जाणत नव्हते. मी दुभाष्याचे काम केले. भेटीच्या शेवटी गुरुजींनी या संन्याशाचा शाल देऊन सत्कार केला. खडीसाखरेचा प्रसाद दिला. गुरुजींनी अन्य काही विचारपूस केली आणि आम्ही आश्रमाबाहेर पडलो.

आश्रमात प्रवेश होऊनही एक परदेशीय अहिन्दु म्हणून गुरुजी भेटतील की नाही अशा साशंक मन:स्थितीत असलेले संन्यासी विलक्षण समाधानाने आश्रमाबाहेर पडल्याचे पाहून, मलाही खूप आनंद झाला. संन्याशाच्या चेहऱ्यावरील भाव असे सांगत होते की केवळ परदेशीय अहिन्दु म्हणून अन्यत्र प्रवेशही नाकारलेल्यास गुरुजींनी समजून घेतले. आप्त म्हणून गुरुजींनी त्यांचा स्वीकार केला. गुरुजी असे भेदातीत मनोवृत्तीचे आणि उदार प्रवृत्तीचे उच्चतम साधक असल्याची माझी धारणा पुन: अधिक दृढ झाली. गुरुजींच्या आठवणी अनेक आहेत. त्यांपैकी ही एक. अशा पूज्य गुरुजींना ही स्मरणरूपी आदरयुक्त श्रद्धांजली.

पुणे

# ओघळलेली विचार मौक्तिके

नीला कृष्ण जोशी




**प. पू. दत्तमहाराजांशी प्रत्यक्ष संवाद साधताना** त्यांचे अमौलिक विचार जे निरनिराळ्या प्रसंगाच्या निमित्ताने सांगितले आहेत ते अध्यात्मिक वाटचाल करताना अतिशय मोलाचे आहेत म्हणून ते संकलि करण्याचा प्रयत्न केला आहे.

प. पू. दत्तमहाराजांनी चांगदेवपासष्टी वाचून बघा असे सांगितले व दोन-तीन लेखकांनी लिहिलेल्या चांगदेव पासष्टीची विवरणे (ती पुस्तके) मला आपणहून दिली होती. अलीकडे दोन-तीन वर्षे प्रकृतीच्या अशक्तपणामुळे कुठे बाहेरगावी जात नव्हते व आश्रमातही दुपारचे नित्याचे येणे घडत नव्हते. घरी त्यांचे दर्शनासाठी मी जात होते त्यावेळी जो थोडा वेळ मिळे त्यातून ही विचार मौक्तिके ओघळली होती. तिचे संकलन ही एक सेवेची स्मरणमाला गुंफीत आहे.

श्री चांगदेव पासष्ठीचा विषय त्यांचेजवळ काढत असताना त्यांनी हे लघुपत्र वाचताना श्रीज्ञानदेव व श्रीचांगदेव यांच्या बुद्धीचा वेगळेपणा स्पष्ट केला. विशाल बुद्धी, निश्चयात्मक बुद्धी, संशयरहित बुद्धी, मनोवृत्ती, बुद्धीवृत्ती असे भेदही त्यांनी उलगडून दाखवले.

**पूर्णबुद्धी**

प. पू. दत्तमहाराज म्हणाले जे पूर्ण तत्त्व आहे त्या तत्त्वाशी बुद्धीच्या जोडण्याचा प्रयत्न केल्यानंतर बुद्धीमध्ये पूर्णता उत्पन्न होते. जी स्थितप्रज्ञता भगवान सांगतात ती अवस्था पूर्ण बुद्धीची आहे. मनातील चंचलता दूर करून अस्थिरबुद्धी स्थिर करता येते एवढे सांगून झाल्यावर उदाहरण म्हणून महाराज म्हणाले,

श्रीज्ञानदेवांना पत्र लिहिताना चांगदेवांच्या मनाचा गोंधळ उडाला. बुद्धीत संशय उत्पन्न झाला. मनामध्ये चांगदेवांना वाटत होते, श्रीज्ञानदेव आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्याजवळ जे नाही ते त्यांच्याजवळ आहे. असे जर वाटत होतं तर एकच ओळ लिहावयाची होती. नमस्कार लिहिण्यास काय हरकत होती. पण नाही, संशय मनात निर्माण झाला. माझ्यापेक्षा लहान आहेत मग आशीर्वाद लिहावा की नाही, पण बुद्धी निर्णयाला येऊ शकली नाही. एकदा असे वाटले व एकदा वेगळे वाटले. द्विधा मनःस्थिती झाली. मग कोराच कागद पाठवून दिला. विचार केला तर योगशास्त्रातील चांगदेवांची बुद्धी पूर्ण होती. काळावर त्यांनी सत्ता मिळवली होती. काळावरून ते श्रेष्ठ कनिष्ठ ठरवीत होते. परतत्त्वाचा स्पर्श त्यांच्या बुद्धीला झाला नव्हता.

श्रीज्ञानदेवांची बुद्धी परतत्त्वस्पर्श पावलेली होती. पूर्ण बुद्धी असल्यामुळे त्यांनी श्रीसद्गुरूंच्या सांगण्याप्रमाणे लगेच उत्तराला सुरुवात केली -

'स्वस्ती श्रीवटेशु जो लपोनिया जगदाभासू'

श्रीचांगदेव वयाने मोठे अगर लहान असो कल्याण व्हावे अशी शुभेच्छा सर्वांकरता करता येते. त्यामुळे श्रीज्ञानदेवांच्या बुद्धीला प्रतिबंध किंवा संशय नव्हता अशी पूर्णबुद्धी स्वच्छ असते व त्यात व्यावहारिक चातुर्य ही भरलेले असते. पूर्ण बुद्धीबद्दल प. पू. दत्तमहाराज वारंवार सांगत असत. हा विचार चिंतनात्मक तर आहेच पण आपणा सर्वांनी तो उचलला पाहिजे इतका अनुकरणीय आहे. आत्मस्वरूप हेच चांगदेव मानून च लेखनास सुरुवात केली आहे.

संशयात्मक बुद्धीबद्दल प.पू. दत्तमहाराज म्हणतात, 'ध्येय निश्चित करण्यापूर्वी लौकिक किंवा पारलौकिक कोणते त्याचा निश्चय करण्यापूर्वी संशय उत्पन्न होणे व चिकित्सा करणे हे शास्त्रसंमत व आवश्यक आहे. श्रवण, मनन, वाचनाद्वारे आपले सर्व संशय फेडून घेतले पाहिजेत. सदासर्वकाळ जर 'हे करू का ते करू' असे संशयात मन राहिले तर मग काहीच साधणार नाही आपली बुद्धी संशयरहीत व निश्चयात्मक झाली पाहिजे. निश्चयात्मक बुद्धी ही विचारांच्या पलीकडे जाते. निश्चयात्मक बुद्धीबद्दलचे त्यांचे सांगणे आमच्या सारख्या सामान्य माणसांना प्रेरणा देणारे आहे. ते म्हणतात, एकदा जे साधन तुम्ही स्वीकारलेत की ते करण्याचा तुमच्या बुद्धीचा निश्चय झाला पाहिजे तरच अभ्यासाचा उत्साह राहतो. साधकावस्थेत जर अशी अवस्था निर्माण झाली नाही तर आपण ठरवलेले ध्येय पूर्ण होत नाही.

श्रीतुकाराममहाराजांचे उद्गार ते सांगतात, 'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ' प. पू. दत्तमहाराज म्हणत होते, निश्चय हेच फळ म्हणून श्रीतुकोबारायांची बुद्धी पूर्ण होती. ते साधे शब्द नव्हते.

दुर्योधन व रावण दोघांचीही निश्चयात्मक बुद्धी होती. विचारांच्या पलीकडे गेली होती. माघार नव्हती. पण याठिकाणी प. पू. दत्तमहाराजांनी निश्चयात्मक बुद्धीचे दोन भाग विशद केले. सद्बुद्धी व असद्बुद्धी.

पुढे त्यांनी असे सांगितले, संत महाभाग जसे वागतात, समाजाचे कल्याण कशात आहे याचा विचार करतात, त्यांचे अनुकरण आपण करावयाचे आहे व अशी निश्चयात्मक बुद्धी आपणाजवळ किती आहे ? याचा विचार करावयाचा आहे तो

कसा करावयाचा हे सांगताना ते म्हणाले, ईश्वर सर्वत्र आहे, सर्वकाळात आहे, सर्व देशात आहे व सर्व रूपात आहे हे त्याचे अस्तित्व बुद्धीला जाणवले पाहिजे. अपरोक्ष अनुभव नसला तरी परोक्षतेने तरी जाणवले पाहिजे. परोक्ष ज्ञानाचे उदाहरण देताना ते राष्ट्रासाठी हसत फाशी जाणाऱ्या देशभक्तांचे उदाहरण देतात. 'नैनं छिदन्ति-शस्त्राणि नैनं दहति पावक:' गीतेतील हे आत्म्याचे वर्णन म्हणत म्हणत अनेक क्रांतिकारी फासावर गेले. आनंदाने गेले. आत्मस्वरूप अविनाशी हे परोक्षज्ञान त्यांचे मनात दृढ झाले होते. हे परोक्ष ज्ञान करून घेणारे बुद्धीमान आहेत.

निश्चयात्मक बुद्धीचे दुसरे उदाहरण ते द्रौपदीचे देतात. पांडव द्यूत हरले. दु:शासनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याचे ठरवले. पांडव खाली माना घालून बसले. राजानेही संमती दिली. आपले रक्षण करणारा गोपालकृष्णच आहे. तिने धावा केला त्यावेळी कृष्ण द्वारकेत आहेत इतक्या लवकर इतक्या लांबून कसे येतील असा विचार तिने केला नाही किंबहुना मनातच आला नाही. तिच्या बुद्धीची खात्री होती ती अशी की, ईश्वर सर्वत्र सर्वव्यापी आहे. असे गोविंदाचे स्वरूप तिच्या बुद्धीत ठासून भरलेले होते. त्या निश्चयाचे बळ व फळ आपण पाहिले.

निश्चयात्मक बुद्धी विकास पावून ती विशाल झाली होती. हे द्रौपदीच्या चरित्रावरून दिसते. आपले पाचही मुलगे अश्वत्थामाने मारले असूनही तिने अश्वत्थाम्याला मारू नका त्याच्या आईला फार दु:ख होईल असे सांगितले. ही गोष्ट फार महान व विशाल बुद्धीची खूण आहे. हीच परतत्त्व स्पर्श झालेली विशालबुद्धी असे प. पू. दत्तमहाराज म्हणाले.

**बुद्धी दे रघुनायका**

श्रीसमर्थांनी हेच मागितले आहे. निश्चयात्मक बुद्धीची मागणी केली आहे. मनोवृत्ती व बुद्धीवृत्ती हा फरक आपला आपण तपासून घ्यावयाचा आहे. अर्जुन मनोभावाने मोहित झाला होता. तसाच तो राहिला असता तर काय झाले असते ? असे प. पू. दत्तमहाराज सांगत होते याचा विचार करावा.

बुद्धीबद्दल बोलताना त्यांनी आणखीही एक उदाहरण दिले. मुद्राराक्षस नाटकामध्ये खूप जण चंद्रगुप्ताला सोडून गेले. चाणक्याला सर्वजण सांगू लागले. बरीच मंडळी शत्रुपक्षाला जाऊन मिळाली. काय होणार ? चाणक्याने सांगितले की, जे गेलेले आहेत ते पूर्वीच मनात विचार करून गेलेले आहेत. ते आम्हाला संपले. जे उरलेले आहेत त्यांना माझा निरोप सांगा तुम्हाला सुद्धा जावयाचे असेल तर तुम्ही सुद्धा जा. माझी परवानगी आहे. बहुमताने होणारा हा निर्णय नाही. सैन्याहून समर्थ अशी माझी बुद्धी मला सोडून गेली

हैदराबाद, सिकंदराबाद शहरांतील
एकमेव महाराष्ट्रीय हॉटेल

रामकृष्ण
विश्राम
भवन

सहली व पर्यटकांनी आपल्या सर्व व्यवस्थेकरिता
आमचे येथे संपर्क साधावा.
(जेवण, बस व्यवस्था व राहण्याच्या सोयी उपलब्ध)

संपर्क : अरुण फणसळकर
४-४-९, दिलशाद कॉम्प्लेक्स,
सुलतान बझार, हैद्राबाद (आंध्र) ५०००१९५
फोन : ४७५१२७०/४६१३१५८

दि विदर्भ प्रिमियर को-ऑपरेटिव्ह
हाऊसिंग सोसायटी लि., नागपूर
मुख्य कार्यालय : गांधीसागर, नागपूर १८.
घर/गाळे खरेदी/बांधणीकरता सुलभतेने अर्थसहाय्य
करणारी अग्रेसर गृहनिर्माण संस्था
आता प्लॉट खरेदीसाठी सुद्धा कर्ज वाटप उपलब्ध
आगामी योजना
कर्ज मर्यादा रु. ५ लाख – कर्ज मर्यादित वाढ
व्याज दर १६ टक्के – ग्रामीण भागात घरे बांधण्याचा कार्यक्रम
शाखा विस्तार/कार्यविस्ताराचा कार्यक्रम

पुंडलिकराव भनारकर, माजी आमदार, अध्यक्ष
दिवाकरराव वेळेकर, उपाध्यक्ष
प्रभाकरराव काठीकर – आ. अशोकराव वाडीभस्मे – मानद सचिव
दत्तोपंत पनके – सुधाकरराव वाचासुंदर – वास्तु निरीक्षक
सदस्य : गजाननराव बापट, राजाभाऊ गांधी, वसंतराव देवपुजारी, मनोहरराव मानकर, रवींद्र दुरुगकर, महादेवराव बाकडे, श्रीपाद रिसालदार, ॲड. अशोकराव बनसोड, श्री. विवेक सोनटक्के, श्रीमती सरिता फडणवीस, श्रीमती मंदाकिनी मंगुळकर
सरव्यवस्थापक : हरीभाऊ देशपांडे

नाही म्हणजे मिळवले.

कार्याकार्यविचारसार परमा बुद्धिस्तु मागान्मम । प. पू. दत्तमहाराज म्हणाले लौकिक दृष्टीने बुद्धीचे महत्त्व मान्य केले आहे.

**थोरपण पऱ्हा सांडिजे**

शेवटी विशालबुद्धी होण्याकरिता हा ज्ञानदेवांचा अभंग उपाय म्हणून सांगितला आहे. थोरपण म्हणजे बुद्धितत्त्व आहे. त्यामुळे माणसाला मोठेपण प्राप्त होते. व्यावहारिक व पारमार्थिक जीवनातही बुद्धिमुळेच थोरपणा येतो. अशा बुद्धिवान माणसांना आपण विसरू शकत नाही त्यांची कीर्ती कायम राहाते. निरनिराळ्या विषयांमध्ये विशेष ज्ञान प्राप्त करते ती थोर खरीच पण ती पूर्ण नाही. अर्थात विशेष ज्ञान संपादन करण्याकरता अभ्यास करावा लागतो ती तपश्चर्या आहे.

संत महात्म्यांची बुद्धी परिपूर्ण असते. प. पू. दत्तमहाराजांनी सांगितले की, नियामक ईश्वरशक्तीमध्ये अनेक प्रकारच्या शक्ती सामावल्या आहेत. त्यात वात्सल्य ही एक शक्ती आहे. त्यामुळे संतांची झालेली पूर्ण बुद्धी वात्सल्यपूर्ण असते. तेव्हा श्रीज्ञानदेवांनी केलेले सर्व लेखन पूर्ण बुद्धीतून केलेले आहे हे लक्षात घेऊन संतांचे ग्रंथ वाचावेत. त्यांची आत्मकेंद्रितता आपण सुटू देऊ नये. ती लक्षात घेऊन त्यांच्या शब्दाचे त्यांच्या बोलण्याचे अर्थ लावावेत. त्याकरिता त्यांनी प. पू. गुरुमहाराजांचे उदाहरण (प. पू. योगीराज वामनरावजी गुळवणीमहाराजांचे) दिले.

ते म्हणाले, गुरुमहाराज योगशास्त्रात जसे पूर्ण बुद्धीचे होते त्याप्रमाणेच त्यांची पूर्ण समदृष्टी झालेली होती. आत्मस्वरूपाचा अनुभव घेतल्यामुळे ती ही पूर्ण बुद्धी होती. 'वासुदेवः सर्वम्' हे शेवटी त्यांना कळलेले होते. स्थितप्रज्ञ अवस्था मिळालेली होती. त्यांनी आश्रमाला श्री - वासुदेव - निवास हे नाव दिले ते त्यांच्या सद्गुरूंचे आहे हेही खरे. पण वासुदेवाचे स्वरूप देहाचे नाव देण्यापुरते मर्यादित नसून सर्व जग वासुदेवमय आहे हा अनुभव ज्याला आला ते वासुदेव व त्यांचा निवास असा प. पू. गुरुमहाराजांच्या पूर्ण बुद्धीत ठसवलेला अर्थ आहे असे प. पू. दत्तमहाराजांनी सांगितले व संतांची वचने आत्मकेंद्रित असतात हे पूर्ण बुद्धीचे लक्षण पुन्हा एकदा सांगितले. ध्येय प्राप्त होण्याकरिता सातत्य, निश्चय हे गुण महत्त्वाचे आहेत.

ही प. पू. गुरुमहाराजांची आठवण हा या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे स्मरणमाळेचा मेरुमणी आहे. अशी मौक्तिकांची माला आपल्या चित्तात ठेवून पूर्ण बुद्धीकडे वाटचाल व्हावी हीच शेवटी प्रार्थना.

३/३४ ज्ञानयोग, वझीरा नाका, बोरीवली (प.) फोन : ८०१ ३३७९.

ब्रह्मश्री पं. दत्तमहाराज यांच्या पावन स्मृतीस
विनम्र अभिवादन

मे. दिनकर कृष्ण जोशी
ॲण्ड सन्स

सिमेंट, एस. डब्ल्यु. आर. पी. व्ही. पाईप,
सॅनेटरफिअेर, ग्लेझ टाईल्स,
मंगलोरी कौले
वगैरेंचे रत्नागिरीतील प्रसिद्ध विक्री केंद्र.

टिळक आळी - रत्नागिरी
फोन - २२५१३/२१०१३
पिनकोड ४१५६१२



# भेद रहिताः श्रीदत्तमहाराजाः

**पं. गुलामदस्तगीर बिराजदार**



भारतशासनेन अध्ययन-अध्यापन - क्षेत्रे अर्थात् शैक्षणिकक्षेत्रे त्रिभाषासूत्रं स्वीकृतम् । ततः राज्ये राज्ये शिक्षणविषये विचारविनियमः समारब्धः । १९६९ तमे खिस्ताब्दे महाराष्ट्र - शासनेन शैक्षणिक - धोरणार्थ श्वेतपत्रिका प्रकाशिता कृता । श्वेतपत्रिकाम् आश्रित्य सभासंमेलनानि संपन्नानि जातानि । तदा त्रिभाषासूत्रानुसारेण संस्कृतभाषायाः समावेशः पाठ्यक्रमे नैव कर्तव्यः इत्यादी विचाराः संसूचिताः जाताः । अतः संस्कृतप्रेमिजनैः अपि संस्कृतभाषायाः समावेशः पाठ्यक्रमे भवतु इति आशयेन प्रचारः प्रसारःच समारब्धः । वृत्तपत्राणां माध्यमेन अपि विचारमण्डनादिकम अभवत् ।

संस्कृतभाषाक्षेत्रे विशिष्टधर्मजातीयाः एव सन्ति अर्थात् ब्राह्मणजातीयाः एव सन्ति । अनया भाषया केवलं ब्राह्मणानामेव पोषणं भवति इत्यपि कथनं लेखनादिकं च समारब्धम् । अतः संस्कृतसेवकैः ब्राह्मणेतरधर्मजातीयाः संस्कृतक्षेत्रे प्रदर्शनभावेन समानीताः । एतेषु मम अपि समावेशः अभवत् ।

मराठा - मन्दिरम् इति संस्था अस्ति । एतस्याः संस्थायाः शैक्षणिकमपि कार्यं बहुविस्तृतं वर्तते । अक्कल-कोटादिनगरेषु विद्यालयाः मराठामन्दिरेण प्रचाल्यन्ते । अस्याः संस्थाथाः वरली मुंबई इत्यत्रापि एकः माध्यमिक - विद्यालयः । अत्र मया संस्कृताध्यापनं क्रियते स्म निवृत्तिकालपर्यन्तम् । संस्कृतविषये प्रकटरूपेण विचाराः मण्डुनीयाः इति पं. श्री. धुं. कवीश्वरादिभिः अहमपि उपदिष्टः । एतदर्थं विविधसंस्थांसु मम सहभागः एतैः कारितः । विशिष्टविद्वज्जनैः सह मम संपर्कः एतैः प्रचारकधुरन्धरैः स्थापितः कृतः । अनेन प्रकारेण ब्रह्मलीन - दत्तमहाराजानाम् अपि संपर्के अहम् आगतवान् ।

संस्कृतस्य प्रकाण्ड-पण्डितैः सह चर्चाकरणे संभाषणादिसंसाधने च मम मनः किमपि भयभीतं न भवति । परन्तु ये धर्माचरणशीलाः तपश्चरणलीनाःच भवन्ति ते सर्वे वन्दनीयाः पूजनीयाः च सन्ति इत्येव भावः मम मनसि समुत्पन्नः भवति । तेषां पुरतः मम मौनधारणा एव भवति । एते स्व. दत्तमहाराजाः धर्माचरणशीलाः तपश्चरणलीनाः पुनःच एते महान्तः आध्यात्मज्ञानिनः । अतः साष्टाङ्गप्रणिपातः इत्येव मम क्रिया स्व. दत्तमहाराजानां पुरतः चलति स्म । मम यत्किमपि कथनं पं. श्री. धुं. कवीश्वरमाध्यमेन एव भवति स्म । अनेन मार्गेण एव स्व. दत्तमहाराजानां मम उपरि महती कृपा अस्ति इति ज्ञानं मम समुद्भवति स्म ।

एकदा गुळवणीमहाराजमठे स्व. दत्तमहाराजानां दर्शनग्रहणार्थं पं. श्री. धुं. कवीश्वरेण सह एव अहं गतवान् आसम् । दर्शनग्रहणान्ते एतैः महाराजैः मम प्रावारक-पुष्प-श्रीफलादिदानेन सत्कारः अपि कृतः । किमर्थम् अयं मम सत्कारः इति प्रश्नः मम मनसि समुद्भूतः इति ज्ञात्वा एव राष्ट्रीय - शिक्षक - पुरस्कारः प्राप्तः इति कृत्वा एव अयं सत्कारः इति महाराजैः कथितम् । अर्थात अन्तर्ज्ञानिनः आसन् । दर्शनार्थिनां मनसि किमस्ति इति एते अन्तर्ज्ञानेन जानन्ति स्म इति मम अनुभवेन मया कथ्यते । तथा अनुभवाः अन्यदर्शनार्थिनम् अपि स्युः एव ।

बुलढाणाजनपदे (जिल्हा) देऊळगावराजा इति खेटकः अस्ति । अत्र एव स्व. दत्तमहाराजांना पितृचरणाः स्व. धुण्डिराजमहाराजाः वसन्ति स्म देऊळ- गावराजा इति खेटके स्व. दत्तमहाराजैः यज्ञादि-धार्मिक-महोत्सवः संयोजितः आसीत् । तदा प्रातःकाले एव मम अपि गमनं तम अभवत् । पूजा पाठादीनाम् आरंभात् पूर्वमेव प्रावारक-श्रीफल-पुष्प-दक्षिणादिदानेन मम आदरातिथ्यम् एतैः महाराजैः कृतम् ।

देऊळगावराजा इत्यत्र यज्ञमण्डपे मम प्रवेशात् पूर्वं मम मनसि महत् भयम् आसीत् । यज्ञमण्डपे शुनः प्रवेशः’ इत्यपि विचारः मम मनसि समुत्पन्नः । धार्मिके कार्यक्षेत्रे किमर्थं मम प्रवेशः ? अतः अहम् अतिदूरे स्थितवान् आसम् । तदा डॉ. रा. ल. जोशीगुरुचरणाः स्वयम् आगत्य मां यज्ञमण्डपे नीतवन्तः । एतैः मह्यम् प्रातराशादिकमपि दायितम् । यज्ञक्षेत्रं नाम धार्मिक्षेत्रम् । अत्र स्पृश्यास्पृश्यः भावः सहजः एव भवेत् इत्यपि मम भयम् । स्व. दत्तमहाराजानां प्रत्यक्षं दर्शनान्ते एतत् सर्वं स्वयमेव निर्गतम् । मम मनसि प्रसन्नता समागता । धन्यतामेव गतवान् अहम् । अत्र कः अपि भेदभावः मया नानुभूतः ।

हजरत जंगली पीर दर्गाहः, मुंबई ४०० ०१८
दूरभाष : ४९२४३८९

**पं. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या स्मृतीस अभिवादन**

**एस्. एन्. जोग ॲण्ड सन्स**

**(रेल्वे कॅटरर्स)**

रेल्वे स्टेशन - गुलबर्गा

**प्रवासी – गि-हाईकाचा संतोष हीच आमच्या यशाची पावती**



# एक अबोल वेदान्ती

**वा. ल. मंजूळ**

**पूज्यनीय दत्तमहाराजांचा माझा परिचय मी** संस्कृत क्षेत्रात चाळीस वर्षे वावरत असतानाही योगायोगाने अलिकडेच झाला. हार्वर्ड विद्यापीठाचे संस्कृतचे प्रोफेसर एच. एच. डॅनिएल इंगाल्स यांना वेदान्त शिकविण्यासाठी महाराज १९५३ सालच्या सुमारास भांडारकर संस्थेत येत असत. पण त्यावेळी मी पुण्यातही आलो नव्हतो. प. पू. गुळवणी महाराजांचा माझा परिचय अनेक कारणांनी होत गेला. अनेक पाश्चात्य पंडितांना चर्चेसाठी मी त्यांच्याकडे घेऊन जात असे. त्यांचा शक्तीपात विद्येतील अधिकार पाहून त्यांच्याकडून 'दीक्षा' ही घ्यावी असे अनेकदा मनात आले. पण मूळचा पिंड भागवत संप्रदायाचा. जन्म-बालपण पंढरपूरात गेलेले. त्यामुळे शक्तीपात संप्रदायापासून दूर राहात गेलो.

माझे वडील कै. बाबुराव मंजूळबुवा हे पुण्यात आल्यावर उत्सवाच्या निमित्ताने श्रीवासुदेवाश्रमात कीर्तनास जात असत. आजोबा कै. त्र्यंबकराज मंजूळ आहिताग्नी होते. काण्व शाखेचे घनान्त अध्ययन झाले होते. श्री विठ्ठल मंदिरात चातुर्मास भागवत सांगत. माझ्या या दोन पूर्वजांचा घनिष्ट परिचय पू. दत्तमहाराजांशी होता. या जुन्या नात्याचा धागा पकडून मी कधी महाराजांना भेटलो नाही. तसा प्रसंगही कधी आला नाही.

मे १९९० मध्ये पू. दत्तमहाराजांच्या वयाला ऐंशी वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने त्यांच्या गौरवाचा एक भव्य सोहळा पुण्यात वामनाश्रमात झाला. या समारंभापूर्वी महाराजांच्या समारंभाच्या निमित्ताने एक गौरव ग्रंथ काढावा अशी कल्पना शिष्यगणांची होती. अर्थातच हा गौरव ग्रंथ शिष्यांच्या आठवणींवर आधारित असावा, अशी सुरुवातीची कल्पना, माझे स. प. महाविद्यालयातील गुरू आणि महाराजांचे निकटवर्ती प्रा. दि. ब. केरूर सरांनी त्यासंबंधी माझी मदत मागितली. पंचांगकर्ते श्री. दातेशास्त्री आणि प्रा. केरूरांनी मला गौरवग्रंथाच्या समितीवर सचिव म्हणून घेतले. माझी गौरवग्रंथाची व्याख्या वेगळी होती. त्यात महाराजांचा सर्वांगांनी परिचय देऊन उरलेल्या भागात पुण्यातील नामवंत विद्वानांचेकडून विविध विषयांवर शोधपर निबंध मागवून ते छापावेत. शेवटी लेखकांचा मी परिचय द्यावा, प्रा. केरूरांनी महाराजांचे गुणगौरवपर चरित्र लिहावे. हे सर्व काम आनंद प्रेसमध्ये करायचे ठरले. ऐनवेळी, प्रा. केरूर यांना गंभीर आजारामुळे जोशी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांनी सर्वच जबाबदारी माझ्यावर सोपवली. पूर्वी अनेक गौरवग्रंथांचे काम करूनही माझ्या पद्धतीची ही सेवा पू. दत्तमहाराजांना रुचेल की नाही अशी शंका आणि भीती मनात होती. गौरवग्रंथाचे नाव 'जाड्य' नसावे, हलकेफुलके असावे. तितकेच आकर्षकही असावे. मला महाराजांच्या प्रसन्न मुद्रेवरून 'प्रसन्न' शब्द तर त्यांच्या अभ्यासाच्या वेदान्त पारिजातवरून 'पारिजात' हा शब्द सुचला. नाव 'प्रसन्न पारिजात' ठरले. महाराजांनाही ते आवडले. आणि मुखपृष्ठावर परंपरेप्रमाणे महाराजांचा फोटो न छापता फुलांचा वर्षाव करणाऱ्या प्राजक्ताचे चित्र टाकण्याचे ठरवले. भक्तगणावर सतत कृपेचा, आपल्या निर्मल अन् कोमल शब्दांनी वर्षाव करणाऱ्या या थोर वेदान्त पारिजाताची ओळख त्यातून अप्रत्यक्षपणे व्हावी हा हेतू होता. डॉ. रा. ना. दांडेकर, डॉ. शि. द. जोशी, डॉ. सरोजा भाटे, डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी, डॉ. रा. चिं. ढेरे आदी मान्यवरांनी संस्कृत-मराठीतून लेख पाठवले. सुंदर सुबक आणि शुद्ध असा ग्रंथ तयार झाला. पू. दत्तमहाराजांना एकदा प्रकाशनपूर्व नेऊन दाखविला. महाराज समाधान पावले. पाठीवर कौतुकाचा हात फिरवला. धन्य वाटले. महाराजांचे कडे मी त्यांच्या शिष्यवर्गापेक्षा किंवा सांप्रदायिक मंडळींपेक्षा वेगळ्या दृष्टीने पाहात होतो. मला ते एक व्यासंगी विद्वान होते. त्यांच्या गौरवग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ संशोधक डॉ. रा. ना. दांडेकर यांनी करावे, त्याचवेळी महाराजांचा मातोश्रींसह सत्कार दांडेकरांनी करावा. ग्रंथ प्रकाशनानंतर पू. महाराजांच्या हस्ते गौरवग्रंथात लिहिणाऱ्या लेखकांचा सन्मान महाराजांनी करावा. यासाठी सर्वजण व्यासपीठावर बसावेत अशी कल्पना मी

खेड परिसरातील नागरीक आणि खेडमध्ये येणारे प्रवासी न्याहारी व भोजनासाठी हॉटेल सौरभमध्ये जातात. कारण... ताजे स्वच्छ स्वादिष्ट पदार्थ नेहमी मिळतात. शिवाय विनम्रसेवा

हॉटेल सौरभ

उपवासाचे पदार्थ, अल्पोपाहार आणि सुग्रास शाकाहारी जेवणाची उत्तम व्यवस्था

संपर्क : आबा जोशी

हुतात्मा कान्हेरे चौक, खेड, जि. रत्नागिरी

मांडली. समितीच्या सर्वांना तितकी मान्य नव्हती. खुद्द महाराज, श्री. दाते आणि प्रा. केरूर यांनी ही कल्पना उचलून धरली. कारण हा गौरव ग्रंथ म्हणजे पुण्यातील विद्वानांनी बांधलेली महाराजांची 'वाङ्मयीन पूजा' होती. प्रत्यक्ष समारंभात ज्येष्ठ प्राच्यविद्या पंडित डॉ. रा. ना. दांडेकर, समारंभाचे अध्यक्ष होते. पुण्याचे उत्साही जिल्हाधिकारी, महाराजांचे एक चहाते आणि माझे वर्गबंधू श्री. श्रीनिवास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय व्यासपीठावर डॉ. चिं. ग. काशीकर, डॉ. अ. मा. घाटगे, डॉ. म. अ. मेहेंदळे, पं. वामनशास्त्री भागवत, श्री. एम. आर. यार्दी (सेवानिवृत्त आय.सी.एस.) डॉ. सरोजा भाटे आदि विद्वान हजर होते. संपूर्ण सोहळा आगळावेगळा झाला. पू. दत्तमहाराजांचा गौरव विद्वानांनी भरभरून केला. आणि त्यांनीही विनम्र भावाने स्वीकारला. सौ. मातोश्रींचाही सत्कार डॉ. दांडेकरांनी केला. या निमित्ताने पुण्यातील संस्कृत विद्वान महाराजांना किती मानतात हे लक्षात आले. महाराजांच्या विद्वत्तेचा, आचार संपन्नतेचा आणि कर्तृत्वाचा डॉ. दांडेकरांनी केलेला गौरव अद्याप आठवतो. याचवेळी पुण्याचे प्रथम नागरीक म्हणून जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनीही महाराजांचा मोठेपणा वेगळ्या शैलीतून मांडला. महाराजांनी सर्व विद्वानांचा श्रीफल-महावस्त्राने गौरव केलाच पण जिल्हाधिकाऱ्यांनाही त्यात समावेशून घेतले. हा त्याचा मोठेपणा. महाराजांची ही सेवा; त्या निमित्ताने त्यांनी दिलेले शाल-श्रीफळ आजही माझ्या आनंदाचा ठेवा आहे.

भांडारकर संस्थेमार्फत दर दोन वर्षांनी अखिल भारतीय प्राच्य-विद्या परिषदेचे अधिवेशन वेगवेगळ्या प्रांतांच्या राजधानीत भरविले जाते. या अधिवेशनात सुमारे वीस विभाग असतात आणि त्यांमध्ये शोधनिबंध वाचणारे दीड ते दोन हजार संशोधक भाग घेतात. या अधिवेशनाला जोडून अ. भा. संस्कृत पंडितांचे एक संमेलन भारत सरकारच्या राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या खर्चाने भरविले जाते. १९९३ साली भांडारकर संस्थेच्या पंचाहत्तरीचे निमित्ताने प्राच्य विद्या परिषदेचे छत्तिसावे अधिवेशन पुण्यात भरविले होते. एस.एन.डी.टी. महाविद्यालयाचा परिसर त्यासाठी घेतला होता. अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठाचे निवृत्त संस्कृत विद्वान डॉ. इंगाल्स हे प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. संस्कृत पंडित परिषदेचे अध्यक्षपद स्थानिक विद्वानाला साधारणपणे देण्यात येते. पुण्यात आंग्लविद्या विभूषित संस्कृत पंडित विपुल, पण पारंपारिक अध्ययन केलेले शास्त्री विद्वान कमी, त्याशिवाय या संस्कृत पंडित परिषदेचे कामकाज संस्कृत भाषेतून चालणार, तेव्हा अध्यक्षाला या सर्व गोष्टी यायला हव्यात. सर्वानुमते पू. दत्तमहाराजांचे नाव


## बापट बंधू

**विजय हॉटेल**
सर्वोत्कृष्ट उपहारासाठी प्रसिद्ध
गांधी चौक, चिपळूण
फोन ५२३९१

**वृंदावन लॉज**
उत्तम निद्राव्यवस्थेसाठी
एस. टी. स्टँडजवळ, चिपळूण
फोन ५२४१५

**हॉटेल वैभव**
शुद्ध शाकाहारी भोजन व्यवस्था
मुंबई-गोवा हायवे रस्त्यावर,
चिपळूण
फोन ५४८२६

कार्याकार्य विचारसारपरमा
बुद्धिस्तु मा गाद्‍मम
-आर्य चाणक्य

## मे. केतकर बंधू

**किराणा मर्चंट व कमिशन एजंट**

बाजारपेठ चिपळूण,
जिल्हा रत्नागिरी.

दूरध्वनी (०२३५५) :
दुकान : ५२०६२
निवास : ५४१६२

धर्मभास्करला शुभेच्छा

## मे. केशव आप्पाजी ओक

बाजारपेठ - चिपळूण
जिल्हा रत्नागिरी

**कस्तूरी चहा**
**मे. श्री. आणि कं.**

दूरध्वनी दुकान ५२०१५
निवास ५४२१५
स्टॉकिस्ट १) महाराष्ट्र कृषी उद्योग,
२) गुडरिक चहा

पुढे आले. महाराजांची प्रकृती त्या काळात ठीक नव्हती, अन्य कोणाचा उपयोग नव्हता, पुण्याचे नाव जाते की काय असा प्रश्न पडला. आम्ही सर्वांनी महाराजांना साकडे घातले. पं. भागवत शास्त्रींना त्यांच्या मदतीला देऊ केले. महाराजांनी आमच्या वेळापत्रकानुसार सर्व कार्यक्रम तीन दिवस सविस्तरपणे कडेला नेले.


कोकम शरबत, आवळा शरबत, नाचणी सत्त्व, आवळा पेठा, आवळा जाम, करवंद जाम इ.
कोकणातील उत्पादने नेहमी तयार असतात.
**योजक असोसिएटस्**
टिळक आळी, रत्नागिरी. दूरध्वनी - २२६२७


महाराजांचा गौरव भारतभर गेला. या निमित्ताने स्वत: अध्यक्ष असूनही सनातन वृत्तीच्या पंडितांची राहण्याची जुन्या पद्धतीची सोय, जेवणाखाण्याची सोवळ्यातली व्यवस्था आणि संध्या-होमादि आह्निके करून घेण्यासाठी वासुदेवाश्रम खुला करून दिला. पंडितांच्या आतिथ्यात जातीने लक्ष घातले. एवढे मोठे स्थान मिळूनही कोठेही अहंभाव, डामडौल काही जाणवले नाही. आतिथ्याची विनम्र वृत्तीच दिसून येत होती.

नागपूरचे संस्कृत विद्वान डॉ. गु. वा. पिंपळापुरे यांनी शुक्ल यजुर्वेदाच्या काण्व शाखेच्या शतपथ ब्राह्मणाची संस्कृत संहिता सायण भाष्यासह क्रमश: प्रसिदध करावयाचे ठरविले होते. हा ग्रंथ दुर्मिळ होता. प्रथमच प्रसिद्ध होणार होता. पण कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य त्यामागे नव्हते. डॉ. पिंपळापुरे महाराजांचे चाहते आणि वृत्तीने स्नेही, मी स्वत: क्रियाशील काण्व असल्याने हा ग्रंथ वासुदेवाश्रमात आणि महाराजांच्या हस्ते प्रकाशित व्हावा असा आग्रह धरला. साधारणपणे १९९५/९६ साल असावे. प्रकृतीची साथ नसतानाही वासुदेवाश्रमात मोठ्या थाटाने प्रकाशन समारंभ पार पडला. पं. पिंपळापुरे यांचा सत्कारही महाराजांनी केला आणि आपल्या भाषणात अनुपलब्ध संस्कृत वाङ्मयाचे सविस्तर सर्वेक्षण त्यांनी केले. एखाद्या व्यासंगी संशोधकाला लाजवेल एवढ्या अभ्यासपूर्ण वाणीने ते बोलले.

दोन वर्षांपूर्वी श्रावण पौर्णिमेला 'संस्कृतदिवस' साजरा करण्याचे पुण्यातील सर्व संस्थांनी एकत्रितपणे ठरवले. पुणे आकाशवाणी केंद्राने पुढाकार घेतला होता. यानिमित्ताने पुण्यातील 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' म्हणून राष्ट्रपतींच्या कडून सन्मानित झालेल्या सर्वांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्याचे योजले. पू. दत्तमहाराज प्रकृति अस्वस्थतेमुळे आणि प्रा. डॉ. दांडेकर वयोमानपरत्वे कार्यक्रमाला येऊ


धर्मभास्करच्या वाचकांना
हार्दिक शुभेच्छा !!!
**जोशी नर्सरी**
आम्ही बाणावली माडाची
खात्रीची रोपे
मागणीप्रमाणे पुरवितो.
: संपर्क :
अरविंदराव के. जोशी
खालचा पाट, गुहागर,
जि. रत्नागिरी
दूरध्वनी : ४०२६०

विवाह, व्रतबंध व धार्मिक
कार्यासाठी रत्नागिरी
शहराच्या मध्यवर्ती भागात
सर्व सुखसोयींनी
सुसज्ज असलेले
**मंगल कार्यालय**
संचालक : सुधाकर वैद्य
टिळक आळी, रत्नागिरी, महाराष्ट्र
विनम्र सेवा हेच आमचे ध्येय

ग्राहकांच्या विनम्र सेवेची २२ वर्षे पूर्ण
करून आम्ही लौकरच २३ व्या वर्षात
पदार्पण करीत आहोत.
आम्ही कोकणातील सुमधुर हापुस
आंब्याचा आमरस आता सिलबंद
डब्यातून मागणीप्रमाणे केव्हाही पुरवतो.
आजच संपर्क साधा
**मंगल उद्योग केंद्र**
द्वारा - स्वानंद स्वीटस्.
शिवाय श्रीखंड, चक्का,
फणसपोळी, फरसाण, मिठाई
वगैरेसाठी.
**स्वानंद स्वीटस्**
बाजारपेठ - दापोली (रत्नागिरी)
दूरभाष ८२१७०

शकणार नव्हते. आकाशवाणीचे संचालक श्री. अवधूत हर्डीकर आणि मी महाराजांच्या निवासस्थानी गेलो. येण्याचा हेतू सांगितला. आम्हा वृद्धांपेक्षा तरुण होतकरू संस्कृत विद्वानांचा सत्कार करा असे सुचवून थोड्या नाखुषीने सत्कार स्वीकारला. मात्र परत जाताना 'निदान थोडे दूध घेऊन जा' हे सांगायला ते विसरले नाहीत. गृहस्थाश्रमीचे आतिथ्य तशाही अवस्थेत त्यांनी पाळले. १९९९ साल भारत सरकारने 'संस्कृत वर्ष' साजरे करावे असे सुचवले. या वर्षातही राष्ट्रीय संस्कृत पंडितांचा सत्कार करण्यासाठी यादी केली अग्रभागी पू. दत्तमहाराजांचे नावही टाकले. पण आमच्या नशीबात नव्हता हा योग ! एवढे मात्र खरे !!

आणखीन् एक आठवण, अगदी कौटुंबिक पण महाराजांच्या दयार्द्र मनाची, जिव्हाळ्याची. मार्च १९९३ मध्ये माझा मधला मुलगा अवघ्या सव्वीसाव्या वर्षी, एम.ई. इंजिनियरींगची परीक्षा संपवून पुण्याला परतत असताना मुंबईच्या किडवाई रस्त्यावर ट्रक अपघातात जागीच निधन पावला. आम्हा सर्व कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. सहनशक्तीचा अंत झाला. पुत्र शोकासारखे दुःख नाही याचा अनुभव दुर्दैवाने घ्यावा लागला.

पहिल्याच आठवड्यात एके दिवशी वासुदेवाश्रमातून फोन आला. पू. महाराज सांत्वनाला येणार आहेत. मी आवाक् झालो. एवढा मोठा सत्पुरुष, रीतीरिवाज पाळण्यासाठी एका सामान्याच्या घरी येत आहे. खूप संकोच वाटला. काहीच स्वागत करू शकणार नाही याचे खूप वाईटही वाटले.

महाराज आले. 'दुःख फार मोठे आहे. आपण सूज्ञ आहात. मी सांत्वन करू शकणार नाही. सर्वांना सांभाळा' एवढेच सांगून महाराज परत गेले. जीवनाचा एक महामंत्र सूत्ररूपाने माझ्या मनात त्यांनी कोरला. सांत्वनात वेदान्त कोरडा वाटतो. पण एका वेदान्ती महापुरुषाने केलेला हा व्यवहारी उपदेश मला मोलाचा वाटला. थोडासा धीर आला. १५/२० मिनिटे बसले असताना कृपार्द्र दृष्टीने ते माझ्याकडे पाहात होते. मी कृतकृत्य झालो. तशाही दुःखात मला धन्यता वाटली, महाराजांच्या माझ्यावरील प्रेमाची.

पू. दत्तमहाराज ईशस्वरूपी विलीन झाले. भांडारकर संस्थेच्या द्वारात सर्व संस्कृत पंडितांच्या वतीने मी त्यांच्या कलेवराला पुष्पमाला समर्पित केली. आठवणीचे कढ दाटून आले. पण लोकरीती म्हणून ते गिळावे लागले. धन्य ते दत्तमहाराज. जे मला 'एका अबोल वेदान्ती'च्या रूपात भेटले. मनात कोरून राहिले.

कोकणातील आदर्श संस्था
रूचकर भोजन व उपहार - थंड पेये
**आदर्श उपहार गृह**
फोन - ५२७७६
स्वादिष्ट मिठाई - फरसाण
व्हि. पी. बेडेकर, गिटस् फूडस् चे अधिकृत विक्रेते.
**आदर्श स्वीट मार्ट**
फोन : ५२०५६.
लग्न - मुंजी, धार्मिक सभा - समारंभ, सहलीसाठी उतरण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण.
**डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह**
फोन : ५२२२६
शांत परिसरातील लग्न-सभा-समारंभ तसेच निवासाची उत्कृष्ट सोय.
**आदर्श मंगल कार्यालय**
कळंबस्ते ता. चिपळूण फोन : ५४२२६
**आदर्श केटरर्स**
फोन : ५२२२६
काणे बंधू बाजारपेठ - चिपळूण (रत्नागिरी)

ब्रह्मलीन पं. दत्तमहाराजांच्या स्मृतीस सादर अभिवादन
**हिराचंद परशुराम बुटाला आणि बुटाला परिवारातर्फे**
खेड (जि. रत्नागिरी)

# मण्डिता वसुधा

पं. वा. बा. भागवत



ब्रह्मश्री दत्तात्रेयमहाराज कवीश्वर यांचे निर्वाण काही दिवसांपूर्वी झाले. त्यांचे संपूर्ण जीवन कृतार्थ झाले. बालवयात निष्ठेने शास्त्राध्ययन, नंतर अनेक शास्त्रांच्या शाखोपशाखांचे चिंतन व अध्यापन असा त्यांचा जीवनाचा सरळ मार्ग होता. त्यांचे जीवन म्हणजे गंगाप्रवाहाप्रमाणे प्रसन्न आणि प्रशांत असा सतत प्रवाह होता.

'अप्रियवचनदरिद्रैः प्रियवचनाढ्यैः स्वभाग्यपरितुष्टैः
परपरिवादनिवृत्तैः क्वचित्क्वचिन्मण्डिता वसुधा'

या सुभाषिताचा आदर्श त्यांनी अनेक वर्ष अनुसरला होता. हे वाङ्मय व्रत असून त्याचे परिपालन फारच क्वचित लोक करू शकतात.

ब्रह्मस्वरूप प्राप्त झालेल्या पण्डित कवीश्वर यांच्या जीवनाचे सार या सुभाषितात चपखलपणे नोंदलेले आहे; मनाने वाचेने आणि कृतीने ते कधीही कठोर बोलण्याच्या आहारी गेले नाहीत. त्यामुळे सुभाषितकार म्हणतो की असे जगाला मण्डनभूत क्वचितच आढळतात आणि त्यांचे सत्य आणि प्रिय भाषण ह्याला कुठेही खण्ड पडला नाही. पुढच्या चरणामधे सुभाषितकार म्हणतो 'प्रियवचनाढ्यैः' हे एक वाक्समृद्धीचे विलक्षण निदर्शन आपल्याला आढळेल. गोड बोलणे, हे दोन तऱ्हेने असू शकते. काही लोक स्वार्थ साधण्यासाठी गोड बोलण्याचे वरपांगी नाटक करणारे, आपल्याला जागोजागी आढळतात. परंतु, ते लोक गोड बोलणे हा त्यांचा स्वाभाव नसल्यामुळे त्यांना सुभाषितकार 'प्रियवचनाढ्य' असे म्हणायला तयार नाहीत. कारण 'आढ्य' म्हणजे समृद्ध. आणि समृद्धी ही वरपांगी बोलण्याने येऊं शकत नाही. तसा नाटकीपणा अशा उदारवृत्तीच्या लोकांमध्ये दुरूनही येणार नाही. म्हणून सुभाषितकार, अशा उदार मनाच्या लोकांचे वर्णन 'प्रियवचनाढ्यैः' या चपखल शब्दाने करीत आहे.

मूळ सुभाषितात 'स्वदारपरितुष्टैः' अशी शब्दरचना आहे. मला ती काही अंशी संकुचित वृत्तीची वाटते, म्हणून मी 'स्वभाग्यपरितुष्टैः' असा पाठभेद मुद्दाम योजिलेला आहे. माणसाचा परितोष अनेक तऱ्हेने होत असतो. माणसाला मिळवण्यासारख्या गोष्टींचा संग्रह अनेक सुभाषितांमध्ये केलेला आपल्याला आढळतो. मनुस्मृतीत माणसाने संगृहित करण्यास योग्य आणि पारितोषकारक अशा ५ गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्या अशा -

वित्तं बन्धुः वयः कर्म विद्या भवति पञ्चमी।
एतानि मान्यस्थानानि गरीयो यद्यदुत्तरम् ॥

अतिशय विचारपूर्वक हा मिळवण्यास योग्य गोष्टींचा संग्रह या श्लोकात दिलेला असून, त्यांचा क्रमही अगदी थोडक्यात पण स्पष्ट सांगितलेला आहे. माणूस जे जे मिळवण्याचा प्रयत्न करत असतो, ते क्वचित्प्रसंगी त्याला जमते क्वचित्प्रसंगी त्याला जमतही नाही. ज्यावेळी जमते त्यावेळी तो संतुष्ट होतो, पण क्वचित्प्रसंगी जमले नाही तर तो उद्विग्न होतो. गीतेमध्ये 'न प्रहृष्येत्प्रियंप्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम्' असे स्थिरबुद्धी म्हणजे स्थितप्रज्ञ माणसाचे वर्णन केलेले आहे. प्रियविषय मिळाला नाही तर उद्विग्न होणे, हा सामान्य माणसाचा स्वभाव आहे. पण ज्याची बुद्धी स्थिर झालेली आहे, तो तशाही स्थितीत उद्विग्न होत नाही. तो मनाचा परितोष कायम राखतो म्हणून सुभाषितकार 'स्वभाग्यपरितुष्टैः' असा शब्द बुद्धिपुरस्सर योजतो. आपल्या वाट्याला जे अनुकूल, प्रतिकूल असे भाग्य आले असेल ते मनाच्या समतोलपणाने स्वीकारून आपले कर्तव्य पार पाडणे हा 'स्वभाग्यपरितुष्टैः' या विशेषणाचा अभिप्राय आहे.

त्याच्यापुढचे विशेषण हे अतिशय महत्त्वाचे आहे. माणूस बोलताना बहुधा तोल सांभाळू शकत नाही आणि त्यामुळे शब्दाने शब्द त्यातून अपशब्द आणि त्यातूनच मोठमोठ्या कलहाची बीजे उत्पन्न झालेली, आपण अनेक प्रसंगी पाहतो. त्यात सामान्य व्यक्तीपासून मोठमोठ्या राष्ट्रांचाही सारखाच वाटा, आपल्याला आढळतो. त्यामुळे 'निंदा' हा जो माणसाला जडलेला भयंकर रोग आहे त्यापासून जर व्यक्तीला किंवा समाजाला किंवा राष्ट्राला वाचवायचे असेल, तर निंदेची स्वाभाविक प्रवृत्ती मुळातच खोडून काढली पाहिजे. ज्यायोगे विचारी माणूस निंदेपासून पूर्ण दूर राहील, एखाद्यावेळेला माणूस वर दिलेल्या विशेषणांचे काटेकोर पालन करू शकेलही परंतु हे चवथे विशेषण, त्याचे पालन करणे, हे फार अवघड आहे. कारण लाकडावर लाकूड घासले, की काहीतरी ठिणगी पडणार तसे, माणूस कितीही संयमी असला तरी सहजासहजी बोलताना, चेष्टेने, विनोदाच्या आहारी जाऊन, एखादा तरी शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडतो आणि मग तेथून भडका व्हायला वेळ लागत नाही, म्हणून दुसऱ्याची निंदा यापासून माणूस जर दूर राहील तर त्याचे आणि त्याच्याबरोबर समाजाचेही कल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही.

तेव्हा या ४ विशेषणांनी आदर्श, स्वच्छ जीवन सुभाषितकाराने मांडले आहे. शतकानुशतके सर्व साधुसंतांनी त्यापासून बोध घेतला आहे. चालू जमान्यातही अशा तऱ्हेचे आदर्श जीवन जगणारे जे साधुसंत झाले, त्यामध्ये दत्तमहाराज कवीश्वर हे आपल्या सुदैवाने अनेकांना मार्गदर्शन करून कृतकृत्य झाले. त्यांच्या ह्या आदर्श स्वच्छ, प्रवाही जीवनाचा आदर्श सर्वांनी अनुसरावा, आणि आपलेही जीवन कृतार्थ करावे ही इच्छा प्रकट करून, ही छोटीशी श्रद्धांजली मी पूर्ण करीत आहे.



# विदेही दत्तामहाराज

द. रा. वाडीकर

दूरदर्शनवर वृत्त निवेदिकेने संस्कृत पंडित श्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांचे निधन झाल्याची बातमी दिली. आपला आधार नाहीसा झाल्याची जाणीव होताच मनाची उभारी गेली. दुःखद गोष्ट स्पष्ट दिसत असूनही न स्वीकारण्याची मनाची खोड मी जाणून होतो. श्री गुरुजींच्या निर्वाणाची बातमी दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळपर्यंत घरी बोललो नाही.

बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाशी संबंध येण्यापूर्वीपासून श्री गुरुजींना नामा-रूपाने ओळखत होतो. श्री गुरुजींच्या गावी म्हणजे नरसोबावाडीत मी लहानाचा मोठा झालो. एकोणतीसशे सदतीस साली ते पुण्यात आले, तथापि ते निरनिराळ्या कारणांनी वाडीला येत असत. सारे जण त्यांना दत्ताशास्त्री कवीश्वर म्हणत. काही वृद्ध माणसे 'कवीश्वरांचा दत्ता' म्हणत. श्री गुरुजींच्या वडिलांना सारे गाव महाराज म्हणे. गाव केवढे ? शे-दीडशे घरांचे. गावात वडिलांबरोबरचे सारे काका व सारी वृद्ध मंडळी आजोबा. त्यातून महाराज फार प्रेमळ. मुलांच्यावर त्यांचा फार जीव. सारी मुले त्यांना नातवंडेच. महाराज लहानमोठ्यांना कसे सांभाळून नेत याची माझ्याशी संबंधित अशी एक घटना आहे. महाविद्यालयीन शिक्षण झाल्यावर बासष्ट त्रेसष्ट साली एक वर्षभर मी वाडीत राहात असे. त्या काळात गीता, गणपती अथर्वशीर्ष यांची संथा मुलामुलींना देत असे. गावातल्या काही लोकांनी अथर्वशीर्षाची संथा मुलींना देण्यावर आक्षेप घेतला. माझ्या अपरोक्षच महाराजांनी माझी बाजू घेतली. मूळ संहिता संधी सोडवून शिकवीत असल्याने आक्षेपाचे कारण उरत नाही, असे त्यांनी पटवले. नव्यांना सामावून घेणारे, जुन्यांना समजवणारे अशा मोठ्या मनाचे होते महाराज. कोल्हापूर-भूषण श्रीपाद शास्त्री जेरे, अमळनेरच्या अध्यात्म मंदिराचे आत्माराम शास्त्री जेरे, साताराचे न्यायाचार्य काशीनाथ शास्त्री जोशी, न्यायरत्न नारायण शास्त्री वाडीकर, श्री दत्तामहाराज कवीश्वर ही सारी मंडळी बाहेर खूप मोठी होती. पण वाडीतल्या लहान थोरांना ती आपल्या घरचीच माणसे होती.

शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्रेपन्न साली महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे म्हणून पुण्यात आलो. एका मोठ्या माणसाने सर्व प्रकारच्या साहाय्याचे आश्वासन दिले होते पण त्यांना ते शक्य झाले नाही. निराधारतेने पुरता घेरून गेलो. या अंधेऱ्या क्षणी माझ्या प्रारब्धातील कर्मांशाने असे काही भाग्यशाली वळण घेतले की बोलता सोय नाही. दत्तामहाराजांच्याकडे जायचे अशी बुद्धी झाली. त्या क्षणीच्या सद्बुद्धीच्या शुभंकरत्वाची मर्यादा केवळ या जन्मापुरतीच सीमित नाही अशी माझी श्रद्धा आहे. फारसे काही बोलावेच लागले नाही. म्हणाले, 'आज संध्याकाळपासून विद्यापीठात (टि.म.वि.) राहण्याची व्यवस्था होईल. थोडे संस्कृत शिकावे लागेल. राहण्याजेवण्याची सोय टिकवून ठेवण्याइतपत संस्कृतचा अभ्यास करून महाविद्यालयीन शिक्षणही घेता येईल.' नव्या पिढीचे मन ते जाणत होतेच. माझ्या जेवणाची व्यवस्था व्हावी म्हणून त्या अपरिग्रही योग्याने काही श्रीमंतांचे उंबरठे ओलांडले. ही घटना न घडती तर काय झाले असते याचा आज विचारही करवत नाही.

चोपन्न ते साठ या काळात मी विद्यापीठात राहात होतो. परिचय प्रवेश अशा काही प्राथमिक परीक्षा दिल्यानंतर व्याकरणाचार्य श्री. भागवत गुरुजींच्याकडे प्रथम थोडे व्याकरणाचे अध्ययन झाले व नंतर श्री दत्तामहाराजांकडे वेदान्ताच्या काही ग्रंथांच्या अध्ययनाचे सद्भाग्य लाभले. व्याकरण व वेदान्त यांची तोंडओळख होण्यापलीकडे माझ्या अध्ययनाची सीमा विस्तारली नाही.

याच काळात स. प. महाविद्यालयातून तत्वज्ञानाचा पदवीधर झालो. श्री दत्तामहाराज जिथे अध्यापन करीत त्या खोलीत आम्ही केव्हाही गेलो की एक गोष्ट नेहमी नजरेत भरे, ती म्हणजे ते ध्यानावस्थेत खोल बुडालेले असत. श्री गुरुजींच्या त्या अवस्थेतल्या दर्शनाचे मर्म आज काहीसे उकलते. 'तदाकार हे वृत्ती नाही स्वभावे । म्हणोनि सदा तेचि शोधीत जावे' या वचनाचा त्यांचे सारे जीवन हा वस्तुपाठच होता. घरी दारी रस्त्यावर कुठेही पहा, त्यांची आत्मधुंद अवस्था चेहऱ्यावर उमटलेली असे. साधना, साधना आणि साधना हेच दत्तामहाराजांचे जीवन होते. साधनेत लाभलेल्या यशानेच त्यांना एवढी प्रसिद्धी विन्मुखता पेलली. ईश्वरभावात ते रमून गेले होते. दुसरे रमणमहर्षीच. संसारी होते म्हणून अंगावर धोतर उपरणे होते इतकेच. शुचितेची ते केवळ मूर्तीच होते. अलीकडेच नव्वदसाली नाशकात दशपुत्रे यांच्याकडे आलेले असताना त्यांना भेटावे म्हणून गेलो. सकाळची वेळ होती. महाराजांचे स्नान झाले होते. चौपायीवर, त्यांना दिलेल्या खोलीत बसलेले होते. नमस्कार केला व खाली बसून राहिलो. तेही शांत बसून होते. निःशब्द भेट. निघायच्या वेळी नमस्कार केल्यावर प्रेमपूर्ण नजरेचे पांघरूण घालीत म्हणाले, 'आम्ही उद्या निघणार.' शान्तिसागर होते महाराज.

माझ्या तीनही कन्यांच्या विवाहाला अत्यंत आत्मीयतेने उपस्थित राहिले. वडील वाडी सोडत नसत. वडिलांची जागा त्यांनी भरून काढली. वैखरीने त्यांच्यासमोर कृतज्ञता व्यक्त करणे अशक्यच असे म्हणून कधी कधी मी ती पत्रातून व्यक्त करी. पत्रोत्तरातून आशीर्वादांचाही लाभ व्हावा अशी सुप्त असे. पत्र गेले की त्याला उत्तर येईच. पण त्यांचे जे येई त्यात अशीच शब्दयोजना असे की त्यातून प्रेम व आदरच प्रगट व्हावा व अगदी रूढीच्या आश्रयानेही, अप्रत्यक्षपणेही त्यांचा मोठेपणा, त्यांची ज्येष्ठता प्रकट न व्हावी. 'सप्रेम सादर स्मरण निवेदन' अशी त्यांच्या पत्राची सुरूवात असे. अलीकडेच बा.मु.सं.म. आद्यसतीर्थ्य संघाचे एक अधिवेशन इचलकरंजीला सम्पन्न झाले. श्रीगुरूजींचा भागवत सप्ताह झाला. निपाणीचे प्रा. जोशी, सोलापूरचे राजाभाऊ जोशी इत्यादी प्रमुख मंडळी होती. सवड काढून आवर्जून अमरवाडीला गेलो. देवालयाच्या परिसरात नारायण स्वामी महाराजांच्या मठासमोरील कट्ट्यावर श्रीगुरूजी बसले होते. भागवत पुराणांचा महिमा मी केवळ ऐकून होतो. इचलकरंजीला श्रीगुरूजी भागवत सांगणार असे ऐकले होते. श्रीगुरूजींनी भागवत सप्ताहाला त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून सुरूवात केली होती. म्हणजे सव्वीस सालापासून नव्वद सालापर्यंत म्हणजे पासष्ट वर्षात त्यांनी किती वेळा भागवताचे सप्ताह केले असतील. ज्ञानाला जशा सीमा नसतात तसे अज्ञानही असीम असते. मी त्यांना विचारले, 'इचलकरंजीला तुम्ही भागवताचे विवेचन करणार आहात का ?' ते शांतपणे म्हणाले, 'त्यांना संस्कृत येते ते करतील.' चोपन्न ते साठ या सालात त्यांना जे सन्मान प्राप्त झाले व त्यावेळी यांचे जे सत्कार झाले ते पाहाण्याचेही भाग्य मला लाभले होते. त्या सर्व प्रसंगी ते असेच अलिप्तच हाते. त्यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्याचे वेळीही 'पूज्याचा डोळा न पाहावी । स्वकीर्ती कानी न ऐकावी' या वचनांशी, चाललेले हे सारे कितपत सुसंगत आहे, असा विचार करून त्या सर्वांपासूनची आपली अलिप्ततातच त्यांनी प्रगट केली. वामननिवास, अमरापूर क्षेत्र विकास ही मोठी कामे अशीच जणू काही त्यांच्या शुभ संकल्पाने परस्पर संपन्न केली. कर्तृभावाचा त्यांना कधी स्पर्शच झाला नाही. कोणी कृतज्ञता व्यक्त केल्यास 'प्रभुकृपे पोटीच ही सर्वांची आत्मीयता लाभली' असे सांगून संभाव्य देहबुद्धीचा निचरा करीत.

दत्तामहाराज आता देहरूपात दिसणार नाहीत हे मान्य करायला हवे. काळजी घेणारे माणूस आहे म्हटल्यावर त्यांच्या सांगण्याबोलण्याकडे काहीसे दुर्लक्ष होते. पण आता



समारंभाची शान
पार्टीचा मान
रत्नागिरी शहरात उत्कृष्ट प्रतीचे

चंदा
आईस्क्रीम

मिळत असताना इतर
आइस्क्रीमांचा शोध कशाला ?

रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील
एकमेव प्रसिद्ध 'चंदा आइस्क्रीम'
सर्वत्र उपलब्ध.

'सुयोग', टिळक आळी,
रत्नागिरी
दूरध्वनी २८३५७


KDS मोनोब्लॉक
● १ ते २० एच पी
● कमी व्होल्टेजवरही उत्कृष्ट कामगिरी करणारा एकमेव पंप

❀ हजर स्टॉकमध्ये उपलब्ध ❀
❀ उत्कृष्ट विक्रीपूर्व तसेच
विक्रीपश्चात् सेवा ❀

किर्लोस्कर
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे - ४११००२.
रिजनल ऑफिस : किर्लोस्कर पेरा कंपाऊंड
वीर सावरकर नगर, पुणे - ४११०३७
फोन ४६७९९४

Gram : RIPUBLIC.
Phone : 421473 Fax : 0831-430842
RE-PUBLIC MACHINERY
CORPORATION
Kadolkar Galli, Belgaum - 590 002

*Authorised Distributors*
*(Belgaum District)*
*for Kirloskar Products.*



बेळगाव शहरात मध्यवर्ती, रेल्वे स्टेशन व
बस स्टॅण्डजवळ प्रशस्त लॉजिंग, बोर्डिंग
व रेस्टॉरंट

मीनाक्षी भुवन
रुचकर पदार्थ, स्वच्छता, टापटीप, विनम्र सेवा
दूरध्वनी : ४२०३२१

मीनाक्षी लॉज
- आरामशीर, आधुनिक सोयी,
स्वादिष्ट भोजन, विनम्र सेवा
दूरध्वनी : ४२२७३४

मीनाक्षी मेडिकल्स
औषधांचे विक्रेते. दूरध्वनी : ४२२७३४

मीनाक्षी स्टोअर्स
सर्व तऱ्हेच्या स्टेशनरी सामानाचे विक्रेते
दूरध्वनी : ४२२७३४
स्टेशन रोड, बेळगाव




ते नाहीत म्हटल्याबरोबर ते जसे जगले, जे काही बोलले त्याकडे ध्यानपूर्वक लक्ष देण्याची गरज निर्माण झाली. आपल्या हयातीत अनेकांच्या लौकिकांची पायाभरणी करून आपल्या कृपादृष्टीने ज्यांनी अनेकांना सांसारिक जबाबदारीतून मुक्त केले त्यांना दुस्तर अशा पारमार्थिक प्रवासात महाराज थोडेच वाऱ्यावर सोडतील. त्यांच्या शुद्ध जाणीवेशी एकरूप होऊन प्रेरणा संपादनासाठी जे साधक प्रयत्न करतील त्यांना ते पदोपदी सहाय्य करतील. त्या साहाय्याला काही मर्यादा नसते. साधकांच्या बुद्धीवरील मळ धुवून निघेल अशी संधींची उपलब्धी अनाकलनीय मार्गाने करून देण्याची त्यांची पद्धती आहे. प्रसंगी बुद्धी थोडी भरकटली तरी आपल्या कृपेने पुन्हा मार्गावर आणण्यास ते समर्थ आहेत. सद्गुरूंचे विस्मरण हे जाणीव विकसनाच्या मार्गातील मरणच असे त्यांना वाटे. सद्गुरूंच्या नामस्मरणाने ईश्वरभाव जाणीवेत दीर्घकाल निरंतर भरण्याने तो तीत मुरत जावून ती शुद्ध शुद्धतर होत जाते. प्रारब्धानुसार ज्याचा ज्या ईश्वरी रूपाशी अनुबन्ध असेल त्या रूपाचे विस्मरण होऊ नये यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांची पत्रे अल्पाक्षर, असंदिग्ध व सारवत् असत. पत्रात प्रसंगानुरूप इतर काही असले तरी एक गोष्ट पुन:पुन: असे. 'श्रीदत्तप्रभूच्या कृपेने त्यांच्या पूज्य कुलात आपण आलेले आहात. त्यांची कृपा आपल्या वंशावर आहे. हे भाग्य आहे.' (पत्र २/६/९२) 'आपणांवर वंशपरंपराच श्री दत्तप्रभूंची कृपादृष्टी 'आहे.' (पत्र ३/५/९३) ईश्वरांशी असलेल्या या अनुबंधाची आठवण देऊन ईश्वराभिमुखता वाढावी यासाठी जणु काही विनवणीच ते करीत. एका बाजूला ईश्वराविषयीचे आत्यंतिक प्रेम तर दुसऱ्या बाजूला आत्मीयांच्या कल्याणाची कळकळ यातून त्यांचा ठिकाणी हा नम्रभाव उमलला. वस्तुत: दत्तामहाराज केवढे मोठे! योगियांच्या घरी जन्म. सर्व शास्त्रे त्यांच्या अभ्यासाला आलेली. शक्तिपातदीक्षा पीठाचे ईश्वर. श्रेष्ठ साधक व सिद्ध पुरुष पण आपल्या माणसांच्या साठी माऊलीसारखे मऊ. दत्तामहाराजांच्या या निरपेक्ष प्रेमाचे उतराई होणे एकतर शक्य नाही हे [illegible] तथापि अंशात्मक उतराई होण्यासाठी जितकी जमेल तितकी ईश्वराभिमुखता वाढविणे हाच मार्ग आहे. महाराज माझ्या ठिकाणची भक्तिमार्गातील गाढ अनभिज्ञता जाणून होते. म्हणून त्यांनी लिहिले आहे की, 'वंशप्राप्त ईशसेवा घडेल तशी चालू ठेवावी.' त्याचबरोबर संतांच्या मार्गाचे अनुसरण करावे हेही मोठ्या प्रेमपूर्वक सुचवताना त्यांनी म्हटले. 'सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वांमुखी मंगल बोलवावे' असा संतांचा सक्रिय आदेश स्थिरसुख संधायक आहे. श्रीगुरुजींच्या जीवननिष्ठेने त्यांच्या छोट्या मोठ्या अनुयायांच्या अंत:करणाचा कब्जा त्यांच्या हयातीतच घेतलेला होता. त्यांच्या साऱ्या व्रतस्थ जीवनाची पुण्याई त्यांच्या सांगाव्याच्या पाठीशी होती व आहे. त्यांच्या देहाच्या पिंजऱ्यातून मुक्त झालेली जाणीव आता अधिकच प्रभावाने कार्यरत होईल. ईश्वराशी असलेल्या अनुबंधाचे धारण पोषण व संवर्धन जाणीवपूर्वक करीत राहून प्रभुकृपेला पात्र होण्याची आपली पात्रता वाढविणे हीच त्यांना श्रदधांजली ठरेल.

हरीश कॉटेज, पंजाबी कॉलनी,
नाशिक रोड.

धर्मभास्करच्या वर्षारंभ विशेषांकास आमच्या
हार्दिक शुभेच्छा

**भारत एजन्सीज्**

लक्ष्मी चौक, रत्नागिरी
दूरध्वनी २२७२९



**अधिकृत विक्रेते**

गोदरेज अँड बॉईज कंपनीचे स्टील फर्निचर
कपाटे, तिजोऱ्या, टाईपरायटर्स, कुलुपे इत्यादी.
गोदरेज, जी. ई. ॲप्लायन्सेस कंपनीचे
रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, एअरकंडीशनर्स इ.

# चालते बोलते ब्रह्म : पू. कवीश्वरगुरूजी

**- वसन्त दिगम्बर नेने**

१९४८ मध्ये इंदूरच्या संस्कृत महाविद्यालयातून पुण्यात नवीनच सुरू झालेल्या (बालमुकुन्द) संस्कृत महाविद्यालयात मी गेलो त्यावेळी माझ्या जीवनात एकदम किती बदल होणार आहेत याची मला कल्पनाही नव्हती. इंदूरचे जीवन अगदी संथ होते तर पुण्याचे नेहमी गतिमान ! इंदूरात व्याकरणाचार्य पं. टिल्लूशास्त्रीजींकडे एक तास लघुसिद्धांतकौमुदीचा अभ्यास झाला की मग दिवसभर मन मानेल तशी भटकन्ती करत राहावे. तेच पुण्यास आल्यावर शास्त्रप्रथमेच्या वर्गात दाखल झाल्याबरोबर ऐच्छिक व्याकरणाच्या अभ्यासाशिवाय आवश्यक न्यायमीमांसा वेदान्त या विषयांचाही अभ्यास होता. त्याशिवाय आम्हा नवीन आलेल्या विद्यार्थ्यांच्या तृतीया परिचय आदि परीक्षाही झालेल्या नव्हत्या म्हणून तृतीयेच्या वर्गालाही जावे लागे. अशाप्रकारे सकाळी व दुपारीही वर्ग आणि सायंकाळी गीतापाठ या सर्वात दिवस कसा निघून जात असे ते कळतही नसे. त्यात दिलासा थोडाबहुत मिळायचा तो वेदान्ताच्या पू. कवीश्वर गुरुजींच्या वर्गामध्ये. त्यांची धीरगंभीर मूर्ती पाहून व शांत सावकाश बोलणे ऐकले की चित्त शांत व्हावयाचे. कठिण विषयही सोपा करून सांगावा तर पू. कवीश्वर गुरुजींनीच. तसेच बाकीच्या वर्गात आदरयुक्त दरारा होता. त्याचीही झळ त्यांच्या वर्गात लागायची नाही. म्हणजे त्यांचेबद्दल आदर ओतप्रोत होता पण तो भीती उत्पन्न करणारा नव्हता तर कुतूहल निर्माण करणारा होता.

पू. कवीश्वरगुरुजी त्यावेळी कन्याशाळेसमोरील एका घरात दुसऱ्या मजल्यावर राहायचे तेथेही मी बऱ्याचवेळा गेल्याचे मला आठवते. मी व श्रीपाद (पू. कवीश्वर गुरुजींचा अनुज) बरोबरच इंदूराहून पुण्यात गेलेलो असल्याने मला पू. कवीश्वरगुरुजींवर जास्त हक्क वाटायचा. शास्त्रप्रथमेपासून व्याकरण विशारद उत्तीर्ण होईपर्यंत पाच-सहा वर्षे मला पू. कवीश्वरगुरुजींचे सान्निध्य लाभले व त्यामुळे चित्तवृत्ती स्थिर ठेवून प्रत्येक गोष्टीकडे बघायची सवय लागली.

पुढे संस्कृताध्ययन सोडून मी सायन्स कॉलेजमध्ये गेलो व कॉलेजात चार वर्षे काढल्यावर रेल्वे सेवेत गेलो व वेगवेगळ्या प्रांतात त्या निमित्ताने निवास झाला पण १९८४ च्या आसपास आमचे त्यावेळच्या सहाध्यायांचे वार्षिक संमेलन सुरू झाले व दरवर्षी आम्ही भेटू लागलो. तेव्हा पुन्हा पू. कवीश्वरगुरुजींच्या सान्निध्याचा लाभ मिळाला. इचलकरंजीला त्यांचेकडून भागवतातील कित्येक आख्याने ऐकावयास मिळाली. त्यांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या सोहळ्यासही उपस्थित राहता आले. आता जरी त्यांना सर्वजण पू. दत्तमहाराज म्हणून संबोधित असले तरी आमच्याकरिता ते पू. कवीश्वरगुरुजीच होते. केव्हाही पुण्यात जाणे झाले तर त्यांचे दर्शन घेऊन पावन झाल्याशिवाय राहावयाचे नाही. आता त्यांच्या अदर्शनाने फार मोठी उणीव निर्माण झाली आहे. श्रेष्ठ व्यक्ती जर ती तत्त्वज्ञान अथवा अध्यात्माचा क्षेत्रातील असेल तर त्या व्यक्तीस स्वर्गवासी झाल्यावर ब्रह्मीभूत असे विशेषण लावतात. पण आमचे पू. कवीश्वरगुरुजी जीवंतपणी चालते-बोलते ब्रह्मच होते.

त्यांच्या स्मृतीस सहस्रशः प्रणाम.

१५५, लोकमान्य नगर, इंदूर ९


## धरमपेठ गृह निर्माण सहकारी संस्था म.

८९, सी, रामनगर, नागपूर १०

स्थापना : १९५५ दूरध्वनी : ५३२८९६

**नागपूर शहरात नवीन घर बांधणे, जुने घर दुरुस्त करणे, घर/गाळा विकत घेणे यासाठी सुलभतेने अर्थसहाय्य करणारी अग्रगण्य गृहनिर्माण संस्था**

मुदत ठेवी खालील दराने स्वीकारतो.

वर्ष १ - ११% ३ वर्षे - १३%

वर्ष २ -१२% ५ वर्षे - १४%

५ वर्षे ३ महिन्यात दामदुप्पट

पु. के. रुक्मांगद - अध्यक्ष भा. धुं. घाटे - कार्यवाह

# तीर्थरूप दादा

**पं. श्री. धुं. कवीश्वर**




**'अण्णा' खाऊचे घर**

म. गांधींच्या दुर्दैवी व आत्यन्तिक दुःखद निधनानंतर, संपूर्ण देशभर, विशेषतः दक्षिण महाराष्ट्रात स्वाभाविक प्रचंड जनक्षोभ निर्माण झाला. देशहितापेक्षा पक्षस्वार्थाला प्राधान्य देणारे तत्कालीन सत्ताधीश व त्यांचे समविचारी नेते, या दुर्लभ संधीचा लाभ न घेते तरच नवल ! त्या नेत्यांच्या अविचारी व 'सत्यमेव जयते' या ब्रीदाला कलंकस्वरूप अशा प्रक्षोभक भाषणामुळे, त्या जनक्षोभाच्या आगीवर तेलच ओतले गेले. त्याचा परिणाम, हिंदुत्वनिष्ठांची, (उदा. भालजी पेंढारकर) राष्ट्रिय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांची व ब्राह्मणांची (यातून कॉंग्रेसवाले ब्राह्मणही सुटले नाहीत !) घरे-दारे जाळण्यात झाला ! या भयानक जाळपोळीचा उच्चांक ज्या गावात झाला, ते गाव म्हणजे त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानातील कृष्णा-पंचगंगा संगमावरील पवित्र व जागृत तीर्थक्षेत्र असलेले, सुमारे शंभर ब्राह्मण कुटुंबांचे आधार असलेले नृसिंहवाडी (नरसोबावाडी) हे गाव होय.

श्रीनृसिंह सरस्वतीस्वामींच्या (श्रीदत्तात्रेयाचे अवतारस्वरूप) कृपाप्रसादाने देवस्थानाकडील धार्मिक कार्याचे वंशपरंपरागत अधिकार प्राप्त झालेल्या पुजारी मंडळींची (जेरे, ऋक्के अशी आडनावे यांचीच) घरे, या नरसोबावाडीत सर्वाधिक. कवीश्वर घराण्याचेही एक मोठे घर (सध्या नवीन स्वरूपात ते विश्वस्तांच्या ताब्यात आहे ) नरसोबावाडीमध्ये अगदी कृष्णा नदीच्या काठावर आहे. नृसिंहवाडी ही कवीश्वर-घराण्याची उपासनाभूमी वा देवसेवाभूमी होती. कवीश्वराकडे, भक्तमंडळी असलेल्या पाहुण्यांची सतत वर्दळ असे. अशा या भक्तमंडळींना त्यांच्या इच्छेनुरूप धार्मिक कार्यासाठी पुजारी-मंडळींकडेच पाठवले जाई. उपजीविकेसाठी म्हणून देवाकडील धार्मिक कार्य तशी पात्रता असूनही - कवीश्वरमंडळींनी कधीही केले नाही. पण असे असूनही, 'आपले गिऱ्हाईक जाईल' या कल्पनेने, कवीश्वराकडे उतरू इच्छिणाऱ्या भक्तमंडळींना, काही धंदेवाईक पुजारी, 'दोन वर्षे झाली. सध्या कवीश्वरांपैकी कोणीही वाडीत नाहीत...' अशा थापा मारून स्टँडवरून परस्पर आपल्याकडे ओढीत असत. मग पालखीच्या वेळी देवाच्या कट्ट्यावर, धुंडिराजमहाराजांची व त्या भक्तमंडळींची प्रत्यक्ष भेट झाल्यावर, धंदेवाईक पुजारीपणाची लबाडी उघडकीस येत असे.

कवीश्वरांची पुराण-प्रवचनाद्वारा उपजीविकेची भूमी विदर्भ-मराठवाडा ही होती. मोठ्या प्रमाणातील भक्तपरिवार हा तिकडचाच आहे.

अशा या नरसोबावाडीत, म. गांधींच्या वधानंतर दुसऱ्या दिवशी, जाळपोळीचा उच्चांक ठरलेल्या 'पवित्र' कार्यास सुरूवात झाली. गणा काकतकर, मधु घाटे, संत मास्तर अशा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांची घरे जाळण्यास अग्रक्रम देण्यात आला. या बाबतीत जाळपोळ करणाऱ्या जनसमूहाच्या नेत्यांना, अचूक मार्गदर्शक लाभले, ते आमच्याच समवयस्क समाजवादी (संघविरोधी) ब्राह्मण मित्रांचे ! तीनही गल्ल्यांमध्ये आगडोंब उसळलेला. आता राहिले, दिगंबर, वासुदेव, श्रीपाद व गजानन (हे चारीही दत्तमहाराजांचे धाकटे बंधू) या संघीयांचे (कवीश्वरांचे) घर.

कवीश्वरांचे घरात, त्यावेळी आमच्या गं.भा. आजी (आईची आई. त्यांना आम्ही 'मावशी' म्हणत असू.) व पाहुण्या म्हणून देवसेवेसाठी आलेल्या श्रीमती इनामदार अशा दोघीच होत्या. भयभीत होऊन दारास आतून कडी लावून त्या बसल्या होत्या. दारावर कुऱ्हाडीचे घाव बसू लागले. 'गुमान दार उघडा. फुकट जळून मराल...' धमकीचे आवाज घुमू लागले.

तेवढ्यात तेथे पाच-पन्नास मुले आली. 'अहो, हे घर जाळू नका, अहो हे घर 'अण्णाखाऊ'चे आहे हो !...' ही बालकांची आक्रोश-विनवणी चालू असताना जाळपोळ करणाऱ्या समूहाचा नेता, शिरोळचे श्री. लाला पाटील आले. त्यांनी आक्रोश करणाऱ्या बालकांना धीर दिला व आपल्या जाळपोळ करणाऱ्या अनुयायींना परत जाण्यास सांगितले. शेजारच्या समोरच्या घरांना आगी लावलेल्या. पण हे कवीश्वरांचे घर मात्र, त्या जाळपोळीचा उच्चांक असलेल्या आगडोंबातून वाचले ! कारण ते कवीश्वरांचे घर, शिरोळच्या पाटील घराण्याचे वंशपरंपरागत श्रद्धास्थान होते व विशेषतः वाडीतील समस्त बालवृंदाचे ते 'अण्णाखाऊ'चे हक्काचे गोड गोड घर होते !

शिरोळच्या लाला पाटलाने आमच्या आजीस (मावशीस) प्रणाम करून धीर दिला. क्षमा मागितली. इतकेच नव्हे तर, शिधा पाणी देऊन परगावाहून पुरुष मंडळी येईपर्यंत आठ दिवस जागता पहारा ठेवला ! ज्यांनी इतरांची घरे जाळण्यात पुरुषार्थ/धन्यता मानली, त्यांनीच कवीश्वरांचे घर जाळण्यापासून वाचविण्यात आपली कर्तव्यनिष्ठा मानली ! असा हा कवीश्वर घराण्याचा एक महिमा !

आता अण्णा खाऊ ! हा काय प्रकार आहे ? वाडीला देवसेवेसाठी शूद्र, ब्राह्मण, संन्यासी असे अनेक प्रकारचे

साधक, सेवेकरी राहात असतात. त्यांचे उपजीविकेचे साधन म्हणजे माधुकरी मागणे. देवाकडची महापूजा झाली की, सुमारे दुपारी एक वाजता ही सर्व साधक-सेवेकरी मंडळी, ब्राह्मणांच्या घरी माधुकरी मागण्यास निघतात. (असे हे अन्नदान हे वाडीचे एक वैशिष्ट्य आहे.) शूद्र सेवेकरी, ब्राह्मणाच्या दारापुढे उभे राहून 'श्रीगुरूदेव दत्त' असा माधुकरीचा परवलीचा शब्द उच्चारतो. भाताची मूद, चतकोर भाकरी/पोळी अशी माधुकरी त्या स्त्री-पुरुष सेवेकऱ्याला मिळते. क्वचित काही कालवणही मिळते.

ब्राह्मण सेवेकरी 'ओं भवति भिक्षां देहि' असे म्हणतो, तर संन्यासी 'नारायण, नारायण' असा उच्चार करतात. सन्याशाला माधुकरीसाठी एखादेच घर पुरते. कारण त्यांना एका पत्रावळीत पर्याप्त असे संपूर्ण जेवण (एकप्रकारे पर्याप्त राइस प्लेटच) मिळते. इतर सेवेकऱ्यांना मात्र भर उन्हात अनवाणी अनेक घरी जावे लागते.

असे हे, शूद्र, ब्राह्मण व संन्यासी वाडीतील माधुकरी मागणाऱ्यांचे मुख्य तीन प्रकार आहेत. पण, वाडीतील आणि तौही फक्त कवीश्वर घराण्याचे वैशिष्ट्य असलेला असा एक प्रकारे माधुकरीचाच प्रकार आहे आणि तो म्हणजे 'अण्णा खाऊ' हा होय. या 'अण्णा खाऊ' माधुकरीच्या प्रकाराला काळ-वेळ नाही. इतर माधुकरी प्रकारांना, महापूजा झाल्यावर दुपारी सुमारे एक ते दोन (फक्त एकदाच) ही मर्यादा तरी आहे. पण. 'अण्णा खाऊ' ला काळवेळेची कोणतीच मर्यादा नाही.


आमचे आजोबा वक्रतुंडबुवा तथा अण्णा

आमचे आजोबा 'वक्रतुण्डबुवा' यांची 'अण्णा' या टोपण नावाने सर्वत्र प्रसिद्धी होती. हे 'अण्णा' लहान मुलावर फार प्रेम करीत. त्यांना गोडधोड असा खाऊ देत असत. त्यामुळे 'अण्णा खाऊ' म्हणजे एक प्रकारे लहान मुलांची ती वाडीतील काळवेळ नसलेली एक प्रकारची माधुकरीच होती. पाच-दहा मुलांचे (यात मुली नसत.) टोळके, केव्हाही कवीश्वरांच्या दारात येई व 'अण्णा खाऊ' म्हणून मोठ्या आवाजात उच्चार करीत असत. मग कधी ती. महाराज (आमचे वडील धुंडिराज. यांना आम्ही मुले बाबा, तात्या वगैरे न म्हणता, इतरांप्रमाणे 'महाराज' असेच म्हणत असू.) तर कधी सौ. आई, शेंगदाणे, चिरमुरे वगैरे जो पदार्थ असेल तो 'अण्णा खाऊ' मागणाऱ्या मुलांच्या हातावर ठेवीत असे. मुले एकदम खूष ! (हा खाऊ घेण्यासाठी मीही लहानपणी, त्या टोळक्यात गुपचूप सामील होत असे. तोंड न दाखवता, फक्त चिमुकला हात पुढे करणारा हा मुलगा कोण, हे लक्षात येताच, ती. महाराज (आमचे वडील) हळूच मला आत ओढून सौ. आईच्या ताब्यात देत असत.)

'अण्णा खाऊची' एक विशेष गंमत. स्टँडवर मोटारीतून पाहुणे उतरले की, ही मुले त्या पाहुण्यांना कोठे जावयाचे आहे असे विचारीत. कवीश्वराशिवाय इतर कोणाचे नाव आले, की ते त्या पाहुण्यांकडे ढुंकूनही पाहावयास तयार नसत. पण त्या पाहुण्याकडून 'कवीश्वर' असे नाव आले की, मुलात चढाओढ लागे. एक मुलगा बॅग घेतो, एकजण पिशवी घेतो... चला तुम्हाला कवीश्वरांच्या घरी पोहोचवितो, असे त्या पाहुण्याला ही मुले म्हणत. हमाली द्यावी न लागता ही वाडीतील मुले इतकी सेवातत्पर कशी हे कोडे त्या पाहुण्याला, कवीश्वरांच्या घरी गेल्यावर काहीसे उलगडत असे. कारण त्यांना 'अण्णा खाऊ' मिळालेला असायचा ! वाडीतील मुलांच्या दृष्टीने कवीश्वरांचे घर म्हणजे 'अण्णा खाऊ'चे घर ! हेही एक कवीश्वर घराण्याचे अपूर्व असे परवा परवापर्यंतचे वैशिष्ट्य होते.

**महान् विद्योपासक**


वडील ती. धुंडिराजमहाराज आई सौ. सौ. सरस्वती

ज्यांच्यामुळे 'अण्णाखाऊ'चे घर म्हणून कवीश्वर घराण्याची वाडीतील बालकवर्गात प्रसिद्धी झाली, ते माझे आजोबा (यांना मी पाहिलेले नाही !) वक्रतुण्डबुवा-अण्णा यांचे अवतारी बालक म्हणून, पं. दत्तमहाराज (माझे वडीलबंधू ती. दादा) यांचा या कवीश्वर-घराण्यात जन्म झाला. आई सौ. सरस्वती व वडिल ती. धुंडिराजमहाराज. पूज्य वासुदेवानंद सरस्वती टेंबेमहाराज (अर्वाचीन प्रतिआद्यशंकराचार्य) व वक्रतुण्डबुवा-अण्णा यांचा गुरु-शिष्यासारखा विशेष दृढ परिचयाचा संबंध होता. त्यामुळे वक्रतुण्डबुवा-अण्णा यांच्या स्वर्गवासानंतर, सरस्वती

धुंडिराज यांच्या पोटी जन्मास आलेल्या बाळाला (दत्तमहाराज) जेव्हा प्रथम पूज्य टेंबेस्वामींनी पाहिले, तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, 'काय अण्णा, आला ना पुन: या कवीश्वर घराण्यात ?'

असे हे, आपले आजोबा वक्रतुण्डबुवा अण्णांचे अवतार असलेले 'विद्यावाचस्पती' पं. दत्तमहाराज कवीश्वर यांनी, आपल्या वयाच्या पहिल्या वाढदिवशीच, भावी जीवनात आपण 'महान विद्योपासक' होणार असल्याची चुणूक दाखवून दिली होती. पहिल्या वाढदिवसाच्या निमित्ताने केलेल्या सुंदर आराशीतील मेवा-मिठाई, फळे, रंगीत खेळणी वगैरे बालसुलभ मोहाच्या अशा कोणत्याही पदार्थाचा स्वीकार न करता, या दत्तबाळाने आराशीतील काहीशा अवघड जागी असलेल्या छोट्या गीतेचीच प्रत, आपल्या सुंदर चिमुकल्या हातात घट्ट पकडली होती ! ती दादांच्या भावी विद्यावाचस्पती स्वरूपाच्या आदर्श ब्राह्मव्रताचे ते प्रसादचिन्हच होते.

'काणादं पाणिनीयं च सर्वशास्त्रोपकारकम्' ! सर्व शास्त्रामध्ये बुद्धीचा सुलभ प्रवेश होऊन, त्यामध्ये विलक्षण पाण्डित्य संपादन करावयाचे असेल तर सर्व शास्त्रांचा (वेदांत, मीमांसा दर्शन इ. शास्त्रे) मूळ आधार असे कणादमुनींचे न्यायशास्त्र व पाणिनीचे व्याकरणशास्त्र अशा या दोन शास्त्रांचा प्रारंभीचा अभ्यास उपयुक्त ठरतो. ती. दादांचा छात्रदशेत असा पायाभूत अभ्यास पक्का झाला होता आणि म्हणूनच, नव्य न्याय, वेदान्त, मीमांसा इ. अनेक गहनशास्त्रे ती. दादांच्या रसनाग्रनर्तक होती. आणि म्हणूनच स्वतंत्र (पण खण्डित) भारताचे आद्य राष्ट्रपती डॉ. बाबू राजेंन्द्रप्रसाद यांनी ती. दादांना कलकत्ता येथील अ. भा. संस्कृत संमेलनात 'विद्यावाचस्पती' अशी सार्थ पदवी प्रदान केली होती.

आदर्श विद्योपासकाचे विद्याविषयक खरे कर्तव्य म्हणजे, आत्मसात केलेली विद्या सदैव सतेज ठेवणे हे असते. जर छात्र असतील तर साहजिकच अध्यापनामुळे विद्येचे उत्तमप्रकारे संरक्षण व संवर्धनही होते. पण छात्र नसतील तर आत्मसात केलेल्या गहन शास्त्रविद्यांचे संरक्षण कसे होणार ? कालान्तराने ती विद्या विस्मृतीच्या दरीतच अदृश्य होऊन जाईल आणि हे पवित्र ब्राह्मव्रताच्या दृष्टीने घोर पातकच ठरेल ! ब्राह्मणग्रन्थात एक कथा आहे. गोमातेच्या रूपाने साक्षात् विद्यादेवी ब्राह्मणाकडे आली व म्हणाली, 'हे ब्रह्मन्, तू माझे रक्षण कर.' ''विद्या ह वै ब्राह्मणम् आजगाम, गोपाय मा'' साक्षात् विद्यादेवीच्या विद्यासंरक्षणविषयक या आज्ञेचे परिपालन ती. दादांनी कसे केले, याविषयीचा एक उद्‌बोधक व संस्मरणीय प्रसंग आठवतो.


पार्ल्यातील जुनेजाणते सुप्रसिद्ध श्री. बापू पंडित यांचे

# यशोदीप कॅटरर्स

'निघाली लेक सासरला
मस्त जमला बेत बारशाचा
आलो जाऊनी सभा संमेलना
झाले धार्मिक विधी परवाला
लाभे सर्वांना कसा समाधानाचा चांदवा
हो तर आहे अवघी यशोदीपची किमया'

पिवळं धम्मक वरण
मोगरीच्या कळ्यांची-भाताची मूद
वर साजूक तूप
केशरी जिलबी
जायफळ वेलचीयुक्त श्रीखंड
फळांची सजावट
की, व्हेजिटेबल माखनवाला
बिर्याणी की मसालेभात
फ्राईड राईस की चावचाव
ठरवा तुम्हीच सारे काही
आपल्या सेवेला हजर नेहमी
बापू पंडित यांचे 'यशोदीप कॅटरर्स'

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ हॉल व उत्कर्ष मंडळ हॉल**

**दोन्ही हॉलसच्या बुकींगसाठी कृपया उत्कर्ष मंडळ येथेच संपर्क साधावा.**

**टेलीफोन नं. ६११ ७५७६**

**सकाळी ८ ते १२ संध्याकाळी ५ ते ८**

**बाहेरच्या ऑर्डर्सही घेतो.**

दुसऱ्या महायुद्धाचा काळ. पुण्यावर जपान बॉब-वर्षाव करील की काय, अशी सार्वत्रिक भीती निर्माण झाली. भराभर पुणे शहर खाली होऊ लागले. ती. दादांनीही सर्व कुटुंब वाडीस पाठवून दिले. (त्यावेळी पुण्यातील जवळजवळ प्रत्येक वाड्यावर 'जागा भाड्याने देणे आहे' अशा पाट्या लटकलेल्या होत्या.) शंकराचार्य मठातील विद्यार्थीही आपापल्या गावी निघून गेलेले. चरितार्थासाठी नोकरी (मुंजाबाच्या बोळातील शंकराचार्यांच्या मठात अध्यापक) म्हणून ती. दादांना पुण्यात राहणे आवश्यक होते. (चरितार्थासाठी नोकरी ! प्रचंड पगार रुपये पंचवीस द. म. !) अशाप्रकारे मी व ती. दादा असे दोघेच पुण्यात त्या महायुद्धाच्या काळात, शनिवार पेठेतील वर्तक इंजिनियरांच्या वाड्यात राहात होतो. या काळात तीं. दादांची दिनचर्या कशी होती ?

पहाटे ३ वा. च्या सुमारास उठणे. भुशाची शेगडी भरणे. (युद्धाच्या काळात जळण म्हणून लाकडी भुसा वापरत.) स्नान करून, कुकरं लावणे, नंतर नित्याचे आह्निक उरकून, वाचनास दुपारी बाराएक वाजेपर्यंत बसणे. गुरुचरित्र वगैरे ग्रंथांचे सोवळ्यात वाचन करतात हे मला माहीत होते. पण सहा-सहा तास सतत वाचन ? कोणत्या पवित्र ग्रंथांचे ? वेदान्त, न्याय, मीमांसा इ. शास्त्रातील ग्रंथांचे पांक्त (प्रत्येक पंक्तीचे / ओळीचे) वाचन मननपूर्वक ती. दादा करीत होते. कशासाठी तर आधीन शास्त्रांच्या संरक्षणासाठी ! असे करणारे किती शास्त्री पण्डित आढळतील ?

पुन: भोजनोत्तर नाममात्र एखादी डुलकी घेऊन (गादी नाही, साध्या चटईवर) व पुन: सोवळे नेसून, विशिष्ट अनुष्ठानाला सुरूवात. मग त्या अनुष्ठानाला काळ-वेळ नाही. कधी रात्री १० वा. पर्यंत, तर कधी कधी पहाट होईपर्यंत अनुष्ठान चालूच !

मी मात्र माझे जेवण उरकून डाराडूर झोपी जाई. (मला लहानपणी वाडीत 'कुंभकर्ण' हेच नाव पडले होते. पालखी-शेजारती संपून देवाकडील सर्व मंडळी आपापल्या घरी गेली तरी, मुंज झालेला, सोन्याचा करदोटा असलेला श्रीपाद, अजून घरी कसा आला नाही ? मग ती. महाराज (आमचे वडील) कंदील घेऊन देवाच्या कट्ट्यावर मला शोधायला येत असत. कधी वाळूत तर कधी कोठल्या तरी पारावर मी डाराडूर झोपलेला आढळत असे. मग खांद्यावर - झोपेतच मला घेऊन वडील घरी येत असत ! .

त्यावेळी वर्तकांच्या वाड्यात, एका आड बाजूच्या एकाच जेमतेम ८ X १२ अशा जुन्या खोलीत ती. दादांचे बिऱ्हाड होते. रात्री उंदरांचा स्वैरसंचारही जाणवत असे. पण ती. दादांचे रात्रीचे अनुष्ठान सुरू झाल्यापासून उंदरांचा त्रास बंद झाला होता. कदाचित दिव्याच्या उजेडामुळे उंदीर येत नसावेत, या समजुतीत मी होतो. पण एका रात्री ?

धर्मभास्करच्या वाचकांना हार्दिक शुभेच्छा

पाध्ये मेडिकल स्टोअर्स

भारतात बनविलेल्या तसेच विदेशी औषधांचें अधिकृत विक्रेते.

आयुर्वेदिक औषधेही मिळतात.

बस स्थानकासमोर, कणकवली,
जि. सिंधुदुर्ग दूरध्वनि : ३२०३२

जेवणाची पंगत - त्याला हवी
"पाटणकर" लोणच्याची संगत !!
लोणची अनेकजण बनवतात,
परंतु "पाटणकरांनी" बनवलेल्या
लोणच्याची सर मात्र
एकालाही नाही !!

- आंबा लोणचे
- माईनमूळ लोणचे
- मिरची लोणचे
- लिंबू लोणचे

लोणच्यात अग्रेसर असलेले

के. सी. पाटणकर ॲण्ड सन्स

मार्केट - बेळगाव

ABHYANKAR BROTHERS

DEALERS & STOCKISTS OF IRON & STEEL

AUTHORISED STOCKISTS OF TATA AGRICO TOOLS

: ADDRESS :
216, SANT TUKARAM RD,
LOKHAND JATTHA,
BOMBAY 400 009.

PHONE : OFFICE :
342 2167 / 342 1295

PHONE : RESI :
437 7818, 446 2332,
444 9432

सहज मला जाग आली. डोळे किलकिले करून, अंथरूणावर पडूनच मी पाहू लागलो. ती. दादांचे सोवळ्यात विशिष्ट अनुष्ठान चालूच होते. मंत्राचे जसजसे पठण होई तसतसे संख्यानिदर्शक म्हणून गव्हाचे दाणे एका ताटलीत जमा होत. आणखी निरखून पाहतो तर.... ती. दादांच्या समोर काही कुटुंबवत्सल उंदीर मंडळी आपल्या लहान-थोर परिवारासह, ताम्हनपाशी येत. ती. दादा त्या मंडळींना त्यांचा आवडता खाऊ (गुळ खोबरे) त्या गजानन-वाहन-मंडळींपुढे ठेवीत असत. इकडे सौम्य आवाजातील अनुष्ठानाचे मंत्रपठण चालूच असे. प्रिय खाद्य खाल्यावर व ताम्हनातील पाणी प्यायल्यावर, एकप्रकारे ढेकर देऊन जणू, ती तृप्त मंडळी आपापल्या घरी (बिळात) गुपचूप निघून जात. त्या संपूर्ण अनुष्ठान-काळात उंदरांचा खडखडाट वगैरे कोणताच त्रास कधीही जाणवला नाही !

कधीतरी मी ती. दादांना म्हणालो होतो. 'आपण सापळा आणू या. एखादी जाडजूड काठी ठेवू या.' त्यावर आपल्या शांत स्वभावानुसार ती. दादा एवढेच म्हटल्याचे मला आठवले, 'कशाला सापळा पाहिजे ? आपणाला उंदरांचा असा काय त्रास होतो ? ते गरीब जीव. कशाला त्यांच्यावर काठी उगारायची ?' पुढे मी हे सर्व विसरूनही गेलो होतो.

'उंदीर हे गणपतीचे वाहन' ही विशिष्ट धार्मिक जाणीव, धर्मनिष्ठ ती. दादांच्या मनात असावी. कवीश्वर-घराणे हे 'गाणपत्य' म्हणूनही प्रसिद्ध आहे. आमचे आजोबा वक्रतुण्डबुवा अण्णा यांना राजूर या क्षेत्रात गणपतीचा साक्षात्कार झाला होता. त्यांचेच अवतार म्हणून ती. दादा होते ना ? (एक आठवण. वक्रतुण्डबुवा अण्णा यांना एकूण २१ अपत्ये झाली. त्यांपैकी एकच वयाच्या ९२ व्या वर्षापर्यंत जगलेले २१ वे अपत्य म्हणजे धुंडिराजमहाराज. आमचे वडील होत. २१ हा आकडा प्रिय असलेल्या गणपतीदेवाने आपले भक्त वक्रतुण्डबुवा यांच्यावर २१ आकड्याचा असा कृपावर्षाव करावा ना !

**पाकशास्त्रातील गुरू**

अखेर जर्मनी-जपानच्या शरणागतीमुळे दुसरे महायुद्ध संपले. गावी गेलेले नागरिक पुण्यास परतू लागले. ती. सौ. वहिनीनाही (सौ. लक्ष्मीबाई/आईसाहेब) पुण्यास यावयाला मिळेल, म्हणून मोठा आनंद झाला. पण ती. दादा याला तयार नव्हते. ते खुबीने टाळाटाळ करीत होते. एका पत्रात ती. दादा म्हणतात 'आणखी काही काळ, वडीलधारी मंडळींच्या व देवाच्या सेवेसाठी वाडीतच राहाणे इष्ट. केव्हा पाठवायचे ते वडील मंडळींनीच ठरविणे योग्य...'

ती. दादा असे का वागत होते ? आपले प्रिय कुटुंबीय

राष्ट्रीय पंडित श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या स्मृतीस अभिवादन

**गोगटे ट्रान्सपोर्ट आणि वेअरहाऊसिंग प्रा. लि.**

रेबेलो हाऊस,
सावरकर पथ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी :
कार्यालय : ५३३ ५५३४, ५४१ ८२०३
घरचा : ५४२ ७८३९, ५४३ ३०९०

**वर्षारंभ अंकास शुभेच्छा !**


फियाट, ॲम्बेसेडॉर, मारूती, प्रिमीयर, जीप वगैरे सर्व प्रकारच्या मोटार गाड्यांचे दुरूस्तीसाठी ठाणे शहर व परिसरातील नागरिकांचे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि विश्वास संपादिलेले एक अग्रगण्य नाव !

**सुनील मोटार्स**

**(ऑटो मोबाईल्समधील स्पेशालिस्ट)**

मोटारगाड्या दुरूस्तीचें एकमेव केंद्र
विठ्ठल सायन्ना, दत्तमंदिर कंपाउंड, जुना आग्रा रोड,
नौपाडा, ठाणे - २
(रविवारी बंद) फोन ५४२ ३४७६.

**उत्तम काम, वक्तशीरपणा हीच आमच्या यशाची पावती.**




आपल्याजवळ आले तर कोणत्या विचारी सुसंस्कृत व्यक्तीस ते नको असते ? पण साधुपुरुषांच्या मनातील खरे संकल्प सामान्यांना कसे कळणार ? ती. दादांच्या त्या पत्रातील 'आणखी काही काळ' हे शब्द महत्त्वाचे आहेत.

कुटुंबीयांना वाडीस पाठवून देण्यास 'महायुद्ध' हे निमित्त मिळाले. त्यामुळे . बायकोवासातून मिळालेल्या एकान्ताचा (मुक्ततेचा) विशिष्ट उपासनेसाठी (अनुष्ठानासाठी) लाभ घेण्याचे ती. दादांनी ठरविले असावे. आता त्या उपासनेचा कालावधी किती ते ती. दादांनाच ठाऊक. महायुद्ध अमक्याच वेळेला संपेल व त्याचवेळी संकल्पित उपासनाही पूर्ण होईल असे काही गणित ती. दादांनाही माहीत असण्याचे कारण नाही. पण अपूर्ण संकल्पित उपासना पूर्ण होणे, बायकोवासात कठीण, म्हणूनही ती. दादांनी, आणखी काही काळ असा सहेतुक शब्दप्रयोग केला असावा ! कालान्तराने ती. सौ. वहिनी पुण्यास आल्या.

ती. दादांच्या या उपासनाकाळात माझा संस्कृतशिक्षणाच्या दृष्टीने विशेष लाभ झाला. परीक्षेस असलेले काही ग्रंथ (उत्तररामचरितम्, कुमारसंभवम् इ.) ती. दादांनी मला चांगल्याप्रकारे शिकविले. त्यावरून, ती. दादा तरुणपणी किती व कसे रसिक असतील, याची काहीशी कल्पना आली.

पण या काळात ती. दादामुळे माझा विशेष लाभ झाला. तो पाकशास्त्रातील उत्तम ज्ञानाचा. ती. दादा पाकशास्त्रातील विशेष जाणकार असतील याची तोपर्यंत मला सुतरां कल्पना नव्हती. अनुष्ठानाचा वेळ वाढत चालल्यामुळे सैपाकाची जबाबदारी ती. दादांनी माझ्यावर सोपवली. सुरुवातीस पाकप्रशिक्षणाच्या काळात भाताचे कधी चिखलगाव तर कधी जळगाव, पोळीचे कधी भारत, कधी पाकिस्तान तर कधी आफ्रिका असेही विविध आकार-प्रकार हाताळण्यात माझे विलक्षण 'योगः कर्मसु कौशलम्' प्रकट झाले. पण वेळोवेळच्या ती. दादांच्या पाकशास्त्रातील उपयुक्त मार्गदर्शनामुळे, आता मी पाकशास्त्रात इतका निपुण झालो आहे की, 'ही मी जाते माहेरी' अशा गृहखात्याच्या धमकीचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही ! अर्थात याचे खरे श्रेय, माझे पाकशास्त्रातील गुरू ती. दादा यांनाच आहे !

**अशान्ति ब्रह्म**

चंद्र आणि उष्णता ? बर्फ आणि आग ? हे कधी कोणास खरे वाटेल काय ? तसेच ती. दादा आणि क्रोध किंवा जमदग्नी, हेही कोणास कधी खरे वाटणार नाही आणि मार्तण्ड जे तापहीन अशा साधु-परंपरेतील ती. दादांच्या बाबतीत ते खरेही आहे. 'शान्ति-ब्रह्म' म्हणूनच ती. दादांची यथार्थ ख्याती आहे. पण याचा अर्थ या संसारात साधु पुरुषांना कधीच राग येत नाही असे नाही. नाहीतर रागाने दार लावून झोपडीत बसलेल्या ज्ञानियांच्या राजाला, 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा । विश्व झाले रागे वह्नि, सन्ते सुखे व्हावे

G. K. ABHYANKAR
& SONS

DEALERS IN
IRON & STEEL, CEMENT, HARD-WARE, G I PIPES & FITTINGS, SANITORYWARE, GLAZED TILES, AC SHEETS
560, ABHYANKAR BUILDING, SADASHIV PETH, LAXMI RD, PUNE 411030.

: PHONE NO. :
OFFICE : 454009

BARODA BRANCH
GANPULE BLDG, ROOPURA, BARODA
PHONE NO : 557987

पाणी' असा उपदेश करण्याची पाळी, मुक्ताईवर आली नसती !

या संसारात, रागद्वेषादि विकारापासून कोणीही परिपूर्णपणे मुक्त नाही. साधु परंपरेतील उत्तम पुरुषालाही राग येतो व मध्यम, अधम, चाण्डालप्रवृत्तीच्या माणसांनाही राग येतो. पण या चार प्रकारच्या माणसातील रागाचे, कोपाचे, क्रोधाचे स्वरूपही ध्यानात घेण्यासारखे आहे.

उत्तमे तु क्षणं कोपः, मध्यमे घटिकाद्वयम् ।
अधमे स्यात् अहोरात्र चाण्डाले मरणान्तिकः ।

उत्तम पुरुषाचा राग हा क्षणभर असतो, तर मध्यम पुरुषाचा राग तास दोन तास इतकाच असतो. अधम (नीच) पुरुष रागाने रात्रंदिवस फणफणत असतो तर, चाण्डाल प्रवृत्तीचा माणूस मरेपर्यंत रागाने डूख धरून असतो.

उत्तम पुरुष रागावले तरी ती क्षणभराची विकृती असते. तो त्यांचा मूळ स्वभाव नसतो. कालिदासाने म्हटले आहे, 'शैत्यं हि यत् सा प्रकृतिर्जलस्य ।' सर्पणामुळे पाणी तापते, पण उष्णता हा पाण्याचा मूळ स्वभाव नव्हे. शीतलता, हीच खरी पाण्याची मूळ प्रकृती आहे.

रागाच्या बाबतीत ती. दादा हे उत्तम पुरुष होते. राग आला तर ते कसे वागत ? लहानपणी अनुभवलेला वाडीतील हा एक प्रसंग. ते दिवस पावसाळ्याचे होते. आमच्या घरापर्यंत कृष्णा नदीचे पाणी आलेले होते. त्या दिवशी आमचे शीघ्रकोपी वडील ती. महाराज ती. दादांना उद्देशून मोठमोठ्याने काही बोलत होते. रागाचा विषय समजण्याचे माझे ते वय नव्हते. ती. दादा शांत होते, मात्र ते फार अस्वस्थ दिसत होते. सौ. आई स्वयंपाकघरातून बाहेर आली व ती. महाराजांना उद्देशून म्हणाली, 'अहो, कशाला उगीच दत्तावर रागावता ?'

काहीशा रागाने अस्वस्थ झालेले ती. दादा, रागावलेल्या वडिलांना काहीही उलट-सुलट प्रत्युत्तर देत बसले नाहीत. उपरण्याचा डोक्यावर फेटा बांधला. धोतराचा आखुडता काचा केला व सरळ घराजवळील कृष्णेच्या महापुरात उडी घेऊन, पलीकडे अमरापुराला निघून गेले. ती. दादा किंबहुना कवीश्वर घराण्यातील सर्वच पुरुष पट्टीचे पोहणारे होते, आहेतही. अमरापुरात (औरवाड) दिवसभर उपासना करून, ती. दादा सायंकाळी शांत चित्ताने घरी परतले. ती. दादांची राग व्यक्त करण्याची पद्धत ही अशी होती. 'ही मी चालले माहेरी' या धर्तीवर, 'हा मी चाललो अमरापुरी' असा हा राग व्यक्त करण्याचा ती. दादांचा कोणालाही यत्किंचितही ताप न देणारा सौम्य स्वभाव होता. ती. दादांची महान् योग्यता जाणून त्यांना बालवयातच पहिला भागवत सप्ताह करावयास सांगणारे पूज्य दीक्षितस्वामी यांची


मना सत्य ते सत्य वाचे वदावे । मन मिथ्य ते मिथ्य सोडूनी द्यावे - समर्थ रामदास.

**अवघ्या ९० रुपये वार्षिक वर्गणीत मराठी वाचकांवर सोज्वळ संस्कार करणाऱ्या तसेच धर्माचार्य ब्रह्मचारी विश्वनाथजी यांचे स्वप्न साकार करणाऱ्या धर्मभास्करला २९ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल शुभकामना**

# तेजल ट्रान्सपोर्ट

टेल्कोचे अधिकृत चेसिस ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर्स

ए- ५, गीता घर सोसायटी, टी. एच्. कटारिया मार्ग,
माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : ४२२ ९२६३.

GRAM : JAYGANARAJ, MAHIM, MUMBAI.

पवित्र तपोभूमी असलेले अमरापूर हेच ती. दादांचे परम शांतीचे माहेर होते.

असे हे 'शान्तिब्रह्म' असलेले ती. दादा, एकदा काही क्षण, माझ्या बाबतीत भलतेच अशान्ति-ब्रह्म झाले; हे कोणास कधी खरे वाटेल काय ? इतके अशान्ति-ब्रह्म की, त्या दिवशी, ती. दादांच्या हातून छडीचा सपासप भरपूर मार मला खावा लागला होता. अर्थात पितृतुल्य वडीलबंधू म्हणून ती. दादांचा तो अधिकारच होता. पण शान्तिब्रह्माला एकाएकी अशान्तिब्रह्म होण्याचे एवढे गंभीर कारण तरी कोणते ? न धरी शस्त्र करी मी असे म्हणणाऱ्या भगवान कृष्णाला, एकदा तरी रणांगणी शस्त्र धरायला लावीनच, अशी आपली प्रतिज्ञा खरी करून दाखविणाऱ्या भीष्माचार्यांप्रमाणे, 'एकदा तरी शान्तिब्रह्माला मी अशान्तिब्रह्म व्हायला लावीनच, अशी काही मी प्रतिज्ञा केली नव्हती ! तशी योग्यता वा सामर्थ्यही माझे नव्हते व नाहीही. मग शान्तिब्रह्म ती. दादांना एकदम एकाएकी माझ्या बाबतीत अशान्तिब्रह्म का व्हावे लागले ? याची दोन कारणे. एक म्हणजे, माझा सर्व वाड्याला जाचक असा व्रात्य बालस्वभाव व दुसरे धर्मनिष्ठ ती. दादांच्या दृष्टीने गंभीर कारण म्हणजे वेदविद्यासंपादनातील मी केलेला गुरूद्रोह. गुरूची वंचना !

पुण्यात सुरूवातीच्या काळात ती. दादांचे बिऱ्हाड, शनिवार पेठेत, त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या सरदार बापूसाहेब नातूंच्या भव्य व प्रशस्त अशा मंगल कार्यालयात होते. दोन मोठे वाडे एकत्र होते. पं. कवीश्वर व पं. चौधरीशास्त्री अशी दोनच बाहेरची बिऱ्हाडे होती. इतर काही बिऱ्हाडे सरदार नातूंच्या नातेवाईकांची (जावई इ.) होती. कोणालाही भाडे भरावे लागत नव्हते. १९३९-४० चा तो काळ होता. नुकतेच दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. एक-दोन वर्षे झाली तरी अनेकवेळा विनंती करूनही सरदार बापूसाहेब नातू या शास्त्रीमंडळींकडून भाडे घेण्यास अजिबात तयार नव्हते. आणि म्हणूनच स्वाभिमानी ती. दादांनी यथासमय शेजारीच वर्तकांच्या वाड्यातील भाड्याच्या जागेत आपले बिऱ्हाड हलविले. धन्य ते मालक व धन्य ते बिऱ्हाडकरू !

सहज एक उपयुक्त माहिती. वधूवर पक्षासाठी प्रशस्त मोठी जागा, शेकडो माणसांचा एकाचवेळी सैपाक तयार करता येईल अशी मोठमोठी भांडीकुंडी, विशाल सतरंज्या, गादी, लोड, तक्के अशी सर्व प्रकारची उपयुक्त सोय असलेल्या त्या सरदार नातूंच्या मंगल कार्यालयाचे दर दिवशी भाडे रूपये वीस फक्त त्या काळी होते. अर्थात त्या काळी मध्यमवर्गाला हे भाडे जास्तच होते. पण मराठवाड्यातील जहागीरदार मंडळी, लग्नासाठी आली की, १५-२० दिवस या मंगल कार्यालयात तळ ठोकून असत.

करी रे मना भक्ति या राघवाची । पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची । - समर्थ रामदास

धर्मभास्करच्या २९ व्या वर्षारंभ विशेषांकास श्री. नरेंद्र टोळे यांच्या शुभेच्छा

चेसिस केअर सेंटर

टाटाचे अधिकृत चेसिस वाहतूक कॉन्ट्रॅक्टर

८- ५, गीता घर सोसायटी, टी. एच्. कटारिया मार्ग,
माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : ४२२ ९२६३.

GRAM : JAYGANARAJ, MAHIM, MUMBAI.

कारण, बरोबरीच्या लवाजम्यासाठी बाहेरील लॉजिंगपेक्षा हे मंगल कार्यालय फारच स्वस्त व सोयीचे होते.

(आमचे द्वितीय वडील बंधू ती. डॉ. दिगंबर अण्णा यांची व सरदार बापूसाहेब नातू यांची बुद्धिबळामुळे विशेष गट्टी जमली होती. ती दिगंबर अण्णांच्या विवाहासाठी संपूर्ण मंगल कार्यालय मोफत होते. इतकेच नव्हे तर वरातीसाठी आपली मोटारही सरदार नातूंनी मोफत दिली होती.)

अशा या प्रशस्त सरदार नातूंच्या वाड्यातील सर्व समवयस्क मुला-मुलींचे नेतृत्व माझ्याकडे असे. घरातील माझे अप्पा हे टोपण नावच वाड्यात सर्वांच्या तोंडी असे. अप्पाच्या पुढारीपणाखाली वाड्यात सतत मुला-मुलींचा धांगडधिंगा, आरडाओरड असा गोंधळ असे. क्वचित नाट्यप्रवेश, गाणी असाही कार्यक्रम होत असे. सरदार बापूसाहेबांचे एकुलते एक पदवीधर चिरंजीव श्री. दाजीसाहेब हे खुद्द दिग्दर्शन करून आमच्याकडून विशेषत: मंगळागौरीच्या वेळी नाट्यप्रवेश बसवून घेत. त्यामध्ये माझी नारदाची भूमिका विशेष गाजत असे.

अशाप्रकारे माझ्या पुढारीपणाखालील धांगडधिंग्याला वाड्यातील सर्व वडिलधारी मंडळी वैतागली होती. घरी, ती. सौ. वहिनीकडे व त्यांच्यातर्फे माझ्याबद्दलच्या तक्रारी वारंवार ती. दादांच्या कानी पडत होत्या. चेंडूमुळे (क्रिकेट) खिडकीच्या काचा फुटणे, सैपाकघरात चेंडू जाणे असे प्रकार वाढत होते. त्यातच एकदा झोपाळा तुटून मोठाच गहजब झाला.

त्यादिवशीच, सायंसंध्या आटोपल्यावर ती. दादांनी मला विचारावयास सुरुवात केली. 'आज अमरकोशातील कोणते व किती श्लोक पाठ केले ?' अडचणीचा प्रश्न. कारण गेले कित्येक दिवस मी काहीच केले नव्हते. 'काल मठात पाठाला गेला होतास ?' त त प प ! कारण ती. दादांनी, मठातील व घरातील सी. बी. आय्. कडून बरीच अस्सल माहिती जमा केली होती. याचा मला पत्ताच नव्हता !

गुगली बॉल झाले. ती. दादांनी वेताची छडी हातात घेतली. मी चांगलाच गांगरलो. आता काय होणार ? तोच पार त्रिफळा उडणारा, नको तो भलत्याच अडचणीचा प्रश्न मला विचारला !

'आज कानगावकरगुरुजीकडे गेला होतास ?' 'हो.'

'आच संहितेतील कोणते मंत्र शिकविले ?' त त प प.

ती. दादांचा आवाज व राग वाढत चालला. 'रोज न चुकता कानगावकरगुरुजीकडे जातोस ? गेले पंधरा दिवस तू नियमाने कानगावकरगुरुजीकडे जात होतास ?'

ती. दादांनी माझ्या चुकारपणाची बित्तंबातमी कळलेली असावी, हे मला जाणवले. तरीही निर्ढावलेल्या गुन्हेगाराप्रमाणे, मी बिनदिक्कत 'हो' म्हणून सपशेल खोटं उत्तर दिले. झाले. साचून राहिलेला ती. दादांचा सात्विक राग


**हिंदुत्वाच्या साधार नि प्रभावी प्रचारास वाहिलेल्या धर्मभास्करच्या २९ व्या वर्षारंभ विशेषांकास शुभेच्छा**

**स्वच्छता व टापटीप यामुळे लोकादरास पात्र झालेले**

# मामा काणे यांचे स्वच्छ उपहारगृह

**स्थापना १९१०**

सेनापती बापट मार्ग, दादर (प. रेल्वे) समोर,
मुंबई ४०० ०२८.

दूरध्वनी : ४२२ २१९२.



**ग्राहकांच्या विनम्र सेवेची ७४ वर्षे यशस्वीपणे पूर्ण करून ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.**

**दुकानाची वैशिष्ट्ये**
* गोदरेज सोप लि. (मिरज) वितरक (पशूखाद्य – खते)
* गोदरेज सोप लि. (मुंबई ) वितरक (साबण – वनस्पती)
* गोल्डन बिस्किट कं. (मिरज) वितरक

**शिवाय सर्व कडधान्ये, मसाल्याचे सामान, स्टेशनरी वगैरेचे विक्रेते**

# कार्लेकर – भिडे

दुकान - वाडातर (ता. देवगड)
दूरध्वनी - ४९२२६.

प्रकट होऊ लागला.

'कानगावकरगुरुजीकडे आज गेला होतास काय ?' सप्सपासप्. मी विव्हळू लागलो.

'न चुकता पंधरा दिवस कानगावकरगुरुजींकडे जात होतास ना ?'

सपासप् सपासप्. 'छडी लागे छम् छम्' चे पदार्थज्ञान, त्यावेळी माझे पक्के झाले.

'नको, नको, मी पुनः कधी खोटे बोलणार नाही...' म्हणून मी ओक्साबोक्सी रडू लागलो. घरातच हा माझा उद्धार चालू होता. समवयस्क मुले-मुली त्यावेळी, हे प्रात्यक्षिक पाहण्यास हजर नव्हती, हेच त्यावेळी माझे परमभाग्य, असे मला वाटले.

इतक्यात ती. सौ. वहिनींनी मधे पडून. ती. दादांच्या हातातील छडी काढून घेतली.

'एक वेळ धांगडधिंगा, दंगा, आरडाओरडा ठीक आहे. पण वेद शिकविणाऱ्या गुरुजींबद्दल खोटे बोलतोस ?' ती. दादांची खरी कानउघाडणी सुरू झाली.

'तू गुरुचरित्र वाचतोस ना ? वाडीला गुरुचरित्राचे तू सप्ताह केलेस ना ?' माझी ट्यूब पेटू लागली.

खोटे बोलून, गुरुद्रोह करतोस ? गुरुची वंचना करतोस?...

धर्मनिष्ठ ती. दादांच्या सात्विक संतापाचे खरे स्वरूप लक्षात येऊन, मी चांगलाच वरमलो. छम् छम् छडीच्या शारीरिक वेदनांपेक्षा, या वैचारिक शाब्दबोधाच्या वेदना, अन्तःकरणात तीव्रतेने जाणवू लागल्या. मी चांगलाच वरमलो. स्फुंदून स्फुंदून रडू लागलो.

'लहानपणी थोडाफार वांडपणा चालायचाच. पण गुरुबद्दल खोटं बोलणं पाप आहे...' समजावणीच्या सौम्य स्वरात, शान्तिब्रह्म निवृत्तिनाथांचाच जणू ममताळू हाताचा स्पर्श पाठीस जाणवू लागला !

तेवढ्यात ती. सौ. वहिनींना उद्देशून, 'अहो, काय आणायचे आहे ? पिशव्या द्या' असे म्हणून, जणू काही क्षणापूर्वी गंभीर प्रकार घडलाच नाही, अशा नित्याच्या सौम्य व प्रसन्न वृत्तीने ती. दादा मला बरोबर घेऊन वाण्याकडे निघाले ! ती. दादांनी रसिकतेने शिकविलेल्या कालिदासाच्या वचनाची आठवण झाली.

**अशनेरमृतस्य चोभयोः वशिनश्चाम्बुधराश्च योनयः ।**

संयमी साधुपुरुष व जलधर मेघ हे दोघेही (प्रसंगी) कडाडणाऱ्या विजेचे व (प्रसंगी) अमृतधारांचेही जनक असतात. गुरुचरित्रातच वर्णन केलेले

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

हे भारतीय संस्कृतीतील गुरूमूल्य, त्यानंतर मी कधीही विसरलो नाही.

**कानगावकरगुरूजी !**

ज्या कानगावकरगुरुजींबद्दल मी खोटे बोललो, म्हणून धर्मनिष्ठ ती. दादांचा सात्विक संताप उफाळून आला, ते कानगावकर गुरूजी कोण ? मी बेळगांवला मामाकडे (याळगी) प्राथमिक शिक्षण घेत असताना, ती. दादांनी मला पुण्यास आणले. आपल्याप्रमाणेच चि. श्रीपादने (मी स्वतः) शास्त्रसंपन्न व्हावे, वेदोनारायण व्हावे; हा ती. दादांचा विशुद्ध उद्देश. म्हणून ती. दादांनी, संस्कृत शिकण्यासाठी सकाळी मुंजाबाच्या बोळातील शंकराचार्यांच्या मठात व दुपारी वेदाच्या अध्ययनासाठी वे. मू. कानगावकरगुरूजींकडे, माझ्या शिक्षणाची व्यवस्था केली होती.

पण मला हे संस्कृतचे, वेदाचे शिक्षण नको होते. बरोबरीच्या इतर मुलांप्रमाणे इंग्रजीचे शिक्षण घ्यावे; असे मला फार वाटे. पण तसे बोलण्याचे, मनातील विचार, वडिलधारी मंडळींपुढे व्यक्त करण्याचे ते माझे वय नव्हते. म्हणून संस्कृत शिक्षणाकडे, विशेषतः वे. मु. कानगावकर-गुरूजींकडील वेदाध्ययनाकडे माझे पूर्ण दुर्लक्ष झाले.

कानगावकरगुरूजी हे माध्यदिन शुक्ल यजुर्वेदीय शाखेचे घनान्त अध्ययन केलेले वेदोनारायण होते.


## प्रगती फार्मा

२८५३, खडेबाजार, बेळगाव - ५९०००२.

**प्रगतीपथावरील प्रगतीची उत्पादने**

**सुकेशा :**
विपुल केस, शांत झोप याकरता

**अष्टवर्गयुक्त च्यवनप्राश :**
आबालवृद्धांना उत्साह व शक्तीवर्धक

**कुडाकल्प/कुडा कॅप्स :**
अतिसारावर प्रभावी औषध

**उलिखा :**
उवा, लिखा नाश करणेकरता

**शुद्ध मध, गुलकंद :**
नेहमी मिळतो.

त्यांच्याकडे माझी वेदाध्ययनाची वेळ दुपारी २ नंतरची असायची. हे वृद्धत्वाकडे झुकलेले एकाक्ष, विधुर वेदोनारायण, पौरोहित्य करून व पक्वान्नाचे भोजन झोडून घरी आलेले असायचे. (यांना भोजनात भगवती लाल मिरचीची पावडर - फार प्रिय. मुठीनेच ते लाल तिखट घ्यायचे.) कानगावकरगुरूजींची सुस्तीची वेळ व माझी वेदाध्ययनाची वेळ ऐन दुपारी एकच असायची. त्यातच चंची घेऊन आलेले काही ब्राह्मण असायचे. 'हा यजमान असा, तो यजमान तसा, आजची टॉमेटोची कोशिंबीर एकदम बेस्ट...' अशा निरर्थक गप्पा गोष्टींचा ऊत यायचा आणि या अशा गप्पागोष्टी संपेपर्यंत, कानगावकरगुरूजी माझ्याकडून संपूर्ण शरीर (अर्थात पायांनीच) यथेच्छ रगडून घ्यायचे. मग त्यांना झोप लागायची. जाग आल्यावर एकदोन मंत्रांची संथा. जेमतेम दहा-पंधरा मिनिटे वेदमंत्रांची संथा व दीड-दोन तास अंग रगडण्याची गुरूसेवा.

कोल्हापुरात रंकाळा-तलावाकडे एक मोठा पाषाणमय नंदी आहे. तो म्हणे, रोज गहूभर मागे व तिळभर रंकाळ्याकडे सरकत असतो आणि या विलक्षण गतीने तो नंदी जेव्हा रंकाळा तलावात बुडी मारेल, तेव्हा म्हणे जगाचा प्रलय होणार !

ज्या पद्धतीने व गतीने माझे वेदाध्ययन होत होते, ते ध्यानात घेता, माझ्या वेदाध्ययनाचा प्रलयकाळ येऊन ठेपलाच होता. अंग रगडण्याच्या गुरूसेवेला मी पार कटाळलो होतो. हे घरी बोलण्याची सोय नव्हती. तशी त्या बालवयात विचार व्यक्त करण्याची साहसशक्तीही नव्हती. म्हणून मी वेदोनारायण कानगावकरगुरूजीकडे जाण्याचे टाळू लागलो. ती. दादा मधूनमधून चौकशी करीत. माझ्या थापा पचू लागल्या.

पण पंधरा दिवसांनी घात झाला. एका लग्नसमारंभात ती. दादांची व कानगावकर गुरूजींची एकत्रच प्रत्यक्ष भेट झाली. तेव्हा कानगावकरगुरूजींनीच, ती. दादांना थेट प्रश्न केला. 'पंधरा दिवस होऊन गेले. श्रीपाद कसा (बहुधा अंग रगडण्यासाठी) येत नाही ? तब्येत बरी नाही की गावाला गेला आहे ?'

अशान्तिब्रह्म-नाटकाच्या पडद्यामागील पार्श्वभूमी ही अशी होती !

**कमल, आलोच हं !**

असे हे माझे ती. दादा वयाच्या ९० व्या वर्षी दि. १ मार्च १९९९ रोजी प्रातः ब्रह्मस्वरूप झाले ! मनात वेडा विचार येतो, 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हे निस्संशय जीवमात्राच्या बाबतीत खरे आहे; पण म्हणून ती. दादांना आणखी काही काळ थांबता आले नसते का ?

हा आपला आमचा वेडा विचार. पण, मला माहीत असलेल्या ती. दादांच्या भावजीवनाचा विचार केला तर, ती.

WITH BEST COMPLIMENTS FROM

**STANDARD ELECTRICALS & ENGINEERS**

373, POONA-BANGALORE ROAD,
BELGUAM - 590 003.

**FOR EVERYTHING IN ELECTRICALS**

GUARANTEED REPAIRES AND REWINDERS OF ELECTRIC MORORS, VENERATORS SUBMERCIBLE MOTORS, H. T. TRANSFORMERS ETC.

**Phones :**

**Works : 20681** **Resi: 470081.**



दादा आपल्या मनाशीच म्हणाले असते, 'अरे बाबा, आधीच उशीर झाला आहे. दीड महिना झाला, आणखी किती थांबू ?'

आध्यात्मिक मार्गातील साधुसंतांनाही कौटुंबिक भावजीवन असते. भक्तीच्या, ज्ञानाच्या मार्गावर आरूढ झालेले थोर साधुपुरुषही कुटुंबवत्सल असतात. अर्थात, 'पद्मपत्रमिवाम्भसा' ते कुटुंबीय संसारात, सामान्य जनाप्रमाणे गुरफटून जात नाहीत ! कुटुंबवत्सल ज्ञानमार्गी ती. दादांचेही एक रमणीय भावविश्व होते.

मी लहानपणापासूनच एक उपद्व्यापी मुलगा. माझे सतत काहीना काही उपद्व्याप चालूच असत. मी वाडीला आमच्या घरातील माळ्यावर जेथे सहसा कोणी जात नसे. केव्हा केव्हा जात असे. त्या माळ्यावर, अनेक मजेशीर वस्तु मिळाल्या. एक सांगण्याजोगी वस्तु अशी. उसाचा रस काढण्याचे एक सुबक लहानसे असे चरकयंत्र आढळले. ते लोखंडी होते.



ती. दादा पू. दत्तमहाराज व ती. वहिनी सौ. लक्ष्मीबाई

चौकशी करता, आमचे आजोबा वक्रतुण्डबुवा अण्णा यांनी, स्वतःच्या कल्पनेने व स्वतःच्या देखरेखीखाली ते लोहमय छोटे, सुबक चरकयंत्र बनवून घेतले होते. कशासाठी ? तर गणपतीला उसाच्या रसाचा अभिषेक करण्यासाठी !

असेच एकदा, माळ्यावर माझे उपद्व्याप चालू असताना, जुन्या ब्रिटिश काळातील पोस्ट-पाकिटांचा व कार्डांचा मजेशीर गठ्ठा आढळला. त्यावेळची कार्डे आजच्या कार्डापेक्षा निम्म्या आकाराची होती. पाकिटातील पत्रे कुतूहल म्हणून वाचू लागलो. फार जुनी पत्रे असल्यामुळे सर्व मजकूर नीट कळत नव्हता. मजकुराशी माझाही काही मतलब नव्हता. पण विशिष्ट मायन्यामुळे, माझे कुतूहल जागे झाले. आणखी काही पत्रे पाहिली. धारवाडहून कोणा प्रियकर पतीने आपल्या प्रेयसी पत्नीला उद्देशून लिहिलेली ती पत्रे होती. पत्राचा मायना, 'प्रिय कमल' व शेवटी तुझा अमुक अमुक असा उल्लेख होता. नंतर लक्षात आले. ती. दादांचे आपल्या प्रिय पत्नीचे (लक्ष्मी) ते खासगीतील नाव होते !

ही गोष्ट त्यावेळी मी कोणासही बोललो नाही. नाहीतर, 'मेल्या, तुला कोणी नसते उपद्व्याप सांगितले होते ?' म्हणून आईने मला रपाटे मारले असते ! ती. महाराजांनी तर, 'गाढवा, अभ्यास करावयाचा सोडून, माळ्यावर या भानगडी करत बसतोस ?' म्हणून मला लम्बकर्णच केले असते. एकूण प्रकार ध्यानात आल्यावर, ती सर्व पत्रे मी तेथेच माळ्यावर टाकून दिली.

'प्रिय कमल' चा हा संदर्भ पाहिल्यावर, माझ्यासारख्या उपद्व्यापी माणसाच्या मनात विचार येतो. ६८ वर्षे यथार्थ सहधर्मिणी म्हणून साथ दिलेली 'माझी प्रिय कमल' मला सोडून निघून केली ! दीड महिना झाला आणि तरीही मी अद्यापि येथे कसा ?'

अशी भावविश्वातील मानसिक अवस्था ती. दादांची झाली असेल काय ? पत्नी सौ. सत्यभामा दिवंगत झाल्याची दुःखद बातमी, मंडालेच्या तुरुंगात कळताच, तो थोर स्थितप्रज्ञ लोकमान्य (टिळक), 'मी हादरलोच !' अशा कारुण्यमय शब्दात, आपल्या दाम्पत्यजीवनाच्या भावविश्वातील तरल भावना व्यक्त करता झाला ! थोरांनाही भावविश्व असते. विधुरावस्थेचे दुःख त्यांना जाणवते.

ती. सौ. वहिनी गेल्यावर ती. दादांची तब्येत झपाट्याने खचू लागली. ती त्यावेळची त्यांची निःशब्द निपचित अवस्था (खरे तर भावसमाधीच !) पाहिल्यावर, ती. दादांनी विशिष्ट तन्मयतेने शिकवलेला कालिदासकृत शोकमय अजविलाप मला आठवला.

दशरथाचा पिता अज व आई इंदुमती उपवनात एकमेकांच्या उत्कट प्रेममय सहवासात रममाण झालेले असतानाच, पूर्व शापामुळे नाजूक फुलांच्या माळेचा स्पर्श होताच, इंदुमतीचा दुःखद मृत्यू होतो. प्रिय पत्नी इंदुमतीच्या आकस्मिक मृत्यूने हताश झालेल्या अजाला, गुरू वशिष्ठमुनी उपदेश करतात. पण कशाचा काही उपयोग होत नाही. प्रिय इंदुमतीच्या ध्यानीमनी नसलेल्या मृत्यूने वेडापिसा झालेला, हादरलेला अज, अखेरी आत्महत्त्येचे पातक नसलेल्या त्रिवेणी-संगमात आत्मसमर्पण करतो !

प्रिय कमल गेल्यावर ती. दादांची भावविश्वातील मानसिक अवस्था, अजासारखीच असेल काय ?

सौ. वहिनी जाऊन जेमतेम दीड महिना झाला आणि पाठोपाठ ती.दादांची प्राणज्योत, दि. १ मार्च ९९ रोजी मालवली.

'कमल मी आलोच हं !' असे कारुण्यपूर्ण आर्त उद्गार, अंत्यसमयी ईश्वराचिंतनासह 'तीर्थरूप' दादांनी काढले असतील काय ?

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

# तीन पत्रे नव्हेत ही तर शिक्षात्रयी !

पं. वसन्त अ. गाडगीळ



**मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णाः**
**त्रिभुवनम् उपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः।**
**परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं**
**निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ॥**

हे प्रश्नार्थक सुभाषित पन्नास वर्षापूर्वी (१९४९ मार्च) टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्रीबालमुकुन्द संस्कृत महाविद्यालयात असताना सर्वप्रथम शिकायला मिळाले. विद्यापीठवाड्यात (५२१ सदाशिव पेठ, पुणे ३०) असणाऱ्या वसतिगृहात रोज सायं. (दिनचर्येचा अनिवार्य भाग म्हणून) गीतापाठ नित्य असे. त्या गीतापाठात स्थितप्रज्ञस्य का भाषा ? यासारखी प्रश्नावलीसुद्धा कण्ठस्थ झाली. परंतु प्रारंभीच्या सुभाषितांनी पृच्छा केलेला तो सत्पुरुष नव्हे भगवद्‌अवतार युगपुरूष पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर या नावाने त्या काळी सर्वांना सर्वत्र आणि आम्हा त्यांच्या छात्रांना (नित्य दर्शन असूनही) सहज प्राप्य आहे त्याच्या कृपाकूर्मदृष्टींनी आमचे पोषण होत आहे याची त्या काळी आम्हा मन्दमतींना कल्पनाच नव्हती. 'आमचे सर्वात लाडके अतिशय आदरणीय श्रद्धेय, शिष्य व्हावे, भक्त व्हावे तर अशांचेच अशा कोटीची ही भगवदवतार विभूति आम्हापुढे याची ओळख त्याकाळी जेवढी पटायला हवी तेवढी पटली नव्हती हे तर खरेच. परंतु आज ५० वर्षांच्या या जीवनयात्रेतील भूतकाळाकडे वळून पाहताना आम्ही किती भव्य दिव्य भाग्याचे ? असे वाटून आपले जीवन आपली पात्रता नसतानाही धन्य धन्य झाल्याचे वाटू लागले. खरंच आमच्या या भाग्याचा कोणी हेवा केला तरी त्या बिचाऱ्यांना दोष नाही देता येणार ?

सत्पुरुष, महात्मा, शान्तिब्रह्म, स्थितप्रज्ञ या सर्व विशेषणांचे विशेष्य असणारे पू. दत्तमहाराज होते कसे, वागत कसे, बोलत कसे यापेक्षा ते अतिशय कळकळीने सारे अंतःकरण ओतून पत्रे कशी लिहीत असत याचा शोध घेतला तर ? माझ्या संग्रहातील पू. दत्तमहाराजांची मी जपून संगोपन केलेली योग्य प्रकाशनाच्या प्रतीक्षेत राखून सुरक्षित ठेवलेली तीन पत्रे हा मी ऐतिहासिक मोलाचा दस्तऐवज असणारा महत्त्वाचा ठेवा मानतो.

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज (टेंबेस्वामी) यांनी कुमारांपासून वृद्धापर्यंत पुरुषांना आणि स्त्रियांना आचारबोधाचे आदर्श पाठ देणारी 'शिक्षा-त्रयी' लिहून अखिल मानवतेवर केलेला उपकार कोण विसरू शकेल ? त्याच महाराजांचे शिष्योत्तम, भक्तोत्तम अनुगृहीत असणाऱ्या पू. दत्तमहाराजांची आज 'धर्मभास्कर' सर्वप्रथम प्रकाशित करीत असलेली संलग्न तीन पत्रे म्हणजे एक प्रकारची शिक्षात्रयीच आहे. त्यांचे मनन, चिंतन करणाऱ्याला पू. दत्तमहाराजांचे शब्दात दत्तमहाराज या पत्रांतून 'अक्षर' झाल्याचे आढळेल.


सर्वमित्र पं. श्रीपादराव कवीश्वर यांना पू. दत्तमहाराजांनी लिहिलेले पत्र हा तर आज सर्वत्र किंकर्तव्यतामूढ असणाऱ्या तरुण पिढीला दिलेला एक आदर्श व्यवहारपाठच आहे. कवीश्वरकुलाच्या जमाखर्चाच्या जमेच्या बाजूतील सहावे कलम वाचून, त्याचे गांभीर्य ज्याला समजेल त्याला स्थितप्रज्ञ शान्तिब्रह्म कशाची, किती चिंता वाहातो याची कल्पना येईल. श्रद्धापूर्वक होणारी भगवदाराधनाच सर्वसंकटनिवारक आहे. यासारखे त्रिकालाबाधित दिलासा देणारे सुभाषित याच पत्रात वाचायला मिळते. 'ऋणापनयनार्थ' कोठेतरी जाण्याचा पत्रांती व्यक्त झालेला मानस त्यांच्याच भाषेत 'दुष्पूर-प्रपञ्चपूर्त्यर्थ योगी महात्म्यालाही ऋणी होण्याचे कष्ट झेलावे लागतात हे नकळत सहजपणे सांगून जातो. कवीश्वरकुलाचे कार्य व यश अविच्छिन्न असावे याच उद्देशाने ईश्वर प्रेरणेनेच हे पत्र लिहिले गेले आहे. या वाक्याने कर्ताकरविता सर्व काही तो एक परमात्माच ही आस्तिक्य श्रद्धा युवा पिढीच्या मानसावर वज्रलेप व्हावी ही सदिच्छा. मूक तळमळ व्यक्त होते. एक आदर्श युवशिक्षा म्हणून मी या पत्राचे मोल फारच मोठे आहे असे मानतो आणि ही ईश्वरी प्रेरणा सद्धर्महृदयींना सतत जागती ठेवीत राहील या सुदृढ विश्वासापोटीच या पत्राच्या प्रकाशनाचा हा प्रपञ्च आहे.

दुसरे सध्या अनेकांना अस्वस्थ करून सोडणारे महत्त्वाचे पत्र आहे ते पूज्य गुरूमाऊलीला त्यांच्या सेवाकाळात सोसाव्या लागलेल्या अमानुष छळवादाचे दर्शन घडविणारे. हे पत्र प्रकाशातच येऊ नये यासाठी अनेकांनी केवळ स्वतःची अनिच्छाच प्रकट केली असे नव्हे तर काही वीतलज्ज दुष्टांचे दुष्टप्रवृत्तीचे पुरे वस्त्रहरणच करणारे हे पत्र प्रकाशात येणे म्हणजे त्या दुष्टांच्याच केवळ नव्हे ज्या संस्थांनी असे क्रूरकर्म 'विषकुम्भ पयोमुख' शिरोधार्य आणि सर्वगुणसंपन्न मानताना 'योगियांचा राजा छळकपटाचा धनी' करण्याचे पाप संस्थेच्या शिरी येऊन एखाद्या अशा क्रूरकर्म्याच्या कृष्णकृत्याची जबाबदारी संस्थाही झटकू शकत नाही. या विपत्तीला तोंड देण्याची आपद् ओढवते म्हणून संस्थेलाही काही बाजू असू शकते. तिलाही प्रतिवाद करता

येईल अशा गर्भित धमक्याही ऐकाव्या लागल्या. हे पत्र प्रकाशात यावे या ईश्वरी प्रेरणेनेच पूज्य महाराज जर हे पत्र स्वतः लिहून आमच्यासारख्यांना 'आम्ही तेव्हापासूनचे सत्यान्वेषी पत्रकार आहोत' हे माहीत असूनही देतात तेव्हा 'अशस्त्र वध' आणि 'पाकिस्तानात नसूनही निर्वासित होण्याचे पारितोषिक देणारे दुष्ट' हे देशभक्त म्हणून मुखवटा घालून समाजात वावरत असले तरी किती ढोंगी नि अप्रामाणिक होते हे समाजाला केव्हातरी कळावेच या हेतून दुसऱ्या क्रमांकाचे संपूर्ण पत्र ज्याला कोणत्याही भाष्याची जरूरीच नाही धर्मभास्कर प्रकाशित करीत आहे हे मी भक्तांचे भाग्य मानतो. श्रीकृष्णलीला वर्णन करताना तो चाणूरमर्दन होता एवढे मात्र झाकून ठेवा असे म्हणणे आणि पूज्यश्री दत्तमहाराजांच्या महत्तेला काही राहू कसे ग्रहण लावण्याचे प्रयत्न त्याकाळी करीत होते ते मात्र आज सांगू नका (त्यांना काय वाटेल ?) हा आग्रह धरणे हे आम्ही समानच मानतो. श्रीदत्तचरित्रातील हा छळवादाचा काळाकुट्ट अध्याय म्हणूनच प्रकाशत येणे ही एक धर्मसेवाच आहे जी 'धर्मभास्कर करीत आहे.

तिसरे पत्र हे सुद्धा, 'आता सर्व काही मिटले आहे' तेव्हा ते प्रकाशात येऊ नये असा अनेक आप्त जनांचा आग्रह दिसला. पण हे सारे आग्रही आप्त आप्तवाक्यं शबदः । आप्तस्तु यथार्थवक्ता' या पू. गुरूजींनींच आम्हाला शिकवलेल्या कोटीतील 'यथार्थवक्ते' असते तर आम्हाला त्यांचाही मान राखावा लागला असता. परंतु पू. गुरूजींचे एक नव्हे, दोन नव्हे नित्य नवीन अनेक चरित्रकार त्यांची अनेक आवृत्त्या निघणारी चरित्रे लिहिताना वा प्रकाशित करताना पू. श्रीगुरूजींच्या स्वाक्षरीतून अक्षर झालेली स्थलकालाबाधित चरित्रसाधने त्यांची सर्वाधिक महत्त्वाची बोलकी पत्रे न पाहाताच, त्यांचा उल्लेखही न करता त्या त्या चरित्र ग्रंथाचे विक्रमी पीक काढतात तेव्हा त्यांचेही या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक साधनाकडे लक्ष वेधण्यासाठी हे पत्र किंवा ही पत्रे प्रकाशित करण्याचे साहसी कर्तव्य कुणाला तरी पार पाडावेच लागते.

आज प्रथमच प्रकाशात येत असणारी ही सर्व पत्रे वाचकांनी केवळ एखादी कथा वाचून बाजूला करण्यासारखी नव्हेत तर ती चिंतन, मनन, निदिध्यासन करण्यासारखी आहेत. समाजाला पत्ररूपाने मिळालेली ही शिक्षात्रयी आहे या दृष्टीने नवीन समाजात नवा मनु घडू पाहाणाऱ्यांसाठीही पाठ्यक्रमात समाविष्ट व्हावीत अशी ही पत्रे अभ्यसनीय ठरावीत.




पत्र - १

*श्रीगणेशदत्तगुरूभ्यो नमः ।*

*आयुष्यमान श्रीपाद कवीश्वर यांसी -*

*दत्तात्रेय कवीश्वरकृत समस्त-वेदोक्त-निखिलाशिषः। विशेषस्तु -*

*तुमचे कालचे वाडीचे व तत्पूर्वीचे एक-दोन वर्षांतील एकाकी अवस्थेतील संस्कृत भाषाभ्यास ध्यानात येऊन बरे वाटले. त्यापूर्वीही प्रभुकृपेने तुम्हाला दैवानुकूल्य सर्व दृष्टीने लाभल्यास तुमच्या लोकोत्तर उत्कर्षाविषयी ती. महाराजांना वाटत असलेला विश्वास मध्ये पत्राने व्यक्त होत होता. माझाही पूर्वीपासूनच तुमच्या कर्तृत्व शक्तीविषयी असणारा विश्वास मध्यंतरी झालेल्या दैव प्रातिकूल्य प्रयुक्त तुमच्यां व आमच्या वाताहतीमुळे दग्धप्राय होऊ लागला होता. तो तुमच्या परवाच्या दोनही पत्रांवरून पुनश्च अंकुरदशापन्न होऊं पाहात आहे. तो दृढमूल होऊन सत्फलक्षम होण्यास भगवत्कृपा, मातापितरांचे शुद्धतम पुण्यबल व सर्वांचे अदृष्ट यांच्या साहाय्याची मुख्य अपेक्षा आहे. ते साहाय्य आहे किंवा कसे हे पाहाण्याकरिताच, ईशप्रेरणेने हा पत्रलेखनाचा प्रयत्न घडत आहे. याचा तुम्ही सर्व बंधूंनी, ईशशक्तीविषयी गाढ श्रद्धामय अशा अवस्थेत 'विचार केल्यास भगवत्कृपेने योग्य ती दिशा निश्चित ठरून त्यायोगे कवीश्वरकुलाच्या प्रथितयशोवृक्षाची वृद्धि निष्प्रत्यूह होईल आणि त्यामुळे पश्चिमावस्थापन्न मातापितरांच्या व परिवारातील सर्वही लहानथोर मंडळींच्या अंतःकरणात शान्तिस्वरूप परमात्म्याचे निरंतर वास्तव्य होऊन कुलपरंपरा व शास्त्रपरंपरा यांना अनुसरून असलेल्या कार्यपद्धतीने यथार्थ राष्ट्रोद्धाररूपी सांस्कृतिक संघोद्दिष्ट कार्यही साधणारे आहे असे वाटते.*

*आत्यंतिक शान्तिलाभ हें सर्वांचेच उद्दिष्ट आहे. प्रपंचात दैवयोगाने घडणाऱ्या नानाविध प्रसंगामुळे चित्तविक्षेप असह्य होऊन ते शान्तिस्वरूप लुप्तप्राय होते. ही विक्षेपस्थिती सह्य होण्यास भगवत्स्वरूपाचे यथार्थज्ञान किंवा तत्कारणीभूत विवेकवैराग्यादि साधने यांची विशेष आवश्यकता आहे. ही साधकदशा पूर्णपणे बाणण्याकरिताच सच्छास्त्र विद्येचा खरा उपयोग आहे. 'सुहृद सर्वभूतानी सुहृदं प्रत्युपकारिणाम्' दयाघन प्रभूविषयी दृढतमश्रद्धेचा उदय न झाल्यामुळे अथवा दैव प्रतिकूल्यामुळे दुष्पूरप्रपंचाच्या पूर्तीकरिता अन्य विद्याभ्यास किंवा अन्य व्यवसाय करण्याचा प्रसंग येत असला तरी सच्छास्त्राभ्यास अगदीच विच्छिन्न होऊ न देता यथावसर तोही चालू ठेवून मनुष्य जन्माच्या मुख्य ध्येयाच्या प्रयत्नात सर्वांनी असावे हीच खरी ती. महाराजांची सदिच्छा आहे आणि याच इच्छेस अनुसरून चि. गजानन याने येथे सकाळी आर्टस् कॉलेजमध्ये जाऊन दुपारी संस्कृत, गायन, कीर्तन यांचा व्यासंग करावा असे आम्हास वाटत असल्याबद्दल श्री. हरिभाऊंनाही सांगलीस लिहिले होते व सर्वांचा विचार काय आहे*

ते कळविण्यासही लिहिले होते. परंतु त्यांचे काहीच उत्तर नाही. कदाचित त्यांना हा विचार पसंत नसेल. असो किंवा विशेष उद्योगामुळे आम्हाला उत्तर पाठविण्यास वेळही मिळत नसेल. तुम्हालाही इतर व्यवसाय करावा असे प्रापंचिक परिस्थिती पाहून वाटत असल्यास तसा व्यवसाय येथेच कोणाच्या तरी साहाय्याने सुरू करून सवडीप्रमाणे अभ्यासही चालू ठेवण्यास काय हरकत आहे ? काही दिवसांपूर्वी कडुसचे श्री. विष्णुपंत महाजन श्री. गोखले वकीलांचे घरी भेटले होते. त्यांनी त्यावेळी 'आम्ही एक मोठ्या प्रमाणात दुधाचा व्यापार करण्याची कंपनी काढलेली आहे असे सांगितले. त्यांच्या त्या कंपनीत किंवा त्यांच्या शिफारशीने अन्य कोठेही व्यवसायात तुमचा प्रवेश होऊ शकेल व येथे राहिल्याने चांगल्या विद्वानांच्या प्रेमछत्राखाली तुमचा विद्याभ्यासही हळूहळू चालू राहील. हा खरा फायदा आहे. चि. गजानन यांसही तुमच्या साहाय्याने संस्कृताभ्यास चालू ठेवून श्री. पराजपे (मठातील) यांचेप्रमाणे पीएच.डी. पर्यंतही अभ्यास करता येईल व कीर्तन व्यासंग योग्य तो झाल्यास येथील बी.ए. झालेल्या श्री. कोपरकर, श्री. गोविंदस्वामी आफळे यांच्यासारख्या कीर्तनकाराप्रमाणे प्रथितयश होता येईल आणि प्रपंचाकरिता धनाचीही वाण पडणार नाही. तसेच स्वतंत्रपणे त्या गादीवरून लोकोपदेश रूपाने अत्यावश्यक असे राष्ट्रकार्यही करता येईल. विद्येबरोबरच शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं वि ज्ञान मास्तिक्यम् ब्रह्मकर्म स्वभावजम् । (गी. १८.४२) या भगवदुपदिष्ट नेतृगुणांचीही खरी जोपासना होत राहील असा प्रयत्न झाला पाहिजे.

याप्रमाणे विशेषतः तुम्हा दोघां कनिष्ठ बंधूंना उद्देशूनच वरील मार्गदर्शन आमच्या मताने केलेले आहे. आपणास पाहिजे तसा योग्य आकार वेळवाला बाल्यावस्थेतच देता येणे शक्य आहे. म्हणून बाकीचे दोघे बंधु आता स्वयंप्रज्ञ झाले असल्याने व त्यांना सध्या श्री. हरिभाऊंच्या योग्य नेतृत्वाखाली योग्य दिशा लागण्याचा संभव दिसत असल्याने (त्यांनी मात्र दिग्दर्शकांवर अढळ विश्वास ठेवून उद्यमशील बनले पाहिजे.) त्यांच्याबद्दल लिहिण्याची आवश्यकता वाटत नाही.

आपल्या घराची प्रापंचिक स्थिती थोडीशी लिहिणे भाग आहे. (१) आतापर्यंत मातापितरांनी यावच्छक्य जनसेवापूर्वक प्रपंचशकट उत्तमप्रकारे चालविला असून या वृद्धावस्थेत त्यांना कोठेतरी भगवत्सान्निध्यात विश्रांतिसुख मिळणे आवश्यक आहे. (२) प्रसंगोपात्त त्यांच्या अवशिष्ट तीर्थयात्राही होऊन नित्यनैमित्तिक धर्मकृत्येही त्यांच्या इच्छेप्रमाणे काही प्रमाणात तरी चालू राहिली पाहिजेत. (३) घरातील मुलांची मुलींची मंगल-कार्ये कुल व परिस्थिती ही पाहून होणेची आहेत. (४) चि. अशोक. चि. अनंत इ. मुलांचा विद्याभ्यास संपूर्ण होणेचा आहे. चि. गजाननचा व तुमचाही काही काल विशेष स्वरूपात तो चालू राहणार आहे. (५) आजपर्यंत निरपेक्षपणे सर्वात्मना साहाय्य करणाऱ्या व्यवहारदक्ष



अशा श्री. हरिभाऊ व सौभाग्यशालिनी पद्मावती या दम्पतींच्या प्रेममय ऋणांतून अंशतः मुक्त होण्याकरिता प्रतिवर्षी कर्तव्यबुद्धीने काही योजना झाली पाहिजे. (६) प्रसंगाने त्या त्या ठिकाणी असणाऱ्या परिवारातील सर्व मंडळींचा वार्षिक अन्नवस्त्रादि खर्च चालला पाहिजे... अशा सहा गोष्टी सध्या कर्तव्य म्हणून आपल्या डोळ्यांपुढे खर्चाच्या आहेत. तसेच -

१. प्रतिवर्षी त्या त्या ठिकाणचे स्थावरांचे उत्पन्न. २. माझी येथील प्राप्ति. ३. चि. दिगम्बर व वासुदेव यांच्या व्यवसाय तत्परतेने होणारी सांगलीची प्राप्ति. ४.कदाचित तुम्हाला येथे व्यवसायाचे आनुकूल्य लाभल्यास तुमची प्राप्ति. ५. चि. गजानन याला वरील मार्ग पसंत पडून त्याने वडिलांच्या इच्छेस अनुसरून तसा अभ्यास करण्याचे ठरविल्यास त्यामुळे कदाचित उत्साहवशात् मध्ये मध्ये मातापितरांचे अन्यत्र जाणे घडल्यास ती प्राप्ति व चि. गजाननलाही येथील अभ्यासात सवड सापडून यदृच्छेने काही अर्धार्जनाची संधी आल्यास ती प्राप्ती अशी उभयविध संभाव्य प्राप्ती. ६. परिवारातील लहानथोर सर्व मंडळींच्या अंतःकरणात, मानुष्यकसुलभ अशा वास्तविक कर्तव्यच्युतीमुळे किंवा दूरदृष्ट प्रयुक्त अवास्तव कल्पनेप्रमाणे एकमेकांविषयी तदा तदा उत्पन्न होणारी पुरोगामिता सद्विवेक बलाने प्रशान्त झाल्यास वाक्‌संयमपूर्वक शांतवृत्तीने व्यवहारातील सर्व कार्ये वेळच्या वेळी व्यवस्थित चालू राहाणे ही मुख्य प्राप्ति. अशा सहा जमेच्याही बाजू आहेत. या जमेच्या व खर्चाच्या दोनही बाबींचे पूर्णपणे निरीक्षण करून आत्मसंयमपूर्वक या प्रापंचिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करणारा एखाद्या उत्तम अर्थमंत्री आमच्या बंधूपैकी कोणीतरी असला पाहिजे. आणि ईश्वरकृपेने ती पात्रता अंकुररूपाने चि. दिगंबर व आयुष्मान् पद्मानुज (श्री. श्रीपाद) या दोघामध्येच असल्याचे वारंवार मी वडीलमंडळीजवळ उद्घोषितही केले आहे व या दोघांच्याबद्दल विशिष्ट प्रसंगी आम्हाला सात्त्विक अभिमानही वाटतो. तो खरा वाटून त्याचे फळ मिळण्याकरिता त्यांनी अगाध शान्तिसागर व पूर्ण भगवत्कृपापात्र अशा श्रीमातृपितृदेवांच्या आज्ञेने काही भगवदुपासना श्रद्धापूर्वक केली पाहिजे. श्रद्धापूर्वक होणारी भगवदाराधनाच सर्वसंकट निवारक आहे. असो. हे पत्र घरी सर्व मंडळींना दाखवून सर्वांचे विचारे जसे ठरेल तसे करावे. तुम्ही दोघांनी येथे स्वावलंबनाने राहावे किंवा बार्शीचे बिऱ्हाड येथे आणावे याबद्दल वडील मंडळी काय ठरवावयाचे ते ठरवितील. कदाचित बार्शीच्या मंडळींचे भाग्य असल्यास त्यांना वाडीवासही घडेल. तो विचार प्रभूंकडे आहे. आपणास आता काही अधिकार नाही. तुम्ही मात्र येथे येऊन निर्दिष्ट उद्योगास लागण्याचे ठरल्यास प्रथम स्वावलंबन किंवा दुसऱ्याच्या दोषाचे प्रेमानेच परिमार्जन करण्याची संघकार्याची हातोटी या दोनही गोष्टींबद्दल तयार असले पाहिजे. असो. कवीश्वरकुलाचे कार्य व यश अविच्छिन्न असावे याच उद्देशाने ईश्वरप्रेरणेनेच हे पत्र लिहिले गेले आहे. याची फलोत्पत्ति ईश्वरेच्छाधीन आहे. ती. मावशी व सौ. आईसाहेब यांना नमस्कार. लहानांस आशीर्वाद. ती. महाराजांचे पत्र बरेच दिवसांत

ब्रह्मर्षि पं. दत्तमहाराज कवीश्वर
विशेषांकास शुभेच्छा

प्लॅस्टिक उद्योगातील अग्रेसर उत्पादक

**श्रीराम प्लॅस्टिक्स**

**उत्कृष्ट पारदर्शक बाटल्यांचे उत्पादक**

**परीक्षित प्लॅस्टिक्स प्रॉडक्टस्**

**पी. व्ही. सी. बाटल्याचे उत्पादक**

संपर्क : श्री. सुधीर दांडेकर

**१, शिवमंगल बिल्डींग, प्रकाश सिनेमाजवळ, माहिम रस्ता, पालघर, जि. ठाणे ४०१ ४०४**

**फोन**
**कार्यालय : ५५२५४२ निवास : ५५२०४२**

सतत अठ्ठावीस वर्षे हिंदू संस्कृती व हिंदूधर्माचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या 'धर्मभास्कर' ने २९ व्या वर्षात पदार्पण केले आहे, ही नक्कीच कौतुकाची गोष्ट आहे.
आमच्यातील अनेक महाभाग स्वतःला 'हिंदू' म्हणवून घेण्यात कमीपणा समजतात म्हणून आपण सुरू केलेले हे कार्य लाख मोलाचेआहे.

**धर्मभास्करचे अभिनंदन !**

**वसंत वॉशिंग कॉन्ट्रॅक्टर व ठाणा पॉवर लॉण्ड्री**

भास्कर कॉलनी, महात्मा गांधी मार्ग, नौपाडा, ठाणे - २.

दूरध्वनी : ५४२ २३१७.

नमस्कार. लहानांस आशीर्वाद. ती. महाराजांचे पत्र बरेच दिवसांत नाही. वैशाखात कोठेतरी ऋणापनयनार्थ जाणेची इच्छा आहे. कोठे योग आहे का पहावे. कळावे हे आशीर्वाद.

दत्तात्रेय

तात्पर्य भ्रमामुळे अहम्मति शब्दापासून काही काळ शाब्दभ्रम झाला. तो 'न हि सर्वविदस्तुसर्वे' या न्यायाने सहृद्य ठरेल. असो. पत्रोत्तर यावे हे आशीर्वाद.

पत्र - २ दि. १९/६/१९६५

श्रीमान माननीय काशीनाथशास्त्री अभ्यंकर

संस्कृत मण्डलाध्यक्ष, पुणे, यांचे सन्निध सादर प्रणामपूर्वक विज्ञापना.

आपणांस ४/५ दिवसांपूर्वी एक पत्र सविस्तर पाठविले आहेच. त्यावेळी आपणांकडून व नंतरही काही मण्डळींकडून "माझ्याविषयी अप्रामाणिकत्वबुद्धि, आपणा सर्वांची, सभेमध्ये माझे पत्र दाखवून श्री. अधिपतींनी करून दिल्यामुळे आपण आपल्या निग्रहशक्तीचा वापर माझ्याबद्दल केला" असे वृत्त समजले. त्यामुळे वस्तुस्थितीदर्शक हे पत्र लिहिण्याचा प्रसंग उद्‌भवला आहे.

"फाल्गुन पौर्णिमेपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत सुटी एक महिना आहे" असे श्री. अधिपतींनी सांगितल्यामुळे मी वृद्ध मातापितरांच्या भेटीस जालना मुक्कामी गेलो. सुटी सुरू झाल्यावरही येथेच राहून विद्यार्थ्यांचे आवश्यक विभागाचे पाठ संपवून गेलो. जालन्यास चैत्र शुक्ल पक्षात मी आजारी झालो. लगेच तेथील प्रसिद्ध प्रमाणिक डॉक्टर श्री. नाईक यांचे औषध सुरू केले. ४/५ दिवसांनी ताप कमी झाली. तरी औषध चालूच होते. त्यावेळी पौर्णिमेपर्यंत आपण पुण्यास जाऊ शकू अशा भावनेने मी त्यासुमारास पौर्णिमेचे आधी एक पत्र श्री. अधिपतींना पाठविले की, "मी बहुतेक पौणिमेस तेथे येईन." त्याच पत्रात मी असेही लिहिले असावे की, पू. पिताजीही आजारी असल्याने त्यांना वाडीचा दूरचा प्रवास झेपणार नाही म्हणून चैत्र वद्य सप्तमीपर्यंत मला वाडीस पू. पिताजींच्या अनुष्ठानासाठी जावे लागेल." नंतर इंजेक्शने चालू होती. शक्तीही पूर्ण आली नव्हती. म्हणून श्री. डॉक्टरांच्या व वडील मण्डळींच्या सांगण्याप्रमाणे मी पौर्णिमेनंतरही २/३ दिवस जालन्यास राहून संकष्टीस सकाळी तेथून निघून सायंकाळी येथे आलो. येताना औषधे बरोबर घेऊनच आलो. नंतर मंगळवार बुधवार दोन दिवस विश्रांती घेऊन बुधवारी रात्री मी वाडीस गेलो व तेथील उत्सवांग सेवा आटोपून वैशाख शुद्ध प्रतिपदेस येथे रात्री परत आलो. पुढे एकदोन दिवसांत श्री. अधिपतींनी सुटीतील वेतन वगळून काही उरलेले द्रव्य हातावर ठेविले ते मुकाट्याने घेऊन मी घरी आलो.

नंतर 'सुटी संपल्याबरोबर पहिल्या दिवशी मला उपस्थित होता आले नाही म्हणून वेतन स्थगित केले असावे." असे वाटून मी जालन्याहून डॉक्टरांचे प्रमाणपत्र मागवून (कारण मागे एकदा मी येथेच घरी आजारी असतांना व श्री. अधिपती समक्ष पाहून गेले असतांही त्यानी प्रमाणपत्राची मागणी केली होती. त्याप्रमाणे श्री. डॉ. चाफेकरांचे प्रमाणपत्र मी आणून दिले होते.) त्याच्यासह एक प्रार्थनापत्र श्री. अधिपतींना पाठवून, 'सुटीतील वेतन स्थगित केले गेले त्याबद्दल पुनर्विचार व्हावा." हा अभिप्राय कळविला. त्याचे उत्तर काय आले वगैरे पुढील प्रकार आपणास विदित आहेच.

ही वस्तुस्थिती आपणांस कळविली आहे. ही विचारांत घेतल्यास यांत अप्रामाणिकपणा आहे किंवा नाही हे कोणाही प्रेक्षावानास कळून येईल अशी खात्री आहे. प्रत्यक्ष अर्थाचा निर्णयही एकदम करता येत नाही. मग हा तर परोक्ष अर्थ आहे. याचा निर्णय आणि तोही आपणांसारख्या अनेक प्रेक्षावानांच्या पुढे ५/१० मिनिटांत होतो आणि एका अकिंचन विद्यासेवकाचा वृत्तिच्छेद व अशस्त्रवध तडकाफडकी संस्कृत विद्यापीठाच्या


ब्रह्मर्षी पं. दत्तमहाराज कवीश्वर विशेषांकास
आमच्या शुभेच्छा

**मालखरे बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा. लि.**

पत्ता :
मालखरे कॉम्प्लेक्स - विश्रामबाग,
यूथ हॉस्टेल समोर - औरंगाबाद.
दूरध्वनी : २५३६२, ३३२२३०

विचारसभेत केला जातो. यापेक्षा दैवदुर्विलास तो कोणता ?

आपणास माझे पत्र दाखवले गेले त्यावेळी पत्र लिहिणारा मी येथे उपस्थित असताना माझा अभिप्राय जाणून घेण्याचीही अपेक्षा आपणा कोणासही कशी वाटली नाही ? आपली सभा खाली चालू होती. मी माडीवरच होतो. २/३ मिनिटांत हा खुलासा होऊ शकला असता. त्या सभेत येण्यास मला अधिकार नाही असा लोकशाहीचा कायदा असेल तर वाटेल त्याच्यावर वाटेल तसे आक्षेप सभेपुढे यावेत आणि त्याचा निर्णय मात्र विचारवंतांनी आक्षेप घेणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे तत्काल द्यावा. ही लोकशाहीची पद्धत मात्र न्याय्य आहे काय ?

आणखी एक विचार्यप्रश्न आपणापुढे मांडत आहे. (१) पूज्य पिताजींच्या सांप्रदायिक कार्याकरिता, (२) सहस्रचण्डी, अतिरुद्रस्वाहाकार व अग्निष्टोमादि श्रौतयाग. (अशा श्रौतयागाचे वेळी अमरावतीस श्री. काशीकरही आले होते.) व (३) दुष्पूरप्रपञ्चपूर्ति, अशा तीन कार्यांचे निमित्ताने मी मध्ये मध्ये बाहेर जातो. तेही श्री. अधिपतींना लेखी, तोंडी सांगूनच मी जात असतो. घरची परिस्थिती, पू. पिताजी व पू. सौ. माताजी यांची अगतिकता इत्यादी व्यावहारिक गोष्टीही ऋजुवृत्तीने श्री. भागवतगुरूजी व श्री. धूपकरगुरूजी यांना सांगून त्यांच्या मार्गदर्शनाची याचना मी वेळोवेळी केली आहे. इतकेच नव्हे तर मला जेव्हा मागे श्री. वासुदेवानंद-सरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या १२ खंडांच्या वाङ्मयाच्या (पाच हजार पाने) प्रचाराकरिता काही दिवस नागपूर वगैरे भागात जावे लागले त्यावेळी मी एक सविस्तर प्रार्थनापत्रही श्री. अधिपतींना पाठविले होते व त्यात 'मला प्रसंगाने असे जावे लागेल तरी मला वर्षातून सुट्टीसह दोन महिनेपर्यंत जाण्याची परवानगी असावी. दीड महिना आपली सुट्टी मिळतेच आणखी १५ दिवसांची परवानगी मला मिळावी असे सविस्तर प्रार्थनापत्र मी पाठविले असता त्यांचा आजपर्यंत काहीच विचार झाला नाही व ते आपणापुढे आलेही नाही.

शाळा सुरू असताना ट्रीपला मुलांना पाठविण्यात त्यांच्या मनावर संस्कार व्हावा ही अशी बुद्धी असते तशीच बुद्धी एखाद्या अध्यापकाला न दिसणारी धर्मकार्ये पाहून व्हावी असे वाटत असल्यास तो अधर्म ठरणार नाही असे वाटते. ऐंशी वर्षे असणाऱ्या पू. पिताजींच्या इच्छापूर्तीकरिताही एखादेवेली जाणे अप्रगल्भ ठरणार नाही.

तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाकडून आपल्या आत्मीयदृष्टीने मला कर्ज मिळाले व त्याची परतफेड प्रतिमास २५ रुपये वेतनातूनच आज ३॥ वर्षे होत आली आहे. पण त्याची पोचपावती किंवा हिशेब मागणी करूनही आजपर्यंत मला मिळू शकला नाही. कारण मी नियम्य आहे. प्राध्यापक आणि संभार्जनकर्ता या दोघांचेही नियम्यत्व येथे समानच आहे. नियामकांनी वाटेल त्या नियम्यावर वाटेल त्यावेळी अविश्वास जाहीर सभेत प्रकट करून त्याला आपली नियामक शक्ति केव्हाही दाखवावी. नियम्य मात्र अविश्वास शब्दही उच्चारू शकत नाही. ही सध्याची लोकशाही. असो.

असेच आणखीही बरेच ऋण हजारापर्यंत मुलींच्या लग्नादिनिमित्ताने झालेले आहे. त्याबद्दलही काही परिहार व्हावा या हेतून एखादेवेळी मी श्री. अधिपतींना वस्तुस्थिती निवेदन करून गेलो आहे. आणखी १/२ वर्षे धांवा यातून मी मुक्त होईन. अशी लेखी प्रार्थनाही त्यांना त्या त्या वेळी केली. पण या ऋजुवृत्तीचा काहीच उपयोग झाला नाही हे आजच्या घटनेवरून सिद्ध झाले. विद्यार्थ्यांचे अभ्यासही राहिले नाहीत. थोडे मागेपुढे तेही पूर्ण झाले आहेत हे आजपर्यंत न्यायवेदांतातील पारंगत विशारद या परीक्षा झालेल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिसाक्षीला अवगत आहे.

माननीय श्रीमान आचार्य लिमये २/३ वेळा येथे येऊन गेले. त्यावेळी मी नव्हतो. हा दोष माझ्या कानांवर घालण्यात आला. पाठ संपवून मी एखाद्यावेळी लग्नास, घरातील काही अस्पर्शनादि अडचणीमुळे घरी अथवा येथेच पाठीमागे शौचासही गेलो असेन. त्यावरून मी कधीच येथे नसतो अशी समजून त्यांची झाली असे मला सांगण्यात आले व माझे निम्बार्कभाष्याचे लेखनकार्य फार दिरंगाईने व बेफिकिरीने चालले आहे असे भासविण्यात आले. प्रथम माझी स्थिती मांडतो. रक्तक्षय, रक्तदाब इत्यादी विकाराने १० वर्ष मी आजारी असूनही आपण दिलेले लेखनकार्य करीत होतो. छापखान्याची खोटी कधीच झालेली नाही. उलट समर्थ भारत



छापखानाच जवळ जवळ एक वर्षापर्यंत बंद होता. असे असूनही वाक्यपदीयाचे ४०० पानांचे लिखाण माझ्याकडून करवून घेऊनही माझीच दिरंगाई आपणासारख्या प्रेक्षावान पुरुषांस भासविली जावी व श्री. आचार्य लिमये यांच्यासारख्या सर्वविषयी स्निग्ध, समप्रकृतीच्या विवेकी पुरुषांनाही माझ्याकरिता सी. आय. डी.चे काम करण्याचा प्रसंग आणला जावा हे केवढे आश्चर्य ! त्यांनी मला समक्ष केव्हाही बोलावले असते तरी मी जाण्यास तयार होतो. गेलोही आहे. त्यांनी व आपण आजपर्यंत माझ्याबद्दल सहानुभूति दाखवली आहे. त्याचेच प्रधानफल श्रीनिम्बार्कभाष्याचे माझ्याकडून पूर्ण झालेले विवरण आहे. अशी माझी आंतरभावना आहे. असे नसते तर मी केव्हाच बहिष्कृत केलो गेलो असतो. पण आज हा विद्यादेवीचा अपमान आपल्यासमोर घडून आला याचा विषाद वाटतो.

विद्यालयाला सुटी असलेल्या पूर्वदिवशी 'सुटी आहे' अशी नोटीस फलकावर पूर्वी लागत होती. पण अलीकडे मात्र १-१॥ वर्ष झालं असावे. उद्या ग्रंथालयाला सुटी आहे अशी नोटीस लागू लागली. त्यामुळे अध्यापकांनी सकाळी उठून येथे यावे तो वाडा बंद. फक्त दिण्डी उघडी. वर येऊन सर्व कुलुपे पाहून परत जावे हा विद्यादेवीचा अधिक्षेप आपल्यासमोर कोण मांडणार ? आणि त्यावर आपण विश्वास कसा ठेवणार ? पत्राच्या विपरीत अर्थावर मात्र लगेच विश्वास ठेवून आपण सर्वांनी कायदा वापरून शिक्षा देण्याचा निर्णयही दिला. अनुग्रह शक्तिपेक्षा निग्रहशक्तीलाच प्राधान्य संस्कृत विद्यापीठात तरी उचित ठरणार नाही. याप्रमाणे सामान्य संमार्जनकर्मकर्त्यापेक्षासुद्धा प्राध्यापकांचे नियम्यत्व हीन समजले जाते. या अनुभवाचा विचार आपण कोणीही करू शकत नाही. हे परवाच्या गोष्टीवरून समजून आल्यावरून प्राप्तकर्तव्य म्हणून मी पुढील निर्णय घेत आहे. याला आपली संमति मिळावी ही प्रार्थना.

ज्या द्रव्यामुळे आपल्या सर्वांच्या प्रेक्षावत्तेचा विघात करून नियामकताच विजयी झाली ते वेतनद्रव्य माझे कायमचेच स्थगित व्हावे. फक्त १५/१६ वर्षांप्रमाणेच यापुढेही विद्यादेवीचे निर्वेतन आजीव सेवकत्व ईशकृपेने व आपणा सर्वांच्या पूर्ण संमतीने मला लाभावे, इतकीच अंतिम इच्छा आहे.

वरील निर्णय व त्याचे कारण म्हणून लिहिलेली सविस्तर पत्रातील सर्व भूमिका आपण सभेपुढे मांडण्यास हरकत नाही. आपण जे कराल ते योग्यच कराल अशी माझी दृढ भावना आहे. फक्त पूज्य श्री. वासुदेवशास्त्रीजींचा एक महत्त्वाचा श्लोक -

अभिनिवेशवशीकृतचेतसां बहुविदामपि संभवति भ्रमः । हा येथेच सार्थ ठरलेला पाहाण्याचा योग यावयास नको होता. असो.

हतविधिलसितानां ही विचित्रो विपाकः ।

विद्यार्थ्यांचे पाठ वगैरे सर्व माझे कर्तव्य पूर्ववत चालू राहीलच. पण पोषणार्थ मला काही इतर प्रयत्न करावा लागेल. तो सफल होईपर्यंत मला विद्यापीठाकडून पाचशे रूपये ऋण मिळावे किंवा फंडातून आपले पूर्वीचे ऋण भागून काही शिल्लक राहात असल्यास ते पैसे मिळावेत अशी प्रार्थना आहे. कारण यावेळी मी पाकिस्तानात नसतानाही निर्वासित होत आहे. यापूर्वी दोघे पंडित निष्कासित झाले. तिसरा क्रमांक माझा आहे हे मी जाणून होतोच. तो समज आज आला इतकेच. हरीची इच्छा. कळावे. कृपाछत्र असावे ही विनंती.

विशेष : १९६२ जानेवारीच्या पगारातून याप्रमाणे प्रतिमास पंचवीस रुपये विद्यापीठाची परतफेड आजपर्यंत करून घेतली आहे. ३॥ वर्षे झाली म्हणजे १०५० रुपये फेड झाली आहे. आता ४५० रुपये ऋण राहिले आहे असे वाटते. ही विनंती.

दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर

पत्र - ३

ब्रह्मर्षि पं. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या स्मृतीस विनम्र प्रणिपात

॥ श्री ॥

**वसुधा केटरर्स**

**समारंभ आयोजनाची संपूर्ण व्यवस्था**

संपर्क : अशोक वाघमारे

फोन : घर : ३३०७८४, ऑफिस : २५८७५, सिडको : ४८८४३९.

पत्ता : बी/१, विशाल अपार्टमेंट, ज्योती नगर, औरंगाबाद.
६८०, सह्याद्रीनगर, सिडको एन् - ५, औरंगाबाद.

गेली ४६ वर्षे जनता जनार्दनाची अविरत सेवा करून
श्रीगजाननच्या कृपा आशीर्वादाने
४७ वर्षांत पदार्पण करत आहोत !
कलात्मक रंगीत मुद्रणाकरता नावाजलेले
नागपूर परिसरातील एकमेव मुद्रणालय

**मधुकर आर्टस्**

धंतोली - नागपूर - १२. फोन : ५२१६८२.

श्रीमान रा. उद्धवराव फडणीस यांना सप्रेम सादर निवेदन

ज्या देवासमोर आपण आपली परिस्थिती सांगून आम्हाला राहण्याकरता १/२ वर्षेच जागा पाहिजे, आमची जागा १/२ वर्षांत बांधून झाल्याबरोबर आपली जागा खाली करून देऊ, असे आपण आम्हाला सांगितलेत, त्याच देवासमोर बसून हे पत्र लिहावे लागत आहे. कारण आपण, आपले आप्त व इतर सल्लागार आणि प्रेक्षक अनुमोदन देणारे सर्वांनी मिळून आमच्याविरूद्ध जो असत्याचा प्रचार चालविला आहे तो आपल्या बुद्धीचा व वाणीचा दुरुपयोग होत आहे हे पाहून जगातून कृतज्ञता नष्ट होत चालल्याचे दुःख झाले म्हणून सत्य वस्तुस्थितीही जनताजनार्दनापुढे यावी एवढ्याच उद्देशाने हे पत्र लिहिणे भाग पडत आहे. श्रीकृष्णांनी सुद्धा आपल्यावरील चोरीचा आळ दूर करण्याकरिता प्रयत्न केलेला आहे आणि सत्य परिस्थिती, एकतर्फी ऐकणाऱ्या लोकांना दाखवून दिली आहे.

आपण प्रथम कबूल केल्याप्रमाणे दोन वर्षांनंतर आपणास विचारणा केली असता, जागेला कॉर्पोरेशनची परवानगी मिळत नाही, पाणी मिळत नाही असे सांगून प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. नंतर काही दिवसांनी, मी स्वतंत्र ओनरशिप घरच घेण्याचे प्रयत्नात आहे असे आश्वासन दिले. शेवटी आम्ही परवा आषाढ मासात आपली प्रार्थना केली की, तूर्त आम्हाला येथील आमच्या जागेत शौचाकरिता खाली उतरून येण्याची शक्ती राहिली नाही. करिता आम्हाला आपण राहात असलेल्या देवाच्या जागेतील एक खोली तूर्त आम्हाला देवाच्या पूजेकरिता देण्याची दया करा अशी प्रार्थना केली. त्यावेळी विचारार्थ उपस्थित असणाऱ्या सज्जनांनीही, तूर्त एक खोली द्या असे आपणास सांगितले. तथापि, आपण आवेशाने सर्वांसमक्ष उत्तर दिले की, मी सध्या या सोसायटीत जागा घेण्याचे प्रयत्नात आहे, ती जागा मिळताच दोनही खोल्या मी सोडून देईन' असे आपण सांगून ती सभा विसर्जित केली, आपल्या म्हणण्यावर आमचा विश्वास नाही असे नाही, म्हणून आम्ही पाच वर्षे, चढउताराचे पाण्याचे कष्ट सोसून, आपण दिलेल्या शब्दांवर विसंबून कसे तरी जीवन कंठीत राहिलो हे आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजे. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, आपण येथे आणि गावोगावी करीत असलेला आमच्या विरुद्धचा असत्यप्रचार प्रत्यक्ष कानावर येऊ लागल्यामुळे वाईट वाटले. आपणास फक्त, एका ब्राह्मण कुटुंबास साहाय्य होत आहे तर होऊ दे या सद्बुद्धीनेच जागा दिली, याबद्दल भाड्याची आम्हाला बिलकूल अपेक्षा नसल्याचेही आपणास वेळोवेळी सांगितले. आपण तूर्त विकत घेतलेल्या जागेत एक भाडेकरी एका खोलीत दोनशे (अंदाजे) रुपये भाडे देऊन राहात असल्याचे समजले, हा हिशोब लक्षात घेतला तर दोन खोल्यांचे पाच वर्षांत किती भाडे झाले असते याचा विचार आपण केलेला दिसत नाही. परंतु देवाच्या दरबारात आपण दोषी ठरू नये याच हेतूने आम्ही आपणाकडून एकही पैसा भाड्याची अपेक्षा केली नाही असे असता, 'आमचा नळ तोडला, लाईट बंद केला, मालक दुष्ट वेडा आहे. असा आपल्यातर्फे गावोगाव होत असलेला प्रचार ऐकून आम्ही थक्क झालो आणि जगातील कृतज्ञता संपली, आता डोळे झाकलेले बरे असे वाटू लागले. वेळापूर, अकलूज, बार्शी, बैराग गावोगावी लोक बोलू लागले. येथेही लोकांची दिशाभूल करीत आहात, जे खळांची व्यंकटी सांडो हे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे सांगणे सत्य असल्याचे प्रत्ययास आले आणि त्यांच्या प्रार्थनेप्रमाणे, आम्ही आमचा कर्मभोग म्हणजे आपण सर्व लोकांत चालविलेली आमची निंदा समाधानाने भोगत राहण्याचा प्रयत्न करीत आहोत असे असता, 'आमचा लाईट तोडला' असे असत्य लोकांपुढे आपण कसे मांडता ? एका ब्राह्मण कुटुंबाला निवासस्थान व दीपप्रकाश दोन्हींचेही साहाय्य आमचेकडून व्हावे अशी देवाचीच इच्छा समजून आम्ही स्वस्थ आहोत. येथे व इतर गावी आपणासारखे पैशून्य आम्ही कधीच केले नाही, आमच्याबद्दल कोणाकोणाला आत्मीयता वाटते हे आम्हीही पूर्णपणे जाणू शकत नाही. तसे आमचे आत्मीय सज्जन श्री. भाऊसाहेब वाकडे, श्री. मनोळकर इ. नुसते आपणाबरोबर विचार विनिमयाकरिता

॥ ॐ ॥

**वाई आणि वाई परिसरातील ग्राहकांची पहिली पसंत...**
**उच्च प्रतीचा**
**आसाम व निलगिरीचा उत्तम स्वादाचा**
**हायग्रोन**

# विश्वास चहा

**वितरक**
**मे. वामन शंकर शेंडे**

**चहाचे व्यापारी**

किसनवीर चौक,
वाई ४१२ ४०३
दूरध्वनी : (०२१६७) २०३२०

**सुपरशॉपी**
**आपल्याला हवे ते सारे काही !**

आले असता, तुम्ही कोण विचारणार ? तुमचा काय संबंध ? अशी त्यांना दुरुत्तरे करून उलट या लोकांना मालकांनी मुद्दाम आम्हाला त्रास देण्याकरिता पाठवले हे मालकांनी आमच्यावर मारेकरी घातले असे निरर्गल प्रलाप आपण सर्वांपुढे काढता हे आपणास मुळीच शोभत नाही. मोठ्या निराशेने विषण्ण होऊन हे पत्र लिहित आहे. आपण वाणीचा तरी यापुढे संयम करा. वाणीचे तरी पाप बंद होऊ दे एवढीच प्रार्थना आहे. दुसरी जागाही आपल्या सांगण्याप्रमाणे पाहून दिली तर त्याबद्दल बेफिकीरी दर्शविली आहे असो. एका खोलीत एका कोपऱ्यात देवाची पूजा चालू ठेवून इतर जागेत आपले सामानही राहिले असते पण कोणताच विचार मानावयाचा नाही या भूमिकेवर आपण राहिला, राहा. देवाच्या दरबारात अन्याय घडू नये या प्रयत्नात आम्ही आहोत, एका अकिंचन ब्राह्मणाला घरातून नव्हे तर इहलोकातूनही घालविण्याचे महापाप आपणाकडून देवांनी घडू देऊ नये इतकीच शेवटी प्रार्थना करून थांबतो.

'सत्कर्मयोगे वय घालवावे' काया, वाचा, मनाने सत्कर्मेच घडली पाहिजेत. नाही तर देवाचे शासन फार कडक आहे. अणुबॉंब पडून सत्तर हजार वस्तीच्या हिरोशिमा शहराची एका क्षणात राखरांगोळी झाली. पिढ्यानूपिढ्या कराची शहरात राहणारे हिंदू, एका रात्रीत, धनानिशी व जिवानिशी नाहीसे झाले हे सामुदायिक दुरितांचे फळ आहे. पापकर्ता, त्याचा सल्लागार, अनुमोदक तिघेही सारखेच दोषी असतात. न्यायाने वा अन्यायाने मिळविलेले घरदार येथेच राहाते इतकेच नव्हे तर मिळविणारास देहही त्याच घरात ठेवून निघून जावे लागते आम्ही शांत आहोत, कळावे.

तुमच्या पैशाची आम्हाला अपेक्षाही नव्हती, केवळ कॉन्ट्रॅक्टरच्या आग्रहाने ते घ्यावे लागले. तथापि ते आपले व कॉन्ट्रॅक्टरचेही सर्व पैसे बायकांच्या अंगावरील सोने विकून देऊन टाकले याप्रमाणे आपल्या व कॉन्ट्रॅक्टरच्या कोणाच्याही ऋणात आम्हाला देवानी न ठेवल्याने आम्ही समाधानाने इहलोक सोडण्यास तयार आहोत असे असता, आम्ही मालकाला पैसे दिले आहेत, भाडे दोनशे रूपये देतो, घराचा टॅक्स भरतो असा असत्यप्रचारही आपण चालू ठेवला, उपकाराची फेड अपकाराने करण्यासारखे आम्ही आपले काय नुकसान केलेले आहे ? याचा प्रथम विचार करून असत्य प्रचाराचे चहाडांचे वाचिक पाप तरी आपण कमी करण्याचा प्रयत्न कराल अशी आशा आहे.

एका महात्म्याच्या हाताने भूमिपूजन झालेल्या जागेत काही देवीचे स्मारक करून तेथे सर्वकल्याणार्थ काही उपासना चालू राहावी, वेदाभ्यास करणारे चार विद्यार्थीही तेथे अभ्यास करतील असा उद्देश सर्वांसमक्ष आपणाजवळ बोलून दाखवला होता. पण आपण तिकडेही दुर्लक्ष केलेत म्हणजे देवालाही आपणास जुमानावयाचे नाही असे दिसते. तुमचे सर्व कर्म आणि कार्य देव बघून घेईल यापेक्षा आम्ही काय करू शकणार. ईश्वराने आपणास संतती, संपती, मानाचा हुद्दा ही प्रपंचातील अनुकूलता दिलेली आहे. फक्त असत्याचा अभिनिवेश, अविवेक हा दोष देवाने दूर केल्यास आपली मैत्री देवांनासुद्धा अमान्य होणार नाही. कळावे.

आपला एक हितैषी - दत्तात्रेय कवीश्वर

शेवटी तेथे राहाणाऱ्या मालकाच्या मुलास पोलीस ठाण्यामध्ये डांबून ठेवून आणि इकडे भयभीत होऊन बिऱ्हाडी बसून राहणाऱ्या


वर्षारंभ विशेषांकास
हार्दिक शुभेच्छा

एम्. एस्. बोल्टस्चे
निर्माते

शालगर बोल्टस्
इंडस्ट्री

: कार्यालय :
शालगर सदन ९२,
सदाशिव पेठ,
सातारा ४१५००४.

: दूरध्वनी : ४४६९१

महाबळेश्वरला जाताना
अवश्य भेट द्या.

कृष्णेच्या घाटानजीक, शहराच्या
मध्यवस्तीत

प्रशस्त हॉल, उत्तम शाकाहारी
भोजन, सहली व समारंभाची खास
व्यवस्था

बंडू गोरे
भोजनालय

५९६, गणपती आळी, वाई ४१२८०३
(सातारा)
दूरध्वनि : ७१०२६

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर
विशेषांकास शुभेच्छा

बा. वि. गोडबोले

साधा व सुवासिक जर्दा
नेहमी वापरा.

उत्पादक :
गोडबोले जर्दा

१ अ/व्यंकटपुरा पेठ,
सातारा (महाराष्ट्र)

दूरध्वनी : २०१६२, २४४६१

*त्याच्या पत्नीस दहशत घालून दम दिला. हे कृत्य करून आपण अविवेकाचा व कृतघ्नतेचा उच्चांक गाठला आहे. आता मुलाप्रमाणे आम्हालाही पोलीस ठाण्यामध्ये डांबून ठेवण्याची आपणास इच्छा होईल तर त्याही तयारीत आम्ही राहू 'आलिया भोगासी असावे सादर' हा हिताचा आदेश आम्हाला शिरोधार्य आहे. धन्यवाद.*

*दत्तात्रेय कवीश्वर*

## काळाच्या आणि करनीच्या कसोटीवर तावून सुलाखून निघालेले पं. दत्तमहाराजांचे ब्रह्मर्षिपद

॥ जया अंगी मोठेपण तया यातना कठीण ॥

॥ चणे खावे लोखंडाचे तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥

ही दोन्ही संतवचने पुराणिक, प्रवचनकार, कीर्तनकार यांच्या तोंडून महाराष्ट्राने थोर अवतारी पुरुषश्रेष्ठांच्या जीवनचरितांचे अवतारकार्याचे निरूपणातून अनेकवेळा ऐकली असतील. परंतु १ मार्च ९९ या दिवशी परमेश्वरचरणी विलीन झालेले थोर ब्रह्मर्षि, न्यायवेदान्तासारख्या प्राचीन शास्त्रांचे प्रकाण्ड पंडित, विद्यावाचस्पती दत्तात्रेयशास्त्री तथा दत्तमहाराज कवीश्वर यांच्यासारख्या भागवतोत्तमाला असह्य अशा यमयातनांतून जावे लागलेले असेल याची त्यांना 'निष्काम परब्रह्म', 'चालता बोलता वेदान्त', 'मूर्तिमंत स्थितप्रज्ञ' मानून, त्यांच्यासमोर नतमस्तक झालेल्या आजच्या असंख्य उपासक भक्तांपैकी कुणाला फारशी कल्पना असेल असे मला वाटत नाही. याचे कारण वाचकवर्गासमोर आलेल्या त्यांच्या कोणत्याही चरित्रग्रंथात, आठवणींच्या संग्रहात माझ्या संग्रही मला मिळालेल्या त्यांच्या आत्मनिवेदनपर पत्रांचा अगदी पुसटसासुद्धा उल्लेख कुठेही आढळला नाही. विसाव्या चालू खिस्त शतकाच्या अस्तमानाचे वेळी महाराष्ट्राच्या धार्मिक विश्वातील विद्वत् क्षेत्रातील एका सर्वश्रेष्ठ थोर महात्म्याचे (त्या शतकातील ऐतिहासिक महत्त्वाचे ठरणारे), ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे 'ब्रह्मपद' कशी खडतर वाटचाल करीत त्यांच्याजवळ आले याची साक्ष म्हणून, याचा उल्लेख मला आज करावा लागत आहे.

ज्यांच्या सहकुटुंब - परिवार निर्दय हत्येच्या भीषण आठवणीने आजही आपले चित्त थरारते, त्या व्याकरणमहापंडित प्रा. काशिनाथशास्त्री अभ्यंकर यांना ५५१ शनिवार पेठ, पुणे २ या आपल्या निवासस्थानातून न्यायवेदान्ताचे महापंडित प्रा. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांनी १९ जून १९६५ रोजी लिहिलेले हे चार पृष्ठांचे प्रदीर्घ पत्र (याच अंकात संपूर्ण प्रसिद्ध होत असलेले) कुणाचेही अंतःकरण पिळवटून टाकेल आणि सात्त्विक संतापाच्या त्वेषाने कुणीही पेटून उठावे अशा दाहक, विदारक सत्याने


हार्दिक शुभेच्छा !!!

**मे. श्रीकृष्ण जगन्नाथ**

✳ विजय विलास कॉम्प्लेक्स,
'बी', खोली ११,
दुसरा मजला,
प्लॉट ३७, सेक्टर १९ (आयसीआय),
वाशी ए. पी. एम. सी. एरिया,
नवी मुंबई
निवास : ७७०२४२१

✳ वकील बिल्डिंग, वडगादी
मुंबई ३

२९ व्या वर्षारंभ विशेषांकास शुभेच्छा

'ज्ञानेश्वर' 'हरिहरेश्वर'

संपूर्ण महाराष्ट्राला मोहिनी घालणारे, सतत हवेसे वाटणारे **'कंदी पेढे'** बनवतात फक्त वाईचे **'खामकर स्वीट होम'**
पेढ्यांचा राजा कंदी पेढा मिळण्याचे एकमेव ठिकाण

**खामकर स्वीट होम**

शिवाय
* खामकर डेअरी
* खामकर मिल्क प्रॉडक्टस्
वाई (सातारा)
दूरध्वनी दुकान : ७००१७
निवास : ७०३०५

**आपल्या घरापासून म्हटलं तर दूर ! म्हटलं तर जवळ, चार दिवस विरंगुळा म्हणून आपण याच !! निसर्गरम्य वातावरण, थंड हवा, हवेशीर खोल्या आणि घरच्यासारखेच स्वादिष्ट रुचकर शाकाहारी भोजन, आपण आपल्या घरी तर नाही ना !!! आपण सहज म्हणाल. विनम्र सेवा, आदरातिथ्य पाहून आपण खूष व्हाल अशी खात्री आहे.**

**हॉटेल गिरीविहार**

**(श्रीरामकृष्णभुवन)**

महाबळेश्वर (सातारा)

भरलेले आत्मनिवेदन आहे. प्रा. का. वा. अभ्यंकर हे टिळक विद्यापीठ चालवीत असलेल्या श्रीबालमुकुंद संस्कृत महाविद्यालयावर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्कृत मंडळाचे अध्यक्ष होते. याच महाविद्यालयात स्थापनेपासून (डिसेंबर १९४८) न्यायमीमांसा वेदान्त शिकविणारे पं. द. धुं. कवीश्वर यांना, त्यांच्या तथाकथित अपराधाबद्दल आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून, एकतर्फी निकाल देऊन, त्यांच्या मासिक ५०० रुपये वेतनांपैकी निम्मे म्हणजे पंधरादिवसांचे वेतन रु. २५० दंड ठोकून कठोर शिक्षा करण्यात आली होती. यांचा अपराध कोणता ? तर म्हणे हे (पं. कवीश्वर) आजारी असल्याचे सांगून पंधरा दिवस गैरहजर राहिले. पं. द. धुं. कवीश्वर गुरुजी या पत्रांत संस्कृतमंडलाध्यक्षासमोर आपली बाजू मांडतांना प्रारंभीच लिहितात -




'फाल्गुन पौर्णिमेपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत सुटी एक महिना आहे.'' असे श्री. अधिपतींनी सांगितल्यामुळे मी वृद्ध मातापितरांच्या भेटीस जालना मुक्कामी गेलो. सुटी सुरू झाल्यावर येथेच राहून विद्यार्थ्यांचे आवश्यक विभागांचे पाठ संपवून गेलो. जालन्यास चैत्र शुक्ल पक्षांत मी आजारी झालो. लगेच तेथील प्रसिद्ध प्रामाणिक डॉक्टर श्री. नाईक यांचे औषध चालूच होते. त्यावेळी पौर्णिमेपर्यंत आपण पुण्यास जाऊ शकू अशा भावनेने मी त्या सुमारास पौर्णिमेचे आधी एक पत्र श्री. अधिपतींना पाठविले की ''मी बहुतेक पौर्णिमेस तिथे येईन. पू. पिताजीही आजारी असल्याने त्यांना वाडीचा दूरचा प्रवास झेपणार नाही म्हणून चैत्र वद्य सप्तमीपर्यंत मला वाडीस (नृसिंहवाडी) पू. पिताजींच्या अनुष्ठानासाठी जावे लागेल.'' नंतर इंजेक्शने चालू होती. शक्तीही पूर्ण आली नव्हती. म्हणून डॉक्टरांच्या व वडील मंडळींच्या सांगण्याप्रमाणे मी पौर्णिमेनंतरही दोनतीन दिवस जालन्यास राहून संकष्टीस सकाळी निघून सायंकाळी येथे आलो. येतांना औषध बरोबर घेऊनच आलो. नंतर मंगळवार बुधवार दोन दिवस विश्रांती घेऊन बुधवारी रात्री मी वाडीस गेलो. तेथील उत्सवांग सेवा आटोपून वैशाख शुद्ध प्रतिपदेस येथे रात्री परत आलो. पुढे एक-दोन दिवसांत श्री. अधिपतींनी सुटीतील वेतन वगळून काही उरलेले द्रव्य हातावर ठेवले ते मुकाट्याने घेऊन मी घरी आलो.

''एका अकिंचन सेवकाचा वृत्तिच्छेद आणि अशस्त्रवध तडकाफडकी संस्कृतविद्यापीठाच्या विचारसभेत केला जातो यापेक्षा दैवदुर्विलास तो कोणता ?'

ज्या सभेत विद्यापीठाने पं. द. धुं. कवीश्वरगुरुजींचा आजार, त्या आजारीपणाबद्दल डॉक्टरांकडून आणलेले प्रमाणपत्र (मेडिकल सर्टिफिकेट) हे सर्वच खोटे ठरवून त्यांना मासिक पगाराच्या अर्धा, रु. २५० दंड ठोकला (अशस्त्र वध) त्या सभेसमोरही आपली बाजू मांडू न देता एकतर्फी निर्णय घेतला याबद्दल याच पत्रात ते पुढे म्हणतात, 'त्या सभेत येण्यास मला अधिकार नाही असा लोकशाहीचा कायदा असेल तर वाटेल त्याच्यावर वाटेल तसे आक्षेप सभेपुढे यावेत आणि त्याचा निर्णय मात्र विचारवंतांनी आक्षेप घेणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे तत्काल द्यावा ही लोकशाहीची पद्धत मात्र न्याय्य आहे काय ? ईशेच्छा !'

'आज हा विद्यादेवीचा अपमान आपल्यासमोर घडून आला याचा विषाद वाटतो.' असे विद्यादेवीमुपास्महे । असे बिरूद मिरविणाऱ्या विद्यापीठाला सांगून पत्राच्या शेवटी संमार्जन कर्मकर्त्यापेक्षा (झाडूवाल्यापेक्षा) सुद्धा हीन वागणूक दिल्याबद्दल हरीची इच्छा असे हितांना ते म्हणतात, 'यावेळी पाकिस्तानात नसतानाही मी निर्वासित होत आहे... ज्या द्रव्यामुळे सर्वांचा बुद्धीचा घात करून नियामकताच विजयी झाली ते माझे वेतनद्रव्य कायमचेच स्थगित व्हावे. फक्त गेल्या १५-१६ वर्षांप्रमाणेच यापुढेही विद्यादेवीचे निर्वेतन आजीव सेवकत्व मला लाभावे हीच अंतिम इच्छा.'

टिळक विद्यापीठाच्या त्या काळच्या प्रशासनाने सत्त्वशील अशा आपल्या गुरुजींना अशी अन्याय्य वागणूक देऊन त्यांना छळले असे समजताच आपल्या गुरुजींच्या सात्त्विक वृत्तीला शोभेल असा प्रतिशोध (सूड) विधायकमार्गानेच आपण घ्यावा असे आम्ही त्यांच्या सर्व लाडक्या विद्यार्थ्यांनी ठरविले आणि पाच, दहा, पंधरा असे करत पाचशे रुपये संस्कृतप्रेमी कवीश्वरभक्ताकडून उभे केले आणि 'कमवा आणि शिका' योजनेखाली ज्या सकाळचा वार्ताहर, छायाचित्रकार म्हणून १९५२ पासून मी काम करीत होतो त्या सकाळचे संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर या विद्याप्रेमींच्या हस्ते ही गुरुदक्षिणा समारंभपूर्वक टि.म.वि.चे कुलगुरू म. म. प्रा. द. वा. पोतदार यांच्या समक्ष पू. गुरुचरणी समर्पण केली. प्रज्ञाचक्षु पं. यशवंतराव मराठे

मूळव्याध ?
मान्यताप्राप्त रामबाण इलाज
केवळ ०५ दिवसांत आराम
सर्वत्र उपलब्ध आयुर्वेदिक टॅब्लेट्स २०,४०चे पॅक
पाईलपील पाईलपील
गुणकारी आयुर्वेदिक औषधांचे निर्माते
पार्ला फार्मा मुंबई ५७

यांच्या घरी हा हृद्य समारंभ झाला.

यापुढे विद्वानांची अशीच परवड झालेली दिसली तर याच विधायक मार्गाचा अवलंब करा. असे सांगून डॉ. परूळेकरांनी छात्रांच्या या गुरूभक्तीचे कौतुक केले आणि आमचे लाडके कवीश्वर गुरूजी ? गुरूदक्षिणा म्हणून दिलेल्या ५०० रुपयांपैकी त्यांना विद्यापीठाने ठोकलेल्या दंडाइतकीच रुपये २५० ही रक्कम स्वीकारून बाकीचे रूपये २५० त्यांनीआम्हाला परत केले आणि त्याच सभेत डॉ. नानासाहेब परूळेकर यांनी रु. २५० मूलधन म्हणून मानून **सकाळ पुरस्कृत विद्वत् पोषण निधी** हे नवीन काम उभे केले. या निधीच्या संचालक मंडळात स्वत: डॉ. ना. भि. परुळेकर आणि श्री.म.स.(बाबूराव) पारखे, पं.ना.श्री. (नानासाहेब) सोनटक्के, उद्यान कार्यालयाचे श्री. शंकरराव थत्ते, पं वसंत अ. गाडगीळ (चिटणीस) अशी पाच मंडळी होती. रूपया दोन रुपये प्रत्येकाकडून दरमहा गोळा करून त्या निधीतून याचना न करणाऱ्या परंतु विपद्ग्रस्त संस्कृत विद्वानांना दरमहा आवश्यक तेवढे अन्नधान्य शिधा (रेशन) घरपोच देऊन त्यांचा गौरव करण्याची ही योजना डॉ. परुळेकरांच्या हयातीपर्यंत चालू होती. (माझ्याशिवाय सर्व संचालक मंडळ आज काळाच्या पडद्याआड गेलेले आहे.) मॉडर्न हायस्कूलचे अंध झालेले पं. नारायणशास्त्री दीक्षित यांसारख्या अनेक विपद्ग्रस्तांना ही सेवा पोचविता आली. (घासून, तोडून, तापवून आणि ठोकून सुवर्णाची परीक्षा व्हावी तसे पू. कवीश्वर गुरुजींचे अवतारकार्य काळाच्या आणि कालानुरूप कलीच्या कसोटीवर तावून सुलाखून निघण्याचा हा काही एकमेव प्रसंग नव्हे. एके दिवशी पुण्याच्या एका दैनिकांतील पहिल्याच पानावर एका वार्तेच्या शीर्षकाने लक्ष वेधून चक्रावून सोडले. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांना अटक. खालील वार्तेत म्हटले होते, 'घरफोडीच्या गुन्हयाबद्दल पं. दत्तात्रेय ढुंडिराज कवीश्वरांना अटक करण्यात आली आहे.' याबद्दल चौकशी करता आढळून आले की, सध्या पू. दत्तमहाराजांचा निवास होता ते रेणूका हे घर अर्धवट बांधकाम झाले असताना एका भक्ताने गयावया करून तात्पुरता आसरा म्हणून तेथे राहायची संमति मागितली. हरिश्चंद्राचे अवतार असणाऱ्या दत्तमहाराजांनी उदारपणे त्याला तिथे आसरा दिला. आणि तो ते बळकावून बसला. म्हणाला, माझा ताबा घर माझे. यांच्या चिरंजीवांनी या बळकावणाऱ्याचे कुलूप तोडून फेकून देताच दत्तमहाराजांवर घरफोडीचा फौजदारी गुन्हा दाखल. श्री. ब. ना. भिडे वकीलासारख्यांनी यांचा खटला लढवून दीडदोन वर्षांनी न्यायालयाकडून यांना न्याय मिळवून दिला. घर बळकावणाऱ्या भक्ताला पू. दत्तमहाराजांनी लिहिलेले पत्रदेखील याच अंकी प्रकाशित झाले आहे.


धर्मभास्कर मासिकाला शुभेच्छा

**वैद्य आणि कंपनी**

बिल्डिंग मटेरियल सप्लायर, स्टेशन रोड, ठाणे ४०० ६०१.

फॅक्स : ५३७५०२६

दूरध्वनी : ५३३१५४३/५३३६०४५/५३६३३८२


पिढीजात संस्कृतविद्या आणि दत्तोपासना यांची ओतप्रोत पुण्याई लाभलेल्या कवीश्वर घराण्यात जन्म आणि तोही कृष्णा पंचगंगा यांच्या पवित्र संगमावर. तपस्यास्थली असणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वतींच्या परममंगल छत्रछायेत नृसिंहवाडीत सूक्ष्मदेहसिद्धी असणारे योगियांचे सम्राट श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामीमहाराज यांचा बालपणींच अनुग्रह. नृसिंहवाडी, सांगली, धारवाड, शृंगेरी पुणे यासारख्या ठिकाणी न्यायवेदान्तासारख्या गहन शास्त्रांचा सूक्ष्माभ्यास, पंडितश्रेष्ठ नागेशशास्त्री उप्पिनबेट्टिगेरी (धारवाड) तसेच वाराणसीचे शास्त्रसागर पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रवीड यांच्याकडून न्यायशास्त्राचे तर शृंगेरीशंकराचार्य जगद्गुरू पीठाचे आस्थानपंडित मीमांसाविद्वान पं. सुब्बाशास्त्री यांच्याकडून मीमांसेचे पाठ लाभलेले पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे केवल पुण्याचे, महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारतच्या संस्कृत विद्यापरंपरेला मुकुटायमान असे सर्वश्रेष्ठ भूषण होते. **पुण्यासारख्या ठिकाणी त्यांच्या विद्वत्तेची कदर नव्हे परवड झाली,** ज्यांच्याकडे त्यांनी अनिवार्य कुटुंबनिर्वाहासाठी सेवावृत्ती केली, त्यांनी त्यांच्या अथांग वैदुष्याची कदर करण्याऐवजी बोद्धारो मत्सरग्रस्ता: । न्यायाने दु:स्वास करून घोर विटंबनाच केली (याची साक्ष त्यांचे लेखारंभी उद्धृत केलेले पत्रच देत आहे) आम्हाला न विचारता परस्पर राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांना कलकत्त्याला बोलावून विद्यावाचस्पती पदवी देतात म्हणजे काय ? असेही महिना पाचशे रूपयाइतका प्रचंड पगार आपण या धोतरउपरणे पांघरून हिंडणाऱ्याला देतो म्हणजे प्रचंड उपकारच अशी धुंदी चढलेल्यांनी फूत्कार काढावेत यापेक्षा या पुण्यनगरीच्या पुण्याईचा क्षय अन्य काय असू




शकतो असा प्रश्न माझ्यासारख्या मंदमति छात्राला त्या काळी पडला नसता तरच नवल. परंतु दत्तमहाराजांचे वेगळेपण त्यांच्या नितांत वेदान्ती वृत्तीत असल्याचे वेळोवेळी जाणवून देणारे प्रसंग आम्हा अंतरंगातील निकटवर्तीयांना अनेकदा पाहायला मिळाले. अस्मानी वा सुलतानी अशा कोणत्याही विपत्तीचे वेळी हे शान्तिब्रह्म विचलित झाले नाही. म्हणून तर ते पं. दत्तात्रेयशास्त्री या पदावरून, प्रा. द. धुं. कवीश्वर या सामान्य संज्ञेकडून ब्रह्मश्री दत्तमहाराज या सर्ववन्द्य सम्राटपदावर केव्हा जाऊन पोचले याचा कुणालाच पत्ता लागला नाही असे म्हणण्यापेक्षा त्यांचे खरे स्वरूप वेळीच ओळखण्याबाबत अतिपरिचियाद् अवज्ञा झाली हे उशीरा का होईना कबूल करण्याचा प्रांजळपणा काही नव्य विद्याविभूषित डॉक्टरेटवाल्यांनी दाखविला तर ? कुत्र्याचे शेपूट सरळ झाल्याचा लोकविलक्षण चमत्कारच जगाला पाहायला मिळेल.

अलीकडेच राष्ट्रीय पंडित म्हणून राष्ट्रपति पुरस्काराचा बहुमान लाभलेले, पं. दत्तमहाराजांचे सहकारी प्राध्यापक म्हणून सान्निध्य लाभलेले थोर वैयाकरणी महापंडित प्राचार्य वामनशास्त्री भागवत गुरूजी संस्कृत विद्याक्षेत्रातील प्राचीन आणि अर्वाचीन विद्याविभूषित विद्वानांतील (शास्त्री आणि एम.ए.पीएच.डी.) संघर्षाची समस्या किती घातक आणि घोर आहे यावर प्रकाश टाकताना मला म्हणाले, 'अहो ! हे नव्य विद्याविभूषित पीएच.डी.डी.लिट्‌वाले आमच्यासारख्यांना (धोतर-उपरणे टोपीवाल्यांना) भटजी समजून या वर्गाला कमी लेखतात, पाण्यात पाहातात, यांचे मानधन हजारात तर आमचे शेकड्यातही नसते.' पं. भागवतगुरूजींच्या म्हणण्यात तथ्य नाही असे कोण म्हणेल ?

**नम: शान्ताय तेजसे ।**

आजच्या संगणकीय युगात प्रात्यविद्यांचा प्राचीन पाठशाळा परंपरेने विद्या रसनाग्रनर्तकी असणारा पं. दत्तमहाराजांसारखा शास्त्रीपंडितांचा व्यासंगी वर्ग झपाट्याने काळाच्या पडद्याआड चालला आहे. नुसती विद्वत्ताच नव्हे तर त्याला विवेक आणि वैराग्याबरोबरच ईश्वरी धर्मानुष्ठानप्रसादाची जोड लाभली तर त्यालाच स्वर्ण कस्तूरिकासंयोग म्हणतात. हा हृद्य संगम ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या चरित्रात चरितार्थ झशला आणि म्हणूनच डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. वराहवेंकटगिरी, डॉ. शंकरदयाळ शर्मा यांसारखी राष्ट्रपतींची त्रयी या पू. दत्तमहाराजांच्या सन्मानात स्वत:चा बहुमान मानू लागली. अशी धन्यता लाभलेले पू. दत्तमहाराज हा ज्ञान-विवेक-वैराग्याची त्रिविध ज्योत एकत्रच प्रकाशमान असणारा जगावेगळा थोर मंदादीप होता. शांत होऊन अमर झालेल्या या दिव्य नंदादीपाला आमचे अनंत प्रणाम !

नम: शान्ताय तेजसे । ॐ


## श्री वासुदेव निवासाची प्रकाशने

४२/४७, एरंडवणे, कर्वे पथ, पुणे ४११००४

**प.पू.श्रीटेंबे स्वामी वाङ्‌मय**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री दत्त माहात्म्य | ३५.० |
| २) | श्री गुरूदेव चरित्र | ३५.० |
| ३) | श्रीगुरूचरित्रम् (द्विसाहस्री-संस्कृत) | २०.० |
| ४) | शिक्षात्रयीम् (संस्कृत) | १०.० |
| ५) | श्रीदत्तचंपू (संस्कृत) | २.० |
| ६) | श्रीकृष्णालहरी (संस्कृत) | १.० |
| ७) | श्रीदत्तभावसुधारसस्तोत्रम् (संस्कृत) | २.० |
| ८) | श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार | ६.० |
| ९) | श्रीदत्तलीलामृताब्धिसार | ४.० |
| १०) | श्रीसत्यदत्तपूजाकथा | ५.० |
| ११) | नित्यउपासनाक्रम | ५.० |
| १२) | श्री दत्तात्रेय षोडशावतार पूजा विधान | २.० |
| १३) | समर्पकस्थलकाल मार्गदर्शिका | ५.० |
| १४) | श्रीकृष्णालहरी तरंग सौंदर्य | ३०.० |
| १५) | श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज **वाङ्‌मयसंपदा आणि जीवनसृष्टी** | ५०.० |
| १६) | श्रीवासुदेवमनन | १५.० |
| १७) | स्त्रीशिक्षा | ८.० |
| १८) | प. प. टेंबेस्वामीकृत 'प्रश्नावली' | २.० |
| १९) | माघ माहात्म्य | ५.० |
| २०) | स्मृती सौरभ | ५.० |
| २१) | त्रिशती काव्य | २०.० |
| २२) | द्विसाहस्री गुरूचरित्र (मराठी) | ३०.० |

**प. पू. गुळवणीमहाराज वाङ्‌मय**

| | | |
|---|---|---|
| १) | जीवनगंगा (आद्य) | ३५.० |
| २) | जीवनगंगा (द्वितीय) | ५०.० |
| ३) | जीवनगंगा (तृतीय) | ५०.० |
| ४) | जीवनगंगा (अंतिम) | ३५.० |
| ५) | स्मर्तृगामींच्या स्मृती | ३०.० |
| ६) | श्रीसद्‌गुरू साधक सुसंवाद | २५.० |
| ७) | योगवाणी (मराठी) अर्थात् सिद्धयोगोपदेश | १५.० |
| ८) | श्रीवामन त्रिपदी (प्राकृत) | १२.० |
| ९) | महायोग विज्ञान | २५.० |
| १०) | श्रीवामन सहस्त्रनाम मानस पूजा | ५.० |

**प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर वाङ्‌मय भगवती प्रकाशन**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमद्‌भागवत | ३०.० |
| २) | चांदणे कैवल्याचे | २५.० |
| ३) | द्विसाहस्री प्रवचने भाग १ | २५.० |
| ४) | द्विसाहस्री प्रवचने भाग २ | २५.० |
| ५) | विवेक चूडामणी | १७.० |
| ६) | सत्कर्मी रती वाढो | १७.० |
| ७) | विचार धन | २०.० |
| ८) | संत संग | १७.० |
| ९) | नारायणी नमोस्तुते | २५.० |
| १०) | गुण गाईन आवडी | १५.० |
| ११) | श्रीदत्तवाक्‌सुधा | २५.० |
| १२) | प्रयाग | ४५.० |
| १३) | चरित्र आणि विचारधन | ६०.० |

**इतर वाङ्‌मय**

| | | |
|---|---|---|
| १) | सूत संहिता भाग १ | २५.० |
| २) | सूत संहिता भाग २ | ४०.० |
| ३) | प्रसन्न पारिजात | ५०.० |
| ४) | श्रीस्वामीलोकनाथतीर्थ चरित्र | ४०.० |

# स्थितप्रज्ञः स उच्यते ।

**प्रा. प्र. शं. जोशी**



पन्नास वर्षे होत आली त्या गोष्टीला. त्यावेळी मी टि.म.वि.च्या बालमुकुंद विद्यालयाचा निवासी विद्यार्थी होतो. आम्हा विद्यार्थ्यांच्या चार गुरूजींपैकी तीन गुरूजींची निवासाची सोय विद्यापीठ वाड्यातच केली होती. केवळ स्वर्गीय दत्तमहाराज त्यावेळचे आमचे कवीश्वर गुरूजी शनवार पेठेत राहात होते. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी त्यांना सकाळ-दुपार विद्यापीठ वाड्यात यावे लागे.

त्यांची ती मूर्ती अजूनही डोळ्यांसमोर उभी राहाते. स्वच्छ शुभ्र धोतर आणि उपरणे या त्यांच्या पोषाखात कधीच बदल झालेला दिसत नसे. उन्हाळा असो वा हिवाळा, त्यांचा पोषाख ठरलेला. उन्हाळ्यात सुद्धा डांबरी रस्त्यावरून रखरखत्या उन्हात ते अनवाणी चालत येत. अधिक चांगला पोषाख वापरणे ही गोष्ट अशक्य नव्हती. पण 'इन्द्रियार्थेषु वैराग्यम्' हे ज्ञानाचे लक्षण त्या वेळेपासून त्यांच्या रोमारोमात भिनलेले होते. लोकोत्तर प्रखर बुद्धिमत्ता असूनही अहंकाराचा लवलेशही त्यांच्या ठिकाणी नव्हता. स्वतःच्या मुलीवर मृत्यूचा घाला पडला असतानाही दुसरे दिवशी विद्यापीठवाड्यात पाठ घेण्यासाठी ठरलेल्या वेळी येण्यात दिसून येणारी त्यांची स्थितप्रज्ञवृत्ती, एखाद्या योग्याला साजेशी होती. आम्ही विद्यापीठ-वाड्यात राहणारे विद्यार्थी काहीवेळा पाठाला वेळेवर उपस्थित राहू शकत नसू. पण कवीश्वर गुरूजींना उशीर झाला आहे असे कधीच होत नसे. क्षमाशीलता हा त्यांचा स्वभावच बनलेला. एखाद्याने एखाद्या दिवशी काहीतरी निमित्त काढून पाठाला बुट्टी मारली किंवा तो विद्यार्थी पाठाला उशीरा आला तरी ते त्याला काहीही जाब विचारत नसत. दुपारच्या वेळी एखाद्याला पाठाच्या वेळी डुलकी लागली आणि त्याचा सहाध्यायी त्याला डिवचून जागे करू लागला तरी 'नका त्याला त्रास देऊ. अभ्यासामुळे त्याला रात्री जागरण झाले असेल' असे ते इतरांना म्हणाल्याचे आम्हा सहाध्यायींना माहीत आहे. व्यवहारी जगाच्या दृष्टीने गुरूजींचा हा दृष्टीकोन अगदी चुकीचावाटेल. पण गुरूजी हे व्यवहाराच्या अतीत होऊन परमार्थाची वाटचाल केव्हापासूनच करत होते, ही गोष्ट अशा प्रसंगातून व्यक्त होते. आम्हा विद्यार्थ्यांना त्यावेळी त्यांच्या या प्रकारच्या वृत्तीचे कोडे उलगडायचे नाही. पण कवीश्वर गुरूजींच्या 'दत्तमहाराज' होण्याच्या मार्गावरील या पाऊलखुणा आहेत याची आता प्रचीती येते.

दैनंदिन व्यवस्थापनाच्या दृष्टीने त्यांचा इतर गुरूजीप्रमाणे विद्यार्थ्यांशी संबंध आला नाही. माझा विषय 'व्याकरण' होता. म्हणून त्यांच्या सहवासाचा फारसा योग आला नाही. पण 'न्यायमञ्जिरीचे' पाठ त्यांच्याकहून घेण्याचे भाग्य मला लाभले. याबद्दल मी स्वतःला धन्य मानतो. विद्यापीठवाड्यातील दोन वर्षांच्या वास्तव्यानंतर काही वर्षातच मी न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे या प्रशालेचा सुपरिन्टेण्डन्ट म्हणून काम पाहात होतो. त्यावेळचा एक प्रसंग. वार्षिक परीक्षेचे निकाल लागले होते आणि कवीश्वर गुरूजींच्या अगदी जवळच्या नातलगांपैकी एकजण मला भेटायला आले. त्यांचा पाल्य अगदी थोड्या गुणांनी नापास होत होता. गुरूजींच्या अगदी निकटवर्तीयांपैकी ती व्यक्ती होती हे मला माहीत होते. त्यांच्या पाल्याला उत्तीर्ण करण्याची विनंती धुडकावणे माझ्या जीवावर आले. पण उत्तीर्णतेचे नियम बाजूला ठेवून त्यांच्या पाल्याला उत्तीर्ण करणे ही गोष्टही माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला पटत नव्हती. मी त्या पालकांना दुसरे दिवशी यायला सांगितले. त्याचदिवशी संध्याकाळी मी कवीश्वर गुरूजींना भेटलो, सकाळची गोष्ट त्यांच्या कानी घातली व पालकांची विनंती मान्य करण्याच्या बाबतीत मी अगतिक असल्याचे त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी पुढील आशयाच्या शब्दात मला मोठा दिलासा दिला. ते म्हणाले, 'हे पहा जोशी, तुम्ही शाळेच्या नियमात बसणाऱ्या गोष्टींचाच विचार करा. मोहाने किंवा कोणाच्या दडपणाने नियमबाह्य निर्णय कधीही घेऊ नका. केवळ या पाल्याच्याच नव्हे तर माझ्या किंवा प्रत्यक्ष तुमच्या मुलाच्या बाबतीतही असा प्रसंग उद्भवला तरी नियमानुसार निर्णय घ्या. त्या बाबतीत तडजोड करू नका.' या आशयाचा त्यांचा संदेश मला पुढील आयुष्यात अनेक प्रसंगी मार्गदर्शक ठरला. असे हे आमचे कवीश्वर गुरूजी अनेकांचे आध्यात्मिक गुरू झाले आहेत. त्यांच्या देहान्तानंतरही ते अनेकांना प्रेरणा देत राहातील. जीवन्मुक्ताची लक्षणे आपण आध्यात्मिक ग्रंथातून वाचत असतो. पण दत्तमहाराजांच्या रूपाने एक जीवन्मुक्त योगी आपल्यात वावरत होता. ज्यांना त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभला ते खरोखरीच धन्य !

मनीषा, ३४, गिरिजा सोसायटी, पौड रोड, पुणे ३८

उत्तम दर्जाच्या व टिकाऊ
बनियन आणि अंडरवेअरकरता एकमेव
विश्वसनीय नाव
**युनायटेड होजियरी**
शनिवार पेठ, पुणे ४११०३०







# भक्तिमार्गाचे थोर साहित्यिक

## कै. पु. वि. बोबडे

**ग. वा. कवीश्वर**

काही श्रेष्ठ मराठी भक्तिरचनांचा उत्कृष्ट इंग्रजी भाषांतराद्वारे व्यापक प्रसार करून स्वतःही तशीच रचना करणारे श्री. पु. वि. बोबडे नुकतेच काही दिवसांपूर्वी कैलासवासी झाले.

सन १९१६ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पुनवट गावी जन्म पावलेले पुरुषोत्तम विठ्ठल बोबडे, नागपूर व वाराणसीला उच्च शिक्षण घेऊन, मध्यप्रदेश राज्य सहकारी बँकमध्ये उच्च पदावर सेवा करीत सन १९७६ मध्ये सेवानिवृत्त झाले.

बँकेत कार्यरत असतानाच सन १९६५ मध्ये At thy feet ही त्यांची भक्तिपूर्ण इंग्रजी रचना प्रकाशित झाली. रवीन्द्रनाथांच्या गीतांजली चे स्मरण करून देणाऱ्या या रचनेची चक्रवर्ती राजगोपालाचार्य, राज्यपाल पाटसकर, मामासाहेब दांडेकर आदि अनेकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. त्यानंतर स्वतः त्यांनीच केलेले त्याचे मराठी रूपांतर 'देवाचिये द्वारी' प्रकाशित होऊन, मराठी वाचकांना संतवृत्तीच्या या साहित्यिकाचा प्रत्यक्ष परिचय झाला. स्थलसंकोचास्तव त्यातील एकच मार्मिक उद्धरण येथे देतो. ''*हे प्रभो, ज्या ज्या वेळी तुझे स्तवन करावयास मी तुझ्यापुढे उभा राहतो, त्या त्या वेळी तुझा महिमा वर्णन करावयास उचित असे शब्द मला सुचत नाहीत, अन् मग स्तवन न करताच तुला केवळ प्रणिपात करून मी तेथून माघारी फिरतो.*

*ज्यावेळी ऐहिक लाभाच्या अपेक्षेने मी तुझ्यासमोर उभा ठाकतो त्यावेळी माझी मलाच लाज वाटावयास लागते. अन् मग पश्चात्तापाचे चार अश्रू तुझ्या चरणांवर वाहून नि तुझ्यापुढे क्षमेची मूक याचना करून मी तेथून परत फिरतो ! जेव्हा जेव्हा मी तुझ्या दर्शनार्थ येतो तेव्हा तेव्हा मी आपली स्वतःची प्रतिमा बरोबर घेऊन येतो. पण तुझ्या सान्निध्यात येताक्षणीच मला माझ्या अहंकाराची शिसारी वाटू लागते नि मग त्या माझ्या प्रतिमेला तुझ्या चरणकमलांवर अर्पून अन् तिच्याऐवजी तुझ्या पवित्र प्रतिमेची प्रतिष्ठापना करून मी तेथून माघारी फिरतो.'*

श्री. बोबडे यांचा हा वाङ्मय व्यासंग अविरत चालू राहून, सन १९८४ मध्ये चक्रवर्ती राजगोपालाचार्यकृत 'रामकृष्ण उपनिषदम्' (तामिल)च्या इंग्रजी भाषांतराचा श्री. बोबडे यांनी केलेला मराठी अनुवाद 'श्रीरामकृष्णांच्या बोधकथा' या शीर्षकाने प्रकाशित झाला आणि आणखी तीन वर्षांनी संत ज्ञानेश्वरांच्या निवडक एकशे दहा अभंगांचे त्यांनी इंग्रजीत केलेले मधुर रूपांतर Garland of divine flowers' प्रकाशित झाले.

यानंतर दहा वर्षांनी मोरोपंतांच्या सुप्रसिद्ध 'केकावली'चे श्री. बोबडे यांनी केलले इंग्रजी भाषांतर (स्पष्टीकरणात्मक टीपांसह) दिल्लीस प्रकाशित झाले. आणि या साऱ्या प्रदीर्घ ज्ञानोपासनेवर त्यांनी सन १९९५ मध्ये The Philosophy of the Geeta या आपल्या पुस्तकाने कळस चढवला. यात गीतेच्या प्रत्येक अध्यायातील काही निवडक श्लोकांचे सर्वसामान्य जनतेला सहज समजेल व मार्गदर्शन करू शकेल अशा स्वरूपाचे स्पष्टीकरण केले आहे.

अशाप्रकारे पुरुषोत्तमपंत बोबडेंनी 'प्रपंच नेटका करीत' व त्याबरोबरच 'दिसामाजि कांहीतरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें' या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे वृत्ति बाळगून परमार्थविवेक करीत आपले जीवन सार्थक केले. वृद्धावस्थेत एका दारूण पुत्रमृत्यूचा प्रसंग त्यांच्यावर कोसळला. तोही त्यांनी सहन केला. स्वतः एक श्रेष्ठ साहित्यिक असताना त्यांनी सदैव निरहंकारी वृत्ति धारण करून इतरांच्या गुणांचा गौरव केला. 'बोद्धारो मत्सरग्रस्ताः' या मनःस्थितीपासून ते एकशे ऐंशी अंश अंतरावर राहिले.

आयुष्याच्या अंतिम दिवशी (१०/१२/१९९८) ते (मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील पांढुर्णा गावी) दुपारपावेतो रोजचे सर्व व्यवहार नेहमीप्रमाणे करीत होते. त्यानंतर त्यांना एकाएकी फार अस्वस्थ वाटू लागले. त्यांचे चिरंजीव डॉ. रमेश यांनी औषधयोजना केली; त्यामुळे त्यांना थोडे बरे वाटले व घरातील सर्वांशी त्यांनी निर्वाणीचे काही बोलणे केले. त्यानंतर त्यांची शुद्ध हरपली व एक तासाभरात ते अखेरचा श्वास घेत मृत्यूला सामोरे गेले. मृत्यूच्या काही दिवस पूर्वीच त्यांनी मला लिहिलेल्या पत्रात एक गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. 'गुजरातेत झालेल्या प्रचंड चक्रीवादळात, तसेच उत्तरप्रदेश, बिहार, आसाम व पश्चिम बंगाल या प्रांतात महापुराच्या थैमानाने हजारोंच्या वर लोक मृत्युमुखी पडले, कैक हजार जखमी झाले. बेघर झाले. निसर्गाचे हे भीषण तांडव म्हणावे की ईश्वरेच्छा म्हणावी ? काही कळत नाही. परमेश्वर अत्यंत न्यायी, दयाळू असून सर्व प्राणीमात्रांचा जनक, संरक्षक व हितकर्ता असण्याचे आपले सारे धर्मग्रंथ एकमुखाने सांगतात. असे असता आपल्याच अपत्यांवर एवढा घोर प्रसंग आणण्याइतका तो निष्ठुर आहे असे कसे म्हणता येईल ? मग ही त्याची विनाशलीला कशासाठी ? तिच्यामागे त्याचा हेतू काय ? निसर्गाचा असाच प्रकोप भूकंप, ज्वालामुखी उद्रेक इ. घटनांतही अनुभवास येतो... अध्यात्मशास्त्राशी संबद्ध या गहन समस्येला काय उत्तर देता येईल यावर मी माझ्या अल्पमतीनुसार विचार करीत होतो. तेवढ्यात जणू हा प्रश्न स्वतः ईश्वरापुढेच ठेवण्यासाठी श्री. बोबडे इहलोक सोडून केवळ लेखनाद्वारेच नव्हे तर प्रत्यक्षपणे 'देवाचिये द्वारी' निघून गेले ! मात्र यावर ईश्वराने त्यांना काय उत्तर दिले असेल ते आता स्वतः त्यांच्या द्वारे आपणास कळण्याची आशा नाही !

इंदोर